# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## दूर शिक्षण केंद्र

# सार्वजनिक अर्थशास्त्र

## (Public Economics)

(शैक्षणिक वर्ष २०१८-१९ पासून)

**एम. ए. भाग-१**

**अर्थशास्त्र पेपर EC-3**

**सत्र २**

© **कुलसचिव,** शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर (महाराष्ट्र)
**प्रथमावृत्ती :** २०१८
एम. ए. भाग - १ सत्र २ करिता (सार्वजनिक अर्थशास्त्र)
सर्व हक्क स्वाधीन. शिवाजी विद्यापीठाच्या परवानगीशिवाय कोणत्याही प्रकाराने नक्कल करता येणार नाही.

**प्रती : १,५००**

■

**प्रकाशक :**
**डॉ. व्ही. डी. नांदवडेकर**
कुलसचिव,
शिवाजी विद्यापीठ,
कोल्हापूर - ४१६ ००४.

■

**मुद्रक :**
**श्री. बी. पी. पाटील**
अधीक्षक,
शिवाजी विद्यापीठ मुद्रणालय,
कोल्हापूर - ४१६ ००४.

■

ISBN- 978-81-940444-2-0

★ दूरशिक्षण केंद्र आणि शिवाजी विद्यापीठ याबद्दलची माहिती पुढील पत्त्यावर मिळू शकेल.
शिवाजी विद्यापीठ, विद्यानगर, कोल्हापूर-४१६ ००४ (भारत)

★ दूर शिक्षण विभाग-विद्यापीठ अनुदान आयोग, नवी दिल्ली यांच्या विकसन अनुदानातून या साहित्याची निर्मिती केली आहे.

## दूर शिक्षण केंद्र, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

### ■ सल्लागार समिती ■

**प्रा. (डॉ.) डी. बी. शिंदे**
मा. कुलगुरू,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) डी. टी. शिर्के**
प्र-कुलगुरू,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) एम. एम. साळुंखे**
माजी कुलगुरू,
यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक

**प्रा. (डॉ.) के. एस. रंगाप्पा**
माजी कुलगुरू,
म्हैसूर विद्यापीठ, म्हैसूर

**प्रा. पी. प्रकाश**
अतिरिक्त सचिव-II
विद्यापीठ अनुदान आयोग, नवी दिल्ली

**प्रा. (डॉ.) सीमा येवले**
गीत-गोविंद, फ्लॅट नं. २,
११३९ साईक्स एक्स्टेंशन,
कोल्हापूर-४१६००१

**प्रा. (डॉ.) पी. एस. पाटील**
I/c अधिष्ठाता, विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखा,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) ए. एम. गुरव**
I/c अधिष्ठाता, वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखा,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) भारती पाटील**
I/c अधिष्ठाता, मानवविज्ञान विद्याशाखा,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) पी. डी. राऊत**
I/c अधिष्ठाता, आंतर-विद्याशाखीय अभ्यास विद्याशाखा
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**डॉ. व्ही. डी. नांदवडेकर**
कुलसचिव,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**श्री. एम. ए. काकडे**
संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**श्री. व्ही. टी. पाटील**
वित्त व लेखा अधिकारी,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) एम. ए. अनुसे** (सदस्य सचिव)
संचालक, दूरशिक्षण केंद्र,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

### ■ अर्थशास्त्र समन्वय समिती ■

अध्यक्ष - **डॉ. पी. एस. कांबळे**
अर्थशास्त्र अधिविभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

- **डॉ. तेजस्विनी मुडेकर**
  कमला कॉलेज, कोल्हापूर
- **डॉ. वाय. एस. गायकवाड**
  विलिंग्डन कॉलेज, विश्रामबाग, सांगली.

दूर शिक्षण केंद्र
शिवाजी विद्यापीठ,
कोल्हापूर

**सार्वजनिक अर्थशास्त्र**
**एम. ए. भाग–१ : पेपर** EC-3

## अभ्यास घटकांचे लेखक


| लेखक | घटक क्रमांक |
|---|---|
| **डॉ. संतोषकुमार ब. यादव**<br>अर्थशास्त्र विभाग, देवचंद कॉलेज, अर्जुननगर | १ |
| **प्रा. डॉ. पी. एस. कांबळे**<br>अर्थशास्त्र विभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर | २ |
| **प्रा. एस. टी. कोंबडे**<br>अर्थशास्त्र अधिविभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर | ३ |
| **प्रा. डॉ. सुभाष जाधव**<br>डी. आर. माने कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, कागल | ४ |

■ **संपादक** ■

**प्रा. डॉ. पी. एस. कांबळे**
अर्थशास्त्र विभाग,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# प्रस्तावना

सन २००७ पासून शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर यांच्या वतीने दूर शिक्षण केंद्रामार्फत बहि:स्थ विद्यार्थ्यांसाठी दूर शिक्षण कार्यक्रम राबविण्यात येत आहे. पदव्युत्तर विद्यार्थ्यांना दूरशिक्षण केंद्राच्या वतीने स्वयं अध्ययन पुस्तिका पुरविण्याचे ठरविण्यात आले आहे. त्या कार्यक्रमाचा एक भाग म्हणून जून २०१८ पासून एम. ए. भाग एक सत्र-२ अर्थशास्त्र विषयाच्या सुधारित अभ्यासक्रमानुसार पेपर क्रमांक ३ (आवश्यक विषय) ''सार्वजनिक अर्थशास्त्र'' या विषयाची स्वयं अध्ययन पुस्तिका तयार केली आहे. अर्थशास्त्र विषयाच्या तज्ञ, जाणकार, अनुभवी व अभ्यासू लेखकांकडून सुधारित अभ्यासक्रमानुसार स्वयंअध्ययन पुस्तिका लिहून घेतली आहे. ''सार्वजनिक अर्थशास्त्र'' या आवश्यक विषयाची मांडणी साध्या, सोप्या व दूर शिक्षण केंद्राच्या विद्यार्थ्यांना समजेल अशा भाषेत करण्यात आलेली आहे. ''सार्वजनिक अर्थशास्त्र'' या विषयातील संकल्पना, सिद्धांत सोप्या पद्धतीने मांडले असून, संकल्पनात्मक स्पष्टता, सिद्धांताची नेमकी मांडणी, उदाहरणे, आकृत्या, कोष्टके, समिकरणे, सांख्यकिय इत्यादी समजेल या पद्धतीने मांडली आहेत. ''सार्वजनिक अर्थशास्त्र'' या विषयाची सैद्धांतिक मांडणी साध्या व सोप्या पद्धतीने करण्यात आलेली आहे.

सार्वजनिक अर्थशास्त्र या विषयातील शासनाची भूमिका, सार्वजनिक निवड आणि सार्वजनिक धोरण सिद्धांत, सार्वजनिक खर्च सिद्धांत व प्रकल्प मुल्यमापन व करारोपनाचा सिद्धांत आणि सार्वजनिक कर्ज या घटकांचे सविस्तरपणे विश्लेषण केलेले आहे.

स्वयं अध्ययन पुस्तिका पूर्ण करण्यासाठी घटकलेखकांनी दर्जेदार लेखन दिले. शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर, दूर शिक्षण केंद्राचे प्रमुख, सर्व कर्मचारी, सेवक वर्ग, छपाई विभाग, प्रकाशन विभाग यांनी विशेष प्रयत्न करून पुस्तिका प्रकाशित केली त्याबद्दल संपादक मंडळ आपले हार्दिक आभारी आहे. एम. ए. भाग-१ सत्र-२ अर्थशास्त्र, सार्वजनिक अर्थशास्त्र हे पुस्तक तयार करण्यासाठी ज्यांनी ज्यांनी सहकार्य केले त्या सर्वांचे हार्दिक आभार.

**■ संपादक ■**

**प्रा. डॉ. पी. एस. कांबळे**

अर्थशास्त्र विभाग,

शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## दूर शिक्षण केंद्र, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर


**अभ्यासमंडळ : अर्थशास्त्र**

अध्यक्ष – **डॉ. अनिलकुमार कृष्णराव वावरे**
छत्रपती शिवाजी कॉलेज, सातारा

- **प्रा. डॉ. पी. एस. कांबळे**
  अर्थशास्त्र अधिविभाग,
  शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
- **डॉ. श्रीमती विद्या कट्टी**
  अर्थशास्त्र अधिविभाग,
  शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
- **डॉ. संतोषकुमार बाबुराव यादव**
  देवचंद कॉलेज, अर्जुननगर, जि. कोल्हापूर
  जि. कोल्हापूर
- **डॉ. बाळासो पांडुरंग पाटील**
  यशवंतराव चव्हाण कॉलेज, इस्लामपूर, जि. सांगली
- **डॉ. नेताजी व्ही. पोवार**
  कमला कॉलेज, कोल्हापूर
- **डॉ. निवास जाधव**
  राजा शिव छत्रपती आर्टस ॲण्ड कॉमर्स कॉलेज,
  महागांव, जि. कोल्हापूर
- **डॉ. एस. एम. भोसले**
  छत्रपती शिवाजी कॉलेज, सातारा
- **डॉ. विजय भिमाप्पा देसाई**
  राजर्षी शाहू आर्टस ॲण्ड कॉमर्स कॉलेज, रुकडी
  जि. कोल्हापूर
- **डॉ. विजयकुमार आप्पासाहेब पाटील**
  आर्टस ॲण्ड सायन्स कॉलेज, आटपाटी,
  जि. सांगली
- **प्रा. डॉ. सिद्धाप्पा टिप्पान्ना बागलकोटे**
  डिपार्टमेंट ऑफ स्टडीज इन इकॉनॉमिक्स,
  कर्नाटक विद्यापीठ, धारवाड (कर्नाटक राज्य)
- **डॉ. वाय. एस. गायकवाड**
  विलिंग्डन कॉलेज, सांगली.
- **प्रा. डॉ. जे. एफ. पाटील**
  अक्षय, बी–६, तारा टेसेसेस, एस.एस.सी. बोर्ड रोड,
  सम्राट नगर, कोल्हापूर
- **डॉ. राहूल शंकरराव म्होपरे**
  देवचंद कॉलेज, अर्जुननगर, ता. कागल, जि. कोल्हापूर
- **श्री. सुर्यकांत बाबूराव पाटील–बुद्धिहाळकर**
  सागर, २१०३/७+८, ई वॉर्ड, रुक्मीनीनगर, कोल्हापूर

# अनुक्रमणिका


| घटक क्रमांक | घटकाचे शीर्षक | पान क्रमांक |
|---|---|---|
| १. | शासनाची भूमिका | १ |
| २. | सार्वजनिक निवड आणि सार्वजनिक धोरण सिद्धांत | ४९ |
| ३. | सार्वजनिक खर्च सिद्धांत व प्रकल्प मुल्यमापन | ८१ |
| ४. | करारोपनाचा सिद्धांत आणि सार्वजनिक कर्ज | १०८ |

■ **विद्यार्थ्यांना सूचना**

प्रत्येक घटकाची सुरुवात उद्दिष्टांनी होईल. उद्दिष्टे दिशादर्शक आणि पुढील बाबी स्पष्ट करणारी असतील.

१. घटकामध्ये काय दिलेले आहे.

२. तुमच्याकडून काय अपेक्षित आहे.

३. विशिष्ट घटकावरील कार्य पूर्ण केल्यानंतर तुम्हाला काय माहीत होण्याची अपेक्षा आहे.

स्वयं मूल्यमापनासाठी प्रश्न दिलेले असून त्यांची अपेक्षित उत्तरेही देण्यात आलेली आहेत. त्यामुळे घटकाचा अभ्यास योग्य दिशेने होईल. तुमची उत्तरे लिहून झाल्यानंतरच स्वयं अध्ययन साहित्यामध्ये दिलेली उत्तरे पाहा. ही तुमची उत्तरे (किंवा स्वाध्याय) आमच्याकडे मूल्यमापनासाठी पाठवायची नाहीत. तुम्ही योग्य दिशेने अभ्यास करावा, यासाठी ही उत्तरे 'अभ्यास साधन' (Study Tool) म्हणून उपयुक्त ठरतील.

प्रिय विद्यार्थी,

हे स्वयंअध्ययन साहित्य या पेपरसाठी एक पूरक अभ्याससाहित्य म्हणून आहे. असे सूचित करण्यात येते की, विद्यार्थ्यांनी २०१७-१८ पासून तयार केलेला नवीन अभ्यासक्रम पाहून त्याप्रमाणे या पेपरच्या सखोल अभ्यासासाठी संदर्भपुस्तके व इतर साहित्याचा अभ्यास करावा.

# घटक क्रमांक – १
# शासनाची भूमिका
# (Role of Government)

**अनुक्रम**

१.० उद्दिष्ट्ये :

१.१ प्रस्तावना

१.२ अभ्यास - विषय

१.२.१ मिश्र अर्थव्यवस्थेतील शासनाची भूमिका:
आर्थिक नियोजन व विकासातील शासनाची भूमिका

स्वयं अध्ययनासाठी प्रश्न - १

१.२.२ मानवी गरजा आणि वस्तूचे वर्गीकरण, अर्थ आणि वैशिष्ट्ये; खाजगी वस्तू, सार्वजनिक वस्तू आणि गुणात्मक वस्तू

स्वयं -अध्ययनासाठी प्रश्न-२

१.२.३ बाजार अपयशाची कारणे; अपूर्णता, घटता उत्पादन खर्च, बहिर्गतता

स्वयं अध्ययनासाठी प्रश्न -३

१.३ सारांश

१.४ संज्ञा

१.५ स्वयं - अध्ययनासाठीच्या प्रश्नांची उत्तरे

१.६ प्रश्नावली

१.७ पुढील अभ्यासासाठी संदर्भ

## १.० उद्दिष्टये

प्रस्तुत घटकांच्या अभ्यासानंतर आपल्याला

१) मिश्र अर्थव्यवस्थेतील शासनाची भूमिका समजून घेता येईल.

२) मिश्र अर्थव्यवस्थेतील सरकारच्या भूमिकेचे परीक्षण करता येईल.

३) आर्थिक नियोजन व विकासाचा हस्तक म्हणून सरकारला करावी लागणारी कार्ये स्पष्ट करता येतील.

४) देशाच्या आर्थिक विकास व नियोजनातील शासनाची भूमिका विशद करता येईल.

५) खाजगी वस्तू, सार्वजनिक वस्तू आणि गुणात्मक वस्तूंतील फरक स्पष्ट करता येईल.

६) सार्वजनिक वस्तूंबाबत बाजार अपयशाची संकल्पना समजून घेता येईल.

७) अपूर्ण बाजारपेठ आणि घटता उत्पादन खर्च यांच्यातील संबंध स्पष्ट करता येईल.

८) बहिर्गततेची संकल्पना समजून घेता येईल.

९) शासनाच्या भूमिकेचे व्यावहारिक उपयोजन करता येईल.

## १.१ प्रस्तावना :

आर्थिक विकासाची संकल्पना अतिशय व्यापक व गुंतागुंतीची असून ती सतत चालू राहणारी प्रक्रिया आहे. त्याला अनेक पैलू आहेत. कोणत्याही देशाच्या सर्वांगीण आर्थिक विकासामध्ये आर्थिक, सामाजिक, शैक्षणिक, पायाभूत सोयी-सुविधा या व यासारख्या इतर संबंधित बाबींचा आढावा घेणे आवश्यक ठरते. प्रा. जी. एम्. मायर यांच्या मते, 'ज्यामुळे दीर्घकाळात देशाचे वास्तव दरडोई दीर्घकाळ सतत चालू राहणारी भौतिक कल्याणाची प्रगती, की जिचा पत्यय समाजात प्राप्त होणाऱ्या वस्तू व सेवा यांच्या वाढत्या स्रोतात विकासाच्या प्रक्रियेत आणि सर्वच प्रकारच्या अर्थव्यवस्थांमध्ये आर्थिक विकासाला चालना देण्यामध्ये शासन महत्त्वाची भूमिका पार पाडते.

सार्वजनिक आयव्यय किंवा सार्वजनिक अर्थकारण ही अर्थशास्त्राची एक महत्त्वाची शाखा असून यामध्ये शासनाच्या निरनिराळ्या वित्तीय व्यवहारांचा समावेश होतो. साधनसामग्रीचे संकलन करणे त्याचे युक्त वाटप करणे वृद्धीचा चालना देणे, देशात आर्थिक स्थैर्य राखणे यासारखी आर्थिक विकासाची उद्दिष्टे साध्य करण्यासाठी सार्वजनिक आयव्ययाचा किंवा राजकोषीय धोरणाचा उपयोग करता येतो. सार्वजनिक सत्तांचे म्हणजेच केंद्र सरकार, राज्य सरकार, स्थानिक स्वराज्य संस्था यांचे उत्पन्न, उत्पन्नाचे मार्ग, त्याचा अर्थव्यवस्थेच्या विविध घटकांवर होणारा अनुक्रम आणि प्रतिकूल परिणाम, विविध उद्दिष्टे साध्य करण्यासाठी केला जाणारा सार्वजनिक खर्च, विविध सरकारांकडून विविध पातळ्यांवर आणि विविध घटकांवर केल्या जाणाऱ्या घटकांवर सार्वजनिक खर्चाचा होणारा परिणाम, सरकारकडून उभारले जाणारे कर्ज, त्याचे मार्ग, त्याचा अर्थव्यवस्थेच्या सार्वजनिक आणि खाजगी क्षेत्रांवर होणारा परिणाम या सर्वांचा सार्वजनिक आयव्ययात किंवा सार्वजनिक अर्थकारणांत (Public Economics) अभ्यास केला जातो. सार्वजनिक अयव्यय किंवा राजकोषीय धोरणांद्वारे सरकार देशाच्या आर्थिक विकासामध्ये महत्त्वाची भूमिका पार पाडते.

देशाच्या आर्थिक विकासात अर्थव्यवस्थेतील विविध क्षेत्रे घटक वेगवेगळ्या प्रकारे, वेगवेगळ्या पातळीवर योगदान देत असतात. देशाच्या आर्थिक विकासाचा वेग वाढविण्यासाठी शेती, उद्योग, सेवा क्षेत्र, पायाभूत सुविधा क्षेत्र, परकीय क्षेत्र यांचा विकास होणे आवश्यक असते. या क्षेत्रांच्या विकासावरच देशाचा आर्थिक विकास अवलंबुन असतो. देशाचे राष्ट्रीय उत्पन्न वाढविले, देशात पायाभूत सोयीसुविधांची पुरेशी निर्मिती होणे, लोकांच्या राहणी मानाचा दर्जा सुधारेल यासाठी या क्षेत्रांची भूमिका महत्त्वाची ठरते. अर्थव्यवस्थेची ही सर्वक्षेत्रे परस्परावलंबी व परस्परपूरक आहेत. एकमेकांच्या विकासाला मदत करणारी, चालना देणारी आहेत. विकास प्रक्रियेत या घटकांना अनन्यसाधारण महत्त्वव आहे. या क्षेत्रांच्या विकासाला चालना देणे, देशाच्या आर्थिक विकासात त्याचे योगदान वाढविणे आणि एकंदर आर्थिक विकास प्रक्रिया गतीमान करणे यामध्ये शासन महत्त्वाची भूमिका पार पाडते. प्रस्तूत घटकात आपण मिश्र अर्थव्यवस्थेतील शासनाची भूमिका; तसेच आर्थिक नियोजन व विकासातील शासनाची भूमिका अभ्यासणार आहोत. हे अभ्यासत असतानाच आपण मिश्र अर्थव्यवस्थेतील शासनाच्या भूमिकेने परीक्षण करणार आहोत. हे परीक्षण करतानाच भारतीय अर्थव्यवस्थेचा आढावा घेणार आहोत.

अर्थशास्त्रात भिओनेल रॉबिन्सन यांच्या मते, मानवी गरजा या अमर्यादित असतात आणि त्या गरजांची पूर्तता करणारी साधने मात्र मर्यादितच असतात आणि ती साधने पर्यायी उपयोगाची असतात. मानवाच्या विविध गरजा भागविणे हा वेगवेगळ्या प्रकारच्या वस्तूंचा गुणधर्म आहे. काही वस्तू या सार्वजनिक तर काही खाजगी वस्तू आणि गुणात्मक वस्तू असतात. मानवी गरजा आणि वस्तूंचे वर्गीकरण अभ्यासात असताना या वस्तूंचा नेमका अर्थ आणि त्यांची वैशिष्ट्ये आपण दुसऱ्या उपघटकांत अभ्यासणार आहोत.

अर्थव्यवस्थेचा संतुलित विकास होण्यासाठी देशात उपलब्ध असलेल्या विविध प्रकारच्या साधनसामग्रीचे वाटप कार्यक्षमपणे होणे आवश्यक असते. साधनसामग्रीचे वाटप कार्यक्षमपणे करण्यास बाजार व्यवस्था अयशस्वी ठरल्यास त्यास बाजार अपयश असे म्हणतात. या बाजार अपयशाची कारणे; अपूर्ण बाजार पेठ आणि घटता उत्पादन खर्च, यांच्यातील संबंध आणि बहिर्गतता या घटकांचा अभ्यास आपण तिसऱ्या घटकांत करणार आहोत.

## १.२ अभ्यास विषय :

या घटकात आपण देशाच्या आर्थिक विकासातील स्थापनाची भूमिका सविस्तरपणे अभ्यासणार आहोत. यासाठी प्रामुख्याने खालील मुद्यांवर सविस्तर विवेचन केले आहे.

### १.२.१ मिश्र अर्थव्यवस्थेतील शासनाची भूमिका :

मिश्र अर्थव्यवस्थेतील शासनाची भूमिका अभ्यासण्यापूर्वी आपण मिश्र अर्थव्यवस्था म्हणजे काय ते पाहू. अर्थव्यवस्थेचे किंवा आर्थिक रचनेचे उत्पादक साधनसंपत्तीच्या मालकीनुसार तीन प्रकार केले जातात.

(अ) भांडवलशाही अर्थव्यवस्था

(ब) समाजवादी अर्थव्यवस्था

(क) मिश्र अर्थव्यवस्था

ज्या अर्थव्यवस्थेमध्ये उत्पादनाची साधने खाजगी मालकीची असतात आणि उत्पादन, विभाजन किंमत यांचे कार्य बाजार यंत्रणे मार्फत होते. त्यास भांडवलशाही अर्थ व्यवस्था असे म्हणतात. अमेरिका, फ्रान्स, इंग्लंड, कॅनडा, जर्मनी, जपान यासारख्या देशात भांडवलशाही अर्थव्यवस्था असलेली दिसून येते. भांडवलशाही अर्थव्यवस्थेची वैशिष्ट्ये पुढीलप्रमाणे सांगता येतील.

१. उत्पादनाचा मालकी हक्क खाजगी असतो. अर्थव्यवस्थेमध्ये उत्पादन कशाचे करावयाचे, किती करावयाचे, किती करावयाचे आणि त्यासाठी कोणत्या उत्पादन तंत्राचा वापर करावयाचा याचा निर्णय खाजगी व्यक्तींकडून घेतला जातो.

२. भांडवलशाही अर्थरचनेच्या परिचालनामध्ये नफा मिळविणे हा प्रमुख हेतू असतो.

३. भांडवलशाही अर्थव्यवस्थेमध्ये ग्राहक हा सार्वभौम असतो, तसेच तो बाजारपेठेचा राजा असल्यामुळे त्या पसंतीनुसारच उत्पादन घेतले जाते.

४. या अर्थव्यवस्थेत संयोजन कौशल्याला पूर्ण वाव असून उत्पादक व उपयोक्ता यांच्यावर कोणतीही बंधने नसतात. बाजारात पूर्ण स्पर्धा असते.

५. या अर्थव्यवस्थेत वस्तू आणि सेवांच्या किंमती बाजारात वस्तूंचा असलेली मागणी व त्या वस्तूच्या पुरवठ्याच्या साहाय्याने ठरतात. म्हणून या अर्थव्यवस्थेस बाजार अर्थव्यवस्था (market economy) असे म्हणतात.

वरील वैशिष्ट्यांच्या अभ्यासावरुन असे सांगता येते की, या अर्थव्यवस्थेत निर्हस्तक्षेप धोरणाचा किंवा हस्तक्षेप-विरहित (Laisses - Fair) नितीचा अवलंब केला जातो. ही अर्थव्यवस्था सरकारी हस्तक्षेपापासून मुक्त असावयास हषी १९ व्या शतकात ती होती. परंतु अलिकडच्या काळात भांडवलशाही अर्थव्यवस्थेतही मौलिक आणि राजकीय उपायांनी विविध आर्थिक उद्दिष्टांची पूर्तता करण्यासाठी शासकीय हस्तक्षेप वाढतो आहे.

ज्या अर्थव्यवस्थेमध्ये उत्पादनाची साधने सरकारी म्हणजेच सार्वजनिक मालकीची असतात आणि उत्पादन, विभाजन आणि किंमती यांचे कार्य सरकारमार्फत होते. त्यास समाजवादी अर्थव्यवस्था असे म्हणतात. १९९० पूर्वीचा रशिया आणि सध्या चीन ही समाजवादी अर्थव्यवस्थेची लक्षणे आहेत. समाजवादी किंवा साम्यवादी अर्थव्यवस्थेची उदाहरणे पुढीलप्रमाणे सांगता येतील.

१) उत्पादन व विभाजनाची साधने सरकारी मालकीची असतात. सर्व प्रकारच्या खाणी, शेतजमीन,

कारखाने, वित्तीय संस्था, विभाजन संस्था यांच्या वरील मालकी, त्यांचे निमंत्रण आणि व्यवस्थापन सरकारी विभागाचे असते.

२) या अर्थव्यवस्थेच्या परिचात्मनामध्ये नफा मिळविणे हा प्रमुख हेतू असत नाही. भांडवलशाही अर्थव्यवस्थेत उत्पन्न वाटपात समानता दिसून येते.

३) समाजवादी अर्थव्यवस्थेत उत्पादित सामाजिक उपयुक्त वस्तूंचा उपभोग घेण्याचे स्वातंत्र्य उपभोक्त्याला असते. वस्तू व सेवांचे उत्पादन, विभाजन, किंमती इत्यादी बद्दलचे निर्णय शासन घेत असते.

४) अर्थव्यवस्थेतील एकूण मागणी, एकूण पुरवठा, पूर्ण रोजगार, भाववाढ नियंत्रण, उत्पादन साधनांचे वाटप, राष्ट्रीय उत्पन्नाचे विभाजन, आर्थिक विकास, राहणीमानाचा दर्जा उंचावणे, मानवी कल्याण यासारखी निश्चित सामाजिक आर्थिक उद्दिष्टे साध्य करण्यासाठी देशातील उपलब्ध साधनसामग्रीचा वापर केला जातो. त्यासाठी नियोजन, अग्रकम आणि महत्त्वकांक्षी लक्ष्ये निधारित केली जातात.

५) निश्चित सामाजिक - आर्थिक उद्दिष्टे साध्य करण्यासाठी नियोजन करणे आणि अर्थव्यस्थेतील देशाच्या आर्थिक निर्णयासंबंधीचे सर्व अधिकार देशातील मध्यमवर्ती नियोजन समितीच्या असतात. अर्थव्यवस्थेतील मूलभूत प्रश्नासंबंधीचे निर्णय म्हणजेच कशाचे उत्पादन करावयाचे, किती करावयाचे आणि कसे करावे या संबंधीचे निर्णय या मंडळाकडून घेतले जातात.

वरील वैशिष्ट्यांच्या अभ्यासावरुन असे सांगता येते की, या अर्थव्यवस्थेत उत्पादन घटकांची मालकी, नियंत्रण आणि व्यवस्थापन यासंबंधीचे निर्णय सरकारकडून घेतले जाते. ही अर्थव्यवस्था पूर्णत: नियोजित व नियंत्रित असते. या अर्थव्यवस्थेतील वस्तू आणि सेवांच्या किंमती सरकार ठरविते. या अर्थाने प्राथमिक किंमती हे या अर्थव्यवस्थेचे एक महत्त्वाचे वैशिष्ट्य आहे.

ज्या अर्थव्यवस्थेत खाजगी व सार्वजनिक क्षेत्राचे सहअस्तित्त्व असते. त्याला 'मित्र अर्थव्यवस्था असे म्हणतात. या अर्थव्यवस्थेत एकाच वेळा भांडलवशाही आणि समाजवादी अर्थव्यवस्थेचे गुण आढळून येतात. भारताची अर्थव्यवस्थेच्या हे मिश्र अर्थव्यवस्थेचे एक उत्तम उदाहरण आहे. या अर्थव्यवस्थेची वैशिष्टचेची वैशिष्टये पुढील प्रमाणे सांगता येतील.

१) या अर्थव्यवस्थेत भांडवलशाही व समाजवादी अर्थव्यवस्थेच्या चांगल्या गुणांचा समन्वय असल्याने देशातील संसाधनांचे युक्त वाटप होते, तसेच किंमत यंत्रणा, नफ्याचा हेतू, उत्पादन - उपभोगाचे स्वातंत्र्य यामुळे संसाधनाचा कार्यक्षम वापर होतो.

२) अर्थव्यवस्थेत दूध, साखर, साठाग्रहे, प्रक्रिया, शेती खरेदी-विक्री यासारख्या क्षेत्रात सहकारी संस्था स्थापन करण्यास सरकारकडून प्रोत्साहन दिले जाते.

३) देशाच्या आर्थिक विकासाला चालना मिळावी, पायाभूत सोयी-सुविधा निर्माण व्हाव्यात आणि देशात मूलभूत उद्योगांची उभारणी व्हावी यासाठी सरकारकडून सार्वजनिक क्षेत्रात मोठ्या प्रमाणात गुंतवणूक केली जाते. सार्वजनिक कल्याण वाढविण्यासाठी सार्वजनिक उपक्रमांना सरकारकडून दिशा दिली जाते आणि त्यांचे नियंत्रण केले जाते.

४) देशात औद्योगिकीकरणाला चालना मिळावी, रोजगार निर्मितीची क्षमता वाढावी यासाठी सरकारकडून सार्वजनिक क्षेत्राबरोबर खाजगी क्षेत्राला वस्तू आणि सेवांच्या उत्पादन व विभाजनासाठी प्रोत्साहन दिले जाते. सार्वजनिक कल्याणात वाढ होणे आणि अर्थव्यवस्थेच्या उत्पादन आणि वितरणाच्या प्रक्रियेत अडथळा निर्माण होऊ नये यासाठी सरकार या क्षेत्रावर नियंत्रण ठेवू शकते.

५) समाजवादी अर्थव्यवस्थेप्रमाणे याही अर्थव्यवस्थेत मध्यवर्ती नियोजन मंडळामार्फत देशाच्या मूलभूत आर्थिक प्रश्नासंबंधी नियोजन केले जाते. किंमत यंत्रणेतील दोष दूर करण्यासाठी सरकार अर्थव्यवस्थेचे नियंत्रण करते. आर्थिक नियोजनाच्या कार्यक्रमाच्या आधारावर अर्थव्यवस्था चालते.

वरील वैशिष्ट्यांच्या अभ्यासावरुन असे सांगता येते की, मिश्र अर्थव्यवस्थेत उत्पादन घटकांची मालकी नियंत्रण आणि व्यवस्थापन यासंबंधीचे निर्णय हे सरककार आणि खाजगी क्षेत्रामध्ये विभागाले जातात. या अर्थव्यवस्थेत भांडवलशाही आणि समाजवादी अर्थव्यवस्थेचे मिश्रण दिसून येते. १९ व्या शतकात सर्वत्र भांडवल शाहीचा पगडा होता. २० व्या शतकात मात्र भांडवलशाही अर्थव्यवस्थेचे दोष उघड होऊ लागल्याने काही देशांनी समाजवादी अर्थव्यवस्थेचा पुरस्कार केला. तर भारतासारख्या काही देशांनी भांडवलशाही व समाजवादाचे मिश्रण असणाऱ्या मिश्र अर्थव्यवस्थेचा स्वीकार केला. या अर्थव्यवस्थेत सरकार सार्वजनिक संमजा विस्तार करीत असतानाच खाजगी क्षेत्राला सुद्धा प्रोत्साहन देते.

मिश्र अर्थव्यवस्थेत आर्थिक विकासाला चालना देण्यामध्ये शासन महत्त्वाची भूमिका बजावते. ॲऽम स्मिथ व सनातनवादी अर्थशास्त्रज्ञांनी भांडवलशाही अर्थरचनेत स्वयंचलित कार्यपद्धतीमुळे शासनाच्या कोणत्याही हस्तक्षेपाची गरज नसते. असे मत व्यक्त केले. शासनाचे निर्हस्तक्षेप नीती (Laissel Fair) अवलंबिणे महत्त्वाचे असून व्यक्ती, संस्था यांच्या खाजगी आर्थिक व्यवहारात ढवळाढवळ करू नये असे मत व्यक्त केले. शासनाच्या अर्थव्यवस्थेतील कमीत कमी हस्तक्षेपामुळे समाजाचे महत्तम करण्यासाठी होऊन व्यापक समाजाहित साध्य होईल असे मत मांडले. ॲऽम स्मिथच्या मते, शासनाने अर्थव्यवस्थेत खालील कार्ये करावीत असे म्हटले.

१) परकीय आक्रमणापासून देशाचे संरक्षण करावे आणि अंतर्गत सुव्यवस्था राखले.

२) कायदा व न्यायव्यवस्थेसाठी आदर्श प्रशासन यंत्रणा असावी.

३) आरोग्य, शिक्षण, रस्ते, रेल्वे, पोस्ट, चालन व्यवस्था यासारख्या सार्वजनिक उपक्रमांच्या सेवा पुरविणे.

४) अर्थव्यवस्थेतील किंमत यंत्रणा मजबूत करून खाजगी उपक्रमांना प्रोत्साहन देणे.

वरील कार्याशिवाय शासनाने देशात कोणतीही कार्ये करू नयेत. तसेच अर्थव्यवस्थेतील किंमत यंत्रणेच्या कार्यवाहीत शासनाची भूमिका तटस्थ असावी. वस्तू आणि सेवांच्या किंमती बाजार यंत्रणेमार्फत () निश्चितच व्हाव्यात. म्हणजेच वस्तूची किंमत ही त्या वस्तूची मागणी व त्या वस्तूच्या पुरवठ्याने निश्चित व्हावी. आंतरराष्ट्रीय व्यापाराचे संरक्षणाचे धोरण राबवू नये से या अर्थशास्त्रज्ञांचे मत होते. विसाव्या

शतकात भांडवलशाही अर्थव्यवस्थेतील दोष स्पष्ट झाल्यानंतर शासनाच्या भूमिकेविषयी सनातनवादी भूमिकेचा पुनर्विचार होऊ लागला. विशेषत: १९२९ च्या जागतिक महामंदीनंतर देशाच्या आर्थिक विकासात, आर्थिक स्थैर्य आणिण्याच्या दृष्टीने शासनाची भूमिका अधिक व्यापक व महत्त्वाची मानली गेली. दुसऱ्या महायुद्धानंतर बहुसंख्य देशांनी कल्याणकारी राज्याच्या संकल्पनेचा विचार महत्त्वाचा मानल्याने देशाच्या अर्थव्यवहारात शासनाच्या कार्यात वाढ होत गेली. आर्थिक विकासाचा वेग वाढविण्यासाठी आर्थिक व्यवहाराचा वेग वाढविणे, आणि त्यासाठी सार्वजनिक क्षेत्राचा विस्तार करणे, अर्थव्यवस्थेच्या विविध क्षेत्रांत गुंतवणूकीसाठी खाजगी क्षेत्राला प्रोत्साहन देणे, सर्वसामान्यांचे जीवनमान सुधारणे इत्यादी उद्दिष्टे साध्य करण्यासाठी विकसनशील, अविकसित देशांतील शासनाने मिश्र अर्थव्यवस्थेच्या माध्यमातून प्रयत्न केले. मिश्र अर्थव्यवस्थेतील शासनाची भूमिका विशद करताना पुढील मुद्दे विचारात घेणे आवश्यक ठरते.

१) सार्वजनिक क्षेत्राचा विकास करणे

२) खाजगी क्षेत्राचा विकास करणे

३) संयुक्त क्षेत्राचा विकास करणे

४) सहकारी संस्थांना प्रोत्साहन देणे

५) सार्वजनिक व खाजगी क्षेत्रात योग्य समन्वय राखणे

६) खाजगी क्षेत्रावर नियंत्रण राखणे

७) समतोल प्रादेशिक विकास साधणे

८) विकास प्रकल्पांसाठी निधी उपलब्ध करुन देणे

९) कल्याणकारी राज्याची भूमिका बजावणे.

वरील मुद्यांची चर्चा खालीलप्रमाणे करता येईल.

**१) सार्वजनिक क्षेत्राचा विकास करणे :**

अल्प विकसित देशात मूलभूत सामाजिक - आर्थिक सुविधांच्या निर्मिती साठी खाजगी क्षेत्राकडून पुरेसा प्रतिसाद मिळण्याची अपेक्षा नसते. टपाल, दुर्गम भागातील -खेड्यातील वाहतूक सेवा, बँक व्यवसाय व विस्तार, वीजनिर्मिती, मोठी धरणे अशा प्रकाशाच्या सुविधांमध्ये दीर्घकालीन गुंतवणूक असल्या कारणाने फलधारणा काळ (cestation period) मोइा असतो. तसेच अशा प्रकल्पांमध्ये गुंतवणूकही मोठी करावी लागते. परिणामी वाहतूक व पनावळ्या, पोलाद, लोखंड यासारख्या क्षेत्रात सार्वजनिक क्षेत्राचा विकास घडवून आणण्याची जबाबदारी शासनाचा पार पाडावी लागते.

स्वातंत्र्यानंतर भारताने देशाच्या सर्वांगीण आर्थिक विकासासाठी मिश्र अर्थव्यवस्थेचा स्वीकार केला. देशाच्या आर्थिक विकासासाठी सार्वजनिक क्षेत्रातील उद्योगावर भर देण्याचे निश्चित केले. त्याचे प्रतीबिंब सरकारने जाहीर केलेल्या १९४८ च्या औद्योगिक धोरणांमध्ये पडलेले दिसून येते. त्यानंतरच्या औद्योगिक धोरणांमध्येही सार्वजनिक क्षेत्राचा विस्तार वाढविण्यासाठी प्रयत्न केले गेले. खालील उद्दिष्टे साध्य करण्यासाठी मिश्र अर्थव्यवस्थेत सार्वजनिक क्षेत्राचा विकास केला जातो.

१) पायाभूत सुविधांची निर्मिती करणे

२) मोठ्या गुंतवणूकीच्या विकास प्रकल्पांसाठी निधी उपलब्ध करून देणे. त्यासाठी संस्थात्मक उभारणी करणे.

३) उत्पन्न आणि संपत्तीच्या पुनर्वितरणास प्रोत्साहन देणे.

४) अर्थव्यवस्थेत रोजगार संधी निर्माण करणे.

५) समतोल प्रादेशिक विकास साधणे

६) लघु-उद्योग व पूरक उद्योगांच्या विकासास मदत करणे.

७) एका बाजूला निर्यातीस प्रोत्साहन देणे आणि दुसऱ्या बाजूला आयात पर्यायीकरणाचे धोरण अवलंबिले.

**२) खाजगी क्षेत्राचा विकास करणे :**

मिश्र अर्थव्यवस्थेत देशाच्या जलद आर्थिक विकासासाठी शासन सार्वजनिक क्षेत्रांबरोबर खाजगी क्षेत्राचा विकास करण्याकडेही पुरेसे लक्ष देते. काही क्षेत्रे सार्वजनिक क्षेत्रासाठी राखीव ठेवून उर्वरित क्षेत्रांत गुंतवणूकीसाठी खाजगी क्षेत्राचा वाव दिला जातो. या अर्थव्यवस्थेतील काही उद्योग सार्वजनिक व खाजगी अशा दोन्ही क्षेत्रांकडे असतात. या दोन्ही क्षेत्रांचा विकास परस्परपूरक ठरावा आणि त्यातून देशाच्या आर्थिक विकासाची निश्चित उद्दिष्टे साध्य व्हावी ही यामागील भूमिका असते. अर्थव्यवस्थेच्या विविध क्षेत्रांत खाजगी क्षेत्रांकडून अधिकाअधिक गुंतवणूक व्हावी. या क्षेत्राचा विकास व्हावा यासाठी या क्षेत्रास आवश्यक सेवासुविधा, करसवलती, अनुदाने शासनाकडून उपलब्ध करुन दिल्या जातात.

स्वातंत्र्यानंतर भारताने समतोलित आर्थिक विकासासाठी आणि विशेषत: औद्योगिकीकरणासाठी सार्वजनिक क्षेत्राबरोबरच खाजगी क्षेत्राच्या वाढीलाही प्रोत्साहन दिले. खाजगी क्षेत्राच्या विकासासाठी सरकारने वेळोवेळी सादर केलेल्या औद्योगिक धोरणात आवश्यक तरतूदी केल्या. देशात वस्तू आणि सेवांची उपलब्धता वाढण्यासाठी खाजगी क्षेत्राची उत्पादन क्षमता वाढविणे आवश्यक असते. खाजगी क्षेत्राची उत्पादन क्षमता वाढवण्यासाठी सरकारने विविध उपाययोजना आखल्या. खालील उद्दिष्टे साध्य करण्यासाठी मिश्र अर्थव्यवस्थेत खाजगी क्षेत्राचा विकास केला जातो.

१) पायाभूत सुविधांचा विकास करणे.

२) खाजगी क्षेत्रात रोजगार निर्मितीला प्रोत्साहन देणे

३) भांडवलसंस्थेची स्पर्धात्मकता वाढविणे.

४) अर्थव्यवस्थेतील वस्तू आणि सेवांचा दर्जा वाढविणे

५) देशाची निर्यात वाढवून परकीय चलन मिळविणे

६) देशातील उत्पन्न आणि संपत्तीच्या वाढीस प्रोत्साहन देणे.

**३) संयुक्त क्षेत्राचा विकास करणे :**

मिश्र अर्थव्यवस्थेत काही उद्योग पूर्णत: सरकारच्या मालकीचे असतात; तर काही खाजगी क्षेत्राच्या मालकीचे असतात. काही उद्योग सरकार संयुक्तक्षेत्राद्वारे चालविण्याचा प्रयत्न करते. एखादा उद्योग हा सार्वजनिक क्षेत्रतील उद्योग आहे किंवा नाही हे निश्चित करण्यासाठी खालीलपैकी एक किंवा सर्व अटी पूर्ण व्हायला हव्यात.

१) उद्योगाची मालकी (ownership) सरकारकडे असली पाहिजे.

२) उद्योगाचे परिचालन (operation) सरकारने केले पाहिजे.

३) उद्योगाचे व्यवस्थापन (Management) सरकारी यंत्रणेद्वारे करण्यात आले पाहिजे.

वरील अटींच्या साहाय्याने आपणास देशातील विशिष्ट उद्योग सार्वजनिक क्षेत्रातील आहे, की खाजगी क्षेत्रातील आहे, की संयुक्त क्षेत्रातील आहे हे सांगता येते. मिश्र अर्थव्यवस्थेत सरकार काही उद्योग संयुक्त क्षेत्रांद्वारे चालविण्याचा प्रयत्न करते. पूर्णत: सार्वजनिक आणि पूर्णत: खाजगी क्षेत्राच्या उद्योगातील दोष टाळण्यासाठी सरकार संयुक्त क्षेत्राचा विकास करते. सार्वजनिक आणि खाजगी क्षेत्राचा विकास परस्परपूरक होण्यासाठी सरकार संयुक्त क्षेत्रात उद्योगधंद्याची स्थापना करण्यासाठी प्रोत्साहन देते. सरकारने वेळोवेळी जाहीर केलेले औद्योगिक धोरण याबद्दल अधिक स्पष्टीकरण देते. सरकारची निश्चित धोरणात्मक चौकट आणि उपाययोजनांमुळे देशात संयुक्त क्षेत्राच्या विकासाला चालना मिळते. भारतात रस्ते, वीज, यासारख्या क्षेत्रांत संयुक्त क्षेत्राद्वारे उद्योग चालविण्याला प्रोत्साहन दिले जाते.

**४) सहकारी संस्थांना प्रोत्साहन देते :**

सहकार ही मानवातील नैसर्गिक आणि उपजत प्रवृत्ती असल्यामुळे या क्षेत्रातील संस्थांना प्रोत्साहन देणे आणि त्यातून कमी उत्पन्न गटातील लोकांच्या विकासास हातभार लावण्याचा प्रयत्न मिश्र अर्थव्यवस्थेत शासनाकडून केला जातो. सहकारामुळे सहकारी संस्थांतील सभासदांचा, सहकारी संस्थेवर प्रत्यक्ष-अप्रत्यक्षरित्या अवलंबून असलेल्या लोकांचा, समाजाचा व पर्यायीने राष्ट्राचा विकास होण्यास मदत होत असते. सहकारी

चळवळ ही केवळ आर्थिक विकासाचे साधन नसून ते सामाजिक परिवर्तनाचे, समावेश विकासाचे साधन असल्यामुळे मिश्र अर्थव्यवस्थेतील सरकारकडून विविध प्रकारच्या सहकारी संस्थांची स्थापना, विस्तार, वित्तीय व तांत्रिक मदत, कुशल मनुष्यबळ उपलब्ध होण्यासाठी प्रशिक्षण संस्था याद्वारे प्रोत्साहन दिले जाते

भारतीय अर्थव्यवस्थेचा विशेषत: कृषी अर्थव्यवस्थेचा अभ्यास करुन कृषी अर्थव्यवस्थेतील प्रश्नांची सोडवणूक करण्यासाठी ब्रिटिश सरकारने भारतात सहकारी पतपुरवठा चळचळीला सुरुवात केली. विशेषत: १९०४ च्या सहकार कायद्याने पतपुरवठा सहकारी चळवळीचा विकास केला. १९०४ नंतर भारतात सहकारी चळवळ इतर क्षेत्रातही पसरु लागली. अर्थव्यवस्थेच्या विविध क्षेत्रात सहकारी चळवळीचा विकास व्हावा आणि त्याचा फायदा देशातील गरीब कुटुंबांना, शेतकऱ्यांना, कारागिरांना मजुरांना, औद्योगिक कामगारांना व्हावा यासाठी सरकारने जाणीवपूर्वक प्रयत्न केला. स्वातंत्र्यानंतर त्यामध्ये विशेष प्रयत्न केले गेले. त्याला सकारात्मक परिणाम संबंधित धटकांवर झालेला दिसून येतो.

### ५) सार्वजनिक व खाजगी क्षेत्रांत योग्य समन्वय राखणे:

देशाच्या आर्थिक विकासाच्या प्रक्रियेत सार्वजनिक व खाजगी क्षेत्रातील उद्योग महत्त्वाची भूमिका बजावतात. मिश्र अर्थव्यवस्थेत या दोन्ही क्षेत्रांमध्ये योग्य समन्वय साधण्याचे काम सरकारला करावे लागते. सार्वजनिक क्षेत्रामार्फत अर्थव्यवस्थेला बळकटी आणण्यासाठी मूलभूत उद्योगांचा विकास करण्याबरोबरच जलद आर्थिक विकासासाठी माफक दरात पायाभूत सुविधा किंवा विकासाची आधारभूत संरचना उपलब्ध केली जाते. उद्योगाच्या स्थान निर्धारावर राजकीय प्रभाव, प्रस्थापित उत्पादन क्षेत्राचा अत्यंत अपुरा वापर, अकार्यक्षम व्यवस्थापन, तांत्रिक व आर्थिक बाबींकडे दुर्लक्ष यांमुळे सार्वजनिक क्षेत्रावर काही मर्यादा पडतात. सार्वजनिक क्षेत्रातील कमतरता भरुन काढण्यासाठी आणि आधी उल्लेख केल्याप्रमाणे विविध निश्चित आर्थिक उद्दिष्टे साध्य करण्यासाठी सरकारकडून खाजगी क्षेत्राला प्रोत्साहन दिले जाते. मूलभूत, पायाभूत आणि आवश्यक वस्तू आणि सेवांचे उद्योग सार्वजनिक क्षेत्राकडे देवून इतर क्षेत्रात खाजगी उद्योगांना गुंतवणूकीस योग्य वाव दिला जातो. देशाच्या सर्वसमावेशक आर्थिक विकासासाठी आणि आर्थिक विकासाचा वेग वाढविण्यासाठी या दोन्ही क्षेत्रांत योग्य समन्वय साधला जातो.

### ६) खाजगी क्षेत्रांवर नियंत्रण राखणे.

मिश्र अर्थव्यवस्थेत देशाचा जलद आर्थिक विकास साध्य करीत असतानाच, त्यातून काही आर्थिक व सामाजिक उद्दिष्टे साध्य करण्याची सार्वजनिक क्षेत्रातील बहुतेक सर्वच उद्योगांची कामगिरी समाधानकारक नसल्यामुळे सरकारकडून खाजगी क्षेत्राच्या वाढीस प्रोत्साहन देते. अर्थव्यवस्थेत या क्षेत्राने अधिकाधिक गुंतवणूक करावी असा सरकारचा प्रयत्न चालू असतानाच या क्षेत्राची अर्थव्यवस्थेत मक्तेदारी निर्माण होऊ नये म्हणून सरकार विविध आर्थिक, धोरणांद्वारे निमंत्रणे लाभते. अर्थव्यवस्थेत खाजगी उद्योगांद्वारे

ग्राहकांची पिळवणूक होत असल्यास किंवा सर्वसामान्य लोकांना त्याला लाभ घेता येत नसेल तर सरकार अथा उद्योगांचे राष्ट्रीयीकरण करते. किंवा त्यावर काही निर्बंध लाभते. भारतात याच उद्देशाने १९ जुलै १९६९ रोजी १४ मोठ्या खाजगी व्यापारी बँकांचे राष्ट्रीयीकरण केले. त्यापूर्वीही विमा क्षेत्राचे राष्ट्रीयीकरण केले. खाजगी क्षेत्राचे देशाच्या औद्योगिकीकरण, आर्थिक विकास, आर्थिक वंचित घटकांची प्रगती यावर विपरित परिणाम होणार नाही याची काळजी सरकार घेते.

भारतात नियोजनाची चार दशके पूर्ण होऊनही आंतरराष्ट्रीय बाजारामध्ये झालेली देशाची पिछेहाट, अंतर्गत व बहिर्गत कर्जामध्ये झालेली वाढ, १९९० मधील अभूतपूर्व टंचाई, अपुरे परकीय चालन, बेरोजगारी, दारिद्र्य, काळापैसा, आर्थिक व प्रादेशिक विषमता यासारख्या समस्या, सार्वजनिक क्षेत्राचे अपयश यासारख्या अनेक कारणांमुळे १९९१ पासून अर्थव्यवस्थेमध्ये रचनात्मक बदल करण्याच्या हेतूने नवीन आर्थिक सुधारणांचा अंमत्र सुरु झाला. त्याबद्दल अर्थव्यवस्थेच्या विविध क्षेत्रात खाजगी क्षेत्राला गुंतवणूकीय अधिकाधिक वाव दिला जाऊ लागला. असे असले तरी या क्षेत्रावर नियंत्रण ठेवून त्याला देशाच्या आर्थिक विकासाच्या दृष्टीने योग्य दिशा देण्याचे महत्त्वपूर्ण काम सरकारला करावे लागते.

### ७) समतोल प्रादेशिक विकास साधणे.

भांडवलशाही आणि साम्यवादी अर्थव्यवस्थांप्रमाणेच मिश्रअर्थव्यवस्थेमध्ये आर्थिक आणि प्रादेशिक असंतुलनाची समस्या दिसून येते. आर्थिक आणि प्रादेशिक अममतोल दूर करण्यासाठी सरकारला प्रयत्न करावे लागतात. विविध राज्ये किंवा राज्यांतील विविध प्रदेश यांच्यातील आर्थिक, सामाजिक विषमता दूर करण्यासाठी सरकारला विविध उपाय योजावे लागतात. पायाभूत सोयी-सुविधांचा विकास आणि पुरेसा विस्तार देशाच्या विविध भागात विशेषत: अप्रगत आणि मागासलेल्या भागात झाल्यास शेती आणि औद्योगिक उत्पादनवाढी बरोबर देशाचा सर्वसमावेशक आर्थिक विकास होत असतो. मिश्र अर्थव्यवस्थेत सरकारला त्यासाठी खास प्रयत्न करावे लागतात. सुप्रसिद्ध अर्थशास्त्रज्ञ गुन्ना मिर्डाल अविकसित भागात एखादा मोठा उद्योग सुरु केल्यामुहे त्या भागाचा कायापालट होण्याची प्रक्रिया सुरु होते. या भागातील शेती, उद्योग, व्यापार, सेवा क्षेत्र, पायाभूत सोयी सुविधा आदीच्या विकासास प्रोत्साहन मिळते. स्वातंत्र्यानंतर देशात सार्वजनिक क्षेत्राने ही भूमिका पार पाडली.

### ८) विकास प्रकल्पांसाठी निधी उपलब्ध करुन देणे :

मूलभूत व अवजड उद्योगांची उभारली, रस्ते, रेल्वे, सिंचन, वीज यासारखे पायाभूत व आणि देशाच्या आर्थिक विकासाला पूरक अथा उद्योगांची प्रकल्पांची उभारणी होण्यासाठी पुरेसा व वेळेत निधी उभारणी आवश्यक ठरते. भांडवलशाही अर्थव्यवस्थेत अशा उद्योगासाठी निधी उभारण्यासाठी सरकार प्रत्यक्ष अप्रत्यक्षरित्या मदत करत असते. खाजगी क्षेत्राला विकास प्रकल्पांसाठी निधी उभारण्यासाठी कर सवलती, कर्जे, अनुदाने, कर्जाती हमी घेणे, परकीय देशांतून कर्जे घेण्यासाठी किंवा निधी उभारण्यासाठी मदत करते. सरकार सार्वजनिक आयव्ययाद्वारे म्हणजेच सार्वजनिक महसूल, सार्वजनिक कर्ज, सार्वजनिक

उपक्रमांना मिळणारा नफा आणि निर्गुंतवणूक यांतून निधी उभारते. तसेच अर्थव्यवस्थेतील बचत आणि भांडवलनिर्मिती क्षमता वाढविण्यासाठी बँक व्यवसाय, विमा व्यवसायाला करासारख्या अनेक विकास सोयी सुविधा उपलब्ध करुन दिल्या जातात. मिश्र अर्थव्यवस्थेत सरकारच्या विकास प्रकल्पासाठी निधी उपलब्ध करून देण्याच्या भूमिकेमुळे या अर्थव्यवस्थांच्या विकासास मदत होत असते.

### ९) कल्याणकारी राज्याची भूमिका बजावणे :

भांडवलशाही अर्थव्यवस्थेत सरकारचा कमीत कमी हस्तक्षेप असतो. तर याठिकाणी सरकार बाजाराधिष्ठित अर्थव्यवस्थेला प्रोत्साहन देते. साम्यवादी अर्थव्यवस्थेत सरकारच मध्यवर्ती नियोजन मंडळाच्या माध्यमातून महत्त्वाची भूमिका बजावते. मिश्र अर्थव्यवस्थेत शासनाला खाजगी क्षेत्राला प्रोत्साहन देतानाच किंवा देशाच्या आर्थिक विकासाला चालना देताना देशातील साधनसंपत्तीचे व उत्पन्नाचे योग्य वितरण होण्याकडे लक्ष द्यावे लागते. साधन संपत्तीचे असमान वाटप झाल्यामुळे आर्थिक शक्तीचे कोंडीकरण होण्याचा धोका असतो. म्हणून देशात बेरोजगारी, दारिद्र्य वाढणार नाही. तर ते कमी कसे होईल यासाठी प्रयत्न करावे लागतात. अर्थव्यवस्थेत खाजगी क्षेत्राची मक्तेदारी निर्माण होऊन ग्राहकांची पिळवणूक होणार नाही ना याकडे लक्ष द्यावे लागते. शेतीवर मोठ्या प्रमाणात अवलंबून असलेल्या लोकसंख्येचे उत्पन्न वाढविण्यासाठी या क्षेत्राकडे विशेष लक्ष द्यावे लागते. अर्थव्यवस्थेतील विविध क्षेत्रांचा विकास व्हावा आणि तो सर्वसमावेशक व्हावा यासाठी नियोजन करावे लागते. मौद्रिक धोरण, राजकोषीय, धोरण, किंमत धोरण, औद्योगिक धोरण, व्यापारी धोरण यासारख्या धोरणांच्या माध्यमांद्वारे देशाच्या आर्थिक विकाालाला चालना दयावी लागते. एकंदरीत देशातील सर्व वर्गांचा विकास होण्यासाठी सरकारला कल्याणकारी राज्याची भूमिका बजवावी लागते.

### मिश्र अर्थव्यवस्थेतील सरकारच्या भूमिकेचे परीक्षण :

मिश्र अर्थव्यवस्थेत शासनाला निर्णायक भूमिका बजावावी लागते. भारतासारख्या मिश्र अर्थव्यवस्थेतही सरकारला निश्चित आर्थिक, सामाजिक उद्दिष्टे साध्य करण्यासाठी महत्त्वाची भूमिका बजावावी लागते. देशाला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर देशाचा सर्वांगीण आर्थिक विकास घडवून आणणे, विकासाचा वेग वाढविणे, स्वातंत्र्यावेळी भारतीय अर्थव्यवस्थेसमोर असणाऱ्या बेरोजगारी, दारिद्र्य, आर्थिक विषमता, प्रादेशिक विषमता, शेती विकासाचा अभाव, औद्योगिकीकरणाचा अभाव, पायाभूत सोयी-सुविधांची कमतरता यासारख्या समस्यांचे निराकरण करण्यासाठी देशाने एक प्रकारची धोरणात्मक चौकट स्वीकारली. भारताने नियोजनाद्वारा देशाचा आर्थिक विकास करण्याचे ध्येय समोर ठेवून १ एप्रिल १९५१ पासून आर्थिक नियोजनास सुरुवात केली. या धोरणात्मक चौकटीच्या साहाय्याने अर्थव्यवस्थेतील त्या त्या क्षेत्राचा विकास करणे आणि देशातील समस्यांचे निराकरण करण्याचा प्रयत्न केला गेला. देशाच्या धोरणात्मक चौकटीला मर्यादित यश देत आहे असे दिसताच त्यामध्ये बदलही केला गेला. १९९१ मध्ये देशात नवीन आर्थिक सुधारणा राबविण्यात सुरुवात केला. त्याअंतगृत सरकारने उदारीकरण, खाजगीकरण आणि जागतिकीकरण धोरणांची

अंमलबजावणी सुरु केली. मिश्र अर्थव्यवस्थेत सरकार महत्त्वाची भूमिका बजावत असलेतरी सरकारच्या भूमिमकेवर काही मर्यादा पडतात. गेल्या ७० वर्षांत भारतीय अर्थव्यवस्थेतील विकासाचे मूलभूत प्रश्न अजूनही सुटलेले नाहीत.

१) मिश्र अर्थव्यवस्थेत देशाच्या आर्थिक विकासाच्या दृष्टीने सार्वजनिक क्षेत्राच्या तुलनेत खाजगी क्षेत्रावर कमी विश्वास दाखविला गेला. खाजगी क्षेत्रावर अनेक नियंत्रणे लादल्याने देशाच्या आर्थिक विकासाचा दर कमी राहिला.

२) प्रगत किंवा विकसिन देशांशी तुलना करता भारतासारख्या विकसनशील देशाचे दरडोई उत्पन्न आल्प राहिले. देशाच्या लोकसंख्येत मोठ्या प्रमाणात झालेल्या वाढीमुळे दरडोई उत्पन्नात पुरेसी वाढ झाली नाही.

३) देशातील लोकसंख्येच्या आकारल्या तुलनेत देशात उपलब्ध असलेली नैसर्गिक साधनसंपत्ती किंवा संसाधने, त्यांचा वापर आणि भांडवलाची उपलब्धता यांच्यामध्ये असमतोल निर्माण झाल्यामुहे महत्तम सामाजिक कल्याणाचे उद्दिष्ट गाठता आले नाही.

४) देशात कोळसा, वीज, खनिजे, तेल, रस्ते, रेल्वे, जहाज, सेवा, हवाई वाहतूक यासारख्या वाहतूक सोयी, पोष्ट कार्यालये, दूरसंचार, इंटरनेट सुविधा यासारख्या दळणवळणाच्या सोयी, बेकिंग, विल आणि विमा कंपन्या यांच्या सोयीमध्ये वाढ झाली असली तरी देशाच्या लोकसंख्येची गरज, भौगोलिक परिस्थिती यांचा विचार करता ही वाढ अपुरी आहे.

५) देशातील मोठ्या प्रमाणावरील उत्पन्न आणि संपत्तीतील विषमतेचा देशाच्या आर्थिक विकासावर परिणाम होतो. भारतात आर्थिक ससाधनांचे वितरण अतिशय सदोष पद्धतीने झाल्यामुळे देशात प्रचंड आर्थिक विषमता दिसून येते.

६) औद्योगिकीकरणामुळे देशाच्या आर्थिक विकासाला मदत होते. परंतु अजूनही भारत हे औद्योगिकदृष्टया प्रगत राष्ट्र म्हटले जात नाही. औद्योगिक क्षेताचा क्षमतेपेक्षा कमी वापर झाला. औद्योगिक विकासामध्ये प्रादेशिक अणमतोल निर्माण झाला आहे.

७) भारतासारखे अनेक विकसनशील व अविकसित देश मोठ्या प्रमाणात शेतीवर अवलंबून असल्यामुळे शेती आणि संबंधित घटकांची प्रगती देशाच्या विकासात महत्त्वाची ठरते. स्वातंत्र्योत्तर काळात भारतातील शेती आणि संबंधित उत्पादनामध्ये अस्थैर्य असलेले दिसून येते.

८) वाढत्या लोकसंख्येमुळे वाढणारी बेकारी ही अल्प विकसित देशाचे प्रमुख वैशिष्टये राहिले आहे. अन्य रोजगार संधीचा अभाव, कौशल्याचा अभाव आणि शेतीवर अवलंबून असणारी मोठ्या प्रमाणावरील लोकसंख्या यामुळे मिश्र अर्थव्यवस्थेतील बेकारीच्या प्रश्नाने उग्र रुप धारण केले आहे.

९) मिश्र अर्थव्यवस्थेतील देश तांत्रिक क्षेत्रात मागासलेले दिसतात. शेती, उद्योग, सेवा क्षेत्र, पायाभूत सोयी-सुविधा या क्षेत्रातील तंत्रज्ञान वापरातील प्रगती अपुरी आहे.

१०) इतर प्रगत, विकसित देशांशी तुलना करता सर्वसामान्य भारतीयांचे राहणीमान निष्कृष्ट दर्जाचे राहिले आहे.

## * आर्थिक नियोजन व विकासातील भूमिका

देशाच्या आर्थिक विकासाच्या दृष्टीने नियोजनाला फार महत्त्व असते. जगामध्ये सर्वप्रथम १९२८ मध्ये रशियाने नियोजनाचा स्वीकार केला. रशियाने भांडवलशाही अर्थव्यवस्थेऐवजी मिश्र अर्थव्यवस्थेत नियोजनाद्वारे विकास साधता येतो हे दाखवून दिले. दुसऱ्या महायुद्धानंतर बहुसंख्य विकसनशील व अविकसित राष्ट्रांनी देशाच्या आर्थिक विकासासाठी नियोजनाचा अवलंब करण्यास सुरुवात केली. विशेषत १९३० च्या जागतिक आर्थिक महामंदीनंतर शासनाच्या वेशषत: राजकोषीय धोरणात मूलगामी बदल घडून आले. आणि त्याचे देशाच्या आर्थिक विकासातील महत्त्वही वाढले. लॉर्ड जे. एम् केन्स यांनी The General Theory of Employment, Interest and Money' (1936) हा ग्रंथ प्रसिद्ध करून अर्थव्यवस्थेतील शासनाच्या भूमिकेला महत्त्वाचे स्थान प्राप्त करून दिले. अलिकडच्या काळात सर्वच देशांनी कल्याणकारी राज्याची संकल्पना स्वीकारल्यामुळे आर्थिक विकासातील शासनाच्या भूमिकेचे महत्त्व वाढले आहे.

आर्थिक नियोजनाद्वारे विशिष्ट कालखंडात ठरविलेली उद्दिष्टे साध्य करण्याचा प्रयत्न केला जातो. आर्थिक नियोजनात अर्थव्यवस्थेतील विविध क्षेत्रांसाठी निश्चित उद्दिष्टे केले जातात. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर भारताने मिश्र अर्थव्यवस्थेचा स्वीकार केल्यानंतर १५ मार्च १९५० रोजी नियोजन मंडळाची स्थापना केली. १ एप्रिल १९५१ पासून नियोजनाद्वारा आर्थिक विकास साध्य करण्याचे प्रयत्न सुरु केले. १९५१ पासून भारतात पंचवार्षिक योजनांची शृंखला सुरू करण्यात आली तेव्हापासून देशात १२ पंचवार्षिक योजना पूर्ण झाल्या आहे. या व्यक्तिरिक्त ७ (सात) वार्षिक योजनाही राबविण्यात आल्या आहेत. बारावी पंचवार्षिक योजना ३१ मार्च २०१७ पर्यंत होती. तत्पूर्वी भारत सरकारने जानेवारी २०१५ रोजी निती आयोग एक असंवैधानिक व अवैधानिक संस्था म्हणून भारताचा दीर्घकालीन विकास करण्यासाठी स्थापन करण्यात आली आहे.

आज बहुतेक सर्व देशांत आर्थिक धोरणाचे आणि विकासाचे महत्त्वपूर्णअंग म्हणून नियोजनाला महत्त्व आहे. हशियाने नियोजनाच्या आधारे आपला नेत्रदीपक आर्थिक विकास आणि प्रगतीसाठी नियोजनाचा अवलंब केल्यामुळे या शतकाला नियोजनाचे युग (planning age) असे संबोधले जाते. या काळात 'नियोजन करा किंवा नष्ट व्हा' हा मंत्र जपला गेला. सर्वच अर्थव्यवस्थांमध्ये देशाच्या विविध आर्थिक समस्यांचे निराकरण करण्यासाठी सरकारांनी नियोजनाचा मार्ग अवलंबिला अविकसित अर्थव्यवस्थेतून विकसित अर्थव्यवस्थेकडे वाटचाल करण्यासाठी शासनाने नियोजनाद्वारे प्रयत्न करावे लागतात. सरकारला आर्थिक नियोजन व विकासाचा हस्तक (माध्यम) म्हणून महत्त्वपूर्ण भूमिका बजावावी लागते. आर्थिक

नियोजन व विकासाचा हस्तक (An agent for economic planning and development) म्हणून सरकारला विविध कार्ये पार पाडावी लागतात. आर्थिक नियोजन व विकसातील शासनाची भूमिका पुढीलप्रमाणे मुद्दयांच्या आधारे स्पष्ट करता येईल.

**(अ) प्रत्यक्ष भूमिका**

१) संस्थात्मक बदल

२) सामाजिक आणि आर्थिक वरकड

३) शिक्षणप्रसार करणे

४) सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब नियोजन

५) सामाजिक व सांस्कृतिक प्रवृत्तितील बदल

६) गुंतवणूकीचा दर वाढविणे

७) शेतीचा विकास करणे

८) औद्योगिक विकास

९) साधनसामग्रीचा पर्याप्त वापर करणे

१०) आर्थिक व प्रादेशिक विषमता कमी करणे

११) साधनसामग्रीच्या वापरावर प्रभाव टाकणे

१२) कायदा व सुव्यवस्था राखणे

१३) संतुलित विकास

१४) स्वावलंबन

१५) बेकारी व दारिद्र्य कमी करणे

१६) देशाची रचानाक्षमता वाढविणे.

**(ब) अप्रत्यक्ष भूमिका**

१) मौद्रिक धोरण

२) राजकोषीय धोरण

३) किंमत धोरण

४) परकीय व्यापारात वाढ करणे

५) सार्वजनिक क्षेत्र सुदृढ करणे

६) आर्थिक नियोजन

**वरील मुद्यांचा सविस्तर अभ्यास खालीलप्रमाणे करता येईल.**

**अ) प्रत्यक्ष भूमिका**

**२) संस्थात्मक बदल**

कोणत्याही देशात होत असलेले संस्थात्मक बदल त्या देशाच्या आर्थिक विकासात महत्त्वाची भूमिका बजावतात. यामध्ये श्रमबाजारातील संस्था आणि बाजार आकाराचा विस्तार यांचा समावेश होतो. बाजाराचा आकार विस्तारण्यासाठी शासन वाहतूक आणि दळणवळणाच्या साधनांचा विकास करू शकते. शेती आणि उद्योगधंद्यांच्या वाढीस मदत करते. सरकारच्या कार्यामध्ये श्रम बाजारातील संस्थात्मक विकासास प्रोत्साहन दिल्यामुळे श्रमाची उत्पादकता वाढते. कामगार संघटनांना मान्यता देऊन सरकार श्रमाच्या/ कामगारांच्या संघटनीकरणास संघर्ष/ मतभेद टाळण्यासाठी यंत्रणा विकसित करणे यासारख्या सामाजिक सुरक्षितता उपायांद्वारे श्रम बजरास मदत केली जाते. सामाजिक सुरक्षितता उपायांद्वारे कामगार आणि मालक यांच्यामध्ये चांगले संबंध प्रस्थापित होऊन श्रमाची कार्यक्षमता वाढते. त्यामुळे उत्पादन वाढ आणि खर्च घट हेण्यास मदत होते.

**सामाजिक आणि आर्थिक वरकड**

रस्ते, रेल्वे, वाहतूक व दळणवळण सुविधा, सिंचना, बंदरे, विमानतळ, वीज यासारख्या आर्थिक सुविधांच्या अभावामुळे अविकसित देशांच्या आर्थिक विकासातील मार्गामध्ये मोठा अडथळ निर्माण होतो. औद्योगिकदृष्टया प्रगत राष्ट्रांमध्ये यासारख्या सुविधांमध्ये गुंतवणूक करण्यास खाजगी क्षेत्र धजावत नाही. कारण यातील परतावा (return) चांगला नसतो आणि यात मोठ्या प्रमाणात गुंतवणूक करण्याची खाजगी क्षेत्राची क्षमता नसते. याशिवाय उपयोजक कौशल्याचा अभाव असतो आणि बहुतांश उद्योजक व्यापार, गृहप्रकल्प, सोने, ज्वेलरी, यासारख्या क्षेत्रांत गुंतवणूक करतात. म्हणून आर्थिक नियोजनास अर्थव्यवस्थेच्या विविध क्षेत्रांचा विकास घडवून आणण्यासाठी आर्थिक आणि सामाजिक वरकड क्षेत्रात सरकारला गुंतवूणक करावी लागते. या देशांत आर्थिक आणि सामाजिक सुविधा वाजवी प्रमाणात उपलब्ध करून देणे हे शासनाचे कर्तव्य असते. याच बरोबर शासनास शिक्षण, प्रशिक्षण सुविधा आणि आरोग्य सुविधा उपलब्ध करुन द्याव्या लागतात. प्रा. मायर आणि बाल्डविन यांच्या मते, शैक्षणिक सुविधांचा विस्तार आणि सार्वजनिक आरोग्य उपायांमुळे अविकसित राष्ट्रांच्या विकासातील अडथळा कमी होण्यास मदत होते.

### ३) शिक्षण प्रसार करणे

आर्थिक विकासाच्या प्रक्रियेत शिक्षण, शिक्षणाचा दर्जा अतिशय महत्त्वाची भूमिका पार पाडते. मिर्डाल यांच्या मते, देशात मोठ्या प्रमाणावरील लोकसंख्या अशिक्षित असेल तर राष्ट्रीय विकास कार्यक्रम निरुपयोगी ठरतात. म्हणून देशात शिक्षणाचा प्रसार करण्याची जबाबदारी सरकारला स्वीकारावी लागते. देशात सार्वत्रिक शिक्षणाच्या सुविधा माफक प्रमाणात उपलब्ध करून देणे हे शासनाचे महत्त्वाचे कार्य असते. प्रा. गॅलब्रेथ व प्रा. लेविस यांच्या मते, विशिष्ट मर्यादेत जनतेला साक्षर बनविण्यासाठी सरकारने प्रौढ शिक्षणावर केलेला खर्चही उत्पादक स्वरुपाचा असतो. श्रमाची उत्पादकता वाढविणे, त्याची भौगोलिक व व्यावसायिक गतीशीलता वाढविणे, नवप्रवर्तनाला चालना देणे या उद्दिष्टांची पूर्तता करण्यासाठी आर्थिक नियोजन व विकासाच्या पक्रियेत सरकारचा शिक्षणावरचा खर्च महत्त्वाचा असतो.

### ४) सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब नियोजन

बहुतांश विकसनशील देशांत लोकसंख्या जास्त असते आणि तिच्या वाढीचा वेगही जास्त असतो. लोकसंख्येचे मोठे प्रमाण हे भारतासारख्या विकसनशील अर्थव्यवस्थेचे मूलभूत वैशिष्ट्य आहे. वाढत्या लोकसंख्येला अन्न, वस्त्र, निवारा, शैक्षणिक सुविधा, आरोग्य सुविधा उपलब्ध करुन देण्यासाठी सरकारला मोठ्या प्रमाणावर खर्च करावा लागतो. या लोकसंख्येला चांगल्या व रास्त किंमतीत आरोग्याच्या सुविधा उपलब्ध करुन देणे गरजेचे असते. तसेच लोकसंख्या वाढ रोखण्यासाठी स्त्री शिक्षण, लैंगिक शिक्षणाचे महत्त्व, बालक-माता कल्याण कार्यक्रम, लोकांच्या मानसिक आणि सामाजिक प्रवृत्तीत बदल घडवून आणण्यासाठी शासनाने प्रयत्न करणे आवश्यक असते. लोकसंख्या नियंत्रित ठेवण्यासाठी कुटुंब नियोजनाचा प्रचार व प्रसार लागतो.

### ५) सामाजिक व सांस्कृतिक प्रवृत्तीतील बदल

देशातील सामाजिक व सांस्कृतिक प्रवृत्ती देशाच्या आर्थिक विकासात महत्त्वाची भूमिका पार पाडते. देशातील सामाजिक प्रवृत्ती, मूल्ये व समाजरचना विशिष्ट जाती व धर्मावर आधारित असल्यामुळे अविकसित व विकसनशील देशात आर्थिक प्रक्रियेत अडथळे निर्माण होतात. म्हूणन या देशात नियोजनाच्या माध्यमातून आर्थिक विकासाची राबविताना लोकांच्या सामाजिक व सांस्कृतिक प्रवृत्तीय सकारात्मक बदल घडवून आणण्या करिता सरकारला महत्त्वाची भूमिका बजावावी लागते. धार्मिक, सांस्कृतिक व सामाजिक बदलाचा मोठा परिणाम श्रमविभागी, उत्पादन व व्यापार, तंत्रवैज्ञानिक प्रगती यावर होतो. म्हणून देशाच्या सामाजिक व सांस्कृतिक प्रवृत्तीत अनुकूल बदल घडवून आणण्यासाठी सरकारला पुढाकार घ्यावा लागतो.

### ६) गुंतवणूकीचा दर वाढविणे

देशाच्या आर्थिक विकासासाठी देशात गुंतवणूक व भांडवल निर्मिती होते गरजेचे असते. विकसनशील

व अविकसित देशांच्या अर्थव्यवस्थेत गुंतवणूकीचा व भांडवल निर्मितीचा दर कमी असतो. कारण बचतीचा दर कमी असतो. भांडवल निर्मितीचा दर कमी राहून देशात दरिद्र्याच्या दृष्टचक्राची निर्मिती होते. म्हणून भांडवल संचयाच्या दराला चालना देऊन सरकार अर्थव्यवस्थेतील गुंतवणूकीचा दर वाढवू शकते. नियोजनाच्या माध्यमातून सार्वजनिक क्षेत्राचा विकासाद्‌वारे गुंतवणूकीचा दर वाढवून देशाच्या विकास प्रक्रियेला चालना देता येते. यासाठी सरकार कर आकारली, खर्च आणि अनुदानाचा मार्ग अवलंबिते.

**७) शेतीचा विकास करणे.**

अनेक विकसनशील व अविकसिन देश मोठ्या प्रमाणावर शेतीवर अवलंबून आहेत. भारत, चीन, पाकिस्तान, इंडोनेशिया यासारख्या अतिरिक्त लोकसंख्या असणाऱ्या देशांच्या अर्थव्यवस्थेत कृषी क्षेत्राचे स्थान अतिशय महत्त्वाचे असले तरी या देशातील शेतीत उत्पादकता इतर विकसित देशांच्या मानाने खूपच कमी आहे. ग्रामीण कर्जबाजारीपणा, आशिसित व अज्ञानी शेतकरी, मोठ्या प्रमाणावरील कोरडवाटू शेती रासायनिक खतांचा बेसुमार वापर, जुन्या शेती तंत्राचा वापर, पतपुरवठ्यांच्या व विपणनाच्या समस्या यासारख्या प्रमुख समस्यांमुळे या देशात शेती संकट निर्माण झालेले दिसून येते. यातून मार्ग काढण्यासाठी आणि शेती क्षेत्रात मूलभूत बदल घडविण्यासाठी शासनाला नियोजनाच्या माध्यमातून विविध कार्यक्रम राबवावे लागतात. जलसिंचनाच्या सोयींचा उपलब्धता वाढविणे, पतपुरवठा, विपणन, तांत्रिक आणि बाजारपेठेचे ज्ञान देणाऱ्या वित्तसंस्थांची निर्मिती करणे, अनुदाने, आधुनिक तंत्राचा अवलंब करण्यासाठी मदत करणे यासारख्या विविध योजना सरकारकडून कार्यान्वित केल्या जातात.

**८) औद्योगिक विकास**

कोणत्याही राष्ट्राच्या आर्थिक विकासात औद्योगिकीकरण खूप महत्त्वाचे आहे. अनेक पाश्चिमात्य अर्थशास्त्रज्ञांनी आर्थिक विकासाचा संबंध त्या देशाच्या औद्योगिकीकरणाशी जोडलेला आहे; तर शेती क्षेत्राचा संबंध अविकसितपनाशी जोडलेला आहे. एखाद्या राष्ट्राला आर्थिक विकास साध्य करावयाचा असेल तर औद्योगिकीकरणाशिवाय पर्याय नाही. औदयोगिकीकरणामुळे नैसर्गिक साधनसंपत्तीचा युक्त वापर, रोजगार निर्मिती. वाढण्यास मदत, राष्ट्रीय उत्पन्नात वाढ, कृषी व सेवा क्षेत्रात मदत, परकीय चलनाची बचत, लोखंड, पोलाद, सिमेंट यासारख्या मूलभूत उदयोगांचा विकास, लोकासात मदत करते. यामध्ये भांडवली वस्तूंच्या आयानीस अनुदान, निर्यात प्रोत्साहन योजना, वित्तीय व तांत्रिक मदत ठरणाऱ्या संस्थांची उभारली यांचा समावेश होतो.

**९) साधन सामग्रीचा पर्याप्त वापर करणे.**

बहुतांश अविकसित राष्ट्रांत नैसर्गिक साधनसंपत्ती विपुल प्रमाणात असते. परंतु नियोजनाअभावी तिचा पर्याप्त वापर केला जात नाही. काही वेळेला साधनसंपत्तीचा गैरवापरही होण्याची शक्यता असते. अशा वेळी सरकार साधन सामग्रीच्या पर्याप्त वापरासाठी उपाय योजते. सरकारच्या विविध उपाय, कार्यक्रमाद्वारे

विपुल प्रमाणातील नैसर्गिक साधनसंपत्तीचा योग्य वार करून घेता येतो. उदा. औद्योगिकीकरणास प्रोत्साहन, पायाभूत सोयी-सुविधांची निर्मिती. परिणामी उत्पादनात वाढ होऊन देशाचे एकंदर राष्ट्रीय उत्पन्न आणि दरडोई उत्पन्न वाढण्यास मदत होते.

### १०) आर्थिक व प्रादेशिक विषमता कमी करणे

देशातील मोठ्या प्रमाणातील आर्थिक व प्रादेशिक विषमतेचा देशाच्या आर्थिक विकासावर परिणाम होतो. भारतात आर्थिक संसाधनाचे वितरण अतिशय सदोष पद्धतीने झाल्यामुळे देशात प्रचंउ आर्थिक विषमता दिसून येते. प्रादेशिक विषमताही अधिक दिसून येते. संवत्ती आणि मालमालांचे विषम वितरण व त्यामध्ये उत्तरोत्तर घडून येणारी वाढ हे भारतासारख्या विकसनशील अर्थव्यवस्थांचे मूलभूत पण दाहक वैशिष्टय आहे. सरकार नियोजनाच्या माध्यमातून विविध उपक्रम, कार्यक्रम, योजना तयार करते व देशातील आर्थिक व प्रादेशिक विषमता कमी करण्यासाठी त्यांचा अंमलबजावणी करते.

### ११) साधनसामग्रीच्या वापरावर प्रभाव टाकणे

आधी सांगितल्याप्रमाणे विकसनशील व अविकसित देशातील साधन सामग्री मोठ्या प्रमाणात वापराविना पडून असते. काही वेळेला त्याचा गैरवापरही होण्याची शक्यता असते. सरकार विविध धोरणे, कार्यक्रम आणि नियोजनाद्वारे देशातील उपलब्ध साधनसामग्रीच्या वापरावर प्रभाव टाकते. जंगले आणि खाणींचा अनिर्बंध वापरास प्रतिबंध केला जातो. अविकसित देशात जमिनीच्या योग्य वापराची, शहरांच्या नियोजनाची आणि उदयोगांच्या पर्याप्त स्थाननिश्‍चितीची समस्या दिसून येते. अशा वेळी सरकार दीर्घकालीन आणि सर्वसमावेशक नियोजनाद्वारे समतोलिन आर्थिक विकासासाठी देशातील साधनसामग्रीचा वापरावर प्रभाव टाकते.

### १२) कायदा व सुव्यवस्था राखणे

देशात कायदा व सुव्यवस्था राखण्याचे महत्त्वाचे कार्य शासनास करावे लागते. चांगल्या व कायदा सुव्यवस्थेशिवाय देशात गुंतवणूकीचा दर वाढत नाही, लोकांच्या राहणीमानात सुधारणा होत नाही आणि एकंदरिने देशाच्या आर्थिक विकासास मदत होत नाही. म्हणून सरकारला संरक्षण, पोलिस, व्यायव्यवस्था यावर मोठा खर्च करावा लागतो. देशात कायदा व सुव्यवस्था असेल तर निर्भय वातावरणात आर्थिक विकासाच्या प्रक्रियेला चालना मिळते.

### १३) संतुलित विकास

पायाभूत सेवा-सुविधांचा विकास, आणि पुरेसा विस्तार, आर्थिक -सामाजिक सोयीसुविधांचा विकास आणि पुरेसा विस्तार देशाच्या विविध भागात झाल्यास शेती आणि औद्योगिक उत्पादन वाढीबरोबर सर्वसमावेशक आर्थिक विकास होत असतो. संतुलित विकासासाठी देशाच्या सर्व भागात सारख्या प्रमाणात पायाभूत, आर्थिक व सामाजिक सुविधा उपलब्ध असाव्या लागतात. मागासलेल्या प्रदेशात या सुविधांचा अभाव

असल्यामुळे भारतासारख्या विकसनशील देशाच्या प्रगतीमध्ये असमतोलित विकास झालेला दिसून येतो.

### १४) स्वावलंबन

अविकसित देश विकासासाठी मोठ्या प्रमाणावर विकसित, प्रगत देशांवर अवलंबून असतात. आर्थिक विकासात व्यापार विशेषत: आंतरराष्ट्रीय व्यापार महत्त्वाची भूमिका पार पाडत असल्यामुळे आंतरराष्ट्रीय व्यापाराच्या मदतीने हे देश विकासाची प्रक्रिया राबवित असतात. आंतरराष्ट्रीय व्यापाराचे लाभ असले तरी ते सर्वच राष्ट्रांना मिळत नाहीत. त्याचे तोटे विविध राष्ट्रांना सहन करावे लागतात. रॉल प्रेबिश व सिंगट यांनी आंतरराष्ट्रीय व्याराचे लाभ जास्त करून विकसित देशांनाच मिळाले हे दाखवून दिले आहे. परिणामी अविकसित देशांचे विकसित देशांवरील अवलंबित्व वाढते. या देशांना तोट्याचे आंतरराष्ट्रीय निर्णय मान्य करावे लागते. शेती, उद्योग, शिक्षण, तंत्रज्ञान, संरक्षविषयक साहित्य ह. क्षेत्रात स्वावलंबनासाठी सरकार प्रयत्नशील असते.

### १५) बेकारी व दारिद्र्य कमी करणे

वाढत्या लोकसंख्येमुळे वाढणारी बेकारी हे अल्प विकसित देशाचे प्रमुख वैशिष्ट्य आहे. या देशात बेरोजगारीचे आणि दारिद्र्याचे प्रमाण मोठे असते. वाढत्या लोकसंख्येमुळे दरडोई उत्पन्न कमी राहते. परिणामी देशातील बचतीचा आणि गुंतवणूकीचा दर कमी राहतो. अर्थव्यवस्थेतील देशांतर्गत गुंतवणूकीचा दर कमी राहिल्यामुळे उद्योग-व्यवसायांची पुरेशी वाढ किंवा विस्तार होत नाही. त्यामुळे बेकारी व दारिद्र्य वाढते. बेकारी व दारिद्र्य कमी करण्यासाठी सरकार देशात रोजगार निर्मित करणाऱ्या उद्योग व्यवसायास प्रोत्साहन देणे, रोजगारविषयक कार्यक्रमाची अंमलबजावणी करणे, लघुउद्योगांना चालना देणे, दारिद्र्य रेषेखालील लोकांचे जीवनमान उंचावण्याण्यासाठी प्रयत्न करणे, कार्यक्रमाची योजनांची अंमलबजावणी करणे अशी कार्ये करावी लागतात.

### १६) देशाची स्पर्धाक्षमता वाढविणे

विकसनशील आणि अविकसित देशामध्ये देशाच्या आर्थिक विकासाला चालना देण्यासाठी मानव संसाधन विकास घडवून आणणे आणि देशाची स्पर्धाक्षमता वाढविणे गरजेचे असते. ॲडम स्मिथ, मार्यल, आर्यर लेविस यांनी आर्थिक विकासाच्या प्रक्रियेत मानव संसाधन विकासाचे महत्त्व अधोरेखित केले आहे. या देशात मानव संसाधन (भांडवल) विपुल प्रमाणात असते. परंतु निरक्षरता, कौशल्याचा अभाव, अंधश्रद्धा, तांत्रिक शिक्षणाचा अभाव यामुळे त्याचा दर्जा निकृष्ट राहतो. याबरोबरच शेती, उद्योग या क्षेत्राची स्पर्धाक्षमताही कमी राहते मानवी भांडवलाची, अर्थव्यवस्थेच्या विविध क्षेत्रांची उत्पादनक्षमता, स्पर्धाक्षमता वाढविणे, नवीन तंत्रज्ञान स्वीकारणे याबाबतीत सरकारची भूमिका महत्त्वाची असते.

## ब) अप्रत्यक्ष भूमिका

### १) मौद्रिक धोरण

योग्य मौद्रिक धोरणाच्या माध्यमातून देशाच्या आर्थिक आणि औद्योगिक विकासास मदत करता येते. मौद्रिक धोरणाद्वारे दुर्मिळ संसाधनांची वाढ करणे, उत्पादनाच्या घटकांची उत्पादकता वाढविणे, आर्थिक आणि सामाजिक स्थितीत सुधारणा करणे, आर्थिक विकासाच्या प्रक्रियेतील अडथळे दूर करणे शक्य होते. अर्थव्यवस्थेत किंमत स्थैर्य निर्माण करणे, पैशाचा पुरवठा आणि पैशाची मागणी यामध्ये समानता प्रस्थापित करुन मौद्रिक संतुलन साधणे, देशाच्या चलनाचे मूल्य परकीय चलनाच्या तुलनेत स्थिर ठेवणे, अर्थव्यवस्थेत रचनात्मक बदल घडवून आणून नैसर्गिक साधनसंपत्तीचा श्रमशक्तीचा पुरेसा वापर करणे व आर्थिक विकास घडवून आणणे ही मौद्रिक धोरणाची उद्दिष्टे देशाची मध्यवर्ती बँक मौद्रिक साधनांच्या साहाय्याने साध्य करण्याचा प्रयत्न करते.

### २) राजकोषीय धोरण

अलिकडच्या काळात सर्वच देशांनी कल्याणकारी राज्याची संकल्पना स्वीकारल्यामुळे राजकोषीय धोरणाचे महत्त्व वाढले आहे. लॉर्ड जे. एम्. केन्स यांनी The General Theory of employment, Interest and Money (1936) हा ग्रंथ प्रसिद्ध करुन राजकोषीय धोरणाचा महत्त्वाचे स्थान प्राप्त करुन दिले. राजकोषीय धोरणाचा उपयोग साधनसामग्रीचे संकलन करणे देशात रोजगार संधी वाढविणे, व्यापार चक्रीय चढ-उतार दूर करून आर्थिक स्थैर्य प्रस्थापित करणे, किंमत स्थिरता राखणे, उत्पन्न आणि संपत्तीतील विषमता कमी करणे आणि देशाच्या आर्थिक वृद्धीला चालना देणे ही उद्दिष्टे साध्य करण्यासाठी करता येतो. सरकार राजकोषीय धोरणांच्या उद्दिष्टांची पूर्तता करण्यासाठी कर धोरण, सार्वजनिक खर्च, सार्वजनिक कर्ज आणि अर्थसंकल्पीय धोरण यांचा वार करते.

### ३) किंमत धोरण

अविकसित राष्ट्रांतील शासनाची दुसरी महत्त्वाची आर्थिक क्रिया म्हणजे किंमतीचे नियंत्रण करणे. आर्थिक विकासाच्या सुरुवातीच्या टप्प्यांत सरकारच्या तुटीच्या अर्थभरणा धोरणामुळे अर्थव्यवस्थेतील गुंतवणूक वाढून किंमती वाढतात. शेती क्षेत्राच्या बाबतीत लहरी मान्सूनमुळे शेतमालच्या पुरवठ्यात मोठे चढ-उतार होऊन शेतमालाच्या किंमतीत अस्थैर्य निर्माण होते. अर्थव्यवस्थेला प्रोत्साहन देणे, वाढती आयात रोखणे, उत्पादकांचे संरक्षण करणे, उपयोकथांचे हित साधणे याबरोबरच शेती क्षेत्र, औद्योगिक क्षेत्र, देशाची अर्थव्यवस्थेला आणि देशातील लोकांच्या कल्याणाच्या दृष्टीने योग्य प्रकारचे किंमत धोरण आवश्यक ठरते. म्हणून सरकार योग्य किंमत धोरण विकसित करणे आणि आवश्यक वस्तूंच्या किंमती नियंत्रणात ठेवण्याचा प्रयत्न करते.

### ४) परकीय व्यापारात वाढ करणे.

आधुनिक काळात जगातील कोणताही देश इतरांपासून अलिप्त राहू शकत नाही. देशाची आर्थिक प्रगती अधिक जलद करावयाची असेल तर प्रत्येक देशाला इतर देशांशी व्यापार आणि इतर वित्तीय,

तांत्रिक, सांस्कृतिक विनिमयाचे व्यवहार किंवा देवाण घेवाण करणे आवश्यक आहे. व्यापार आणि विकास या एकाच नाण्याच्या दोन बाजू असून त्या परस्परपूरक आणि परस्परावलंबी आहेत. सर डेनिस रॉबर्टस्न यांच्या मते, 'आंतरराष्ट्रीय व्यापार हे विकासाचे यंत्र आहे. अविकसित देशांचा व्यापार तोल आणि व्यवहार तोल प्रतिकूल असतो. सरकार निर्यातीला प्रोत्साहन देणे, आर्थिक विकासाला प्रोत्साहन आणि विकासाची गती वाढविण्याऱ्या वस्तूंच्या आयातीत सुलभता आणणे आणि तैनीच्या वस्तूंची आयात रोखले या मार्गाद्वारे परकीय चलनाची प्राप्ती करते. योग्य विनिमय नियंत्रणाद्वारे परकीय विनिमय संकटाचे निराकरण केले जातो.

### ६) आर्थिक नियोजन

रशियाने नियोजनाच्या आधारे आपला नेत्रदीपक आर्थिक विकास करुन संपूर्ण जगाला प्रभावित केले. दुसऱ्या महायुद्धानंतर जगातील बहुसंख्य देशांनी आर्थिक विकास आणि प्रगतीसाठी नियोजनाचा अवलंब करण्यास सुरुवात केली. देशाचा सर्वांगीण आर्थिक विकास घडवून आणणे, विकासाचा वेग वाढविणे, देशातील बेकारी, दारिद्र्य, आर्थिक आणि प्रादेशिक विषमता, शेती विकासाचा अभाव, औद्योगिकरणाचा अभाव, पायाभूत सोयी-सुविधांची कमतरता यासारख्या समस्यांचे निराकरण करण्यासाठी भारतासारख्या बहुसंख्य विकसनशील देशांनी आर्थिक नियोजनाची धोरणात्मक चौकट स्वीकारली. या धोरणात्मक चौकटीच्या साहाय्याने अर्थव्यवस्थेतील त्या त्या क्षेत्राचा विकास करणे आणि देशातील समस्यांचे निराकरण करण्याचा प्रयत्न केला जातो.

**स्वयं अध्ययनासाठी प्रश्न - १**

**(अ) पुढील प्रश्नांमध्ये जे पर्याय दिलेले आहेत त्यातील अचूक पर्याय निवडा.**

१) आर्थिक विकासाची संकल्पना अतिशय --------------- प्रक्रिया आहे.

अ) व्यापक　　ब) गुंतागुंतीची

क) सतत चालू राहणारी　　ड) वरील सर्व

२) ज्या अर्थव्यवस्थेत खाजगी व सार्वजनिक क्षेत्राचे सहअस्तित्व असते, त्याला --------- अर्थव्यवस्था असे म्हणतात.

अ) भांडवलशाही　　ब) साम्यवादी

क) मिश्र　　ड) वरील सर्व

३) भारतीय अर्थव्यवस्था हे --------- अर्थव्यवस्थेचे एक उत्तम उदाहरण आहे.

अ) भांडवलशाही　　ब) साम्यवादी

क) मिश्र　　ड) वरीलपैकी कोणतेही नाही

४) मिश्र अर्थव्यवस्थेत उत्पादन घटकांची मालकी, नियंत्रण आणि व्यवस्थापन यासंबंधीचे निर्णय हे ------------------ क्षेत्रामध्ये विभागले जातात

अ) केवळ सरकार होते  ब) केवळ खाजगी क्षेत्र घेते

क) सरकार आणि खाजगी  ड) वरीलपैकी कोणतेही नाही.

५) ------- अर्थव्यवस्थेत आर्थिक विकासाला चालना देण्यामध्ये शासन महत्त्वाची भूमिका बजावते.

अ) मिश्र  ब) भांडवलशाही

क) हुकुमशाही  ड) वरीलपैकी कोणतेही नाही.

६) मिश्र अर्थव्यवस्थेत शासन --------- च्या विकासाला प्रोत्साहन देते

अ) सार्वजनिक क्षेत्र  ब) खाजगी क्षेत्र

क) सहकारी क्षेत्र  क) वरीलपैकी सर्व.

७) मिश्र अर्थव्यवस्थेत देशाच्या जलद आर्थिल विकासासाठी शासन --------क्षेत्राचा विकास करण्याकडे पुरेसे लक्ष देते.

अ) सार्वजनिक  ब) खाजगी

क) सार्वजनिक क्षेत्राबरोबर खाजगी क्षेत्राचा ड) वरीलपैकी कोणतेही नाही.

८) -------- अर्थव्यवस्थेत सार्वजनिक व खाजगी क्षेत्रांत योग्य समन्वय राखण्याचा प्रयत्न केला जातो.

अ) भांडवलशाही  ब) मिश्र

क) साम्यवादी  ड) वरीलपैकी कोणतेही नाही.

९) आर्थिक नियोजन व विकासाचा हस्तक म्हणून -------विविध कार्ये पार पाडावी लागतात.

अ) शासनाला  ब) खाजगी क्षेत्राला

क) समाजाला  ड) वरीलपैकी कोणतेही नाही.

**ब) एक -दोन वाक्यात उत्तरे लिहा.**

१) राजकोषीय धोरणाचा वापर कशासाठी केला जातो ?

२) सार्वजनिक अर्थकारणात कोणत्या बाबींचा अभ्यास केला जातो ?

३) अर्थव्यवस्थेचे प्रकार सांगा ?

४) मिश्र अर्थव्यवस्था म्हणजे काय ?

### १.२.२ मानवी गरजा आणि वस्तूचे वर्गीकरण, अर्थ आणि वैशिष्टये

सार्वजनिक आयव्ययाचे आर्थिक आणि सामाजिकदृष्ट्या महत्त्व स्पष्ट करता येते. महामंडीचे प्रतिकूल परिणाम टाळण्यासाठी देशाच्या आर्थिक विकासात भांडवलशाही शासनव्यवस्थेला महत्त्वाची भूमिका पार पाडावी लागते. असे केन्सने १९३६ साली प्रसिद्ध केलेल्या 'सर्वसाधारण सिद्धांतात दाखवून दिली. भाववाढ, घसरण, वाढती बेरोजगारी यासारख्या अर्थव्यवस्थेच्या प्रतिकूल काळात सरकारने हस्तक्षेप करायला पाहिजे याची जाणीव झाली. अमेरिका आणि हेगलंडसारख्या प्रगत देशात आर्थिक स्थैर्य आणि पूर्ण रोजगाराची अवस्था प्रस्थापित करणे ही सार्वजनिक आयव्ययाची महत्त्वाची उद्दिष्टे निश्चितच केली गेली. भारतासारख्या विकसनशील देशात अर्थव्यवस्थेतील भयानक दरिद्र्य आणि तीव्र बेरोजगारीचे निराकरण करण्यासाठी राजकोषीय धोरणाच्या माध्यमाने जलद आर्थिक विकासाचा वापर करता येतो. देशात सार्वजनिक आयव्ययाच्या व्यवहारात सामाजिक न्याय प्रस्थापित करणे हे सरकारची दुसरी महत्त्वाची जबाबदारी असते. सार्वजनिक आयव्ययाच्या महत्त्वाचा आणखी एक मुद्दा म्हणजे देशातील सर्वसामान्य लोकांच्या सामाजिक गरजांची पूर्तता करणे. यादृष्टीने आपण याठिकाणी गरजा आणि त्याचे प्रकार अभ्यासणार आहोत.

गरजांचे तीन प्रकारांत वर्गीकरण करता येते.

१) खाजगी गरजा

२) सार्वजनिक गरजा किंवा सामूहिक गरजा, आणि

३) गुणात्मक गरजा.

## समाजाच्या एकूण गरजा

| सार्वजनिक गरजा | खाजगी गरजा | गुणात्मक गरजा |
|---|---|---|
| १) सरकारकडून सर्वांची सारख्याच प्रमाणात पूर्तता कोणतीही किंमत किंवा नाममात्र किंमत न आकारता उदा. संरक्षण, पोलिस, आरोग्य सेवा, इत्यादी. | १) प्रत्येक व्यक्तीची त्याच्या खरेदी शक्ती क्षमतेनुसार व्यक्तीगत गरजांची पूर्तता | १) अन्नधान्य, घरे, शिक्षण यासारख्या आवश्यक गुणात्मक गरजांची पूर्तता गरीबांसाठी सरकाकडून कमी किंमतीत केली जाते. |
| २) कर आणि इतर महसूलाद्वारे खालील खर्च भागविला जातो. | २) व्यक्तीच्या स्वत:च्या उत्पन्नातून यावर खर्च केला जातो. | २) सरकारच्या निधीतून मोठ्या प्रमाणात अनुदानित |

## १) खाजगी गरजा :

खाजगी गरजा या अशा गरजा असतात की. व्यक्ती त्यांच्या उत्पन्नानुसार त्या गरजांची पूर्तता करतात. व्यक्तीच्या उत्पन्नाच्या मर्यादेनुसार वेगवेगळ्या पातळीवर अशा गरजांची पूर्तता होते. व्यक्तीच्या पसंतीनुसार घरे, अन्न, गाड्या, कपडे, मनोरंजन आणि यासारख्या गरजांची पूर्तता व्यक्तीच्या पसंतीनुसार होते. अधिक संपत्ती असणाऱ्या व्यक्ती अधिक आरामदायी आणि मौल्यवान वस्तू आणि सेवांचा उपभोग घेऊ शकतात. तर कमी उत्पन्न गटातील लोकांना किंवा गरीब लोकांना या वस्तूंचा त्याग करावा लागतो. आणि केवळ थोड्या अत्यावश्यक वस्तूंचा उपभोग घ्यावा लागतो. या गरजांच्या बाबतीत अपवर्जनाचे तत्त्व लागू होते.

## २) सार्वजनिक गरजा

व्यक्तीच्या किंवा समाजाच्या दुसऱ्या प्रकारच्या गरजांना सार्वजनिक गरजा किंवा सामूहिक गरजा असे म्हणतात. ज्या गरजांचा उपभोग सर्वच नागरिकांच्या कडून सारख्याच प्रमाात घेतला जाते, त्यास सार्वजनिक गरजा असे म्हणतात. सार्वजनिक गरजांची पूर्तता करताना पुरवठा केल्या जाणाऱ्या वस्तू व सेवांच्या बाबतीत मात्र किंमत धोरण अपवर्जनाचे तत्त्व लागू पडत नाही, जे खाजगी गरजांच्या बाबतीत लागू पडते अपवर्जनाचे किंवा विभाजनाचे तत्व लागू पडत नसल्यांमुळे सार्वजनिक गरजांची पूर्तता करताना जे नागरिक सार्वजनिक वस्तू आणि सेवांची किंमत देत नाहीत त्यांना अशा वस्तू आणि सेवांपासून वंचित ठेवता येत नाही/वंचित ठेवणे शक्य होत नाही. सार्वजनिक वस्तू आणि सेवांपासून नागरिकांना वंचित ठेवता येत नसल्यामुळे अशा गरजांचा उपभोग घेताना त्याची स्वच्छेने किंमत देण्याचीही शक्यता नसते. म्हणजेच कोणत्याही प्रकारची किंमत न देताही सर्वच नागरिकांच्याकडून सार्वजनिक गरजांची पूर्तता केली जाते. मल्लानिस्सारण सोयी, सार्वजनिक आरोग्य, पूर नियंत्रण तरतूदी, स्वमानाचा अंदाज सांगणारी केंद्रे, संशोधन संस्था, न्यायालये, पोलिस संरक्षण यासारख्या सार्वज निक सोयी श्रीमंत आणि गरीब लोकांना सारख्याच प्रमाणात उपलब्ध असतात. या गरजांची पूर्तता स्पर्धात्मक बाजारपेठ करू शकत नाही. म्हणून सार्वजनिक गरजांची पूर्तता (सार्वजनिक वस्तूंचा पुरवठा) करण्याची जबाबदारी सरकारवर पडते. सरकारला यासाठी अर्थसंकल्पीय तरतूद करावी लागते.

## ३) गुणात्मक गरजा

प्रा. मस्ग्रेव्ह यांनी सार्वजनिक गरजांचे वर्गीकरण दोन गटांत केले आहे. एक, सार्वजनिक गरजा आणि दोन, गुणात्मक गरजा, गुणात्मक गरजा. गुणात्मक गरजा. या सार्वजनिक गरजांचाच एक विशेष प्रकार मानला जातो काही गरजा अशा असतात की गरीब लोकांना त्या अत्यावश्यक असतात. परंतु त्यांची पूर्तता करण्यासाठी त्यांच्याकडे पुरेसे उत्पन्न असत नाही. अशा वेळी कल्याणकारी सरकारकडून गरीब व गरजू व्यक्तींना अशा वस्तू आणि सेवांचा पुरवठा केला जातो. तेव्हा त्यास गुणात्मक गरजा असे म्हणतात.

गुणात्मक गरजा या खाजगी गरजाच असतात. परंतु गरिबांना त्याचा लाभ व्हावा म्हणून सरकारकडून त्या पुरविल्या जातात. गरीब लोकांची प्रगती आणि त्यांचे राहणीमान उंचावण्यासाठी या गरजांची आवश्यकता असते. उदा. कमी (अंशदानित) किंमतीत अन्न आणि कपड्यांचे वितरण करणे, गरीबांना कमी किंमतीत घरे उपलब्ध करुन देणे, गरीब मुलांना कमी किंमतीत दूध उपलब्ध करून देणे, ज्येष्ठ नागरिकांना पेन्शन व सामाजिक सुरेक्षा उपाय, प्रसूती लाभ इत्यादी. चा गरजांची पूर्तता झाल्यामुळे गरीबांची उत्पादन क्षमता आणि कार्यक्षमता वाढते आणि परिणामी त्यांच्या उत्पन्नात वाढ होते. कल्याणकारी राज्यामध्ये अशा प्रकारच्या गरजांवरील सार्वजनिक खर्च दिवसेंदिवस वाढत आहे.

सार्वजनिक आणि गुणात्मक वस्तूंची पूर्तता करणे हाच केवळ सार्वजनिक आयव्ययाचा महत्त्वाचा पैलू नसून सामाजिक दृष्टीने प्रतिकूल ठरणाऱ्या गरजांना प्रतिबंध करणे किंवा त्यांच्या उपभोगावर नियंत्रण आणण्याचा प्रयत्न सार्वजनिक दारु पिणे हे घातक आहे. तंबाखू किंवा तंबाखूजन्य पदार्थामुळे कॅन्सरसारखे भयानक आजार उद्‌भवतात. अशा गरजांची पूर्तता केली जाऊ नये म्हणून यावर मोठ्या प्रमाणात कराची आकारणी केली जाते आणि पिडीत लोकांच्या आरोग्यावरील उपाय म्हणून अशा आजारांच्या परिणामाविषयी जाहीरातीवर मोठा खर्च केला जातो. समाजाच्या एकूण गरजा पुढील तक्यत्याद्‌वारे स्पष्ट करता येते.

**वस्तूंचे वर्गीकरण– अर्थ आणि वैशिष्ट्ये**

एकोणिसाव्या व विसाव्या शतकात सरकारच्या कार्यात झपाट्याने वाढ होत गेली. ही वाढ होत असतानाच सरकारचा खर्चही मोठ्या प्रमाणात वाढला. सरकारच्या खर्चाची वाढीची कारणे ॲडॉल्फ वैगनर आणि पिकॉक–वाहजमन यांनी सिद्धांताद्‌वारे स्पष्ट करण्याचा प्रयत्न केला. प्रा रिचर्ड मस्ग्रेव्ह यांनी The Theory of Public Finance या सुप्रसिद्ध ग्रंथात सार्वजनिक खर्चासंबंधीचा आधुनिक सिद्धांत स्पष्ट करताना सरकारी कार्ये का वाढली याचे शास्त्रीय स्पष्टीकरण केले. अलिकडच्या काळात मानवी गरजांमध्ये होत असलेल्या बदलांमुळे सार्वजनिक खर्चाच्या उद्दिष्टांत बदल होऊ लागले आहेत. मानवी गरजांची पूर्तता करण्यामध्ये खाजगी वस्तू, सार्वजनिक वस्तू आणि गुणात्मक वस्तू यांचा समावेश होतो, असे प्रा. मस्ग्रेव्ह यांनी सार्वजनिक खर्चासंबंधीच्या आधुनिक सिद्धांतात स्पष्ट केले. मानवी गरजा पूर्ण करणाऱ्या या वस्तूंचा अर्थ आणि वैशिष्ट्ये पुढीलप्रमाणे सांगता येतील.

**१) खाजगी वस्तू :**

विशिष्ट वस्तूंचा उपभोग घेणाऱ्या व्यक्तीलाच उपयोगिता मिळते व ती इतरांना नाकारली जाते, अशा वस्तूंना खाजगी वस्तू (Private Goods) असे म्हणतात. वेगळ्या शब्दात असे सांगता येईल की, एखाद्या व्यक्तीने विशिष्ट वस्तूचा लाभ घेतल्यास त्या विशिष्ट क्षणी संबंधित वस्तूचा लाभ इतर कोणत्याही व्यक्तीला घेता येत नाही. उदाहरणार्थ, एखाद्या व्यक्तीने एखाद्या ठिकाणी स्वत:ला राहण्यासाठी बंगला बांधला तर त्या ठिकाणी राहण्याचा लाभ त्या व्यक्तीला मिळतो, इतर कोणत्याही व्यक्तीला असा लाभ मिळविता येत नाही. संबंधित बंगला ही त्या वस्तूची वस्तू राहते आणि तो त्याचा उपभोग घेतो.

खाजगी वस्तूंचे उत्पादन करण्यामध्ये सहभागी झालेल्या उत्पादन घटकांना त्यांच्या कमाल कार्यक्षम क्षेत्रातील सीमांत उत्पादनाच्या बाजार किंमतीइतकी किंमत मिळत असते. खाजगी वस्तूची किंमत ही त्या वस्तूच्या सीमांत उत्पादन खर्चाइतकी असल्यामुळे अशा वस्तूंची बाजारपेठ स्पर्धात्मक राहते. स्पर्धात्मक बाजारपेठेमुळे साधनसंपत्तीचे कार्यक्षम व पार्याप्त वाटप होण्यास मदत होते. म्हणून सरकारला अशा वस्तूंचे उत्पादन घेण्याची गरज असत नाही. खाजगी वस्तूंची प्रमुख वैशिष्ट्ये पुढीलप्रमाणे सांगता येतात.

१) पूर्ण विभाज्यता

२) अपवर्जनाचे तत्त्व

३) कार्यक्षम किंमत यंत्रणा

४) वस्तूच्या गुणवत्तेबद्दल माहिती

५) स्थिर किंवा वाढत्या उत्पादन खर्चाची स्थिती

६) बाह्य लाभ व खर्चाचा अभाव

७) स्पर्धात्मकता

वरील वैशिष्टये खालीलप्रमाणे समजून घेता येतील.

**१) पूर्ण विभाज्यता :** खाजगी गरजांची पूर्तता करणाऱ्या खाजगी वस्तू या विभाज्य (divisible) असतात. या वस्तूंचे स्वतंत्र, असामाईक अशा उपभोग्य परिमाणामध्ये विभाजन करता येते. उदा. सायकल, पेन, कपडे, टी.व्ही. कार.

**२) अपवर्जनाचे तत्व :** अपवर्जन तत्त्व म्हणजे वगळता येणे. उपभोक्ता एखादी वस्तू विकत घेत असताना तो त्या वस्तूची किंमत देत असेल तेव्हाच ती वस्तू त्याला मिळेल. म्हणजेच किंमत न देणाऱ्याला खाजगी वस्तूच्या उपभोगापासून वगळले जाते. वेगळ्या शब्दात, वेगळ्या शब्दात, पूर्ण विभाज्यता आणि किंमत तत्त्वामुळे खाजगी वस्तूची किंमत न देणाऱ्या किंवा देऊ न शकणाऱ्या ग्राहकांना अशा वस्तूच्या उपभोगापासून पूर्णपणे अपवर्जित करता येते.

**३) कार्यक्षम किंमत यंत्रणा :** खाजगी वस्तूंची बाजारातील किंमत ही त्या वस्तूसाठी असणारी मागणी आणि त्या वस्तूचा पुरवठा या वरुन ठरते. ग्राहक खाजगी वस्तूंना बाजार किंमत देऊन महत्तम कल्याण प्राप्त करुन घेतात. तथापि, बाजार किंमत न देऊ शकरणाऱ्या उपभोकत्याला महत्तम कल्याणापासून वंचित राहावे लागते कारण त्याला खरेदीशक्तीच्या अभावी संबंधित वस्तूच्या उपभोगापासून वंचित राहावे लागते.

**४) वस्तूच्या गुणवत्तेबद्दल माहिती :** खाजगी वस्तूचे आणखी एक महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे या

वस्तूंच्या बाबतीत सर्वच ग्राहकांना वस्तंच्या गुणवत्तेबद्दल किमान खर्चात माहिती उपलब्ध असते. तसेच खाजगी वस्तूंचे उत्पादन करणाऱ्या उत्पादकांना संबंधित वस्तूंचे उत्पादन तंत्र, वस्तूची बाजारातील मागणी व पुरवठा, व्यवस्थापन, कच्या मालाची उपलब्धता व किंमती इत्यादी बाबतीत आवश्यक ती माहिती किमान खर्चात सहज  मिळते.

५) **स्थिर किंवा वाढत्या उत्पादन खर्चाची स्थिती :** सर्वसाधारणपणे खाजगी वस्तूचे उत्पादन करणाऱ्या उद्योगात स्थिर किंवा वाढत्या उत्पादन खर्चाचा नियम अनुभवास येतो. तथापि, अशा वस्तूंचा उत्पादन खर्च घटत असेल तर उत्पादनात मक्तेदारी निर्माण होऊन स्पर्धात्मक बाजारपेठेचे स्वरुप नष्ट होते.

६) **बाह्य लाभ व खर्चाचा अभाव :** खाजगी वस्तूंचे आणखी एक महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे अशा वस्तूंच्या उत्पादनात किंवा उपभोगात मोठ्या प्रमाणात बाह्य लाभ आणि बाह्य खर्चाचा अभाव असतो. उदा. एखाद्या उपभोक्त्याने विशिष्ट वस्तूचा उपभोग घेतला तर दुसऱ्या व उपभोक्त्याला त्याच वस्तूचा लाभ मिळत नाही. उदा. एखाद्या व्यक्तीने कपडे घतले तर दुसऱ्या व्यक्तीला त्यांचा लाभ घेता येत नाही.

७) **स्पर्धात्मकता :** खाजगी वस्तूंच्या बाबतीत स्पर्धात्मकता प्रचंड असते. एखाद्या व्यक्तीने एखादी वस्तू जास्त प्रमाणात मिळविली. तर दुसऱ्याला ती कमी प्रमाणात मिळते. म्हणजेच खाजगी वस्तू मिळविण्यासाठी बाजारपेठेत स्पर्धा दिसून येते.

२) **सार्वजनिक वस्तू :**

विशिष्ट वस्तूंचा उपभोग घेणाऱ्या व्यक्तीबरोबरच इतरांनाही त्या वस्तूची उपयोगिता मिळते. तेव्हा त्या वस्तूला सार्वजनिक वस्तू (Sosiar goods) असे म्हणतात. प्रा. रॉलड मॅकीन यांच्या मते, 'ज्या वस्तूंचा एकाच वेळी एकापेक्षा अधिक उपभोक्त्यांना त्याच किंमतीमध्ये उपभोग घेता येतो व संभाव्य उपभोक्त्यांना अपवर्जित  करण्यासाठी खर्च करावा लागतो. तेव्हा त्या वस्तूंना सार्वजनिक वस्तू म्हणता येईल. वेगळ्या शब्दात, एखाद्या व्यक्तीमार्फत घेतल्या जाणाऱ्या उपभोगामुळे इतर व्यक्तीकरिता उपलब्ध असणाऱ्या वस्तूच्या परिमाणात घर होत नसेल  त्या वस्तूस सार्वजनिक वस्तू असे म्हणता येईल. उदा. प्रकाश, आवाज, सुगंध, आरोग्य, राष्ट्रीय सुरक्षितता, शिक्षण, रस्ते यासारख्या पायाभूत सोयीसुविधा, बाग सार्वजनिक पोलिस यंत्रणा, सार्वजनिक पाणीपुरवठा

खाजगी वस्तूंचे उत्पादन व वितळ स्पर्धात्मक बाजारयंत्रणेमार्फत खाजगी क्षेत्र कार्यक्षमतेने करु शकते. सार्वजनिक वस्तूंचे उत्पादन व वितरणामध्ये सरकारी दस्ततेपाची गरज असते. सर्वसाधारणपणे अशा वस्तू सरकारमार्फत विना मोबदला किंवा अल्प मोबदला पुरविल्या जातात. कारण खाजगी क्षेत्र चैनीच्या आणि नफा देणाऱ्या उपभोग व भांडवली वस्तूंमध्ये गुंतवणूक करतात आणि शिक्षण, आरोग्य,

पायाभूत सोयी-सुविधा या सारख्या वस्तूंमध्ये तुलनेने कमी नफा आणि मोठा फलधारणा कालखंड यामुळे गुंतवणूक करण्यास धजावत नाहीत. परिणामी लोककल्याणाच्या व्यापक उद्देशाने प्राथमिक सोयी-सुविधा आणि गरीबांच्यासाठीच्या उपयुक्त वस्तूंमध्ये शासनसंस्थेला गुंतवणूक करून पुरवठा करावा लागतो. या वस्तूंच्या उपलब्धतेसाठी सरकारला अंदाजपत्रकीय तरतूद करावी लागते. अशा वस्तूंचा एकूण समाजात असलेला पुरवठा समाजातील प्रत्येक व्यक्तीसाठी खुला असल्यामुळे या वस्तूंचा घेतला जाणारा लाभ सर्वांसाठी खुला असतो, तसेच या वस्तूंमध्ये खाजगी वस्तूंच्या सर्व वैशिष्ट्यांचा अभाव असतो. सार्वजनिक वस्तूंची प्रमुख

**वैशिष्टय्ये पुढीलप्रमाणे सांगता येतात.**

१) अविभाज्यता

२) अपवर्जन तत्त्वाचा अभाव

३) किंमत गुणवत्तेबद्दल माहिती

४) वस्तूंच्या गुणवत्तेबद्दल माहिती

५) बाह्य लाभ

६) घराला उत्पादन खर्चाची स्थिती

७) अ-स्पर्धात्मकता

**वरील वैशिष्ट्ये खालीलप्रमाणे समजून घेता येतील.**

**१) अविभाज्यता :** मानवाच्या गरजांची पूर्तता करणाऱ्या सार्वजनिक वस्तू या अविभाज्य (Indivisible) असतात. अविभाज्यता म्हणजे ज्यांचे (वस्तूंचे) लहान -लहान परिणामामध्ये विभाजन करता येत नाही. उदा. सार्वजनिक आरोग्य यंत्रणा, संरक्षण व्यवस्था सार्वजनिक बगीचा इ.

**२) अपवर्जन तत्त्वाचा अभाव :** सार्वजनिक वस्तूंचा एखाद्या व्यक्तीमार्फत धेतला जाणारा लाभ इतरांसाठीसुद्धा खुला असतो. म्हणून सार्वजनिक वस्तूंच्या बाबतीत अपवर्जन तव्वाचा अभाव असतो. सार्वलनिक वस्तूंचा एकूण समाजात असलेला पुरवठा समाजाती प्रत्येक व्यक्तींसाठी खुला असल्यामुळे त्याचा लाभ इतरांना नाकारता येत नाही. उदा. सार्वजनिक रस्ते.

**३) किंमत यंत्रणेचा अभाव :** सार्वजनकि वस्तूंच्या बाबतीत वस्तूची किंमत ही किंमत यंत्रणेमार्फत म्हणजेच त्या वस्तूची मागणी व त्या वस्तूचा पुरवठा यांतून न ठरता ती सरकारमार्फत ठरविली जाते. वस्तूच्या किंमतीबाबतचा निर्णय सरकार घेत असेल बहुतांश वेळेला सार्वजनिक वस्तूं सरकारमार्फत मोफत व मुक्त दिल्या जातात. उदा. सार्वजनिक रस्ते, संरक्षण, कायदा व मुख्यवस्था

**४) वस्तूंच्या गुणवत्तेबद्दल माहिती :** सार्वजनिक वस्तूंचे आणखी एक महत्त्वाचे वैशिष्टय म्हणजे या वस्तूंच्या बाबतीत सर्वच ग्राहकांना वस्तूच्या उत्पादन, उपभोग व गुणवत्तेबद्दल सर्वच ग्राहकांना माहिती उपलब्ध होऊ शकत नाही. उदा. राष्ट्रीय सुरक्षा.

## खाजगी, सार्वजनिक व गुणात्म वस्तुंमधील फरक खालील तक्त्यात दर्शविली आहे.

| सार्वजनिक वस्तू | खाजगी वस्तू | गुणात्मक वस्तू |
|---|---|---|
| १) सार्वजनिक वस्तूंचा पुरवठा सार्वजनिक क्षेत्रांकडून केला जातो. | १) खाजगी वस्तूंचा पुरवठा खाजगी क्षेत्रांकडून केला जातो. | १) गुणात्मक वस्तूंच पुरवठा सार्वजनिक व खाजगी क्षेत्राकडून केला जातो. |
| २) प्रति स्पर्धा नसते. | २) प्रतिस्पर्धा असते | २) प्रतिस्पर्धा असते |
| ३) सार्वजनिक वस्तू नाकारता येत नाही. | ३) खाजगी वस्तू नाकारता येते. | ३) गुणात्मक वस्तू मर्यादित प्रमाणात नाकारता येते. |
| ४) बाह्य लाभ प्राप्त होतात. | ४) बाह्य लाभ प्राप्त होत नाहीत. | ४) बाह्य लाभ प्राप्त होतात. |
| ५) उदा. पोलिस यंत्रणा, संरक्षण, रस्ते इत्यादी. | ५) उदा. टि.व्ही. फ्रिज, ोटार, चैनीच्या वस्तू इ. | ५) मोफत शिक्षण, आरोग्य केंद्रे इ. |

**५) बाह्य लाभ :** सार्वजनिक वस्तूचा एखाद्या व्यक्तीने लाभ घेतला असेल तरी त्या वस्तूंचा इतरांसाठीसुद्धा लाभ मिळतो. त्यास बाह्य लाभ असे म्हणतात. उदा. एखादी आजारी व्यक्ती सार्वजनिक आरोग्य केंडातून औषध घेतल्याने आजारातून मुक्त झाल्याने तिचा प्रतिकूल परिणाम समाजावर होत नाही. उलट समाजातील इतर व्यक्तीना होणारा संभाव्य आजार टाळतो.

**६) घटत्या उत्पादन खर्चाची स्थिती :** सर्वसाधारणपणे सरकार सार्वजनिक वस्तूचे उत्पादन खर्चाचा नियम अनुभवास येतो.

**७) अ-स्पर्धात्मकता :** सार्वजनिक वस्तूंच्या बाबतीत अ-स्पर्धात्मकता दिसून येते. कारण सार्वजनिक वस्तू ही देशातील प्रत्येक व्यक्तीला समान राशीत उपलब्ध असते.

**३) गुणात्मक वस्तू**

सार्वजनिक व खाजगी वस्तूंच्या वैशिष्ट्यांचे मिश्रण म्हणजे गुणात्मक वस्तू होय. प्रा. मस्ग्रेव्ह

यांनी गुणात्मक वस्तू (Merit Goods) होय. प्रा. मस्ग्रेव्ह यांनी गुणात्मक वस्तू या सार्वजनिक वस्तूंचाच एक विशेष प्रकार मांडला. शिक्षण, आरोग्य, गरीब कुटुंबांना उपलब्ध करुन दिली जाणारी निवासव्यवस्था ही या वस्तूंची उदाहरणे आहेत. प्रा. मस्ग्रेव्ह यांच्या मते, सार्वजनिक वस्तू व सेवा यांना अपवर्जनाचे तत्व लागू करता येत नाही. परंतु काही सार्वजनिक वस्तू व सेवा अशा असतात की, त्यांना अपवर्जनाचे तत्त्व लागू करता येते. उदा. कमी उत्पन्न गटातील विद्यार्थ्यांना शैक्षणिक फी मध्ये सवलत, प्राथमिक शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना मधल्या काळात मोफत भोजन किंवा दूध, गरीबांना परवडणाऱ्या दरातील अनुदानित घरे इत्यादी. या वस्तू पूर्णत: बाजार पेठेच्या किंमत यंत्रणेवर सोडून दिल्या तर त्याचा उपभोग सर्व नागरिकांना आवश्यक त्या किमान प्रमाणात करता येणार नाही. करणाऱ्या वस्तू आणि सेवांच्या किंमती कमी उत्पन्न गटातील लोकांच्या कुवतीबाहेर जातील. या घटकांना या वस्तू आणि सेवांच्या उपभोगापासून वंचित राहावे लागेल. या वस्तूंच्या बाबतीत बाह्य लाभ मोठ्या प्रमाणात असल्यामुळे बाजारपेठेत त्यांच्या होणाऱ्या पुरवठ्याबरोबरच सरकारनेही या वस्तू आणि सेवांचा पुरवठा करावा. त्याचा गरीब व वंचित लोकांना फायदा होऊन सामाजिक कल्याणात वाढ होईल. लोकांची उत्पन्नपातळी, त्यांच्याकडे असलेल्या मालमत्ता व इतर सोयी-सुविधा यासारख्या निकषांच्या साहाय्याने सधन व्यक्तींना अशा वस्तू व सेवांच्या मोफत उपभोगापासून अपवर्जित करता येऊ शकते. गुणात्मक वस्तूची प्रमुख वैशिष्टये पुढीलप्रमाणे सांगता येतील.

१) सर्वांना सारख्या प्रमाणात उपभोग घेता येत नाही

२) वस्तूंच्या संदर्भात मर्यादित माहिती उपलब्ध

३) बाह्य लाभ

४) उत्पादन खर्चात प्रथम वाढ, नंतर घट

वरील वैशिष्ट्ये खालीलप्रमाणे समजून घेता येतील.

**१) सर्वांना सारख्या प्रमाणात उपभोग घेता येत नाही :** गुणात्मक वस्तू या सर्वांना समान राशीत उपलब्ध होत नाहीत. परंतु ठराविक व्यक्तींना त्याचा लाभ होत असतो. उदा. आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांतील विद्यार्थ्यांना शैक्षणिक फी मध्ये सवलत दिली जाते, इतरांना (सधन विद्यार्थी) त्याचा लाभ घेता येत नाही.

**२) वस्तूंच्या संदर्भात मर्यादित माहिती उपलब्ध :** गुणात्मक वस्तूंचे आणखी एक महत्त्वाचे वैशिष्टये म्हणजे या वस्तूंच्या बाबतीत उत्पादन, उपभोग व गुणवत्तेबद्दल माहिती ग्राहकांना किमान खर्चात मर्यादित स्वरुपात उपलब्ध होऊ शकते.

**३) बाह्य लाभ :** गुणात्मक वस्तूंचे उत्पादन, वितरण व उपभोग यांमुळे समाजाला मोठ्या प्रमाणात बाह्य लाभ होतात. उदा. एखाद्या आजारी व्यक्तीला सार्वजनिक आरोग्य केंद्रातून उपचार घेतल्यामुळे

त्याचा आजार बरा होतो. परिणामी समाजातील इतर व्यक्तींना होणाऱ्या संसर्गापासून संरक्षण होते.

**४) उत्पादन खर्चात प्रथम वाढ नंतर घट :** सर्वसाधारणपणे गुणात्मक वस्तूंच्या बाबतीत उत्पादन घेत असताना प्रथम उत्पादन खर्चात वाढ होते व विशिष्ट कालावधीनंतर त्यात घट होत राहते.

**स्वयं - अध्ययनासाठी प्रश्न - २**

**(अ) पुढील प्रश्नांमध्ये जे पर्याय दिलेले आहेत. त्यातील अचूक पर्याय निवडा.**

१) गरजांचे ---------- प्रकारांत वर्गीकरण करता येते

अ) तीन ब) चार क) पाच ड) सांगता येत नाही

२) -------- गरजा या अशा गरजा असतात की, व्यक्ती त्यांच्या उत्पन्नानुसार त्या गरजांची पूर्तता करतात.

अ) सार्वजनिक ब) खाजगी

क) गुणात्मक ड) वरीलपैकी एकही नाही

३) व्यक्तीच्या उत्पन्नाच्या मर्यादेनुसार वेगवेगळ्या पातळीवर --------- गरजांची पूर्तता होते.

अ) सार्वजनिक ब) खाजगी

क) गुणात्मक ड) वरीलपैकी एकही नाही.

४) ज्या गरजांचा उपभोग सर्वच नागरिकांच्याकडून सारख्याच प्रमाणात घेतला जातो. त्यास ----------- गरजा असे म्हणतात.

अ) खाजगी ब) गुणात्मक

क) सार्वजनिक ड) वरीलपैक एकही नाही.

५) -------- गरजांची पूर्तता करताना पुरवठा केल्या जाणणाऱ्या वस्तू व सेवांच्या बाबतीत किंमत धोरण अपवर्जनाचे तत्त्व लागू पड नाही.

अ) सार्वजनिक ब) खाजगी

क) गुणात्मक ड) वरीलपैकी एकही नाही

६) -------- गरजांच्या बाबतीत किंमत धोरण अपवर्जनाचे तत्त्व लागू पडते.

अ) सार्वजनिक ब) खाजगी

क) गुणात्मक ड) वरीलपैकी एकही नाही

७) कोणत्याही प्रकारची किंमत न देताही सर्वच नागरिकांच्याकडून ------ गरजांची पूर्तता केली जाते.

अ) गुणात्मक ब) खाजगी

क) सार्वजनिक ड) वरीलपैकी एकही नाही

८) -------- गरजांची पूर्तता झाल्यामुळे गरिबांची उत्पादन क्षमता आणि कार्यक्षमता वाढते.

अ) गुणात्मक ब) खाजगी

क) सार्वजनिक ड) वरीलपैकी एकही नाही

९) -------- वस्तूच्या बाबतीत एखाद्या व्यक्तीने विशिष्ट वस्तूचा लाभ घेतल्यास त्या विशिष्ट आणि संबंधित वस्तूचा लाभ इतर कोणत्याही व्यक्तीला घेता येत नाही.

अ) खाजगी ब) सार्वजनिक

क) गुणात्मक ड) वरीलपैकी एकही नाही

१०) स्पर्धात्मक बाजारपेठेमुळे साधन संपत्तीचे कार्यक्षम वाटप होण्यास मदत होते. म्हणून सरकारला ------- वस्तूंचे उत्पादन घेण्याची गरज असत नाही.

अ) गुणात्मक ब) सार्वजनिक

क) खाजगी ड) सार्वजनिक आणि गुणात्मक

११) एखाद्या व्यक्तीमार्फत घेतल्या जाणाऱ्या उपभोगामुळे इतर व्यक्तीकरिता उपलब्ध असणाऱ्या वस्तूच्या परिमाणात घर होत नसेल तर त्या वस्तूत ---------- वस्तू असे म्हणतात.

अ) सार्वजनिक ब) खाजगी

क) गुणात्मक ड) वरीलपैकी एकही नाही.

**(ब) एक-दोन वाक्यात उत्तरे लिहा.**

१) खाजगी गरजा म्हणजे काय?

२) सार्वजनिक गरजा म्हणजे काय?

३) गुणात्मक गरजा म्हणजे काय?

४) खाजगी वस्तू म्हणजे काय?

५) सार्वजनिक वस्तू म्हणजे काय?

६) गुणात्मक वस्तू कशास म्हणतात?

७) अपवर्जनाचे तत्त्व म्हणजे काय?

### १.२.३. बाजार अपयशाची कारणे: अपूर्णता, घटक उत्पादन खर्च, बहिर्गतता

प्रस्तुत प्रकरणात आपण विविध अर्थव्यवस्थांमधील शासनाच्या भूमिकेविषयी अभ्यास करत आहेत. यामध्ये आपण मिश्र अर्थव्यवस्थेतील शासनाची भूमिका: त्याचबरोरब आर्थिक नियोजन व विकासातील शासनाची भूमिका अभ्यासली. त्यानंतर मानवी गरजा व वस्तूंचे वर्गीकरण सविस्तरपणे अभ्यासले. या उपघटकांत आपण अर्थव्यवस्थेतील साधन सामग्रीचे कार्यक्षम पणे वाटप करण्यात बाजारयंत्रणा कधी अपयशी ठरते, त्याची कारणे कोणती याचा अभ्यास करणार आहोत. अपूर्ण बाजारपेठा, अपूर्ण स्पर्धेच्या बाजारपेठेतील उत्पादनाचा घटत जाणारा खर्च आणि सार्वजनिक वस्तूची बहिर्गतता यांचा अभ्यास करणार आहोत.

#### बाजार अपयश (Market Failure)

बाजार अपयश ही सर्वसाधारणपणे प्रत्यक्षास येणारी घटना आहे. अर्थशास्त्रामध्ये बाजार अपयशही अशी अवस्था आहे की, त्या अवस्थेमध्ये संबंधित देशाच्या अर्थव्यवस्थेत वस्तू आणि सेवांचे कार्यक्षमपणे वाटप झालेले नसते, आणि त्यामुळे निव्वळ सामाजिक कल्याणात घट होते. बाजार अपयश ही मक्तेदारीबरोबरच पूर्ण स्पर्धेच्या संदर्भातही दिसून येणारी अवस्था आहे. अर्थशास्त्रामध्ये सर्वप्रथम ही संकल्पना १९५८ मध्ये वापरली गेली. परंतु व्हिक्टोरियन तत्त्वज्ञ हेन्री सिडविक यांनी या संकल्पने संबंधी लिखाण केले. बाजार अपयश हे भविष्यातील पसंतीची अनिश्चितता, आर्थिक आणि तांत्रिक माहितीची अपूर्णता, बाजारातील अपूर्ण स्पर्धा, विक्री कौशल्याद्वारे बाजारातील विविध घटकांवर विक्रेत्याने पाडलेला प्रभाव आणि त्यातून निर्माण झालेली बाजार दृष्कृते (distortions) बहिर्गतता यांच्याशी संबंधित आहे.

बाजार अपयशामुळे अर्थव्यवस्थेत वस्तू आणि सेवांचे कार्यक्षम वाटप होत नाही. वस्तू आणि सेवांच्या वितरणातील असमाधानकारक कार्यामुळे निव्वळ सामाजिक कल्याणात घट होते. यावर उपाय म्हणून सरकारने देशातली वाटप यंत्रणा कार्यक्षमपणे काम करण्यासाठी योग्य धोरण आखणे आणि त्याची कार्यक्षम पणे अमंलबजावणी करणे. सरकारच्या प्रयत्नांमुळे देशातील उत्पन्न आणि संपत्तीतील केंद्रीकरण टळून त्यांच्या योग्य वितरणास हातभार लागतो. अर्थव्यवस्थेतील अनियंत्रित बाजारपेठेमुळे आर्थिक क्षेत्रे केंद्रीकरण होते. अर्थव्यवस्थेतील उत्पन्न, उत्पादन, रोजगार निर्मिती यामध्ये अनिश्चितता येते, वस्तू आणि सेवांच्या किंमती मध्ये चढ उतार निर्माण होतात, आर्थिक अस्थैर्य निर्माण होते. हे टाळण्यासाठी म्हणजेच बाजार अपयशावर तोडगा काढण्यामध्ये शासनाची भूमिका महत्त्वाची असते.

**सार्वजनिक वस्तू आणि बाजार अपयश :**

आधी अभ्यासल्याप्रमाणे विशिष्ट वस्तूंचा उपभोग घेणाऱ्या व्यक्ती बरोबरच इतरांनाही त्या वस्तूची उपयोगिता मिळते. तेव्हा त्या वस्तूला सार्वजनिक वस्तू (public good) असे म्हणतात. जो बाजार अर्थव्यवस्थेतील साधनसामग्रीचे वाटप कार्यक्षमपणे करण्यास अयशस्वी ठरतो, त्या बाजाराच्या स्थितीला बाजार अपयश असे म्हणतात. बाजार अल्पयशावर तोडगा करण्यासाठी सार्वजनिक वस्तूंच्या पुरवठ्यातून मार्ग काढता येतो. विशिष्ट बाजारातील स्वनियंत्रित संघटना, शासन किंवा राष्ट्रीय पातळीवरील संस्थांच्या हस्तक्षेपामुळे बाजार अपयशाचे अस्तित्व दिसून येते. बाजार अपयशाची कारणे आणि त्यावरील शक्य तोडगा हे सर्वसाधारणपणे सूक्ष्म अर्थशास्त्रात अभ्यासले जाते. मोठ्या प्रमाणावरील सार्वजनिक वस्तूसंबंधीचा निर्णय आणि अभ्यासले जाते. मोठ्या प्रमाणावरील सार्वजनिक वस्तूसंबंधीचा निर्णय आणि अभ्यासामध्ये अशा प्रकारचे विश्लेषण महत्त्वाची भूमिका बजावते. तथापि करारोपण, अनुदाने, अर्थव्यवस्थेला मंदीतून बाहेर काढण्यासाठी दिली जाणारी पॅकेजेस्, वेतन आणि किंमतीवरील नियंत्रणे, अर्थव्यवस्थेच्या विविध क्षेत्रावरील निर्बंध यासारख्या शासकीय धोरणात्मक हस्तक्षेपामुळे अर्थव्यवस्थेत साधनसामग्रीचे अकार्यक्षम वाटप होते, तेव्हा त्यास शासन अपयश (Government Failure) असे म्हणतात.

सार्वजनिक वस्तूंच्या बाबतीत बाजार अपयशाची संकल्पना उदाहरणाच्या साहाय्याने समजून घेता येईल. समाज विशिष्ट भागातील लोकांकरिता सार्वजनिक अत्याधुनिक बाग तयार केली आहे. त्या बागेमध्ये लहान मुलांना खेळण्याचे विविध साहित्य पुरविले जात आहे. या बागेची सेवा किंवा फायदा सर्वांना होणार आहे. म्हणजेच त्या भागातील सर्वांना याचा लाभ घेतासेवेचा लाभ घेऊ शकतात.

सरकार सार्वजनिक वस्तूंचा पुरवठा करताना त्याचा लाभ सर्वांना होतो. यामुळेच सार्वजनिक वस्तूंच्या बाबतीत मोफत लाभ घेणाऱ्या व्यक्तींची उपस्थिती अडचणीची ठरते. यासाठी आणखी एक उदाहरण देता येईल. समाजासाठी पुरविला गेलेला डास प्रतिबंधक कार्यक्रम सर्वांना लाभदायक ठरतो. ह्या कार्यक्रमाचा फायदा सर्व लोकांना देण्याशिवाय तो परिणामकारकपणे राबविता येत नाही. अशा वेळी बाजारात कार्यक्षमपणे सार्वजनिक वस्तू पुरविणे शक्य होत नाही. अशा वस्तूंचा किंवा सेवा पुरवठा करताना त्याचा लाभ घेणाऱ्यांची संख्या मोठ्या प्रमाणात असेल तर ऐच्छिक खाजगी व्यवस्थापन याठिकाणी उपयोगी पडत नाही. याठिकाणी बाजार यंत्रणा कार्यक्षमपणे काम करू शकत नाही. अशा वेळी अशा वस्तूंच्या कार्यक्षम उत्पादन आणि वितरणासाठी शासन व्यवस्थेला महत्त्वपूर्ण भूमिका बजावावी लागते. किंवा अशा सार्वजनिक वस्तूंवर सरकारला अंशदाने (अनुदाने) द्यावी लागतात.

लोकांना शुद्ध  हवा उपलब्ध असणे ही सार्वजनिक वस्तू आहे. शुद्ध हवेचा सार्वजनिक वस्तूच्या स्वरुपातील मागणी वक्र निश्चित करणे अवघड असते. म्हणजेच लोक कोणत्या दराने शुद्ध हवेची खरेदी-विक्री करू शकतील हे सांगता येत नाही. म्हणजेच शुद्ध हवेसाठी निरपेक्ष बाजार यंत्रणा नाही. परंतु ज्या प्रदेशात हवेचे अधिक प्रदूषण झाले आहे किंवा त्या ठिकाणी शुद्ध हवेचा पुरेसा पुरवठा होत नाही अशा

प्रदेशांत राहण्यासाठी लोक तुलनेने कमी किंमत देण्यास तया असतात. त्याउलट, ज्या प्रदेशात युद्ध हवा मुबलक प्रमाणात आहे अशा प्रदेशात राहण्यासाठी लोक तुलनेने अधिक किंमत देण्यास तयार असतात. अलिकडच्या काळात मोठ्या प्रमाणात वाढत असलेले कृषी पर्यटन (Agro tourism) हे त्याचे उत्तम उदाहरण आहे. (याचबरोबर त्याला इतरही घटक कारणीभूत आहेत.) याठिकाणी सार्वजनिक वस्तू म्हणून अशुद्ध हवेचा पुरवठा होत असेल तर ते बाजर अपयश मानले जाते.

**अपूर्ण बाजारपेठ**

सामान्यपणे ज्या आर्थिक वस्तूंचा पुरवठा सरकारमार्फत केला जातो, अशा वस्तूंचा पुरेसा पुरवठा खाजगी उत्पादकाकडून केला जात नाही. अशा वस्तूंच्या उत्पादन आणि विक्री मध्ये पुरेसा नफा मिळत नसल्यामुळे खाजगी उत्पादक अशा प्रकारच्या आर्थिक क्रियामध्ये विशेष पुढाकार घेत नाहीत. रिकामी अपूर्ण बाजारपेठेत सार्वजनिक कल्याण महत्तम करणाऱ्या वस्तूंचा पुरवठा सरकारला करावा लागतो. या वस्तू घटत्या उत्पादन खर्चाच्या स्वरुपाच्या असतात.

वस्तू आणि सेवांचे उत्पादन, विभाजन व इतर आर्थिक व्यवसायाकरिता संसाधनांचे वाटप करणे ही एक महत्त्वाची आर्थिक समस्या आहे. म्हणून अर्थव्यवस्थेतील उपलब्ध संसाधनांचे कार्यक्षम वाटप झाले तरच समाजाच्या आर्थिक कल्याणात वाढ होते. याउलट उपलब्ध संसाधनांचे अकार्यक्षम वाटप झाले तर संसाधनांचा चुकीचा वापर झाल्यामुळे तोटा होण्याचीच शक्यता असते. खाजगी क्षेत्राची उत्पादन पर्याप्तता स्पर्धात्मक बाजारव्यवस्थेवर अवलंबून असते. अर्थव्यवस्थेतील उत्पादन पर्याप्ततेसाठी खालील अटींची पूर्तता व्हावी लागते–

१) प्रत्येक उद्योगात अनेक विकेते उत्पादकी व अनेक ग्राहक असतात.

२) वस्तूचे उत्पादन, विक्री, बाजार व्यवस्था याविषयी संपूर्ण ज्ञान ग्राहक व विक्रेते यांना असते.

३) अर्थव्यवस्थेतील उत्पादन साधने पूर्ण गतीशील असतात.

४) उपयोगितेचे महत्तमीकरण करणे हे प्रत्येक ग्राहकाचे प्रमुख उद्दिष्ट असते.


५) उपयोगितेचे महत्तमीकरण करणे हे प्रत्येक ग्राहकाचे प्रमुख उद्दिष्ट असते.

वरील सर्व अटींची पूर्तता ही अर्थव्यवस्थेतील सर्व साधारण समातोलाची स्थिती सूचित करतात. अर्थव्यवस्थेतील सर्वसाधारण समतोलाच्या स्थितीत प्रत्येक उदयोग हा पूर्णपणे स्पर्धात्मक असतो. संसाधनाचे वाटप कार्यक्षमपणे होण्यास मदत होते. परंतु वास्तविक परिस्थितीत अर्थव्यवस्थेत या अटी निदर्शनास येत नाहीत. विशेषत: पहिली अट निदर्शनास येत नसल्या कारणाने अपूर्ण बाजारपेठेची स्थिती निर्माण होते. अपूर्ण बाजार पेठेत संसाधनाचे कार्यक्षमपणे वाटप होत नसल्या कारणाने सामाजिक कल्याणात वाढ होत नाही. म्हणून महत्तम सामाजिक कल्याणासाठी अपूर्ण बाजारपेठेत शासनाची भूमिका महत्त्वाची


ठरते. याठिकाणी सार्वजनिक क्षेत्राचे कार्य महत्त्वाचे असते.

स्पर्धात्मक बाजारपेठ आणि अपूर्ण बाजारपेठ यामध्ये संसाधनाचे वाटप कसे होते हे खालील आकृती क्र. १.१ (अ) व १.१ (ब) वरुन समजून घेता येईल. स्पर्धात्मक बाजारपेठेत सामाजिकदृष्ट्या पर्याप्त उत्पादन होते. तर अपूर्ण बाजारपेठेत कार्यक्षम सामाजिक वारणी होऊ शकत नाही.

**आकृती क्र. १.१ (अ)**




**आकृती क्र. १.१ (ब)**




आकृती क्र. १.१ (अ) मध्ये स्पर्धात्मक बाजारपेठेची स्थिती दर्शविली आहे. या बाजारस्थितीत OA या उत्पादन मात्रेला उद्योगसंस्थेचा सीमांत प्राप्ती आणि सीमांत खर्च समान आहेत (MC = MR) OA या उत्पादन मात्रेला उद्योग संस्थेला सर्वसाधारण नफा मिळतो. उद्योगसंस्थेचा व या बिंदूमध्ये समतोल साधला जातो. कारण याठिकाणी सीमांत खर्च = सीमांत प्राप्ती आहे. त्याचबरोबर या ठिकाणी सीमांत खर्च = सरासरी प्राप्ती (AR म्हणजेच किंमत) आहे. अर्थव्यवस्थेत उत्पादन संस्था सीमांत प्राप्ती सीमांत खर्चाबरोबर होई पर्यंत उत्पादन घेतले जाईल. बाजारपेठेत पूर्ण स्पर्धा असल्यामुळे म्हणजे वस्तूची एकच किंमत असल्यामुळे ग्राहक कोणत्याही विक्रेत्याकडून त्याच किंमतीला वस्तू खरेदी करू शकतो. स्पर्धात्मक


**बाजारपेठेत ग्राहकाची निर्णयशक्ती सामाजिकदृष्ट्या पर्याप्त उत्पादन दर्शविते.**

आकृती क्र. १.१ (ब) मध्ये मक्तेदारी किंवा मक्तेदारीचा अंश असणाऱ्या म्हणजेच अपूर्ण बाजारपेठेची स्थिती दर्शविली आहे. या बाजारपेठेत सीमांत प्राप्ती = सीमांत खर्च a या बिंदूत झालेला दिसून येतो.

परंतु याठिकाणी सीमांत प्राप्ती = सरासरी प्राप्ती (किंमत) दिसून येत नसल्यामुळे याठिकाणी दोन्ही बिंदूचे संयुक्तीकरण (एकत्रीकरण) दिसून येत नाही. अपूर्ण स्पर्धेच्या बाजारपेठेत उद्योगसंस्था OA इतके उत्पादन निश्चित करते. कारण याठिकाणी उत्पादन संस्थेला महत्तम नफा मिळतो. OA या उत्पादनाला OP इतकी किंमत आकारली जाते. अपूर्ण स्पर्धेतील उत्पादन संस्था जेथे सीमांत खर्च हा सरासरी प्राप्तीपेक्षा कमी असतो, अशा ठिकाणी वस्तूची मात्रा व वस्तूची किंमत निश्चित करतात. परंतु याठिकाणी उदयोग संस्था पर्याप्त सामाजिक उत्पादन निर्माण करु शकत नाहीत. या बाजारात मक्तेदारी किंवा मक्तेदारीचा अंश असल्यामुळे उद्योगसंस्थांना वस्तूच्या किंमतीवर नियंत्रण ठेवणे शक्य होते. परिणामी या अपूर्ण स्पर्धेच्या बाजारपेठेमध्ये ग्रहकाचे शोषण होऊ शकते. कमी उत्पाद आणि अधिक किंमत यामुळे महत्तम सामाजिक कल्याणात अडथळा निर्माण होतो. एकंदरीने, अपूर्ण बाजारपेठेत उदयोगसंस्थांचे उत्पादन सामाजिकदृष्ट्या पर्याप्त ठरत नाही.

**घटता उत्पादन खर्च**

अपूर्ण स्पर्धेच्या बाजारातील घटत जाणारा उत्पादन खर्च अर्थव्यवस्थेत वाटणीचा प्रश्न निर्माण करते. या बाजारात ज्या उत्पादन मात्रेला सीमांत खर्च = सरासरी प्राप्ती (MC = AR) तेथे उत्पादनाचा सरासरी खर्च (AC) घटत जातो. अशा अवस्थेमध्ये बाजारात पर्याप्त सामाजिक वाटणीचा बिंदू निर्माण करु शकत नाही हे खालील आकृती क्र. १.२ मधून समजून घेता येईल.




आकृतीमध्ये सीमांत खर्चाचा वक्र क्षीमांत प्राप्तीच्या वक्राला ज्या ठिकाणी छेडतो त्याठिकाणी समतोलावस्था प्राप्त होते. सर्वप्रथम आकृतीत व या बिंदूत ही अट पूर्ण होत असल्याने OA हे उत्पादन निश्चित होते. या उत्पादन मात्रेला उदयोग संस्थेला चांगला नफा प्राप्त होतो. OA या उत्पादनास सरासरी प्राप्ती सरासरी प्राप्ती सरासरी खर्चापेक्षा अधिक असल्याने ही प्राप्ती होते. याठिकाणी ef इतका सरासरी नफा मिळतो आणि OA या उत्पादन मालेला उदयोगसंस्थेला इतका मक्तेदारी नफा प्राप्त होतो. याठिकाणी

AB इतके कमी उत्पादन घेतल्याने उत्पादनाचे अयोग्य वाटप होईल. बाजारात OC इतके उत्पादन पर्यात असले तरी ते उदयोगसंस्थेला फायदेशीर नसल्याकारणाने उत्पादनाची OC मात्रा इतकी घेतली जाणार नाही. कारण याठिकाणी घटत जाणाऱ्या सरासरी खर्चाच्या अवस्थेमध्ये सीमांत खर्च हा सरासरी खर्चापेक्षा कमी असला पाहिजे. ज्याठिकाणी सीमांत खर्च = सरासरी प्राप्ती (किंमत) असते त्याठिकाणी सरासरी प्राप्ती ही सरासरी खर्चापेक्षा कमी असते. त्याठिकाणी पर्याप्त सामाजिक उत्पादन होते. आकृतीत OB ही उत्पादनाची मात्रा पर्यात सामाजिक उत्पादन दर्शविते. परंतु याठिकाणी उत्पादन संस्थेला dcgh इतका तोटा सहन करावा लागल्याने उदयोगसंस्था असे उत्पादन होण्यास पुढाकार घेत नाहीत याठिकाणी खाजगी उत्पादन संस्थेला आलेला उत्पादन खर्च भरून निघत नाही.

अपूर्ण स्पर्धेच्या बाजारातील घटत जाणाऱ्या उत्पादन खर्चासंबंधात पर्याप्त सामाजिक वाटपासाठी शासनव्यवस्थेची भूमिका महत्त्वाची असते, असे सनातनवादी अर्थशास्त्रज्ञांचे मत होते. त्यांच्या मते, ज्या आवश्यक आर्थिक वस्तूंचा पुरवठा पुरेशा नफ्याअभावी खाजगी क्षेत्र करू शकत नाहीत अशा वस्तूंचा पुरवठा सार्वजनिक क्षेत्राने करावा किंवा अशा वस्तूंचा पुरवठा करण्यासाठी खाजगी उदयोगसंस्थांचा तोटा भरून काढण्यासाठी सरकाने अनुदान दयावे. थोडक्यात, अपूर्ण स्पर्धेची बाजारपेठ आणि घटता उत्पादन खर्च एकत्रितपणे अस्तित्वात आभ्यास बाजारात वाटपाचा प्रश्न (बाजार अपयश) निर्माण होतो.

**बहिर्गतता**

बहिर्गतता (externalities) ह्या सार्वजनिक वस्तूशी संबंधित असतात. एखादया, विशिष्ट आर्थिक घटकाच्या उत्पादन व उपयोगामुळे इतर आर्थिक घटकांवर होणारे परिणाम म्हणजे बहिर्गतता होय. यालाच बाहयता असेही म्हणतात. बहिर्गतता हे सार्वजनिक वस्तूचे महत्त्वाचे वैशिष्टय असून या दोघांचा एकमेकांशी निकटचा संबंध आहे. अर्थव्यवस्थेतील वस्तूच्या उत्पादन आणिणयोगामुळे निर्माण झालेल्या बहिर्गततेमुळे बाजार अपयश उद्‌भवते.

बहिर्गतता या चांगल्या किंवा वाईट असू शकतात. वेगळ्या शब्दात बहिर्गततेमुळे विशिष्ट आर्थिक घटकांना फायदे होऊ शकतात किंवा तोटे सहन करावे लागतात. विशिष्ट आर्थिक घटकांना फायदे होऊ शकतात किंवा तोटे सहन करावे लागतात. विशिष्ट आर्थिक घटकाच्या उत्पादन व उपभोगामुळे इतर आर्थिक घटकांना कोणत्याही विशेष खर्चाशिवाय आर्थिक फायदे मिळत असतील, तर त्यास चांगल्या किंवा सकारात्मक बहिर्गतता असे म्हणतात. याउलट, विशिष्ट आर्थिक घटकाच्या उत्पादन व उपभोगामुळे इतर आर्थिक घटकांना आर्थिक तोटे सहन करावे लागत असतील तर त्यास वाईट किंवा प्रतिकूल बहिर्गतता असे म्हणतात. शिक्षणामुळे व्यक्तीच्या ज्ञानात व कौशल्यात वाढ होऊन त्याची प्रगती होती. त्याच्या व्यक्तिगत फायदाबरोबरच समाजात चांगले नागरिक निर्माण होऊन समाजाचाही फायदा होतो. म्हणजेच शिक्षणाचा समाजावर चांगला परिणाम होतो. अशा सकारात्मक बहिर्गततेमुळे समाजाचे कल्याण वाढते. याउलट, व्यक्तीने वाहन खरेदी केल्यामुळे त्या व्यक्तीचा प्रवास सुखकारक, किंवा आरामदायी

होत असला तरी अशा अनेक वाहनांमुळे मोठ्या प्रमाणात वायू प्रदूषण होते. वायू प्रदूषणाचे वाईट परिणाम समाजाला भोगावे लागतात. उदा. दिल्लीत होणाऱ्या वायूप्रदूषणामुळे काही काळ शाळा बंद ठेवाव्या लागतात. इतरांनाही त्यांचा त्रास होतो. अशावेळी समाजाचा खर्च वाढतो. त्यातून सार्वजनिक व खाजगी खर्चाचा प्रश्न निर्माण होतो. ज्यावेळी अर्थव्यवस्थेत मोठ्या प्रमाणात बहिर्गतता निर्माण होतात. त्यावेळी होणे अशक्य असते. अशा पेठेत हस्तक्षेप करावा लागतो.

बहिर्गततेचे परिणाम

बहिर्गततेचे दोन महत्त्वाचे परिणाम सांगता येतात. त्यामध्ये

१) बिगर-बाजार बहिर्गत परिणाम

२) बाजार बहिर्गत परिणाम

बाजारातील वस्तूच्या मागणी व पुरवठयावरून ठरणाऱ्या किंमतीद्वारे बहिर्गत परिणाम मोजता येत नसल्यास त्यास बिगर-बाजार बहिर्गत परिणाम असे म्हणतात. विशिष्ट आर्थिक घटकाच्या उत्पादन व उपभोगामुळे इतर आर्थिक घटकांना होणाऱ्या तोट्यापासून या बहिर्गत परिणामात संरक्षण मिळत नाही किंवा त्यात होणाऱ्या लाभापासून इतर आर्थिक घटकांना वगळताही उदा. शिक्षण, नवीन रस्ते यासारख्या वस्तू आणि सेवा कार्यक्षमपणे उपलब्ध होण्यासाठी अशा वस्तूंचे उत्पादन व वितरण सार्वजनिक सत्तेच्या हातात असावे लागते. या परिणामात बहिष्कृती तत्त्वाचा (Principle of exclusion) वापर करता येत नाही.

बाजारातील वस्तूच्या मागणी व पुरवठयावरुन ठरणाऱ्या किंमतीद्वारे बहिर्गत परिणाम मोजता येत असल्यास त्यास बाजार बहिर्गत परिणाम असे म्हणतात. ज्या सार्वजनिक वस्तूंचे बाजार बहिर्गत परिणाम असतात. त्या वस्तू उत्पादन व वितरणासाठी खाजगी क्षेत्राकडे दिल्या तरी चालतात. विशिष्अ परिस्थितीत अशावस्तुंचे उत्पादन व वितरण शासन स्वत:कडेही घेऊ शकते. सर्वसाधारणपणे, ज्या युद्ध खाजगी वस्तूंच्या बाबतीत बहिर्गतता नसतात अशा वस्तूंचे उत्पादन व वितरण खाजगी क्षेत्राकडे सोपविणे योग्य ठरते. कारण अशा वस्तूंच्या पुरवठ्यामध्ये खाजगी खर्च व सामाजिक सीमांत खर्च यामध्ये फरक करता येत नाही. गुणात्मक गरजा व वस्तूंच्या बाबतीतमात्र सरकारचा हस्तक्षेप आवश्यक ठरतो.

**स्वयं-अध्ययनासाठी प्रश्न-३**

**अ) पुढील प्रश्नांमध्ये जे पर्याय दिलेले आहेत, त्यातील अचूक पर्याय निवडा.**

१) बाजार अपयश ही संकल्पना --------शी संबंधित आहे

अ) आर्थिक व तांत्रिक माहितीची अपूर्णता ब) बाजारातील अपूर्ण स्पर्धा

क) बाजार दृष्कृत्ये ड) वरील सर्व

२) बाजार अपयशामुळे अर्थव्यवस्थेत वस्तू व सेवांचे कार्यक्षम वाटप ----------

अ) होत नाही ब) होते

क) अकार्यक्षम वाटप होत नाही ड) वरीलपैकी एकही नाही.

३) बाजार अपयशामुळे निव्वळ सामाजिक कल्याणात --------------- होते

अ) वाढ ब) घट

क) चढ-उतार ड) वरीलपैकी एकही नाही

४) अपूर्ण बाजारपेठेत सार्वजनिक कल्याण महत्तम करणाऱ्या वस्तूंचा पुरवठा------करावा लागतो.

अ) सरकारला ब) खाजगी क्षेत्राला

क) सरकारला करावा लागत नाही ड) वरीलपैकी एकही नाही

५) अपूर्ण स्पर्धेच्या बाजारातील घटत जाणारा उत्पादन खर्च अर्थव्यवस्थेत -------- चा प्रश्न निर्माण करते.

अ) उत्पादनाचा ब) वाटणीचा

क) उपभोगाचा ड) वरीलपैकी एकही नाही

६) बहिर्गतता ह्या ------------ वस्तूशी संबंधित असतात

अ) खाजगी ब) गुणात्मक

क) सार्वजनिक ड) वरीलपैकी एकही नाही.

**ब) एक - दोन वाक्यात उत्तरे लिहा**

१) बाजार अपयश म्हणजे काय?

२) बहिर्गतता म्हणजे काय?

३) बहिर्गततेचे दोन महत्त्वाचे परिणाम सांगा?

## १.३ सारांश

सार्वजनिक अर्थकारण ही अर्थशास्त्राची एक महत्त्वाची शाखा असून यामध्ये शासनाच्या निरनिराळ्या वित्तीय व्यवहारांचा समावेश होतो. प्रस्तूत घटकात आपण मिश्र अर्थव्यवस्थेत शासनाची भूमिका अभ्यासली. मिश्र अर्थव्यवस्थेत आर्थिक विकासाला चालना देण्यामध्ये शासन महत्त्वाची भूमिका बजावते. मिश्र अर्थव्यवस्थेतील शासनाची भूमिका विशद करताना पुढील मुद्दे विचारात घेणे आवश्यक ठरते - (१)

सार्वजनिक क्षेत्राचा विकास करणे (२) खाजगी क्षेत्राचा विकास करणे, (३) संयुक्त क्षेत्राचा विकास करणे, (४) सहकारी संस्थांना प्रोत्साहन देणे, (५) सार्वजनिक व खाजगी क्षेत्रात योग्य समन्वय राखणे, (६) खाजगी क्षेत्रावर नियंत्रण राखणे, (७) समतोल प्रोदेशिक विकास साधणे, (८) विकास प्रकल्पांसाठी निधी उपलब्ध करुन देणे, (९) कल्याण कारी राज्याची भूमिका बजावणे.

देशाच्या आर्थिक विकासाच्या दृष्टीने नियोजनाला फार महत्त्व असते. सरकारला आर्थिक नियोजन व विकासाचा हस्तक (माध्यम) म्हणून महत्त्वपूर्ण भूमिका बजावावी लागते. आर्थिक नियोजन व विकासातील शासनाची भूमिका पुढील मुद्दयांच्या आधारे समजून घेता येते – (अ) प्रत्यक्ष भूमिका: (१) संस्थात्मक बदल, (२) सामाजिक आणि आर्थिक वरकड (३) शिक्षणप्रसार करणे, (४) सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब नियोजन (५) सामाजिक व सांस्कृतिक प्रवृत्तीतील बदल, (६) गुंतवणूकीचा दर वाढविणे (७) शेतीचा विकास करणे, (८) औद्योगिक विकास (९) साधन सामग्रीचा पर्याप्त वापर करणे (१०) आर्थिक व प्रादेशिक विषमता कमी करणे, (११) साधनसामग्रीच्या वापरावर प्रभाव टाकणे, (१२) कायदा व सुव्यवस्था राखणे (१३) संतुलित विकास (१४) स्वावलंबन (१५) बेकारी व दारिद्र्य कमी करणे (१६) देशाची स्पर्धाक्षमता वाढविणे; (ब) अप्रत्यक्ष भूमिका: (१) मौद्रिक धोरण (२) राजकोषीय धोरण, (३) किंमत धोरण, (४) परकीय व्यापारात वाढ करणे, (५) सार्वजनिक क्षेत्र सदृढ करणे (६) आर्थिक नियोजन,

गरजांचे तीन प्रकारात वर्गीकरण करता येते. (१) खाजगी गरजा, (२) सार्वजनिक गरजा किंवा सामूहिक गरजा, आणि गुणात्मक गरजा मानवी गरजांची पूर्तता करण्यामध्ये खाजगी वस्तू, सार्वजनिक वस्तू आणि गुणात्मक वस्तू यांचा समावेश होतो. खाजगी वस्तूंची प्रमुख वैशिष्ट्ये पुढीलप्रमाणे आहेत. १) पूर्ण विभाज्यता, २) अपवर्जनाचे तत्त्व, ३) कार्यक्षम किंमत यंत्रणा, (४) वस्तूच्या गुणवत्तेबद्दल माहिती (५) स्थिर किंवा वाढत्या उत्पादन खर्चाची स्थिती (६) बाह्य लाभ व खर्चाचा अभाव, (७) स्पर्धात्मकता, सार्वजनिक वस्तूंची प्रमुख वैशिष्टये पुढील मुद्यांच्या आधारे सांगता येतात. (१) अविभाज्यता (२) अपवर्जन तत्त्वाचा अभाव (३) किंमत यंत्रणेचा अभाव (४) वस्तूंच्या गुणत्ते बद्दल माहिती, ५) बाह्य लाभ (६) घटत्या उत्पादन खर्चाची स्थिती (७) अ-स्पर्धात्मकता, गुणात्मक वस्तूची प्रमुख वैशिष्ट्ये पुढील मुद्यांच्या आधारे सांगता येतात. (१) सर्वांना सारख्या प्रमाणात उपभोग घेता येत नाही (२) वस्तूंच्या संदर्भात मर्यादित माहिती, (३) बाहय लाभ (४) उत्पादन खर्चात प्रथम वाढ नंतर घट.

बाजार अपयश ही सर्वसाधारणपणे प्रत्ययांस येणारी घटना आहे. बाजार अपयशामुळे निव्वळ सामाजिक कल्याणात घट होते. तसेच वस्तू आणि सेवांचे कार्यक्षम वाटप होत नाही. बाजार अपयशावर तोडगा काढण्यासाठी सार्वजनिक वस्तूंच्या पुरवठ्यातून सरकारला मार्ग काढता येतो. स्पर्धात्मक बाजारपेठ आणि अपूर्ण बाजारपेठ यामध्ये संसाधनाचे वाटप वेगवेगळ्या पद्धतीने होते. अपूर्ण स्पर्धेच्या बाजारातील घटत जाणारा उत्पादन खर्च अर्थव्यवस्थेत वाटणीचा प्रश्न निर्माण करते. बहिर्गतता ह्या सार्वजनिक वस्तूशी संबंधित असतात.

## १.४ संज्ञा

**सार्वजनिक उपक्रम :** सार्वजनिक क्षेत्रात स्थापन झालेल्या सरकारी मालकीच्या उदयोगांना सार्वजनिक क्षेत्रातील उदयोग किंवा सार्वजनिक क्षेत्रातील उपक्रम (Public Sector Undertakings - PSUS) असे म्हणतात.

**खाजगी उद्योग :** खाजगी क्षेत्रात स्थापन झालेल्या खाजगी मालकीच्या उदयोगांना खाजगी क्षेत्रातील उदयोग असे म्हणतात.

**गुंतवणूक :** वस्तूच्या उत्पादनाच्या प्रक्रियेत जो घटक प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षरित्या भाग घेतो त्या घटकावर करण्यात येणाऱ्या खर्चास गुंतवणूक म्हणतात.

**आर्थिक विकास :** दीर्घकाळापर्यंत देशाच्या राष्ट्रीय उत्पन्नातील वाढीबरोबरच भौतिक कल्याणातही सुधारणा होणे म्हणजे आर्थिक विकास होय.

**राष्ट्रीय उत्पन्न :** देशात एका वर्षाच्या काळात उत्पादित झालेल्या अंतिम वस्तू व सेवांची पैशातील मूल्यांची बेरीज म्हणजे राष्ट्रीय उत्पन्न होय.

**आर्थिक नियोजन :** ठरविलेली आर्थिक व सामाजिक उद्दिष्टे साध्य करण्यासाठी देशातील साधनसामग्रीचा पर्याप्त वापर करण्यासाठी स्वीकारलेला मार्ग किंवा पद्धती म्हणजे आर्थिक नियोजन होय.

**बेकारी :** उत्पादन घटकाला त्याच्या पायतेनुसार व प्रचलित दरानुसार अर्थव्यवस्थेत काम उपलब्ध नसणे तेव्हा त्यास बेकारी असे म्हणतात.

**स्पर्धात्मक बाजारपेठ :** ज्या बाजारपेठेत ग्राहक व विक्रेते अनेक असतात, वस्तू एकजिनसी असतात, किंमत एकच असते, उत्पादन घटकांची संपूर्ण गतीशीलता असते आणि मुक्त प्रवेश असतो, त्यास स्पर्धात्मक बाजारपेठ असे म्हणतात.

**सार्वजनिक आयव्यय :** सार्वजनिक सत्तेच्या उत्पन्न, खर्च आणि कर्जाचा एकत्रित अभ्यास ज्या शाखेत केला जातो, त्यास सार्वजनिक आयव्यय असे म्हणतात.

**संसाधन :** मानवी उपभोग किंवा उत्पादनासाठी जो घटक प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षरित्या उपयोगी पडतो, त्यास संसाधन असे म्हणतात.

**कार्यक्षमता :** उत्पादन घटकांची उत्पादन करण्याची क्षमता म्हणजे कार्यक्षमता होय, ही कार्यक्षमता वेतन किंवा मोबदला, शिक्षण, तांत्रिक ज्ञान, कामाचे ठिकाण, आरोग्य इ. घटकांवर अवलंबून असते.

**मौद्रिक धोरण :** पैशाच्या संख्यामानातील उपलब्धतेच्या बाबतीत मौद्रिक अधिपलेकडून केलेली सावध कृती म्हणजे मौद्रिक धोरण होय.

**राजकोषीय धोरण :** राजकोषीय धोरण म्हणजे कर आणि सार्वजनिक खर्च यातील बदल ज्याची पूर्ण रोजगार आणि किंमत स्थैर्य ही उद्दिष्टे असतात.

**व्यापार चक्र :** अर्थव्यवस्थेतील तेजीकडून मंदीकडे व मंदीकडून तेजीकडे होणारे नियमित बदल म्हणजे व्यापार चक्र होय.

**दारिद्र्य :** जेव्हा व्यक्तीला किंवा कुटुंबाला मिळणाऱ्या एकूण उत्पन्नातून त्याच्या किंवा कुटुंबाच्या आवश्यक गरजांची पूर्तता होत नाही, तेव्हा त्यास दारिद्र्य असे म्हणतात.

**औद्योगिकीकरण :** औदयोगिकीकरण म्हणजे नवीन उदयोगाची स्थापना किंवा उत्पादनाची निर्मिती होय.

**१.५ स्वयं-अध्ययनासाठीच्या प्रश्नांची उत्तरे**

**स्वयं-अध्ययनासाठी प्रश्न - १**

**अ) बहुपर्यायी प्रश्न -**

१) (ड) वरील सर्व

२) (क) मिश्र

३) (क) मिश्र

४) (क) सरकार आणि खाजगी क्षेत्रामध्ये विभागले जातात.

५) (अ) मिश्र

६) (ड) वरील सर्व

७) (क) सार्वजनिक क्षेत्राबरोबर खाजगी क्षेत्राचा

८) (ब) मिश्र

९) (अ) शासनाला

**(ब) एक-दोन वाक्यात उत्तरे-**

१) साधनसामग्रीचे संकलन करणे, अर्थव्यवस्थेतील रोजगार संधी वाढविणे, किंमत स्थिरता राखणे, आर्थिक वृद्धीला चालना देणे, देशात आर्थिक स्थैर्य राखणे यासारखी आर्थिक विकासाची उद्दिष्टे साध्य करण्यासाठी राजकोषीय धोरणाचा वापर केला जातो.

२) सार्वजनिक सत्तांचे उत्पन्न, खर्च आणि कर्ज या अनुषंगाने येणारे घटक व त्यांचा अर्थव्यवस्थेच्या सार्वजनिक व खाजगी क्षेत्रावर होणारा परिणाम या सर्वांचा अभ्यास सार्वजनिक अर्थकारणात केला जातो.

३) अर्थव्यवस्थेचे उत्पादक साधनसंपत्तीच्या मालकीनुसार तीन प्रकार केले जातात-(अ) भांडवलशाही अर्थव्यवस्था, (ब) समाजवादी अर्थव्यवस्था, (क) मिश्र अर्थव्यवस्था

४) ज्या अर्थव्यवस्थेत खाजगी व सार्वजनिक क्षेत्राचे सहअसितत्त्व असते. त्याला मिश्र अर्थव्यवस्था असे म्हणतात.

स्वयं-अध्ययनासाठी प्रश्न - २

अ) बहुपर्यायी प्रश्न-

१) (अ) तीन

२) (ब) खाजगी

३) (ब) खाजगी

४) (क) सार्वजनिक

५) (अ) सार्वजनिक

६) (ब) खाजगी

७) (क) सार्वजनिक

८) (अ) गुणात्मक

९) (अ) खाजगी

१०) (क) खाजगी

११) (अ) सार्वजनिक

**ब) एक-दोन वाक्यात उत्तरे-**

१) व्यक्ती त्यांच्या उत्पन्नानसुार ज्या गरजांची पूर्तता करतात. त्यांना खाजगी गरजा असे म्हणतात.

२) ज्या गरजांचा उपभोग सर्वच नागरिकांच्याकडून सारख्याच प्रमाणात घेतला जातो, त्यास सार्वजनिक गरजा असे म्हणतात.

३) कल्याणकारी सरकारकडून गरीब व गरजू व्यक्तींना ज्या गरजांची पूर्तता करण्यासाठी वस्तू आणि सेवांचा पुरवठा केला जातो. त्यास गुणात्मक गरजा असे म्हणतात.

४) विशिष्ट वस्तूंचा उपभोग घेणाऱ्या व्यक्तीलाच उपयोगिता मिळते व ती इतरांना नाकारली जाते. अशा वस्तूंना खाजगी वस्तू असे म्हणतात.

५)   विशिष्ट वस्तूंचा उपभोग घेणाऱ्या व्यक्तीबरोबरच इतरांनाही त्या वस्तूची उपयोगिता मिळते, तेव्हा त्या वस्तूला सार्वजनिक वस्तू असे म्हणतात.

६)   सार्वजनिक व खाजगी वस्तूंच्या वैशिष्ट्यांचे मिश्रण म्हणजे गुणात्मक वस्तू होय.

७)   अपवर्जन तत्त्व म्हणजे वगळता येणे. उपभोक्ता एखादी वस्तू विकत घेत असताना तो त्या वस्तूची किंमत देत असेल तेव्हाच ती वस्तू त्याला मिळेल. म्हणजेच किंमत न देणाऱ्याला खाजगी वस्तूच्या उपभोगापासून वगळले जाते.

**स्वयं-अध्ययनासाठी प्रश्न -३**

अ) बहुपर्यायी प्रश्न -

१)   (ड) वरील सर्व

२)   (अ) होत नाही

३)   (ब) घट

४)   (अ) सरकारला

५)   (ब) वारणीचा

६)   (क) सार्वजनिक

**(ब) एक - दोन वाक्यात उत्तरे-**

१)   जो बाजार अर्थव्यवस्थेतील साधनसामग्रीचे वाटप कार्यक्षमपणे करण्यास अयशस्वी ठरतो, त्या बाजाराच्या स्थितीला बाजार अपयश असे म्हणतात.

२)   एखाद्या विशिष्ट आर्थिक घटकाच्या उत्पादन व उपभोगामुळे इतर आर्थिक घटकांवर होणारे परिणाम म्हणजे बहिर्गतता होय.

३)   बहिर्गततेचे दोन महत्त्वाचे परिणाम सांगता येतात -(अ) बिगर बाजार बहिर्गत परिणाम, आणि (ब) बाजार बहिर्गत परिणाम.

**१.६ प्रश्नावली**

**अ) दीघोत्तरी प्रश्न**

१)   मिश्र अर्थव्यवस्थेतील शासनाची भूमिका स्पष्ट करा.

२)   'मिश्र अर्थव्यवस्थेतील सरकार महत्त्वाची भूमिका बजावते' चर्चा करा.

३)   मिश्र अर्थव्यवस्थेतील सरकारच्या बदलत्या भूमिकेचे परीक्षण करा.

४) आर्थिक नियोजन व विकासाचा हस्तक म्हणून सरकारला करावी लागणारी कार्ये स्पष्ट करा.

५) देशाच्या आर्थिक विकास व नियोजनातील शासनाची भूमिका विशद करा.

६) देशाच्या आर्थिक नियोजनातील शासनाची भूमिका विशद करा.

७) खाजगी वस्तू, सार्वलनिक वस्तू आणि गुणात्मक वस्तूंतील फरक स्पष्ट करा.

८) मानवी गरजा आणि वस्तूचे सविस्तर वर्गीकरण करा.

९) खाजगी गरजा, सार्वजनिक गरजा आणि गुणात्मक गरजा यांचे सविस्तर स्पष्टीकरण दया.

१०) खाजगी वस्तू व सार्वजनिक वस्तूंचा अर्थ स्पष्ट करुन त्यांची वैशिष्ट्ये सांगा.

११) सार्वजनिक वस्तू व गुणात्मक वस्तूंचा अर्थ स्पष्ट करून त्यांची वैशिष्ट्ये सांगा.

१२) बाजार अपयश म्हणजे काय? सार्वजनिक वस्तूंच्या बाबतीत बाजार अपयशाच्या संकल्पनेची चर्चा करा.

१३) अपूर्ण बाजारपेठ आणि घटता उत्पादन खर्च यावर सविस्तर विश्लेषण करा.

**(ब) टीपा लिहा**

१) मिश्र अर्थव्यवस्थेतील शासनाची भूमिका

२) आर्थिक नियोजन व विकासातील सरकारची भूमिका

३) मानवी गरजा आणि वस्तूा

४) सार्वजनिक आणि गुणात्मक गरजा

५) खाजगी वस्तूंची प्रमुख वैशिष्ट्ये

६) सार्वजनिक वस्तूंची प्रमुख वैशिष्ट्ये

७) गुणात्मक वस्तूंची प्रमुख वैशिष्ट्ये

८) बाजार अपयश

९) सार्वजनिक वस्तू आणि बाजार अपयश

१०) अपूर्ण बाजारपेठ

११) अपूर्ण बाजारपेठेतील घटना उत्पादन खर्च

१२) बहिर्गतता

## १.७ पुढील अभ्यासासाठी संदर्भ


1. Lekhi R.K. (2013):' The Economics of Development & planning Kalyani Publishers, New Delhi.
2. Jhihgan M.L. (2017):' The Economics of Development and Planning Vrinda publications (p) Lto, New Delhi.
3. Musgrave R.A. (1959):' The Theory of public Finance,' Mchraw Hill, Kogakhusa, Tokyo,
4. Cornes R. and T. Sanoler - (1986):' The Theory of Exlernatihes, Public goods and Cambridge University Press, Cambrioge.
5. Friwoman A. (1986):' welfare Economics and Social' Chaice Theroy, Mortins Nijhoff, Bostan.
6. पाटील जे. एफ. (संपादित) (४०११) :' सार्वजनिक अर्थकारण; फडके प्रकाशन कोल्हापूर.


**Test 1 : Advanced Calculus** **Max Marks : 30**

**Attempt any Five questions** **Time : 1hr.**

1. Define total Variation. Let F be of bounded Variation

   On (a,b) and at (a,b). Show that $v_f$ (a,b) = $v_f$ (a,c) +$v_f$ (c,b).

2. Suppooe Fere ($\alpha$) (a,b). Show that $\alpha$ ER(F) on (a,b).

   and $\int_a^b Fd\alpha$-+ $\int_a^b \alpha\, df$ = f (b) $\alpha$ (b) - f (a) $\alpha$ (a)

3. Show that f eR - ($\alpha$ ) on (a,b) if and only if f Satisfies Riemann's condition. ($\alpha \uparrow$

   an (a,b).

4. Assume $\alpha \uparrow$ an (a,b). Suppore f eR ($\alpha$) an (a,b) Show that | f | e R ($\alpha$) an (a,b) and $f^2$ eR ($\alpha$) an (a,b) and $f^2$ eR ($\alpha$) an (a,b)

5. Assume that f eR ($\alpha$) on (a,b) $\alpha \uparrow$ on (a,b)

   Define F (X) = $\int_a^X Fd\alpha$ Let g F R ($\alpha$) on (a,b)$^4$

   Show that 9 f R (F) and F.g FR ($\alpha$) on (a,b).

6. Let $\alpha \uparrow$ on (a,b), let a<c<b. Suppose f and $\alpha$ are discontinuous from the right at X = C. Show that $\int_a^b$ fd$\alpha$ Cannot exist.

7. State and prove second mean value theorem for Riemann Stieltjes integrals.

****

# घटक क्रमांक २ :

# सार्वजनिक निवड आणि सार्वजनिक धोरण सिद्धांत

## Unit II : Theory of Public Choice and Public Policy

उद्दिष्टे - Objectives

१. प्रास्ताविक- Introduction

२. अभ्यास विषयाची मांडणी- (Presentation of Subject Matter)

२.१.उत्पादन साधने वाटपाच्या खाजगी आणि सार्वजनिक यंत्रणा-
(Private and Public Mechanism for Allocating Resources)

२.२.सार्वजनिक वस्तूंना पसंती व्यक्त करण्यात आणि पसंत्यांचे एकत्रिकरण करण्यातील समस्या -
(Problems of Preference Revealation and Aggregation of Preferences)

१. सामाजिक पसंती अभिव्यक्तीचा निवडलेल्या दृष्टिकोन : निरपेक्ष आणि सापेक्ष दृष्टिकोन

२. सामाजिक निवडीचा राजकीय आंतरक्रिया खर्च सिद्धांत-

(Political Interactions Costs Theory of Public Social Choice)

३. सामाजिक निवडीचा ॲरोचा अशक्यता प्रमेय- Arrow's Impossibility Theorem of Social Choice

४. लोकशाहीचा आर्थिक सिद्धांत- Economic Theory of Democracy

५. राजकीय-आर्थिक नोकरशाही सिद्धांत- Politico-Eco-Bureaucracy Theory

२.२.सार्वजनिक वस्तूंची तरतूद- (Provision of Public Goods)

१. सार्वजनिक वस्तूं तरतूदीचे विकसेल व लिंदाल यांचे ऐच्छिक विनिमय प्रतिमान-
(Voluntary Exchange Model of Provision of Public Good by Wicksell and Lindahl)

२. सार्वजनिक वस्तू विकेंद्रीत पुरविण्याची अशक्यता : सॅम्युअल्सन आणि मसग्रेव्ह यांचे योगदान-

(Impossibility of Decentralised Provision of Public Goods : Contributions of Samuelson and Musgrave)

२.३ सार्वजनिक वस्तू मागणी प्रकटीकरण योजना/यंत्रणा-
(Demand Revealing Schemes/Mechanisms for Public Goods)

२.४ आपली प्रगती आजमवा- (Check Your Progress)

२.५ सारांश- (Summary)

२.६ स्मरणीय संकल्पना- (Terms to Remember)

२.७ प्रगती आजमवाची उत्तरे

२.८ अभ्यासासाठी प्रश्न- (Exercise)

२.९ संदर्भ ग्रंथ- (References)

**उद्दिष्टे** : (Objectives)

१. सार्वजनिक निवड आणि सार्वजनिक धोरण संकल्पना समजून घेणे.

२. सामाजिक निवडीच्या प्रकटीकरणातील आणि एकत्रिकरणातील समस्या स्पष्ट करणे.

३. सार्वजनिक वस्तुंच्या पुरवठ्याच्या तरतुदींचे स्पष्टीकरण देणे.

४. सार्वजनिक वस्तुंचा पुरवठा आणि सार्वजनिक वस्तुंना मागणी प्रगट करणाऱ्या योजनांमधील संबंध स्पष्ट करणे.

**१. प्रास्ताविक :-** Introduction

कमी अधिक फरकाने सर्वच प्रकारच्या अर्थव्यवस्थांमध्ये सरकार महत्त्वाची भूमिका बजावते. समाजवादी आणि मिश्र अर्थव्यवस्थेत सरकारची भूमिका अत्यंत महत्त्वाची असते. तर तुलनेने भांडवलशाही अर्थव्यवस्थेतील सरकारची भूमिका मर्यादित असते. सरकार आपल्या सार्वजनिक अंदाजपत्रकाच्या माध्यमातून लोकांना सार्वजनिक वस्तू पुरवून त्यांच्या सामाजिक कल्याणात वाढ घडवून आणण्याचा प्रयत्न करते. ते करण्यासाठी सार्वजनिक वस्तूंबद्दलच्या लोकांच्या आवडी-निवडी व पसंती सरकारला माहीत असणे आवश्यक असते. या पार्श्वभूमीवर सार्वजनिक वस्तूंना लोकांच्या पसंती दर्शविणाऱ्या सिद्धांताचा अभ्यास या प्रकरणात केला आहे. तसेच सार्वजनिक वस्तू पुरविण्यासाठी सरकार कशी तरतूद करते त्याचे विश्लेषण करणारे सिद्धांतही हे प्रकरण अभ्यासते.

**२. अभ्यास विषयाची मांडणी :-** (Presentation of Subject Matter)

हे प्रकरण सरकारने लोकांना पुरविण्याच्या सार्वजनिक वस्तू लोकांच्या पसंतीचा विचार करून पुरविण्याचा प्रयत्न केला जातो. यासाठी सार्वजनिक वस्तूंना लोकांना पसंती व्यक्त करताना येणाऱ्या अडचणींचा विचार करावा लागतो. त्याचे सैद्धांतिक विवेचन सार्वजनिक अर्थशास्त्र करते.

## २.१ उत्पादन साधने वाटपाच्या खाजगी आणि सार्वजनिक यंत्रणा :- (Private and Public Mechanism for Allocating Resources)

**प्रस्तावना :-** (Introduction)

उत्पादन साधने ही खुप महत्त्वाची असतात कारण त्यांच्या शिवाय एकही वस्तु किंवा सेवेचे उत्पादन शक्य

नाही. मात्र वास्तवात उत्पादन साधने खूप मर्यादित उपलब्ध असुन ती पर्यायी उपयोगाची असल्याने त्यांची दुर्मिळता वाढते. तर दुसऱ्या बाजुने असंख्य व पुन्हा पुन्हा उद्‌भवणाऱ्या माणवी गरजा भागवण्यासाठी मोठया प्रमाणावर वस्तूंचे उत्पादन करावे लागते. त्यामुळे उत्पादन साधणांचे योग्य वाटप आणि पुरेपुर वापर करणे आवष्यक ठरते. या पार्श्वभुमिवर उत्पादन साधनांच्या वाटपाचा अभ्यास करणे आवश्यक ठरते. अर्थव्यवस्थेतील उत्पादन उपक्रमांचे ढोबळमानाने खाजगी क्षेत्र आणि सार्वजनिक क्षेत्र अशा उत्पादक क्षेत्रात वर्गीकरण केले जाते. यातुन खाजगी क्षेत्र आणि सार्वजनिक क्षेत्र यांच्यात उत्पादन साधनांचे वाटप कसे होते याचा अभ्यास करण्याची गरज निर्माण होते.

सार्वजनिक अर्थशास्त्र एक अर्थशास्त्राची महत्वाची शाखा म्हणुन उत्पादन साधनांच्या दुर्मिळतेच्या मुलभूत आर्थिक प्रष्नाच्या अभ्यासास महत्व देते. उत्पादन साधनांची दुर्मिळता अर्थव्यवस्थेची वस्तु व सेवांची उत्पादन क्षमता मर्यादित करते. जमिन हे नैसर्गिक उत्पादन साधन मर्यादित संख्येत उपलब्ध असल्याने कच्च्या मालाच्या पुरवठयावर मर्यादा आणते. श्रम हा उत्पादन घटक त्याची संख्या व गुणवत्ता विचारात घेतल्यास त्याची नियंत्रणे आणि मर्यादा स्पष्ट होतात. भांडवल निर्मिती मर्यादित असल्याने भांडवलाची उपलब्धताही मर्यादितच आहे. मात्र अमर्यादित आणि पुन्हा पुन्हा उद्‌भवणाऱ्या मानवी गरजा भागवण्यासाठी वस्तु व सेवांचे मोठया प्रमाणावर उत्पादन करावे लागते. यातुन सरकार करत असलेल्या वाटप कार्याचे महत्त्व वाढते.

कोणत्याही प्रकारच्या अर्थव्यवस्थेपुढे एक अत्यंत महत्त्वाचा आर्थिक प्रश्न असतो, तो म्हणजे मर्यादित आणि पर्यायी उपयोगी साधनांचे योग्य वाटप करून असंख्य आणि पुन्हा पुन्हा उद्‌भवणाऱ्या मानवी गरजा भागविण्यासाठी आवश्यक वस्तु व सेवांचे मोठया प्रमाणावर उत्पादन करने. त्यासाठी जे महत्त्वाचे आर्थिक निर्णय अर्थव्यवस्थेत घ्यावे लागतात, ते म्हणजे कशाचे उत्पादन करावे ? उत्पादन किती करावे ? इत्यादी. यासाठी अर्थव्यवस्थेत वस्तु व सेवांच्या उत्पादनाचे प्रमाण आणि रचना ठरवावी लागते. त्यामुळेच सरकारच्या वाटप कार्यास महत्त्व प्राप्त होते. यासाठी अर्थव्यवस्थेत उत्पादन साधनांचे वाटप करण्यासाठी संस्थात्मक साधने किंवा यंत्रणा असाव्या लागतात, त्या उत्पादन साधनांच्या वाटपाचा निर्णय घेण्यासाठी उपयुक्त ठरतात.

उत्पादन साधनांचे वेगवेगळया वस्तुंच्या उत्पादनासाठी उत्पादन साधनांचे वाटप करण्यासाठी दोन यंत्रणा किंवा संस्था आहेत. त्या संस्था किंवा यंत्रणा म्हणजे बाजार व्यवस्था आणि सरकार होय. ढोबळ मानाने अर्थव्यवस्थेतील उत्पादन उपक्रमांचे दोन उत्पादक क्षेत्रात, सार्वजनिक क्षेत्र आणि खाजगी क्षेत्र असे वर्गीकरण केले जाते. यातील बाजार यंत्रणा ही संस्था किंवा व्यवस्था खाजगी क्षेत्रात उत्पादन साधनांचे वाटप करण्यासाठी उपयुक्त ठरते. तर सार्वजनिक क्षेत्रात उत्पादन साधनांच्या वाटपासाठी सरकार ही यंत्रणा किंवा संस्था उपयुक्त ठरते.

खाजगी क्षेत्रात उत्पादन साधनांचे वाटप मागणी आणि पुरवठा यांच्यातुन ठरणारी किंमत यंत्रणा उत्पादन साधनांचे वाटप करते कि जी उपभोक्त्यांचे सार्वभौमत्व आणि उत्पादकांची नफयाची प्रेरणा यातून ठरते. याउलट सार्वजनिक क्षेत्रात उत्पादन साधनांचे वाटप सरकारी अंदाजपत्रकातील महसुल आणि खर्च व्यवहारातुन ठरते. अशा प्रकारे मागणी आणि पुरवठा आणि त्यातुन निश्चित होणारी किंमत यंत्रणा खाजगी क्षेत्रातील उत्पादन साधनांचे वाटप अर्थव्यवस्थेत करते. तर सरकारचे अंदाजपत्रक ज्यात महसुल आणि खर्च व्यवहारांचा समावेश असतो ते

उत्पादनसाधनांचे वाटप अर्थव्यवस्थेत सार्वजनिक क्षेत्रात करतात. म्हणुन अर्थव्यवस्थेत उत्पादन साधनांचे वाटप करणाऱ्या या दोन संस्था किंवा यंत्रणा आहेत.


वास्तव परिस्थितीत मात्र कोणत्याही अर्थव्यवस्थेत उत्पादन साधनांचे वाटप करण्यासाठी एका यंत्रणेचा किंवा संस्थेचा वापर केला जात नाही. त्याचे कारण म्हणजे प्रचलीत अर्थव्यवस्था मिश्र अर्थव्यवस्था निर्माण झाल्या आहेत. त्यांच्यात फक्त काही प्रमाणाचा फरक आहे. विद्यमान अर्थव्यवस्था बाजार यंत्रणा आणि सरकार यांचा एकत्रित वापर करून उत्पादन साधनांचे वाटप वेगवेगळया प्रकारच्या वस्तुंचे उत्पादन करण्यासाठी करत असल्याचे दिसते. ज्या अर्थव्येवस्थेत बाजार यंत्रनेचे प्राबल्य आहे तिला भांडवलशाही अर्थव्यवस्था म्हणतात. याउलट जर अर्थव्यवस्थेत सरकार उत्पादन साधनांच्या वाटपाचा निर्णय प्राबल्याने घेत असेल तर त्यास समाजवादी अर्थव्यवस्था असे म्हणतात.

**अंतरक्षेत्रिय उत्पादन साधने वाटप : पर्याप्त आणि अपर्याप्त :–**

(Intersector Resource Allocation : Optimal and suboptimal)

अर्थव्येवस्थेला उत्पादन साधनांचे वाटप खाजगीक्षेत्र आणि सार्वजनिक क्षेत्र या उत्पादक क्षेत्रांमध्ये करायचे असते. जेव्हा उत्पादन साधनांचे वाटप लोकांच्या पसंती आकृतीबंध आणि अभावी मागणी यातुन होते तेव्हा त्यास पर्याप्त उत्पादन साधनांचे वाटप म्हणतात. त्यास सामाजिक समतोल असेही म्हणतात. अंतरक्षेत्रिय उत्पादन साधनांच्या वाटपाचे प्रत्यक्ष आणि पर्याप्त बिंदु एकच किंवा वेगवेगळे असु शकतात. जेव्हा ते बिंदु वेगवेगळे असतात तेव्हा उत्पादन साधनांचे क्षेत्रिय वाटप अपर्याप्त झाले आहे असे समजावे. यालाच सामाजिक असमतोल किंवा अंतरक्षेत्रिय उत्पादन साधनांचे चुकिचे वाटप असेही म्हटले जाते. पर्याप्त आणि अपर्याप्त अंतरक्षेत्रिय उत्पादन साधनांच्या वाटपातील संबंध पुढिल आकृतीत दाखवीला आहे.

Intersector resource Silocation: Optimal and Suboptimal points




Private Sector Output
(Percent of National Output)

A = Point optirnal Intesector Resource Allocation (assumed).
B.C = Points Of Suboptimal Intersector Resource Allocation.

वरील आकृतीत असे गृहित धरण्यात आले आहे कि अ हा पर्याप्त उत्पादन साधन वाटप बिंदु आहे. त्यामुळे खाजगी क्षेत्र आणि सार्वजनिक क्षेत्र यांच्या उपलब्ध उत्पादन साधनांचे पर्याप्त वाटप झाले असुन खाजगी क्षेत्राला ७५ टक्के तर सार्वजनिक क्षेत्राला २५ टक्के उत्पादन साधने वाटली आहेत. हा सामाजिक समतोल बिंदु समाजातील लोकांच्या खाजगी वस्तु व सार्वजनिक वस्तु यांना असलेली पसंती, आणि प्रभावी मागणी यातुन ठरला आहे, कि जी प्रभावी मागणी उत्पन्न आणि संपत्तीचे वाटप आणि लोकांना मिळालेला मतदान हक्क यातुन निश्चित होते.

समजा अंतरक्षेत्रिय उत्पादन साधनांच्या वाटपाचा अ हा पर्याप्त बिंदु असेल आणि प्रत्यक्ष क्षेत्रिय साधने वाटप ही A बिंदुतच झाले असेल तर खाजगी क्षेत्र आणि सार्वजनिक क्षेत्र यांच्यातील उत्पादन साधने वाटपाचा बिंदु एकच (अ) असतो. मात्र प्रत्येक्ष उत्पादन साधने वाटपबिंदु B किंवा C असेल तर खाजगी क्षेत्र आणि सार्वजनिक क्षेत्र यात उत्पादन साधनांचे अपर्याप्त वाटप झाले आहे असे समजावे. जर क्षेत्रिय उत्पादन साधने वाटपाचा बिंदु B असेल तर सार्वजनिक क्षेत्रासाठी उत्पादन साधनांचे अतिरिक्त वाटप ($y\ y^1$) झाले आहे असे समजावे. जर ते C बिंदुत झाले असेल तर खाजगी क्षेत्रात उत्पादन साधनांचे अतिरिक्त वाटप ($x\ x^2$) झाले आहे असे समजावे.

**अंतर क्षेत्रिय पर्याप्त उत्पादन साधने वाटप समवृत्ती दृष्टीकोन :-**

(Indifference Approach to Optimal Intersector Resource Allocation)


समवृत्ती वक्र विश्लेषन उत्पादन साधनांच्या अंतरक्षेत्रिय वाटपासाठी लागु केल्यास आपणास उत्पादन साधनांचे क्षेत्रिय वाटप पर्याप्त कोठे होते ते समजते. अंतर क्षेत्रिय उत्पादन साधनांच्या पर्याप्त वाटपाचे स्पष्टीकरण देण्यासाठी सामाजिक उत्पादन शक्यता वक्र (Societal Production Possibility Curve) आणि सामाजिक समवृत्ती वक्र (Social Indifference Curve) आवश्यक असतात. सामाजिक उत्पादन शक्यता वक्र म्हणजे असा वक्र जो उपलब्ध उत्पादन साधनांच्या सहायाने सार्वजनिक वस्तु आणि खाजगी वस्तु उत्पादनाचे वेगवेगळे एकाच उत्पादन पातळीला गट दर्षवितो. हा वक्र आरंभ बिंदुला अंतर्गोल असतो. कारण दुर्मिळ उत्पादन साधने सार्वजनिक वस्तु आणि खाजगी वस्तु यांच्या उत्पादनात समान कार्यक्षमतेने पर्यायी असुशकत नाही. ही असमानता असण्याची कारणे म्हणजे १) काही आर्थिक वस्तु प्रती नग कमी वास्तव घटक खर्चातुन दुसऱ्या क्षेत्रापेक्षा एका उत्पादन क्षेत्रात निर्माण करणे शक्य होते. २) एका उत्पादन क्षेत्रात अनेक वस्तुंचे उत्पादन केल्यास वाढत्या खर्चाची प्रवृत्ती निर्माण होते.

सामाजिक समवृत्ती वक्र म्हणजे असा वक्र जो खाजगी वस्तु आणि सार्वजनिक वस्तु यांचे अनेक गट दर्शवितो कि जे समाजाला समान समाधान किंवा कल्याण देतात. तो खाजगी वस्तु आणि सार्वजनिक वस्तु उपभोगातील समाजासाठी सीमांत पर्यायता दर दर्शवितो. सामाजिक समवृत्ती वक्र लोकांच्या पसंती बरोबरच प्रभावी मागणी दर्शवितो. जी उत्पन्न, संपत्ती स्थिती आणि राजकिय मतवाटप यातुन निश्चित होते. सामाजिक समवृत्ती वक्र आंरभ बिंदुला बहिर्गोल असतो कारण तो खाजगी वस्तु व सार्वजनिक वस्तु यांच्यातील घटता सीमांत पर्यायता दर दर्शवितो. घटत्या सीमांत पर्यायता दराची कारणे म्हणजे १) जेव्हा वस्तु अधिक दुर्मिळ असते तेव्हा तिची सापेक्ष पर्यायता अधिक असते, २) जेव्हा सरकार उत्पादन साधने वाटपात प्रबळ असते तेव्हा राजकिय आणि आर्थिक

स्वातंत्र्याचे मोठया प्रमाणावर नुकसान होते.

समवृत्ती दृष्टिकोणाप्रमाणे खाजगी क्षेत्र आणि सार्वजनिक क्षेत्र यात उत्पादन साधनांचे पर्याप्त वाटप कोठे होते, ज्याला महत्तम सामाजिक कल्याण बिंदु असेही म्हणतात, ते पुढील आकृतीत दर्शविले आहे.

**$S^1$, $S^2$, $S^3$, $S^4$ आकृती**




a = Point of optimal Intersector allocation
b,c,d = Points of Suboptimal Intersector Ailocation.

वरील आकृतीत P सामाजिक उत्पादन शक्यता वक्र आणि $S^3$ सामाजिक समवृत्ती वक्र यांचा उतार समतोल बिंदुत एकच आहे कि जो खाजगी वस्तु व सार्वजनिक वस्तु यांच्यातील सीमांत रूपांतरण दर आणी सीमांत पर्यायता दर समान दर्शवतो. त्यामुळे आर्थिक वस्तुंना सामाजिक पसंती आणि समाजाच्या उत्पादन क्षमता यांच्यात समतोल प्रस्तापित होतो आणि तो बिंदु महत्तम सामाजिक कल्याण बिंदु असतो, जो वस्तुंचे पर्याप्त वाटप आणि उत्पादन घटकांचे क्षेत्रिय पर्याप्त वाटप समाजाने साध्य केले ते दर्शवितो. वरील आकृतीत b, c, d हे अपर्याप्त अंतरक्षेत्रिय उत्पादन साधने वाटप बिंदु आहेत. त्यामुळे ते सामाजिक असमतोल दर्शवितात. आकृतीतील ल बिंदुत सार्वजनिक क्षेत्रात उत्पादन साधनांचे अतिरिक्त वाटप होते तर ल बिंदुत खाजगी क्षेत्राला उत्पादन साधनांचे अतिरिक्त वाटप होते. ते सामाजिक कल्याणाची अल्प पातळी दर्शवितात कारण वस्तु व सेवांचा अपुरा उपभोग आणि उत्पादन साधनांचा अपुरा वापर होतो.

**बदलत्या कालावधिनुसार अंतरक्षेत्रिय उत्पादन घटक वापरातील बदल**

(Changes in Intersector Resource Allocation Overtime)

बदलत्या कालावधीनुसार उत्पादन साधनांचे अंतरक्षेत्रिय वाटप बदलते. हा बदल दोन प्रकारचा असतो.
१) पर्याप्त अंतरक्षेत्रिय उत्पादन साधने वाटप स्थिर असताना प्रत्यक्ष अंतरक्षेत्रिय साधने वाटपातील बदल,
२) दोन्ही पर्याप्त आणि प्रत्यक्ष अंतरक्षेत्रिय उत्पादन साधने वाटपातील बदल.

**अंतरक्षेत्रिय पर्याप्त वाटप स्थिर असताना प्रत्यक्ष वाटपात होणारे बदल पुढिल प्रमाणे असतात.**

१. समाज प्रत्यक्ष पर्याप्त क्षेत्रिय उत्पादन साधने वाटप बिंदु पासुन अपर्याप्त बिंदुकडे म्हणजे a पासुन b, c किंवा व

बिंदुकडे जातो.

२. प्रत्येक्ष अपर्याप्त बिंदुपासून पर्याप्त उत्पादन साधने वाटपबिंदू कडे म्हणजे b, c किंवा व कडून a बिंदूकडे जातो.

३. समाजातील उत्पादन घटक क्षेत्रिय अपर्याप्ततेचे प्रमाण b, c किंवा व कडून a बिंदू जवळ किंवा दूर जावू शकतो.

४. समाजातील अंतरक्षेत्रिय साधने अपर्याप्त वाटपाची दिशा b पासुन c बिंदूकडे, किंवा c पासुन b बिंदूकडे किंवा b आणि c च्या मध्ये आणि c आणि d च्या मध्ये बदलु शकते.

५. समाजातील अंतरक्षेत्रिय उत्पादन साधने वाटप a, b, किंवा c पुर्ण रोजगार स्थितीकडून अपुर्ण रोजगार व बिंदूकडे किंवा अपुर्ण रोजगार साधने वाटप व बिंदूकडून a, b, किंवा c पुर्ण रोजगार बिंदूकडे.

**क्षेत्रिय उत्पादन वाटप दोन्ही प्रत्यक्ष आणि पर्याप्त यामधील बदल पुढिल प्रकारचे असतात.**

१. आर्थिक वृध्दी वाढल्यामुळे समाजव्यवस्थेची उत्पादन क्षमता वाढुन सामाजिक उत्पादन शक्यता वक्र उजव्या बाजुला सरकुन या उच्च पातळीवरील समवृत्ती वक्राला स्पर्श करेल त्यामुळे एकूण सामाजिक कल्याण वाढेल.

२. लोकांच्या सार्वजनिक वस्तु व खाजगी वस्तु साठीच्या सामाजिक पसंतीत किंवा उत्पन्न व संपत्ती स्थिती किंवा राजकिय मतदान विभाजन बदलुन प्रभावी मागणी बदलल्यामुळे ४ सामाजिक समवृत्ती वक्र वर पोहचेल त्यामुळे सामाजिक कल्याण पातळी वाढेल.

३. दोन्ही P आणि S वक्र वर सांगितलेल्या कारणांमुळे बदलुन अंतर क्षेत्रिय पर्याप्त नविन बिंदू प्रस्थापित होईल.

४. अंतर क्षेत्रिय प्रत्यक्ष आणि पर्याप्त वाटपातील बदलाचे प्रमाण आणि दिशा बदलू शकेल.

**सार्वजनिक क्षेत्रातील उत्पादन साधने वाटपाची पर्यायी साधने :-**

(Alternative Instruments of Public Sector Allocation)

अर्थव्यवस्थेतील सार्वजनिक क्षेत्रात उत्पादन साधनांच्या वाटपावर १०० टक्के किंवा ५० टक्के प्रभाव पाडणारी पर्यायी साधने पुढिल प्रमाणे आहेत.

१. सार्वजनिक क्षेत्र वित्तपुरवठा करून आर्थिक वस्तुचे उत्पादन करते आणि उत्पादन साधनांची मालकी किंवा प्रत्यक्ष नियंत्रण ठेवून वस्तु उत्पादनासाठी वित्तपुरवठा कर आकारून केला जातो.

२. सार्वजनिक क्षेत्र वित्तपुरवठा करून आर्थिक वस्तुचे उत्पादन करते आणि काही किंवा सर्व उत्पादन साधने विकत घेते. मात्र वस्तुसाठी कोणतेही षुल्क न आकारता कर आकारून वित्तपुरवठा करते.

३. सार्वजनिक क्षेत्राने चलन व्यवस्था स्वतःच्या मालकिची किंवा नियंत्रित करून साधने वाटपावर प्रभाव पाडते.

४. सरकार आर्थिक वस्तुचे उत्पादन करते किंवा तीचा पुरवठा करते मात्र त्यासाठीचा वित्त पुरवठा वापर आकारा (User Charges) ने करते.

५. खाजगी उद्योग संस्थेने निर्माण केलेल्या वस्तुस मोठया प्रमाणावर अनुदान देवून आणि प्रत्यक्ष नियमनातुन प्रभाव पाडते.

६. सार्वजनिक आणि खाजगी मालकिची उद्योगसंस्था किंवा एकाच उद्योगात खाजगी आणि सार्वजनिक उद्योग संस्थांचे अस्तित्व एकाच उद्योगात ठेवून.

७. बाजाराधिशठीत निर्माण वस्तुस मोठया प्रमाणावर अनुदान देऊन.

८. बाजाराधिष्ठित उत्पादित वस्तुचे प्रत्यक्ष नियमन करून.

९. वस्तु किंवा उत्पादन साधनाचे सेवन कर दंडाच्या साहाय्याने नियंत्रित वाटप करून.

१०. वस्तु आणि उत्पादन गुणवत्ता आणि सुरक्षितता मापदंड.

११. खाजगी उद्योगांना सार्वजनिक क्षेत्रातील परवाना आवष्यक करून.

१२. सर्वसाधारण ट्रस्ट विरोधी नियमन.

१३. स्थलांतर व्यवहार आणि इतर राज्यवित्तीय कृती यातुन उत्पन्न, संपत्ती आणि मतदान क्षमतांचे पुनर्वाटप करून अप्रत्यक्ष उत्पादन साधने वाटप बदलने.

१४. संपदा अधिकाराची व्याख्या सरकारने निश्चित करून.

**उत्पादन साधने वाटपातील समस्या :–** (Problems of Allocating Resources)

आज सर्व प्रकारच्या अर्थव्यवस्थांना मिश्र अर्थव्यवस्थांचे स्वरूप प्राप्त झाले असल्याने खाजगी क्षेत्र आणि सार्वजनिक क्षेत्र उत्पादन साधने वाटपासाठी विशिष्ठ यंत्रणांचा वापर करता येत नाही. त्यामुळे मिश्र यंत्रणांचा वापर करूनच खाजगी क्षेत्र आणि सार्वजनिक क्षेत्र यांच्यात उत्पादन साधंनांचे वाटप करावे लागते. या स्थितीत या यंत्रणांचे नेमके कोणते मिश्रण घ्यायचे ते ठरविणे कठिण आहे. तसेच उत्पादन साधनांचे खाजगी क्षेत्र आणि सार्वजनिक क्षेत्र यांच्यात पर्याप्त वाटप करणे अत्यंत अवघड गोष्ट आहे. उत्पादन साधनांच्या क्षेत्रिय वाटपांच्या यंत्रणांना सांख्यिकी आणि व्यावहारीक पुरावे नाहीत. उत्पादन साधनांच्या योग्य, कार्यक्षम आणि पर्याप्त अंतरक्षेत्रिय वाटपासाठी सरकारची भूमिका वाढवीने अत्यावश्यक आहे. मात्र आर्थिक सुधारणांच्या कालावधीत आणि प्रामुख्याने खाजगीकरणाच्या युगात अर्थव्यवस्थेतील सरकारची प्रामुख्याने अंतरक्षेत्रिय उत्पादन साधने वाटपातील भुमिका वाढविणे अत्यंत अवघड आहे.

## २.३ सार्वजनिक वस्तूंना पसंती व्यक्त करण्यात आणि पसंत्यांचे एकत्रिकरण करण्यातील समस्या :– (Problems of Preference Revealation and Aggregation of Preferences)

कोणत्याही प्रकारच्या अर्थव्यवस्थेततील सरकार महत्तम सामाजिक कल्याण साध्य करण्याचा प्रयत्न करते. अर्थात त्यासाठी लोकांची कोणत्या सामाजिक वस्तूंना पसंती आहे ते सरकारला माहीत असणे आवश्यक असते.

लोकांनी सार्वजनिक वस्तूंना आपली निवड व्यक्त करणे आवश्यक असते. त्या लोकांच्या पसंतीचा विचार करून सरकार प्रामुख्याने लोकशाही शासन व्यवस्था असलेल्या देशात सार्वजनिक वस्तू पुरविण्यासाठीची तरतूद आपल्या अंदाजपत्रकात करते आणि त्यावर आधारित उत्पादन साधनांचे वाटप अर्थव्यवस्थेत करते. त्यामुळे उत्पादन साधनांचे वाटप आणि वापर योग्य व विवेकी होवून लोकांच्या सार्वजनिक वस्तूंच्या गरजा भागून समाजाचे महत्त्व सामाजिक कल्याण साध्य करण्यास मदत होते. याविषयीचे विवेचन करणारे सिद्धांत सार्वजनिक अर्थशास्त्रात आहेत. त्यानांच सर्वजनिक निवडीचे किंवा सामाजिक निवडीचे सिद्धांत असे म्हणतात. ते सिद्धांत सार्वजनिक वस्तूंना पसंती व्यक्त करण्यात येणाऱ्या समस्या स्पष्ट करतात आणि त्या निवडी एकत्रित करण्यात येणाऱ्या अडचणींचे स्पष्टीकरण देतात. सार्वजनिक निवडीच्या सिद्धांतात पुढील सिद्धांतांचा समावेश होतो.

१. निरपेक्ष आणि सापेक्षा एकमत सिद्धांत/तत्त्व- Principle of Absolute and Relative Unanimity

२. राजकीय आंतरर्कि या खर्च सिद्धांत- Political Interactions Costs Theory

३. ॲरोचा अशक्यता प्रमेय- Arrow's Impossibility Theorem

४. लोकशाहीचा आर्थिक सिद्धांत- Economic Theory of Democracy

५. राजकीय- आर्थिक- नोकरशाही सिद्धांत- Politico-Eco-Bureaucracy Theory

**१. सामाजिक पंसती अभिव्यक्तीचा निवडलेल्या दृष्टिकोन :- निरपेक्ष आणि सापेक्ष दृष्टिकोन**

लोकशाही शासन देशात लोकांना सरकारने सार्वजनिक वस्तू पुरविण्यासाठी राजकीय प्रर्कि या महत्त्वाची ठरते. कारण सार्वजनिक वस्तूंना लोक पसंती राजकीय प्रर्कि येतून करतात. त्या आधारे सरकार उत्पादन साधनांचे वाटप सार्वजनिक वस्तूंमध्ये करते. लोकांच्या सार्वजनिक वस्तूंना पसंती, त्यातील अडचणी आणि त्यावरील उपाययोजा या विषयीचे सर्वप्रथम विश्लेषण स्विडीश अर्थशास्त्रज्ञ नट विकसेल यांनी दिले आहे. त्यासच विकसेलचा सामाजिक पसंती प्रकटीकरणाचा विकसेलचा दृष्टीकोन असे म्हणतात.

विकसेल यांच्या मते, उत्पादन साधनांचे कार्यक्षम सामाजिक वाटप करण्यासाठी राजकीय प्रक्रिया अत्यंत महत्त्वाची असते. जरी लोकशाही शासन देशात लोकांच्या मताचा विचार केला तरी उत्पादन साधनांचे सामाजिक वस्तू उत्पादनात वाटप करणे सहज शक्य नसते. सर्वांना समान मत याच्या आधारे सामाजिक वस्तूंना लोकांची व्यक्तिगत पसंती प्रकट करतानाही अडचणी येतात. त्यामुळे त्यांचा योग्य प्रकारे विचार करणे आवश्यक ठरते, असे या सिद्धांताचे मत आहे. विकसेल यांच्या मते, लोकशाही शासन देशात साध्या बहुमत पद्धतीने (Simple Majority Voting) लोकांच्या सामाजिक वस्तूंना पसंती व्यक्त करणे शक्य आहे, आणि त्या आधारे त्या सार्वजनिक वस्तू सरकार पुरवू शकते. जर एखादी सार्वजनिक वस्तू (उदा. संरक्षण सेवा) पुरवावी यासाठी ५१% लोकांनी मतदानाच्या माध्यमातून आपली निवड व्यक्त केली तर सरकार ती सामाजिक वस्तू उत्पादन साधनांचा वापर व वाटप करून सर्व लोकांना पुरवू शकते. मात्र त्यातील ४९% लोकांना ती सार्वजनिक वस्तू पुरवावी असे न वाटणाऱ्यांनाही ती वस्तू पुरविण्याचा खर्च, कर स्वरूपात दयावा लागतो. या राजकारणात हरणाऱ्या लोकांना जो खर्च (कर) सहन करावा

लागतो, त्यासच 'मतदार बाह्यता खर्च' (Voter Externality Costs) असे म्हणतात.

विकसेल यांच्या मते, लोकशाही शासन व्यवस्थेत निरपेक्ष एकमत पद्धतीचा (Absolute Unanimity Method) वापर करून सार्वजनिक वस्तूंविषयीच्या लोकांच्या आवडी किंवा पसंती व्यक्त करता येतात. त्या निवडी विचारात घेवून त्या सार्वजनिक वस्तू लोकांना सरकार उत्पादन साधनांचा वापर करून पुरवू शकते. निरपेक्ष एकमत दृष्टिकोनाप्रमाणे, सर्वच म्हणजे १००% मतदारांनी कोणती सार्वजनिक वस्तू किंवा सेवा सरकारने पुरवावी ते मतदान करून दर्शवावे. ती सार्वजनिक वस्तू किंवा सेवा सरकार आपल्या अंदाजपत्रकात तरतूद करून लोकांना पुरवून महत्तम सामाजिक कल्याण साध्य करू शकते. मात्र त्यापैकी एक जरी नागरिकाने ती सार्वजनिक वस्तू पुरविण्याच्या विरोधी मतदान केले तर ९९% लोकांची त्या सार्वजनिक वस्तूची निवड पूर्ण होवू शकत नाही. त्यामुळे निरपेक्ष एकमत पद्धतीचा विचार करून सार्वजनिक वस्तू सरकारला लोकशाही देशात पुरविणे अडचणीचे ठरते.

म्हणून विकसेल यांच्या मते, सार्वजनिक वस्तूंना लोकांच्या पसंती निरपेक्ष एकमताऐवजी सापेक्ष एकमताच्या आधारे (Relative Unanimity) प्रकट करता येते आणि ते निर्णय सरकारला घेण्याच्या दृष्टीने अधिक उपयुक्त आणि सोईचे ठरते. सापेक्ष एकमत दृष्टिकोनाप्रमाणे एकूण लोकांपैकी किती टक्के लोकांनी १/३, २/३, ३/४, ५/६ मतदानाची किमान मर्यादा ती सार्वजनिक वस्तू पुरविण्यासाठी पसंती दर्शविली ते निश्चित केल्यास सरकारला ती सार्वजनिक वस्तू पुरविण्याचा निर्णय घेणे सोपे होवून ती सार्वजनिक वस्तू पुरविता येते. त्यातून विरोधकानाही जाणीव होईल की माझे एक मत तो राज्यवित्तीय निर्णय बदलू शकणार नाही. त्यातून लोकांची पिळवणूक कांही लोकांमुळे होणार नाही. मात्र असा नियम बहुमताच्या विरोधी जावून त्यांच्या पसंतीवर व सामाजिक कल्याणावर प्रतिकूल परिणाम करू शकतो. जर ३३% (१/३) किमान सार्वजनिक वस्तूला पसंती व्यक्त करण्याची मर्यादा ठरविली तर ६७% लोकांचा विरोध असताना ती सार्वजनिक वस्तू सरकार पुरवेल.

विकसेल यांनी आपल्या सार्वजनिक निवडीच्या सिद्धांतात सार्वजनिक खर्च आणि कर यांचाही एकाच वेळेस विचार केला आहे. त्यांच्या मते, सार्वजनिक खर्चातून मिळणारा सामाजिक लाभ कर व सामाजिक वस्तू पुरविण्याचा सामाजिक खर्च/कर दोन्ही समान ठेवल्यास सरकारला सार्वजनिक वस्तू पुरविण्यास लागणारा महसूल व करावा लागणारा सार्वजनिक खर्च करणेही सहज शक्य होईल.

अशाप्रकारे लोकशाही शासन देशात सार्वजनिक वस्तूंना लोकांची पसंती निरपेक्ष किंवा सापेक्ष एकमतातून दर्शविता येते आणि त्याआधारे सरकार उत्पन्न साधनांचे वाटप सार्वजनिक वस्तूंमध्ये करून त्यांचे उत्पादन करून लोकांना पुरवून महत्तम सामाजिक कल्याण साध्य करू शकते.

मात्र विकसेल यांच्या सार्वजनिक किंवा सामाजिक निवडीच्या सिद्धांतावर पुढील टिका/आक्षेप (criticisms) घेतले जातात.

१. लोकशाही शासन देशात प्रथम कोणत्या व किती सार्वजनिक वस्तू पुरवायच्या ते प्रथम ठरविले जाते आणि नंतर त्या पुरविल्या जातात.

२. सार्वजनिक वस्तूंच्या खर्चाच्या प्रमाणात सरकारला कर लादता येत नाही.

३. सरकार प्रथम सार्वजनिक वस्तूंवरील खर्च निश्चित करते आणि नंतर तो भागविण्यासाठी महसूल गोळा करते. येथे हा सिद्धांत उपयुक्त ठरत नाही.

४. सर्व लोकांना सार्वजनिक वस्तूंना पसंती व्यक्त करायची असते हे माहीत असतेच असे नाही.

५. प्रत्यक्षात सरकार सार्वजनिक वस्तू पुरविताना लोकांच्या पसंतीचा, निवडीचा विचार करतेच असे नाही.

या सिद्धांतावर बरीच टिका होत असल्या तरी या सिद्धांताचे पुढील महत्त्व (importance) दुर्लक्षिता येणार नाही. सार्वजनिक निवडीचा हा पहिला सिद्धांत आहे. यानंतरचे सर्व सिद्धांत याच सिद्धांतावर आधारलेले आहेत. हा सिद्धांत लोकशाही शासन देशात सार्वजनिक निवड प्रर्कि या कशी असते याचे शास्त्रशुद्ध स्पष्टीकरण देतो. हा सिद्धांत सार्वजनिक निवडीतील अडचणी स्पष्ट करून त्या दूर करण्याचे उपायही सुचवितो. म्हणून तो महत्त्वाचा आहे.

**२. सामाजिक निवडीचा राजकीय आंतरक्रिया खर्च सिद्धांत :–**

Political Interactions Costs Theory of Public/Social Choice


लोकशाही शासन व्यवस्थेत सार्वजनिक वस्तूंना पसंती व्यक्त करण्यात असलेल्या आर्थिक बाबींचे विश्लेषण जेम्स बुचॅनन आणि गॉर्डन टयुलोक यांनी दिले आहे. त्यास सामाजिक निवडीचा राजकीय आंतक्रिया खर्च सिद्धांत असे म्हणतात. त्यांनी सामाजिक निवडीचे राजकीय आंतरक्रिया खर्च आणि ती सामाजिक वस्तू किंवा सेवा पुरविण्यासाठीचा राज्यवित्तीय निर्णय घेण्यासाठी आवश्यक लोकांच्या गटाची मान्यता यांचा विचार केला आहे.

या सिद्धांताच्या मते, लोकशाही शासन देशात एखादी सामाजिक वस्तू किंवा सेवा पुरविण्यासाठी लोकांचे एकमत होण्यासाठी राजकीय आंतरक्रिया खर्च करावा लागतो. अर्थात ही वस्तू किंवा सेवा सरकारने पुरवावी यासाठी लोकांची किंवा लोकांच्या गटाची मान्यता असावी लागते. ज्या जास्तीत जास्त लोकांच्या गटाने कमीत कमी राजकीय आंतरक्रिया खर्चात तो राज्यवित्तीय निर्णय मान्य केला आहे, ती सामाजिक वस्तू किंवा सेवा सरकारने पुरवावी. ती लोकांची सामाजिक निवड दर्शविते. तो निर्णय लोकशाही शासन यंत्रणेत सरकारने घेणे सोपे आणि योग्य ठरते.

या सिद्धांताप्रमाणे सरकारने कोणत्या सामाजिक वस्तू व सेवा पुरवाव्यात ते ठरविताना तो राज्यवित्तीय निर्णय घेण्यासाठी येणाऱ्या राजकीय आंतरक्रिया खर्चाचा (Political Interactions Costs) विचार करणे आवश्यक आहे. राजकीय आंतरक्रिया खर्च म्हणजे सरकारने ती सामाजिक वस्तू पुरवावी हा निर्णय घेण्यासाठी लोकांची सामाजिक निवड दर्शविण्यासाठी येणारा खर्च होय. तो मतदार बाह्यता खर्च (Voter Externality Cost) आणि निर्णय घेण्याचा खर्च (Decision Making Cost) या दोन घटकांचा मिळून तयार होतो. मतदार बाह्यता खर्च (Voter Externlity Cost) म्हणजे ज्या नागरिकांना किंवा मतदारांना ती सामाजिक वस्तू किंवा सेवा पुरविण्याचा सरकारचा निर्णय मान्य नसणाऱ्यांना कर किंवा शुल्क या स्वरूपात करावा लागणारा खर्च होय. निर्णय घेण्याचा खर्च (Decision Making Cost) म्हणजे नागरिकांना किंवा मतदारांना संपर्क साधून त्यांच्यात एकमत निर्माण करण्यासाठी राजकीय एकमत किंवा करार घडवून आणण्यासाठी करावा लागणारा सौदाशक्ती खर्च होय. ती सामाजिक वस्तू

पुरविण्याचा सरकारचा निर्णय मान्य करण्यापोटी जेवढ्या अधिक लोकांची किंवा लोकांच्या गटांची संख्या अधिक तेवढा मतदार बाह्यता खर्च घटतो आणि कमी असतो. याउलट निर्णय घेण्याचा खर्च वाढत जावून तो अधिक रहातो. या दोहोंचा मिळून राजकीय आंतरक्रिया खर्च तयार होतो.

या सिद्धांताप्रमाणे एखादी सामाजिक वस्तू किंवा सेवा पुरविण्याचा निर्णय सरकार कसा घेवू शकते ते पुढील आकृतीत दाखविले आहे.




वरील आकृतीत ती सामाजिक वस्तू किंवा सेवा सरकारने पुरवावी हा सरकारचा राज्यवित्तीय निर्णय ७०% लोकांच्या गटाने मान्य केला आहे, आणि त्यासाठीचा राजकीय आंतरर्कि या खर्च कमीत कमी आहे. कारण तो राजकीय आंतरर्कि या खर्च वर्क ाचा निच्चतम बिंदू आहे. अशाप्रकारे सरकार लोकांची सामाजिक निवड विचारात घेवून ती सामाजिक वस्तू किंवा सेवा लोकशाही शासन यंत्रणेत पुरवू शकते.

मात्र सार्वजनिक निवडीच्या राजकीय आंतरर्कि या खर्च सिद्धांतावर पुढील आक्षेप (criticisms) घेतले जातात.

१. प्रत्यक्ष लोकशाही शासन देशात सरकार राजकीय आंतरर्कि या खर्च विचारात घेवून सार्वजनिक वस्तू लोकांना पुरवत नाही.

२. राजकीय आंतरक्रिया खर्च कोण करणार याचे स्पष्टीकरण या सिद्धांतात आढळत नाही.

३. ही निर्णय घेण्याची खूप वेळखाऊ आणि खर्चिक पद्धत आहे.

४. प्रत्यक्षात या सिद्धांताचा वापर सार्वजनिक वस्तू पुरविण्यासाठी केला जात असल्याचे जगात एखादेही उदाहरण सापडत नाही. असे असले तरी या सिद्धांताचे महत्त्व (importance) नाकारता येणार नाही.

१. हा सिद्धांत लोकशाही शासन देशात सामाजिक वस्तू पुरविण्याचा निर्णय सरकार कसे घेते याचे स्पष्टीकरण देतो.

२. सार्वजनिक वस्तू सरकारने पुरविण्यात लोकांची जबाबदारी काय असते याचे विवेचन हा सिद्धांत देतो, म्हणून तो महत्वाचा आहे.

३. सार्वजनिक वस्तू सरकारने पुरविण्याच्या निर्णयात लोकांचा सहभाग हा सिद्धात स्पष्ट करून त्यांचे महत्तम सामाजिक कल्याणातील योगदान दर्शवितो.

**३. सामाजिक निवडीचा ॲरोचा अशक्यता प्रमेय :-** Arrow's Impossibility Theorem of Social Choice

लोकशाही शासन असलेल्या देशात व्यक्तीगत सामाजिक वस्तूंना पसंती समूह मतदान पद्धती असताना सामाजिक निर्णय घेण्याच्या प्रक्रियेचे विवेचन केनिथ ॲरो यांनी केले आहे. यालाच ॲरोचा सामाजिक निवडीचा अशक्यता प्रमेय असे म्हणतात. लोकशाहीप्रधान देशात बहुमताच्या आधारे सार्वजनिक वस्तू पुरविण्यासंदर्भात सरकारला कोणत्या अडचणी निर्माण होतात त्याचे स्पष्टीकरण हा सिद्धांत देतो. लोकशाही देशात सार्वजनिक वस्तूंना लोकांच्या निवडी किंवा पसंती फक्त बहुमताचा विचार करून झाल्यास या वस्तू पुरविण्याविषयीचा निर्णय घेता येत नाही. बहुमताच्या स्थितीतही सार्वजनिक वस्तू सरकारने पुरविल्यानंतर महत्तम सामाजिक कल्याण साध्य होईल असे नाही. म्हणूनच या सिद्धांताला अशक्यतेचा प्रमेय असे म्हणतात.

केनिथ ॲरो यांच्या मते, लोकशाही व्यवस्था असलेल्या देशात बहुमताबरोबरच सामाजिक निवडीच्या संदर्भात कांही अटींची पूर्तता होणे आवश्यक आहे. त्यातून लोकांच्या सामाजिक वस्तूंना योग्य पसंती प्रकट करण्याबरोबरच प्रभावी सामाजिक समवृत्ती वक्र मिळतो, आणि महत्त्म सामाजिक वक्रास साध्य करणारे सामाजिक कल्याण पुळन मिळते. यासाठी बहुमताबरोबरच त्या अटींचीही पूर्तता करणे आवश्यक आहे.

या सिद्धांताप्रमाणे लोकशाही शासन देशात सामाजिक वस्तू लोकांना पुरवून महत्तम सामाजिक कल्याण सरकारने साध्य करण्यासाठी योग्य सामाजिक कल्याण चलन निश्चित होण्यासाठी पुढील अटींची (conditions) पूर्तता लोकांनी करणे आवश्यक आहे.

१. सामाजिक निवडीत सातत्य किंवा निरंतरता (transitive/consistent) असणे आवश्यकच आहे. म्हणजे लोकांनी एकमेव सामाजिक वस्तूंची क्रमवारी लावावी त्यातून लोकांनी प्रकट केलेली सामाजिक वस्तू स्पष्ट होणे आवश्यक आहे.

२. सामाजिक कल्याण पुळन विरूद्ध दिशेने न बदलणारे (Non Reverse) असावे. म्हणजे संपूर्ण समाजाने निवड

केलेली सामाजिक वस्तू एखाद्या व्यक्तीने सामाजिक निवड बदलल्याने एकूण सामाजिक निवडीत बदल होवू नये.

**३. सामाजिक कल्याण पुळनात लोकांनी सामाजिक वस्तूंना प्रकट केलेल्या निवडी/पसंतीची र्क्र मवारी स्वतंत्र:–** (Independent Ranking) असणे आवश्यक आहे. एखाद्या निवडीत बदल झाल्यामुळे त्याचा प्रभाव सामाजिक कल्याण पुळनावर होवू नये.

४. नागरिकांनी किंवा मतदारांनी सार्वजनिक वस्तूंची निवड मुक्त किंवा निर्भय (Free Choices) असणे आवश्यक आहे.

५. लोकांनी सामाजिक वस्तूंना दर्शविलेली पसंती किंवा निवड हुकुमशाही पद्धतीची (Dictatorial) किंवा लादलेली नसावी.

या सिद्धांताप्रमाणे, लोकशाही शासन व्यवस्थेत बहुमताबरोबरच वरील अटींचीही पूर्तता होणे आवश्यक आहे. तरच लोकांच्या सामाजिक वस्तूंच्या निवडीतून महत्तम सामाजिक कल्याण साध्य करणारे सामाजिक कल्याण पुळन साध्य होते. नाहीतर महत्तम सामाजिक कल्याण साध्य होणारी सामाजिक वस्तूंची निवड लोकांकडून शक्य होत नाही. म्हणूनच या सिद्धांतास अशक्यता प्रमेय असे म्हणतात. तेच पुढील उदाहरणाच्या साहाय्याने स्पष्ट करता येते. यालाच मतदानाचा विरोधाभास (Voting Paradox) असेही म्हणतात.

समजा अ, इ, उ असे एकूण तीन मतदार आहेत. त्यांना द, ध, न या तीन अंदाजपत्रकीय धोरणातून एका धोरणाची निवड करायची आहे. यामधील द धोरण तीन सार्वजनिक ग्रथालये बांधावीत असे दर्शविते. ध धोरण दोन सार्वजनिक ग्रथालये बांधावीत असे दर्शविते. तर न धोरण एकच सार्वजनिक ग्रथालय बांधावे असे दर्शविते. हे तीन मतदार वरील तीन अंदाजपत्रकीय धोरणांची निवड करताना बहुमताबरोबरच सामाजिक कल्याण करण्याच्या अटींची, प्रामुख्याने अट क्रमांक १, सामाजिक निवडीतील सातत्य किंवा निरंतरता, ची पूर्तता होणे आवश्यक आहे. तरच सरकारला त्या निवडीतून महत्तम सामाजिक कल्याण साध्य होते, अन्युा तो निर्णय सातत्य किंवा निरंतरतेचा अभाव असलेला असतो. त्यालाच केनिथ ॲरो यांनी अशक्यता प्रमेय म्हटले आहे, कारण तो महत्तम सामाजिक कल्याण साध्य करणारा ठरत नाही. ते पुढील व्रत्यात दाखविले आहे.

**तक्ता – बहुमत असलेले पर्यायी अंदाजपत्रकीय धोरणाची निवड**

| **अ) निर्णय :** अनिरंतर (Intransitive)<br>**पर्यायी धोरणे** | | | |
|---|---|---|---|
| मतदार | पसंती १ | पसंती २ | पसंती ३ |
| A | X | Y | Z |
| B | Y | Z | X |
| C | Z | X | Y |


| **ब) निर्णय :** निरंतर (Intransitive)<br>पर्यायी धोरणे | | | |
|---|---|---|---|
| A | X | Y | Z |
| B | Y | Z | X |
| C | Z | Y | X |

वरील तक्त्यात मतदार अ आणि उ हे ध धोरणाऐवजी द धोरणास पसंती देतात. मतदार इ आणि उ हे द धोरणाऐवजी न धोरणाची निवड करतात. अशाप्रकारे सर्वच धोरणांच्या बाबतीत द, ध, न तीन मतदारांपैकी दोन पसंत करून बहुमत देतात. या सामाजिक वस्तू निवडीत सातत्य किंवा निरंतरता रहात नाही. त्यामुळे पहिली अट मोडली जाते.


तक्त्याच्या दुसऱ्या भागात मतदार उ  हा न, ध, द  पसंती आकृतीबंध दर्शवितो.
ध  धोरणास द  ऐवजी ३ पैकी २ मतदार पसंत करतात. न धोरणास द ऐवजी ३ पैकी २ मतदार निवडतात. ध धोरण हे न ऐवजी ३ पैकी २ मतदार निवडतात. अशाप्रकारे ध हे मध्यमान (Median) धोरण ठरून तेच विजयी ठरते. ही निवड अटींची पूर्तता करते आणि ही निवड निरंतर (Transitive) आहे.

**हा सिद्धांत पुढील आकृतीच्या साहाय्याने स्पष्ट करता येतो.**

Results - Intrasitive
Twin Peaked preference
function for voter




b. Results - Transitive



वरील आकृतीत अ) भागात तीनही धोरणे तीनपैकी दोन मतदार पसंत करतात. त्यामुळे सामाजिक निवडीत सातत्य किंवा निरंतरता रहात नाही. तसेच मतदार हा सामाजिक निवड प्रकट करताना त्याच्या पसंतीत सातत्य किंवा निरंतरता रहात नाही. त्यामुळे या स्थितीत सरकारला राज्यवित्तीय निर्णय घेता येत नाही. मात्र आकृतीच्या ब) भागात तीन धोरणांपैकी ध धोरणास अधिक पसंत केल्याने बहुमत मिळते. त्याचबरोबर सामाजिक निवड करताना त्या निवडीत निरंतरता किंवा सातत्य रहाते. तसेच उ मतदाराच्या निवडीतही सातत्य आढळते. त्यामुळे ही एकूणच सामाजिक निवड निरंतर किंवा सातत्यपूर्ण आहे. त्यामुळे सरकार दोन सार्वजनिक ग्रथालये बांधावीत हे धोरण निवडून ते पूर्ण करण्याचा प्रयत्न करेल.

ॲरो यांच्या सामाजिक निवड सिद्धांतावर पुढील आक्षेप (criticism) घेतले जातात.

१. ॲरो यांना आपल्या सिद्धांतात मतदारांच्या सामाजिक निवडीची तीव‘ता दाखविता आली नाही.

२. ॲरो लोकशाही राजकीय प्रकि‘येच्या कार्यक्षमतेचे अत्यंत निराशावादी चित्र उभा करतात.

३. सामान्य मतदार आपल्या मतदारातून सामाजिक निवड करतोच असे नाही.

४. अनेक नागरिकांना सरकार सामाजिक वस्तू पुरविताना त्यांच्या पसंतीचा विचार करते हे माहीत नाही.

**असे असले तरी या सिद्धांताचे महत्त्व (importance) नाकारता येत नाही.**

१) हा सिद्धांत लोकशाही शासन यंत्रणेत सरकार सार्वजनिक वस्तू कसे पुरविते याचे विवेचन देतो.

२) सार्वजनिक वस्तू पुरविण्यात बहंमताबरोबरच निवडीतील सातत्यास किती महत्त्व आहे ते हा सिद्धांत स्पष्ट करतो.

३) हा सिद्धांत सार्वजनिक वस्तूंच्या उपभोगातून महत्तम सामाजिक कल्याण कसे साध्य करता येईल याचे शास्त्रीय विवेचन करतो.

४) लोकशाहीचा आर्थिक सिद्धांत एलेपोळल ढहशेीू`ष ऊशोलीरलू

लोकशाही शासन व्यवस्थेत सार्वजनिक वस्तूंना असलेल्या सामाजिक निवडीचा विचार करताना निवडून दिलेल्या प्रतिनिधींचा म्हणजेच राजकीय पक्षांचाही विचार करणे आवश्यक आहे. कारण ते लोकांच्या सामाजिक निवडी निर्णयकर्त्यांपर्यंत पोहचवून त्या सामाजिक वस्तू सरकारने पुरविण्यात महत्तवाची भूमिका बजावू शकतात. ते लोकांना माहिती देण्यासाठी करावा लागणारा खर्च वाचू शकतात. तसेच लोकांच्या एकजिनसी सामाजिक निवडीतून उत्पादन साधनांची बचत करू शकतात. त्यातून सामाजिक लाभ वाढवून सामाजिक खर्च कमी करू शकतात. याच पार्श्वभूमीवर अँथनी डॉऊन्स यांनी लोकशाहीचा आर्थिक सिद्धांत मांडला आहे.

डाऊन्स यांचा लोकशाहीचा आर्थिक सिद्धांत पुढील गृहितावर आधारीत आहे. मतदार महत्तम उपयोगिता मिळविण्याचा प्रयत्न करतात. तर राजकीय पक्ष महत्तम मतदान मिळविण्याचा प्रयत्न करतात.


या सिद्धांताच्या मते, राजकीय पक्ष समाजातील उत्पादन साधनांचे कार्यक्षम वाटप करण्याचा प्रयत्न करत

नाहीत. ते अधिकाधिक मते मिळवून पुन्हा निवडून येण्याचा प्रयत्न करतात. जरी सरकारकडे पॅरेटो महत्तम सामाजिक कल्याण साध्य करण्याची क्षमता असली तरी ते फक्त राजकीय पक्षांच्या स्पर्धेतूनच शक्य होईल. अशाप्रकारे राजकीय पक्षांमधील स्पर्धा सरकारला पॅरेटोचे महत्तम सामाजिक कल्याण साध्य करण्यास भाग पाडते काय?

डाऊन्स यांच्या मते, निवडून दिलेले राजकीय पक्ष आणि प्रतिनिधी स्वार्थाने प्रेरीत झालेले असतात, ते आदर्श सामाजिक धोरणे साध्य करण्याचा प्रयत्न करत नाहीत. म्हणजेच महत्तम सामाजिक कल्याणासाठी ते प्रयत्नशील नसतात. म्हणून त्यांना राजकीय सत्ता सारखी मिळावी असे वाटते. त्यासाठीच ते महत्तम मते मिळविण्याचा प्रयत्न करतात. महत्तम मते मिळविण्यासाठीचे त्यांचे वर्तन असते. व्यक्तीलासुद्धा निवडून येण्याची प्रेरणा राजकीय सत्तेचे लाभ मिळविण्यासाठी मिळते. सत्ता, प्रतिष्ठा, संपत्ती यासारखे राजकीय सत्तेचे लाभ असतात.

डाऊन्स यांच्या सिद्धांतात राजकीय पक्षांमधील स्पर्धेत मध्यमा मतदार (Median Voter) अत्यंत महत्त्वाची भूमिका बजावतो. ते त्यांनी 'मध्यमा मतदार प्रमेय' (Median Voter Theorem) च्या साहाय्याने स्पष्ट केले आहे. मध्यमा मतदार प्रमेयाप्रमाणे बहुमत निर्णय प्रतिमानात एक टोक (Single Peaked) किंवा शिखर धोरण पसंती मध्यमा मतदार पसंत करतो आणि जिंकतो. मध्यमा मतदारांच्या सामाजिक निवडीमुळे सामाजिक कल्याण तोटा कमीत कमी ठेवणे शक्य होते.

मध्यमा मतदार प्रमेय (Median Voter Theorem) पुढील आकृतीच्या साहाय्याने दाखविता येतो.



वरील आकृतीत पोलीस संरक्षण यासाठी तीन व्यक्तींचे ऊ१, ऊ२, ऊ३ मागणी वर्क दाखविले आहेत. प्रत्येक व्यक्तीला जझ किंमत दयावी लागते. जझ किंमतीला पहिली व्यक्ती जट१ उत्पादन पसंत करते, दुसरी व्यक्ती जट २ तर तिसरी व्यक्ती जट ३ उत्पादन पसंत करते. यावर या तीन व्यक्तींचे मतदान घेतल्यास व्यक्ती दोन आणि तीन जट १ उत्पादनाऐवजी जट २ व जट ३ पसंत करतात. म्हणजे ते जट १ उत्पादनावर विजय मिळवितात. व्यक्ती दोन आणि तीनचा विचार केल्यास मध्यमा मतदाराची पसंती किंवा निवड विचारात घेतली जाईल. म्हणजेच जट२ उत्पादनाची निवड केली जाईल.

आपला राजकीय पक्ष आणि मध्यमा मतदार ओळखून त्यांची जास्तीत जास्त मते मिळविण्याचा प्रयत्न करून राजकीय सत्ता मिळविण्याचा प्रयत्न करतील. राजकीय पक्षांची स्पर्धा ही अधिक तीव' मध्यमा मतदार व मते मिळविण्यासाठी होईल. त्यातून ते राजकीय सत्तेत येतील. मात्र वास्तव परिस्थितीत मतदार आणि राजकारण्यांना अपुरी माहिती असते. मतदारांना सरकारी प्रतिनिधी निवडी संदर्भात अपुरी माहिती असते. तसेच वेगवेगळ्या राज्यवित्तीय निर्णयांचा मतदाराच्या सामाजिक कल्याणावर काय परिणाम होतो याची माहिती नसते. राजकारण्यांना मतदारांच्या मागण्यांची माहिती नसते. तसेच त्यांना कोण मध्यमा मतदार आहे हेही माहीत नसते. त्यामुळे सामाजिक निवडीसाठी डाऊन्सच्या प्रतिमानावर अवलंबून न राहता अल्पाधिकारातील सौदापद्धती प्रतिमानाचा विचार करणे आवश्यक आहे.

मतदार व्यक्तीगत मतदान करतात. तर कांहीवेळा ते दबावगट तयार करतात. मात्र सर्व मतदार मतदानात सहभागी होत नाहीत. त्यासाठी हवामान, टेलिव्हिजन कार्यक्र'म यासारखे आर्थिकेत्तर कारणे तर मतदान खर्च, राजकीय पक्षांचे सार्वजनिक वस्तूसारखे स्वरूप, लाभ इ. आर्थिक कारणेही जबाबदार असू शकतात. त्यामुळे मध्यमा मतदाराचा मतदानातील सहभाग कमी रहाते. याचाच परिणाम म्हणून मध्यमा मतदान प्रतिमानावर मर्यादा पडतात.

सामाजिक निवडीचा डाऊन्स यांच्या लोकशाहीच्या आर्थिक सिद्धांतावर पुढील टिका (criticisms) केल्या जातात.

१. डाऊन्स यांचे प्रतिमान मतदाराचे सर्व प्रकारचे वर्तन स्पष्ट करत नाही.

२. मतदाराचे मतदान खर्च व लाभ ठरविणारे घटक हा सिद्धांत स्पष्ट करत नाही.

३. सर्व राजकीय पक्षांचा महत्तम मतदान हाच हेतू असतो असे नाही.

४. राजकीय सत्ता मिळण्यासाठी किमान मतदान मिळाले तर चालते, त्यासाठी महत्तम मतदानच पाहिजे असे नाही.

५. बहुपक्षीय व्यवस्था गुंतागुंतीची असल्याने डाऊन्स यांचे प्रतिमान त्यासाठी उपयुक्त नाही.

६. मध्यमा मतदारांचा सामाजिक निवडीचा विचार केल्यास सार्वजनिक खर्च वेगाने वाढेल.

**असे असले तरी डाऊन्स यांचा सामाजिक निवडीचा सिद्धांत महत्त्वाचा** (important) **आहे.**

१. हा सिद्धांत लोकशाही शासनातील राजकीय पक्षांची व प्रतिनिधींची सार्वजनिक वस्तू पुरविण्यातील भूमिका

स्पष्ट करतो.

२. राजकीय पक्ष आणि प्रतिनिधी कोणत्या हेतूनी प्रेरित झालेले असतात त्याचे विवेचन हा सिद्धांत करतो.

३. राज्यवित्तीय धोरण ठरविण्यात मध्यमा मतदाराची - (Median Voter) भूमिका या सिद्धांताने उत्तमरितीने स्पष्ट केली आहे.


## ५. राजकीय- आर्थिक नोकरशाही सिद्धांत- Politico-Eco-Bureaucracy Theory

कोणत्याही अर्थव्यवस्थेची कामगिरी तिच्यातील सं'यात्मक रचनेवर अवलंबून असते. सार्वजनिक क्षेत्राचा विचार करता ती नोकरशाही (Bureaucracy) या संस्थेवर अवलंबून असते. नोकरशाही म्हणजे अनेक नोकरांचा गट होय की जो सरकारच्या सेवा वेगवेगळ्या खात्यांच्यामार्फत पुरविण्यास जबाबदार असतो. प्रत्येक नोकर हे नफाविरहित संघटन असते की जिच्यासाठी सरकार वित्त पुरवठा करते. कांही नोकर एकमेकांना सहकार्य करून पुरक ठरतात, तर कांही स्पर्धा करतात. उत्पादन साधनांच्या, प्रामुख्याने सामाजिक वस्तूंसाठी, वाटपात व वापरात नोकरशाहीची भूमिका विचारात घेणे आवश्यक असते. त्याचे विवेचन करणारा सिद्धांत वेबर, निसकॅनेन, ब्रिटन यांनी मांडला आहे. त्यालाच राजकीय - आर्थिक नोकरशाही सिद्धांत असे म्हणतात.

वेबर यांच्या मते, नोकरशाही हा प्रशासकीय घटक आहे जो प्रशासकीय नियम, कायदयांची अंमलबजावणी करतो. निसकॅनेन व ब`टन यांच्या मते, नोकरशहा महत्तम उपयोगिता मिळविण्याचा प्रयत्न करणारा असतो. निसकॅनेन यांनी व्यवस्थापकीय उपयोगिता मूल्य दृष्टिकोन (Managerial Utility Function Appraoch) वापरून नोकरशहा उपयोगिता मूल्य तयार करतात, की ज्याच्यात वेतन, त्याच्यासाठी काम करणाऱ्या नोकरांची सं'या व त्यांचे वेतन, त्यांची किर्ती, संपत्ती, सत्ता, दर्जा यांचा समावेश होतो. नोकरशहाच्या उपयोगिता मूल्यात समाविष्ट असलेल्या घटकांचा समावेश सार्वजनिक अंदाजपत्रकाच्या आकारमानाशी आहे. त्यामुळे नोकरशहा महत्तम उपयोगिता मिळविणारे, तसेच अंदाजपत्रक आकारमान महत्तम करणारे आहेत. त्यामुळे ते अंदाजपत्रक निर्णयावर परिणाम करणारा घटक आहे.

नोकरशाहीचे वर्तन विचारात घेवून ते उत्पन्न निर्णयावर काय परिणाम करतात ते विचारात घेणे आवश्यक आहे. मक्तेदार महत्तम नफा मिळवून देणारे उत्पादन करतो. नफ्याच्या प्रेरणेने काम न करणारा खाजगी उत्पादक नफा विरहित उत्पादन घेतो. तर नोकरशहा सरकारने दिलेलया अनुदानातून ज्या सेवांचे उत्पादन करायचे आहे ते जास्तीत जास्त करण्याचा प्रयत्न करतो.

खाजगी मक्तेदार, नफा न घेता उत्पादन करणारा खाजगी उत्पादक, आणि नोकरशहा करत असलेल्या उत्पादनाची तुलना खालील आकृतीत केली आहे.




वरील आकृतीत ऊहा बाजार आणि मध्यमा मतदार मागणी वक्र MR हा सीमांत प्राप्ती वक्र, तर LRAC = LRMC हा दीर्घकालीन सरासरी वक्र व सीमांत वक्र आहे. मक्तेदारी उत्पादन OQ1 उत्पादन करून OP1 किंमत आकारून P1 CBP2 मक्तेदारी नफा मिळवितो. ना नफा खाजगी उत्पादन OQ 2 उत्पादन करून OP2 किंमत आकारेल. समजा नोकरशहाला OP2 AQ 3 अंदाजपत्रक आकारमान दिल्यास ते OQ 3 उत्पादन करतील. हे उत्पादन मक्तेदार आणि ना नफा खाजगी उत्पादनापेक्षा जास्त आहे. तसेच ते OP2 किंमतीस मागणी असलेल्या मध्यमा मतदार किंवा उपभोक्ता इच्छित असलेल्या उत्पादन OQ 2 पेक्षा अधिक आहे. OP2 ही दीर्घकालीन पॅरेटो कार्यक्षम किंमत आहे. या किंमतीस मक्तेदारी उत्पादन कमी घेवून (OQ1) तर नोकरशहा अतिरिक्त उत्पादन (OQ3) कल्याणात घट घडवून आणतात. मक्तेदार CBF एवढे तर नोकरशहा FAG एवढे उत्पादनात घट करतात.

नोकरशाहीचा उत्पादनावरील परिणाम अंदाजपत्रकावर अवलंबून असतो.

जर नोकशाहीस OP२ AQ३ ऐवजी OP2FQ3 अंदाजपत्रक दिले असते तर नोकरशाहीचे उत्पादन ना नफा खाजगी उत्पन्ना एवढेच असते. जर नोकशाहीचे अंदाजपत्रक जझ२ऋ्रट२ पेक्षा कमी,

मात्र OP2BQ1 पेक्षा अधिक असेल तर नोकरशहाचे उत्पन्न मक्तेदार आणि ना नफा खाजगी उत्पादक यांच्यामध्ये असेल. या स्थितीत मध्यमा मतदार किंवा उपभोक्ता अंदाजपत्रक वाढविण्यास प्राधान्य देईल, तर OP2

AQ3 पेक्षा अंदाजपत्रक कमी करण्यास पसंती देईल. मात्र नोकरशहा आपले अंदाजपत्रक वाढवून उपयोगिता महत्त्वम मिळविण्याचा प्रयत्न करेल.

नोकरशहांना दिलेल्या अंदाजपत्रकातील कांही भाग कार्यालयाचे आधुनिकीकरण, खात्यावर खर्च, अतिरिक्त मनुष्यबळ, खंड यावर खर्च करेल. मात्र ते उत्पादन वाढीसाठी खर्च करणार नाहीत. अशाप्रकारे सार्वजनिक क्षेत्रातील उत्पन्न पुरवविण्याचा खर्च अधिक असतो.

ते उत्पादन अकार्यक्षमतेतून करतात. यालाच वाटपातील अकार्यक्षमता असे म्हणतात. त्यात मध्यमा मतदाराच्या पसंतीतून कार्यक्षमता आणता येते. यालाच द अकार्यक्षमता असेही म्हणतात. सार्वजनिक क्षेत्रातील वाटपातील अकार्यक्षमता नोकरशाही व अमंलबजावणी प्रक्रिया यातूनच निर्माण होते असे नाही, तर शिक्षक, डॉक्टर, नियोजनकर्ते, वकील इ. प्रकारच्या व्यावसायिकांचाही परिणाम होतो.

**या सिद्धांतावर पुढील टिका (Criticisms) केल्या जातात.**

१. सामाजिक निवड या सिद्धांताप्रमाणे प्रकट होत नाही.

२. नोकरशाहीला हा सिद्धांत अतिरिक्त महत्त्व देतो.

३. नोकरशहा ही अंमलबजावणी यंत्रणा आणि ती निर्णय घेणारी व्यवस्था नसते याचा विचार हा सिद्धांत करत नाही.

४. प्रत्येक नोकरशहा महत्तम उपयोगिता साध्य करण्याचा प्रयत्न करतो असे म्हणणे चुकीचे आहे.

५. हा आर्थिक सिद्धांतापेक्षा राजकीय सिद्धांत अधिक आहे.

**असे असले तरी या सिद्धांताचे पुढील महत्त्व (importance) आपणास नाकारता येत नाही.**

१. या सिद्धांताने सर्वप्रथम आर्थिक निर्णय प्रर्कि येतील नोकरशाहीचे महत्त्व स्पष्ट केले आहे.

२. नोकरशाहीचे हेतू किंवा ध्येये काय असतात याचे वास्तव स्पष्टीकरण हा सिद्धांत देतो.

३. नोकरशाहीवर लोकप्रतिनिधींचे नियंत्रण नसते, हे या सिद्धांतातून स्पष्ट होते.

४. हा सिद्धांत म्हणजे लोकशाहीच्या आर्थिक सिद्धांतास पूरक सिद्धांत आहे.

५. सार्वजनिक वस्तूंच्या पुरवठ्याचे विवेचन हा सिद्धांत करतो, म्हणून तो महत्त्वाचा सिद्धांत आहे.

### २.३ **सार्वजनिक वस्तूंची तरतूद :–** (Provision of Public Goods)

लोकांच्या सामाजिक गरजा भागविण्यासाठी सार्वजनिक वस्तूंचे उत्पादन करून त्यांचा पुरवठा लोकांना करावा लागतो. सार्वजनिक वस्तूंच्या पुरवठ्याची तरतूद सरकारला अंदाजपत्रकात करावी लागते. त्यासाठी अर्थव्यवस्थेतील उत्पादन साधनांचे वाटप सार्वजनिक वस्तूंच्या उत्पादनासाठी करावे लागते. म्हणून सार्वजनिक वस्तूंच्या तरतूदीसाठी समाजाच्या उत्पादन साधनांच्या वाटपाच्या पर्याप्त अटी विचारात घ्याव्या लागतात. त्याचे पुढील सिद्धांत आहे.

१. सार्वजनिक वस्तूं तरतूदीचे विकसेल व लिंदाल यांचे ऐच्छिक विनिमय प्रतिमान ते **(luntary Exchange Model of Provision of Public Good by Wicksell and Lindahl)**

यापूर्वीचे सॅम्युअल्सन यांचे सार्वजनिक वस्तू तरतूदीचे प्रतिमानाच्या संदर्भात अनेक प्रश्न निर्माण होतात. ते प्रत्यक्षात अर्थव्यवस्थांमध्ये अस्तित्वात आहेत असे वाटत नाही. या पार्श्वभूमीवर प्रत्यक्ष लोकशाही देशात होत असलेल्या निर्णय प्रकिं यांचे विश्लेषण करण्यासाठी विकसेल व लिंदाल यांनी ऐच्छिक विनिमय प्रतिमान विकसित केले आहे.


विकसेल-लिंदाल प्रतिमान उपयोजित आहे. ते लोकशाही देशात न्याय सार्वजनिक वस्तूंचे उत्पादन आणि न्याय कारभार यांचे तत्वे आणि निर्णयप्रकिं या निश्चित करते. तसेच ते लोकशाही देशात सार्वजनिक वस्तूंची तरतूद आणि करभार निश्चित करताना येणाऱ्या अनेक समस्यांचे विश्लेषण करते. या पार्श्वभूमीवर विकसले-लिंदाल प्रतिमानाचा अभ्यास महत्त्वपूर्ण ठरतो.

विकसेल - लिंदाल प्रतिमान सार्वजनिक वस्तू तरतूदीच्या समतोलाचे वर्णन करते.

या प्रतिमानात अ आणि इ या दोन व्यक्ती आहेत. ते राजकीय पक्ष आहेत असे समजण्यास हरकत नाही. हे प्रतिमान समतोल कर हिस्सा आणि सार्वजनिक वस्तू अटी शोधण्याचा प्रयत्न करते. तसेच या समतोलाचे एकमेवता आणि स्थैर्य यांचे परीक्षण करते. या प्रतिमानात व्यक्तींच्या दोन गटात राजकीय सत्तेचे समान वाटप झाले आहे, असे मानले आहे.

लिलाव करणारी व्यक्ती विविध कर हिस्से आणि अंदाजपत्रके (खर्च) जाहीर करते.

या प्रक्रियेत त्या व्यक्तींच्या किंवा गटांच्या ऐच्छिक विनिमयातून समतोल स्थिती निर्माण होते आणि मिळते. व्यक्तीमध्ये किंवा त्यांच्या गटांध्ये सहकारावर आधारीत खेळ किंवा निर्णय घेतला जातो, आणि प्रत्येक व्यक्ती आपली पसंती किंवा निवड बरोबर प्रकट करतात. यातून सार्वजनिक वस्तूच्या पुरवठ्याची संतुलित तरतूद होवून पर्याप्त कर व्यक्तींकडून गोळा केला जातो. तसेच वस्तूचे वाटपही समान पद्धतीने होते.



h उभ्या अक्षावर A व्यक्तीचा सार्वजनिक वस्तू पुरविण्यातील हिस्सा दर्शविला आहे. जर A व्यक्तीचा करातील हिस्सा h असेल तर B व्यक्तीचाही तेवढाच म्हणजेच (१ – h) समान असेल. त्याना कर किंमत असे म्हटले आहे. आडव्या अक्षावर (G) सार्वजनिक वस्तूचा पुरवठा दाखविला आहे. AA हा अ व्यक्तीचा आणि BB हा B व्यक्तीचा सार्वजनिक वस्तूस मागणी वक्र आहेत. OA हा A चा आरंभ बिंदू तर OB हा B चा आरंभ बिंदू आहे.

प्रत्येक व्यक्तीचे उपयोगिता मूल्य (U) हे सार्वजनिक वस्तू (G) आणि खाजगी वस्तू (X) संदर्भात आहे. A आणि B हे A आणि B व्यक्तींचे खाजगी वस्तू उपभोगाचे गुणांक आहेत. दोन्ही A आणि B व्यक्ती उपलब्ध उत्पन्नातून महत्तम उपयोगिता मिळविण्याचा प्रयत्न करतात.

$$Y^A \geq pX^A + hG$$
$$Y^B \geq pX^B + (1-h)G$$

$Y^A$ आणि $Y^B$ हे A आणि B व्यक्तीचे उत्पन्न आहे. तर P हा खाजगी वस्तूच्या किंमतीचा गुणांक आहे. h मध्ये बदल करून आणि इतर चले स्थिर मानून अ व्यक्तीचा मागणी वक्र तयार होतो. तसाच B चाही. AA आणि BB हे A व B चे मागणी वक्र आहेत. A चा समतोल कर हिस्सा (h) आणि समतोल उत्पन्न (G) निश्चित होते. जर h1 कर हिस्सा घेतला तर A ची सार्वजनिक वस्तूस मागणी G1 असेल, तर B हा G2 मागणी निश्चित करेल. या दोन व्यक्ती किंवा पक्षांमध्ये मतभेद होतील, तडजोड होणार नाही. जो पक्ष प्रबळ तो जिंकेल. हे द्वयाधिकाराचे उदाहरण होईल. यातून अंतिम निश्चिती होणार नाही आणि ते पक्षांच्या बळावर अवलंबून राहील. ही समस्या सोडविण्यासाठी विकसेल व लिंदाल यांनी समान अधिकार दोन्ही पक्षांना द्यावेत असे सांगितले. तर दोन व्यक्तींमध्ये किंवा पक्षांमध्ये ऐच्छिक विनिमय होवून ते h हा कर हिस्सा आणि G सार्वजनिक वस्तूंचे उत्पादन मान्य करतील. hG संयुगालाच लिंदाल समतोल असे संबोधले जाते. तो महत्तम समतोल आहे. लिंदाल समतोलास पॅरेटो कार्यक्षम निकाल असे म्हणतात.

आकृतीच्या साहाय्याने हे प्रतिमान स्पष्ट करताना आंशिक समतोल विश्लेषण लिंदाल विकसेल यांनी केले आहे. मात्र आधुनिक अर्थशास्त्रज्ञांनी सर्वसाधारण समतोल विश्लेषण दिले आहे. यात फॉली, मिलेटॉन, रॉबर्टर्स या अर्थशास्त्रज्ञांचा समावेश आहे. जॉन पेन यांनी या प्रतिमानाचे कल्याण महत्त्व स्पष्ट केले आहे.

विकसेल–लिंदाल यांच्या या प्रतिमानावर पुढील टिका (criticisms) केल्या जातात.

१. समतोलाकडे जाणारी समायोजन प्रक्रिया अनुकूल नाही.

२. कर हिश्श्यात कोणी समायोजन करायचे ते हे प्रतिमान सांगत नाही.

३. समान राजकीय सत्ता गृहितक चुकीचे व अवास्तव आहे.

४. समायोजन करण्याच्या सामुदायिक सौदा पद्धतीस वेळ आणि उशीर लागतो.

असे जरी असले तरी या प्रतिमानाचे महत्त्व (importance) पुढीलप्रमाणे सांगता येईल.

लिंदाल-विकसेल प्रतिमान लोकशाही देशात प्रत्यक्षात होत असलेल्या निर्णयप्रर्कि येचे स्पष्टीकरण देते. दोन व्यक्ती किंवा पक्षांमधील समायोजन एक तत्त्वावर आधारलेले आहे. एकमत तत्त्व खर्चिक असल्याने, हे प्रतिमान अधिक महत्त्वाचे आणि उपयुक्त ठरते.

## २. सार्वजनिक वस्तू विकेंद्रीत पुरविण्याची अशक्यता : सॅम्युअल्सन आणि मसग्रेव्ह यांचे योगदान: Impossibility of Decentralised Provision of Public Goods : Contributions of Samuelson and Musgrave

सार्वजनिक खर्च पर्याप्त करून सार्वजनिक वस्तूंच्या पुरवठ्याची पर्याप्त पूर्तता/तरतूद लाभ तत्त्वाच्या आधारे करावे असे विश्लेषण ऐच्छिक विनिमय सिद्धांताच्या आधारे करता येते असे इरिक लिंदाल यांनी केले. त्यात जॉहेनसेन आणि बॉवेन यांनी सुधारणा केल्या आहेत. आधुनिक काळात सॅम्युअल्सन आणि समग्रेव्ह यांनी त्याचे विश्लेषण केले आहे. सूक्ष्म आर्थिक सिद्धांत विश्लेषण कांही अटींच्या आधिन राहून पॅरेटो पर्याप्तता स्पष्ट करते. ते खाजगी वस्तूंच्या बाबतीत शक्य आहे. मात्र सार्वजनिक वस्तूंच्या बाबतीत किंमत यंत्रणा नसल्याने त्यांच्या पर्याप्त तरतुदीसाठी तिचा वापर करता येत नाही. सार्वजनिक वस्तूंचा उपभोग संयुक्त उपभोग असतो. त्यांच्या लाभाचे विभाजन करता येत नाही. त्यांचा एकदा पुरवठा केल्यानंतर समाजातील सर्व लोक त्यांचे सेवन करतात. जे कररूपाने त्यांची किंमत देतात आणि जे देत नाहीत ते सर्वच त्यांचा उपभोग घेतात. असे असतानाही सार्वजनिक खर्च करून सार्वजनिक वस्तूंच्या पुरवठ्याची तरतूद किंमत यंत्रणेच्या आधारे कशी करता येईल याचे स्पष्टीकरण लिंदाल यांनी १९२९ मध्ये केले आहे. त्यांच्या मते, सार्वजनिक वस्तू पुरविण्यासाठी येणारा सर्व खर्च कररूपाने लोकांकडून वसूल करता येतो. कर ही सार्वजनिक वस्तूंची किंमत आहे. खाजगी अर्थव्यवस्थेची कार्यपद्धती सार्वजनिक अर्थव्यवस्थेत लागू करावी.

सार्वजनिक वस्तू पुरविण्याच्या तरतुदीचे आंशिक समतोल विश्लेषण मसग्रेव्ह, बॉवेन, सॅम्युअल्सन, बुचॅनन यांनी करताना सार्वजनिक वस्तूच्या मागणी-पुरवठा स्थितीतून समतोल किंमत आणि उत्पादन एक वस्तूच्या बाबतीत स्पष्ट केले आहे. त्यांच्या मते, सार्वजनिक वस्तू असलेल्या व्यक्तीगत मागणीचे उर्ध्व एकत्रीकरण तिला एकूण मागणी दर्शविते. ती सार्वजनिक वस्तूची किंमत निश्चित करून ती कररूपाने वेगवेगळ्या दराने वसूल करता येते, मात्र तिला मागणी सारखीच भिन्न भिन्न व्यक्तींची असते. खाजगी वस्तूच्या बाबतीत असे नसते. खाजगी वस्तूला मागणी भिन्न व्यक्तींची भिन्न असते, मात्र तिची किंमत एकच असते.


सॅम्युअल्सन यांच्या मते, सार्वजनिक वस्तू खाजगी क्षेत्रातून पुरविता येत नाहीत. ती सार्वजनिक क्षेत्रातूनच पुरविणे आवश्यक आहे. खाजगी वस्तू व्यक्तीच्या पसंतीनुसार पुरविता येतात. मात्र सार्वजनिक वस्तूंच्या बाबतीत व्यक्तीची निवड किंवा पसंती माहीत नसते. त्यामुळे बाजारभाव सार्वजनिक वस्तूंच्या बाबतीत लागू करता येत नाही. लोकशाही देशात सार्वजनिक वस्तूबद्दलची इच्छा विचारात घेता येते. त्याच्या आधारे त्या पुरविण्याची तरतूद सरकार करू शकते. जर बाजारभाव सार्वजनिक वस्तूंच्या पुरवठ्यासाठी लागू केला तर त्यांच्या पुरवठ्याची तरतूद व

आवश्यक महसूल कसा गोळा करता येईल ते सॅम्युअल्सन यांनी स्पष्ट केले आहे. (१९५४)

१९५६ मध्ये मात्र सॅम्युअल्सन यांनी वरीलप्रमाणे विकेंद्रित बाजार किंवा मतदान यंत्रणा सार्वजनिक वस्तूंच्या पुरवठ्याची तरतूद करू शकत नाहीत असे सांगितले आहे. त्यासाठी बाह्य अवलंबित्त्वाचा विचार करणे आवश्यक आहे. खाजगी वस्तू व सार्वजनिक वस्तू यामधील फरक स्पष्ट करणे आवश्यक आहे. यावर सार‘या खाजगी वस्तू किंमतीचे कमी व अधिक/ मोठ्या प्रमाणात वाटप करता येते. या सर्व व्यकतींची मागणी एकत्र करून खाजगी वस्तूला एकूण मागणी तयार होते. मात्र संरक्षणासारखी सार्वजनिक वस्तू वेगळी आहे. जिचा उपभोग सर्वांनी सारऱ्या प्रमाणात करावा लागतो. तिच्या उपभोगाचे स्वरूप खाजगी वस्तू उपभोगापेक्षा भिन्न आहे. अशाप्रकारे सार्वजनिक वस्तू पुरविण्याच्या सरकारच्या प्रयत्नांचे नियंत्रण करावे लागेल. त्यासाठी खाजगी वस्तू व सार्वजनिक वस्तू यांचा एकत्र विचार करावा लागेल. तसेच त्याचे स्पष्टीकरण सामाजिक कल्याण मूल्याच्या चौकटीत द्यावे लागेल.

कोणताही समाज ही त्याच्या उपयोगिता वक्राच्या (Utility Frontier) आतील बाजूस उत्तम रहाणारा नाही. समाजाचा उपयोगिता वक्र  हा समाजच्या समवृत्ती वक्र ास जेथे स्पर्श करतो तेथे महत्तम सामाजिक कल्याण शक्य आहे. ते खाजगी वस्तू व सार्वजनिक वस्तू एकत्रित विचारात घेवून स्पष्ट करणे आवश्यक आहे. सर्व व्यक्तींना खाजगी वस्तूपासून मिळणारी सीमांत उपयोगिता/लाभ समान असणे आवश्यक आहे. तसेच सार्वजनिक वस्तूच्या बाबतीत सीमांत सामाजिक खर्च सर्व लोकांचा हा सीमांत पर्यायिता दराबरोबर असणे आवश्यक आहे.

हेच पुढील आकृतीत दाखविले आहे.



## २.४ सार्वजनिक वस्तू मागणी प्रकटीकरण योजना/यंत्रणा

### (Demand Revealing Schemes/Mechanisms for Public Goods)

शुद्ध सार्वजनिक वस्तूंना पसंती किंवा प्राधान्य प्रकट करण्यासाठी कर-किंमत दृष्टिकोनाचा (Tax-Price Approach) प्रामुख्याने वापर केला जातो. मात्र या स्थितीत उपभोत्यास सार्वजनिक वस्तूंना पसंती व देण्यास तयार किंमत (Willingness to Pay) प्रकट करण्यास प्रेरणा मिळत नसल्याने बरोबर पसंती विवेकी व्यक्तींकडून प्रकट करण्याऐवजी त्यांच्या अपुऱ्या पसंत्या व्यक्त होतात. त्यामुळे सामाजिक पसंती व्यक्त करण्याच्या संभाव्य यंत्रणांचा किंवा योजनांचा अभ्यास करणे अर्थशास्त्रज्ञांना आवश्यक ठरते.

साधारण पातळीवर सार्वजनिक वस्तूचा उपभोग घेत असलेल्या लोकांच्या गटातून त्यांच्या प्रतिनिधीला देण्यास तयार सीमांत किंमत (Marginal Willingess to Pay) विचारात घेवून शक्य आहे. समजा एकूण लोकसं'येत छ लोक आहेत. त्यांचा प्रतिनिधी उपभोक्ता ीं किंमत देण्यास तयार आहे. या स्थितीत पर्याप्त सीमांत खर्च छीं असेल. आणि त्या पातळीपर्यंतच सार्वजनिक वस्तूचा पुरवठा केला जाईल. सार्वजनिक वस्तू पुरविण्याचा सर्व खर्च कररूपाने वसूल केला जाईल. या स्थितीत जर प्रतिनिधी खरोखर प्रतिनिधी असेल तर तो सार्वजनिक वस्तूची योग्य पसंती प्रकट करेल. नाहीतर सार्वजनिक वस्तूचा चुकीचा पुरवठा केला जाईल. मात्र खरा प्रतिनिधी होण्यासाठी त्या व्यक्तीला सर्व माहिती पुरविणे आवश्यक आहे. जर तो उपभोक्त्यांचा गट मोठा असेल तर मात्र ते अत्यंत खर्चिक आहे.

यातून सार्वजनिक वस्तू निवडीच्या अनेक समस्या निर्माण होतात. यासाठी चार्ल्स टायबाऊट (Charles Tietbout) यांनी पर्यायी सूचना केली आहे, त्यासच टायबाऊट प्रतिमान असे म्हटले जाते.

### १. टायबाऊट प्रतिमान :- (Tiebout Model)

सद्यस्थितीत स्थानिक सार्वजनिक वस्तू सिद्धांताचा वापर राष्ट्राच्या लोकसं'येचे भिन्न राज्यवित्तीय क्षेत्रात म्हणजेच स्थानिक सरकारांमध्ये विभाजन करून आंशिक स्पष्टीकरण देण्यासाठी केला जात आहे. सॅम्युअल्सन यांनी सार्वजनिक वस्तूंच्या विकेंद्रित निवडीतून उपभोक्त्यांमध्ये अकार्यक्षमता निर्माण होतात. या पार्श्वभूमीवर अर्थशास्त्रज्ञ चार्ल्स टायबाऊट यांनी हे प्रश्न विचारात घेवून स्थानिक सर्वाजनिक वस्तूंच्या पुरवठ्याचे प्रारूप विकसित केले आहे, जे स्थानिक वस्तूंच्या विकेंद्रित निवडीतून कार्यक्षमता निर्माण होते. तसेच हे प्रतिमान स्थानिक सार्वजनिक वस्तूंना पसंती व्यक्त करण्याची यंत्रणासुद्धा पुरविते.

टायबाऊट यांच्या मते, जर पुरशा मोठ्या प्रमाणावर स्थानिक समुदाय किंवा क्षेत्रे असतील आणि प्रत्येक क्षेत्रासाठी विशिष्ट सार्वजनिक वस्तू ठरविल्या तर प्रत्येक व्यक्ती आपल्या निवडीच्या सार्वजनिक वस्तूंच्या क्षेत्रात त्यांच्या पसंतीनुसार राहतील. लोक स्वत:चा निर्णय स्वत:च घेतील. लोक आपल्या पसंती व्यक्त करतील आणि सार्वजनिक क्षेत्रातील साधने वाटपात कार्यक्षमता आणू शकतात. ज्या लोकांच्या निवडी सार्वजनिक वस्तूना समान आहेत, त्याच क्षेत्रात ते ते लोकांचे समुदाय राहतील. येथे मतदानातून सार्वजनिक वस्तूंना पसंती प्रकट करण्यात अडचणी निर्माण होत नाहीत. यातून उत्पादन साधनांचे पॅरेटो पर्याप्त वाटप होईल. टायबाऊट यांच्या मते, या समस्या निर्धारातून सार्वजनिक वस्तूंच्या तरतूदींची प्रर्कि या स्पष्ट करणे शक्य झाले आहे.

टायबाऊट यांच्या प्रतिमानाप्रमाणे समतोल निर्माण होण्यासाठी पुढील गृहितांची (Assumptions) आवश्यकता आहे.

१. उपभोक्ते पूर्ण गतीशील आहेत आणि ते उत्पन्नाच्या वाटपानुसार राहतात.

२. या प्रारूपात फक्त स्थानिक कराचाच विचार करते असे वाटते.

३. जर भिन्न सार्वजनिक वस्तूंना पसंती असलेले लोक असले तर समतोल निर्माण होण्यासाठी मोठ्या प्रमाणावर समुदायांची गरज असेल.

४. विभाजनातील न्यायाच्या आधारावर स्वत:च्या मतानुरूप व्यक्त केलेली पसंती विचारात घेतली जाणार नाही.

टायबाऊट यांच्या प्रतिमानाप्रमाणे ज्याप्रमाणे उपभोक्ता वस्तूंची खरेदी करण्यासाठी खाजगी बाजारपेठेत जातो त्याचप्रमाणे त्याला कर आधारीत सामुदायिक सेवा पुरविल्या जात असलेल्या समुदायात पाठविल्यास उपभोक्त्याच्या दोन्ही फेऱ्या बाजारपेठेस होतात. या स्थितीत उपभोक्ता वस्तूंना पसंती व्यक्त करण्यास टाळू शकत नाही. क्षेत्रीय गतिशिलता स्थानिक सार्वजनिक वस्तूंना खाजगी बाजारपेठेच्या फेरीचे स्वरूप प्राप्त होते.

टायबाऊट यांचे हे प्रतिमान प्रत्यक्षात अस्तित्वात आहे का याची सत्यासत्यता पडताळण्यासाठी ओटस (Oates) (१९६९) न्यूयॉर्क मधील ५३ समुदायांचा अभ्यास केला. त्यांच्या अभ्यासाप्रमाणे व्यक्तींच्या सामाजिकीकरण निर्णयात इतर घटकांबरोबरच राज्यवित्तीय चले महत्त्वाची भूमिका बजावतात. ओटस यांच्याबरोबरच असा अभ्यास इडेल आणि स्कॅर, हॅमील्टन आणि लिनेनमन यांनीही केला आहे.

टायबाऊट यांच्या या प्रतिमानावर पुढील आक्षेप/टिका (criticisms) केल्या जातात. यात बुचॅनन, वॅग्नर, गोझ यांचा प्रामुख्याने समावेश होतो.

१. टायबाऊट यांचा समतोल जेंव्हा प्रस्थापित होईल, जेंव्हा समुदाय बदल्यामुळे व्यक्तीच्या उपयोगितेत सुधारणा होणार नाही.

२. जेंव्हा लोकांचे स्थलांतर होते तेंव्हा इतरांवर बाह्यता लादल्या जातात याचा विचार हे प्रतिमान करत नाही.

३. स्थानिक सार्वजनिक वस्तू जर अशुद्ध असतील तर प्रदेशास/क्षेत्रास गर्दी/ प्रदूषण खर्च (congestion costs) सहन करावा लागतो.

४. प्रत्यक्षात आपण मिश्र टायबाऊट जगात राहतो.

५. वास्तवात मिश्र समुदाय एकत्र राहतात याचा विचार हे प्रतिमान करत नाही.

या प्रतिमानावर वरीलप्रमाणे टिका होत असल्या तरी त्याचे पुढील महत्त्व (importance) विचारात घेणे आवश्यक ठरते.

१. हे प्रतिमान उत्पादन साधनांचे वाटप सपर्वजनिक वस्तूंमध्ये कसे करावे त्याचे स्पष्टीकरण देते.

२. सार्वजनिक वस्तू पुरविण्यात स्थानिक सरकारची भूमिका हे प्रतिमान स्पष्ट करते.

३. सार्वजनिक वस्तूंच्या पुरवठ्याचे व्यवस्थापन करणे या प्रतिमानाप्रमाणे सहज शक्य होते.

४. हे प्रतिमान म्हणजे सॅम्युअल्सन यांच्या दृष्टिकोनावर सुधारणा आहे.

**२. संघ/गट/समूह वस्तू सिद्धांत :- (Theory of Club Goods/Clubs)**

प्रत्यक्ष वास्तवात कांहीच शुद्ध वस्तू अस्तित्वात असतात. त्यांची वैशिष्ट्ये त्यांचा शुद्ध सार्वजनिक वस्तू किंवा शुद्ध खाजगी वस्तू वर्गात समाविष्ट करतात. मात्र अनेक वस्तू या अविभाज्य असतात, त्यांचा उपभोग अनेक व्यक्ती एकाचवेळी घेवू शकतात. त्यानंतर त्या वस्तू गर्दी/दूषित (Congested) होतात. मात्र त्यांच्यात कांही वर्जन तंत्रज्ञान असते. त्यामुळे त्यांच्या वापराबद्दल व्यक्तीकडून किंमती गोळा करता येतात. उदा. पोहण्याचा तलाव, गोल्फ मैदान, पूल इ. यांचेचे विश्लेषण संघ/गट वस्तू सिद्धांतात केले आहे.

या सिद्धांताची प्रथम मांडणी जॅक वाईजमन (१९५७) यांनी केली. मात्र हा सिद्धांत अधिक व्यवस्थित व शास्त्रशुद्ध जेम्स बुचॅनन यांनी १९६५ मध्ये मांडला. म्हणून हा सिद्धांत बुचॅनन यांच्या नावानेच ओळखला जातो.

''संघ/गट हा ऐच्छिक समूह असतो. तो उत्पादन खर्च, सदस्यांची वैशिष्ट्ये आणि वस्तूच्या वर्जन लाभांचे वाटप करण्यासाठी निर्माण होतो.'' अशी व्या'या सँडलर व शिरहर्ट यांनी दिली आहे.

"A club is a voluntary group deriving mutual benefits from sharing one or more of the following : production costs, the members characteristics by excludable benefits."

**संघ/गट वस्तू सिद्धांत पुढील दृष्टीने महत्त्वाचा आहे.**

१) वस्तूंच्या गर्दी/ दुषीतीकरणाचे विश्लेषण देतो.

२) पर्याप्त दुषीतीकरणाचे स्पष्टीकरण देतो.

३) संघ/समुहाच्या पर्याप्त आकारमानाचे विश्लेषण करतो.

४) युती, सहकारी संस्था, समुदाय आणि शहरांचे पर्याप्त आकारमान दर्शवितो.

**बुचॅनन यांचे संघ/गट वस्तू प्रतिमान पुढील गृहितांवर आधारलेले आहे.**

१. संघ विनाखर्च बिगर सदस्यांना वगळतो.

२. संघ सदस्यांना भेदजन्य वागणूक दिली जात नाही.

३. लाभ आणि खर्चाचे संघ सदस्यांमध्ये समान वाटप केले जाते.

४. संघ हे लोकांचे ऐच्छिक संघटन आहे.

हे प्रतिमान संघ सदस्य प्रतिनिधीच्या वर्तनाचे परीक्षण करून संघ वस्तूंविषयीचे विश्लेषण करतो. ती व्यक्ती

ळ अक्षराने दर्शविली जाते. व्यक्तीचे उपयोगिता मूल्य पुढीलप्रमाणे–

Yi = खाजगी वस्तूंचा i व्यक्तीकडून उपभोग

X = अशुद्ध सार्वजनिक वस्तू

S = संघ/गटाचे आकारमान

**हे प्रतिमान पुढील समस्यांचे विश्लेषण करते.**

अ) गट वस्तूच्या पर्याप्तता अटी निश्चित करणे.


ब) वस्तू पुरवठ्याची संख्या ठरविणे.

क) वरील दोन्ही 'अ' आणि 'ब' एकाचवेळी ठरविणे.

या सर्वांचे विश्लेषण सँडलर आणि शिरहर्ट (Sandler and Tschirhart, 1980) यांनी पुढील आकृतीच्या साहाय्याने दिले आहे.

आकृतीचा पहिला भाग S, S1, S2 यातील संघात संघ वस्तूचा लाभ आणि खर्च वक्र दर्शवितो. लाभ वक्र

The Economic Analysis of Public Goods
Total Cost Per Person
Total Benefit Per Person



उपभोगाचे घटते मूल्य दर्शवितो. तर खर्च वक्र स्थिर प्रमाण मूल्य दर्शवितो. S1 संघ आकारमानासाठी X पर्याप्त पातळी X1 बिंदूत आहे की जेथे सीमांत लाभ व सीमांत खर्च समान आहेत. समजा X1 चा उपभोग जर सदस्य आकारमान S1 पासून S2 पर्यंत वाढल्यास लाभ वक्र खाली घसरतो. मात्र दरडोई खर्च सदस्य आकारमान वाढल्यामुळे घटतो. एकूण खर्चाचे वाटप अनेक लोकांमध्ये होते. या आवृत्तीच्या पहिल्या भागात संघ आकारमान आणि उत्पादनांच्या पर्याप्त संयोगाचे संच (S1, X2), (S2, X3), (S, X) निर्माण होतो.

ते आकृतीच्या चौथ्या भागात दोन दाखविले आहे.

असाच प्रयत्न आकृतीच्या दुसऱ्या भागात केला आहे. या भागात पर्याप्त सदस्य आकारमान X1, X2 आणि X सुविधेसाठी दाखविले आहे. लाभ वक्र आकार लोकांचा लाभ वाढत असल्याचे दर्शवितो. खर्च वक्र लोकांच्या वाढत्या संख्येमुळे खर्च घटत असल्याचे दर्शवितो. जेथे लाभ आणि खर्च वक्र समान झाले आहेत तेथे पर्याप्त सदस्यसंख्या अस्तित्वात येते.

अशाप्रकारे X1 आणि S1 पर्याप्त संघ आकारमान तर S2 आणि X2 आणि S आणि X आहे. हेच पर्याप्त बिंदू IV या भागात S opt ने दाखविले आहेत. आकृतीच्या IV थ्या भागात Sopt dH" आणि X opt वक्र E बिंदूत छेदतात तेथे एकूण पर्याप्तता अस्तित्वात येते.

बुचॅनन यांचे प्रतिमान समजण्यासाठी कठीण आहे. ते एकाचवेळी गट वस्तू व गट सदस्य आकारमान यांचे स्पष्टीकरण देते, ते गुंतागुंतीचे वाटते. त्यामुळे या प्रतिमानाचा प्रत्यक्ष वापर करणे अत्यंत अशक्य वाटते.

## २.५ **आपली प्रगती आजमवा :–** (Check Your Progress)

विभाग एक Section I

**अ) खालील विधाने चूक की बरोबर ते सांगा.**

१. विकसेल यांनी सार्वजनिक निवडीचा राजकीय आंतरक्रिया खर्च सिद्धांत मांडला आहे.

२. अशक्यता प्रमेय मसग्रेव्ह यांनी विकसित केला आहे.

३. बाह्यता खर्च हा राजकीय आंतरक्रिया खर्चाचा एक घटक आहे.

४. सामाजिक वर्जनता हे सार्वजनिक वस्तूंचे उल्लेखनिय वैशिष्ट्य आहे.

५. संघवस्तू सिद्धांत बुचॅनन यांच्या नावाने ओळखला जातो.

**ब) एका वाक्यात उत्तर द्या.**

१. निरपेक्ष एकमत म्हणजे काय?

२. निर्णय घेण्याचा खर्च म्हणजे काय?

३. संघ वस्तू म्हणू काय?

४. सर्वजनिक वस्तू हणजे काय?

५. राजकीय आंतरर्कि या खर्च म्हणजे काय?

## २.६ सारांश: (Summary)

सार्वजनिक वस्तू लोकांच्या सार्वजनिक गरजा भागवून महत्तम सामाजिक कल्याण साध्य करण्यात महत्त्वाची भूमिका बजावतात. लोकशाही देशात सार्वजनिक वस्तूंना लोकांच्या निवडी/पसंती सरकारला माहीत असणे आवश्यक असते. सार्वजनिक वस्तूंना सार्वजनिक निवडी प्रकट करण्यात येणाऱ्या समस्यांची चर्चा सार्वजनिक निवडीचे सिद्धांत करतात.

या प्रकरणात सार्वजनिक निवडीचे एकमत दृष्टिकोन, राजकीय आंतरर्कि या खर्च सिद्धांत, अशक्यता प्रमेय, लोकशाहीचा आर्थिक सिद्धांत, राजकीय-आर्थिक-नोकरशाही सिद्धांताचा अभ्यास केला आहे. तसेच सार्वजनिक वस्तू पुरविण्याच्या तरतुदीच्या ऐच्छिक विनियम प्रतिमान, सॅम्युअल्सन-मसर्गेव्ह योगदान यांची चर्चा हे प्रकरण करते. सार्वजनिक वस्तूंना पसंती प्रकट करण्याच्या यंत्रणा/योजनांचा विचारही केला आहे. तसेच टायबाऊट प्रतिमान आणि संघ वस्तू सिद्धांताचा समावेशही या प्रकरणात केला आहे.

## २.७ स्मरणीय संकल्पना : (Theory to Remember)

या प्रकरणातील पुढील महत्त्वाच्या संकल्पना स्मरणीय आहेत.

१. सार्वजनिक निवड (Public Choice) : सार्वजनिक वस्तूंसाठी असलेली लोकांची पसंती/प्राधान्य होय.

२. सापेक्ष एकमत (Relative Unanimity) : राज्यवित्तीय निर्णय सरकारने घेण्यासाठी लोकशाही शासन यंत्रणेत किमान ठरविलेले एकमत होय.

३. राजकीय आंतरर्कि या खर्च (Political Interactions Costs) : सार्वजनिक वस्तूंना लोकांच्या पसंती कळवून त्या वस्तू सरकारने पुरविण्यासाठी करावा लागणारा खर्च होय.

४. संघ वस्तू (Club Goods) : अशुद्ध सार्वजनिक वस्तू की ज्यांच्यावर एका संघाचे/गटाचे ती पुरविण्यासाठी व खर्च गोळा करण्यासाठी नियंत्रण असते.

५. बाह्यता खर्च (Externality Cost) : सरकारने पुरविण्याच्या सार्वजनिक वस्तू विरोधी मतदान करणाऱ्या लोकांना सहन करावा लागणारा खर्च होय.

प्रगती आजमवाची उत्तरे

**अ) विधाने चूक की बरोबर ते सांगा.**

१) चूक २) चूक ३) बरोबर ४) चूक ५) बरोबर

**ब) एका वाक्यात उत्तरे लिहा.**

१. सार्वजनिक वस्तू पुरविण्याविषयीचा राज्यवित्तीय निर्णय घेण्यासाठी सर्व लोकांची मान्यता असते.

२. सरकारने सार्वजनिक वस्तू लोकांच्या निवडीनुसार पुरविण्याचा निर्णय घेण्यासाठी लोकांमध्ये किंवा राजकीय पक्षांमध्ये सहमत घडवून आणण्यासाठी येणारा खर्च होय.

३. अशुद्ध सार्वजनिक वस्तू ज्यांच्यावर संघाचे किंवा गटाचे नियंत्रण व नियमन असते त्यांना संघ वस्तू म्हणतात.

४. लोकांच्या सार्वजनिक गरजा भागविण्याच्या वस्तू म्हणजे सार्वजनिक वस्तू होय.

५. सार्वजनिक वस्तू सरकारने पुरविण्यासाठी लोकांच्या सार्वजनिक वस्तूंविषयीच्या निवडी पोहचविण्यासाठीचा खर्च म्हणजे राजकीय आंतरक्रिया खर्च होय.

## २.८ अभ्यासासाठी प्रश्न (Exercise)

१. सार्वजनिक निवडीच्या विकसेलच्या सिद्धांताचे स्पष्टीकरण द्या.

२. राजकीय आंतरक्रिया सिद्धांताचे परीक्षण करा.

३. अशक्यता प्रमेयाचे मूल्यमापन करा.

४. सार्वजनिक वस्तू तरतुदीच्या विकसेल-लिंदाल प्रतिमानाची चर्चा करा.

**५. टिपा लिहा.**

अ) लोकशाहीचा आर्थिक सिद्धांत

ब) राजकीय-आर्थिक-नोकरशाही सिद्धांत

क) टायबाऊट प्रतिमान

ड) संघ/गट वस्तू सिद्धांत

## २.९ संदर्भ ग्रंथ (References)


१. Herber, Bernard (2004). Modern Public Finance, AITBS Publishers & Distributors, Delhi.

२. Brown & Jackson (1987). Public Sector Economics, Basil Blackwell, Oxford,

३. Tyagi, B. P. (1997-98), Public Finance, Jai Prakash Nath & Co., Meerut.

४. Lekhi, R. K. (1998). Public Finance, Kalyani Publishers, Ludhiana.

५. Buchanan, J. M. (1970). The Public Finances, Richard D. Irwin, Homewood.

६. Atkinson & Stilglitz (1980). Lectures on Public Finance, Tata Mc Graw Hill, New York.

७. Goode, R. (1986). Government Finance in Developing Countries, Tata McGraw Hill, New York.


****

## घटक क्र. ३
# सार्वजनिक खर्च सिध्दांत व प्रकल्प मुल्यमापन

अनुक्रमणिका :

३.१ प्रास्ताविक

३.२ उद्दिष्ट्ये

३.३ सार्वजनिक खर्च सिध्दांत

 ३.३.१ सॅम्युअलसन यांचा सार्वजनिक खर्चाचा शुध्द सिंध्दांत

 ३.३.२ वॅग्नर यांचा राज्याच्या वाढत्या कार्याचा नियम

 ३.३.३ वाइजमन पिकॉक परिकल्पना

 ३.३.४ कोलीन क्लार्क परिकल्पना

३.४ सार्वजनिक गुतवणूकीचे निकष

३.४.१ प्रकल्प मुल्यमापन

३.४.२ सामाजिक खर्च लाभ विश्लेषण

३.५ सार्वजनिक अंदाजपत्रक

 ३.५.१ सार्वजनिक अंदाजपत्रकाचे वर्गीकरण

 ३.५.२ कामगिरी अंदाजपत्रक व कार्यक्षम अंदाजपत्रक

 ३.५.३ शून्याधारित अंदाजपत्रक

३.६ सारांश

३.७ पारिभाषिक शब्द व शब्दार्थ

३.८ स्वयंअध्ययन प्रश्न व उत्तरे

३.९ सरावासाठी स्वाध्याय

३.१० संदर्भ ग्रंथ

### ३.१ प्रास्ताविक :–

विद्यार्थी मित्र हो मागील घटकामध्ये आपण सार्वजनिक निवडीचे सिध्दांत व सार्वजनिक धोरण याबद्दल सविस्तर अभ्यास केलेला आहे. त्यामध्ये आपण संसाधनाची वाटणी, एकत्रित पसंती, एकमत तत्व, लोकशाही

आर्थिक सिध्दांत ॲरो यांचा अशक्यता प्रमेय सार्वजनिक वस्तू व त्यासंबंधीत विविध दृष्टीकोन इ. चा अभ्यास केलेला आहे. प्रस्तुत घटक ह्यात तीनमध्ये खर्चाविषयक सिध्दांत व प्रकल्प मुल्यमापन संबंधी अभ्यास करणार आहे. सार्वजनिक अर्थशास्त्रामध्ये सार्वजनिक खर्चात अत्यंत महत्वाचे स्थान आहे. सरकार याद्वारे महसूल जमा करते व सार्वजनिक खर्चाद्वारे तो समाजकल्याणासाठी खर्च करते. १९३३ नंतर सार्वजनिक खर्चास अत्यंत महत्वाचे स्थान प्राप्त झाले आहे. जे. एम केन्स यांनी त्यांच्या आधुनिक आर्थिक विचारामध्ये सार्वजनिक खर्चास अत्यंत महत्वाचे स्थान दिले आहे. सार्वजनिक खर्चाद्वारे सरकार सामाजिक कल्याण वाढविण्याचा प्रयत्न करत असते. आधुनिक सरकारे ही कल्याणकारी सरकारे म्हणून ओळखली जातात. दुसऱ्या महायुध्दानंतर सार्वजनिक खर्च व एक महत्वाचा भाग म्हणून पुढे आलेला आहे. दरवर्षी सरकार अंदाजपत्रक मांडत असते. त्यामध्ये, महसूल व खर्च यांचा ताळेबंद असतो. कराद्वारे महसूल जमा केला जातो व तो सामाजिक व विकास कामासाठी वापरला जातो. तो सार्वजनिक खर्चाच्या माध्यमातून दर्शविला जातो. १९८० च्या नंतरच्या दशकामध्ये समाजामध्ये आर्थिक विषमता वाढत असताना दिसते. ही विषमता कमी करण्यासाठी सरकारकडे सार्वजनिक खर्च हे एक साधन आहे. संसोशधनाच्या वाटणीद्वारे हे शक्य होवू शकते. विषमता संसाधनाच्या वाटपावर अवलंबून असते. प्रस्तुत घटकामध्ये सार्वजनिक खर्चनियमक सिध्दांताचा सखोल अभ्यास आपण करणार आहोत. त्याचबरोबर प्रकल्प मुल्यमापन करणार आहे. सार्वजनिक अंदाजप्रत्रकाद्वारे सरकारी खर्चाची पूर्व दिशाही समजून घेणार आहोत.

## ३.२ उद्दिष्ट्ये :

या घटकाचा अभ्यास केल्यानंतर आपणास

१. सार्वजनिक खर्चाविषयी सिध्दांत समजून घेता येतील.

२. सरकारची वाढती कार्ये कोणती आहेत. ते समजून घेता येईल.

३. सार्वजनिक गुंतवणूकीची गरज व महत्व समजून घेता येईल.

४. प्रकल्पाचे मुल्यमापन कसे केले जाते. त्याची कल्पना येईल.

५. सार्वजनिक अंदाजपत्रक समजून घेता येईल.

## ३.३ सार्वजनिक खर्चाचे सिध्दांत :-

अलिकडील काळात जगातील सर्वच देशातील सरकारांचे कार्यक्षेत्र वाढले आहे. याचाच परिणाम म्हणून सार्वजनिक खर्चात मोठ्या प्रमाणावर वाढ झाल्याचे दिसून येते. वाढत्या खर्चाचे आव्हान व एक मोठा प्रश्न प्रत्येक सरकारपुढे आहे. मिळालेल्या उत्पन्नातून सार्वजनिक खर्च कसा करावा याबद्दल योजनाही सरकारला तयार करावी लागते. सार्वजनिक खर्च म्हणजे असा खर्च जो सार्वजनिक संस्थाद्वारे केला जातो. तो म्हणजे केंद्र सरकार, राज्य सरकार व स्थानिक सरकारे यांच्याद्वारे केला जाणारा खर्च हा व्यक्ती व व्यवसाय संस्थांच्या खर्चापेक्षा वेगळा असतो. सरकार कराद्वारे लोकांकडून पैसा जमा करत असते व तो जमा केलेला पैसा लोकांसाठी खर्च करावयाचा असतो. खर्च करत असताना अपव्यय टाळावा लागतो. खर्चासाठी काही नियम पाळावे लागतात. व त्याच बरोबर वैध्दांतीक बाजूही समजून घ्यावी लागते.

**सार्वजनिक खर्च व्याख्या :-**

सार्वजनिक खर्च म्हणजे केंद्र, राज्य व स्थानिक सरकारने केलेला खर्च होय. यामध्ये सरकारने केलेला खर्च हा खाजगी लोकसंस्था व उत्पादन संस्था यावर केलेला असतो. सार्वजनिक खर्चाची एक विशिष्ट अशी व्याख्या करता येत नाही. सार्वजनिक खर्चाच्या विस्तृत व्याख्येमध्ये खालील बाबींचा समावेश करता येतो.

१. सार्वजनिक खर्च म्हणजे सरकारच्या विविध विभागांच्या प्रात्यक्षिकरित्या किंवा अनुदानाच्या स्वस्तात वस्तू व सेवावर खर्च होय.

२. सरकारच्या विविध विभागाद्वारे सामाजिक सुरक्षा सामाजिक कल्याण साध्य करण्यासाठी केलेला खर्च सरकारी कर्जावरील व्याज अनुदान व मदत करणे

३. राष्ट्रीय उदयोगानी केलेला भांडवली खर्च यामध्ये सरकारद्वारे केलेल्या संसायनाचा वापर,खाजगी क्षेत्रामध्ये उत्पादन साधनांचे पुर्न, राष्ट्रीयकृत उदयोगांनी केलेली गुंतवणूक इ.चा समावेश होतो.

" Public Expenditure refers to the expenditure in-- by central stond or local govement of country for its own administration soual welfare economic development and for prviding helps to other countries"

वरील प्रमाणे तीन्ही प्रकारच्या कार्यास सार्वजनिक खर्च म्हटले जाते.

**सार्वजनिक खर्चाचे सिद्धांत**

महत्तम सार्वजनिक हिताची प्राप्ती सार्वजनिक खर्चाच्या बाजूने दोन सिध्दांतावर अवलंबून आहे तेच सिद्धांत सरकारी खर्चाचे मुलभूत सिद्धांत समजले जातात.

**१.** डॉ. डॉल्टन व प्रा.पिगू यांनी पहिला सिद्धांत मांडला आहे. त्याच्या मते सरकारने खर्च केलेल्या प्रत्येक पैशाच्या मात्रेपासून सीमांत लाभ उत्तरोत्तर ऱ्हास पावत असतो भांडवल सरकारने लावलेल्या करांच्या स्वखर्चातील पैशाच्या प्रत्येक मात्रेपासून घेणारा सीमांत त्याग वाढत जातो सरकारने आपला खर्च अशा बिंदूपर्यत केला पाहीजे ज्या बिंदूत त्याग व लाभ समान येतील ही सरकारची आदर्श खर्च पातळी म्हणून ओळखळी


**२.** सरकारी खर्चाच्या योग्य वितरणाच्या दृष्टीने पाहता सम सिमांत उपयोजीत चा नियम या क्षेत्रात देखील लागू होताना दिसतो. हा विषयक सिमांत लाभाचा सिद्धांत म्हणून ओळखला जातो यामध्ये सर्वच क्षेत्रातील लाभ समान पातळीवर आणण्यासाठी प्रयत्न होणे आवशयक आहे सरकारने-- लाभ साध्य करण्यासाठी खर्चाचे स्थलांतरण केले पाहिजे. वरील प्रमाणे महत्तम हिताचे किंवा लाभाचे तत्व प्रत्यक्षात लागू करताना अनेक अडचणी येत असतात कारण खर्च एका विभागाद्वारे होतो तर करारोपण दुसऱ्या विभागाद्वारे होते. त्यामुळे तुलना करणे अडचणीचे होते.

**३.३.१ सॅम्युअलसन यांचा सार्वजनिक खर्चाचा शुद्ध सिद्धांत**

सार्वजनिक खर्चाच्या शुद्धा सिद्धांतामध्ये पर्याप्त पातळीवरील सार्वजनिक वस्तूच्या पुरवठ्या बदलण्याची सर्व तत्वे असतात. यामध्ये --- तत्व लाभ तत्वाचा समावेश होतो. क्षमता तत्वांबद्दलचे सखोल विश्लेषण प्रा.

पिगु या अर्थतज्ञांनी केलेली आहे लाभ तत्वाबद्दलचे विश्लेषण विकसीत - लिन्ढाल व जॉनसन यांनी केलेले आहे.

सॅम्युअलसनी यानी त्याच्या सिद्धांतात सर्वसाधारण समतोलाचे विश्लेषण केलेले आहे. यांनी आपल्या सिद्धांतामध्ये संसाधनाची वाटणी - व संसाधनाचे विभाजन () याबद्दलच्या समास्याचे विश्लेषण करून एक सर्वसाधारण समतोल साध्य करण्याबददलचे विश्लेषण केलेले आहे. त्यांच्या मते सार्वजनिक वस्तू या सामुहीक पुरविल्या जातात. त्या खाजगी लोकाकडून पुरविल्या जावू शकत नाहीत. खाजगी वस्तू या पसंती प्रमाणे पुरविल्या जातात. सार्वजनिक पसंती ही सार्वजनिक वस्तूबद्दल माहीत नसते. सार्वजनिक वस्तू पुरवठा करीत असतात लोकशाही देशात सरकारला लोकमत विचारात घ्यावे लागते. सार्वजनिक वस्तूचा पर्याप्त पुरवठा करत असताना बाजार तत्वे लागू केली जावीत असे गृहीत धरले जाते.





वरील आकृतीत क्र. ३.१ मध्ये दोन व्यक्तीची सार्वजनिक वस्तूची मागणी व खाजगी वस्तूची मागणी दर्शविली आहे. व व्यक्तीची मागणी दर्शविली आहे. उत्पन्न पातळी व इतर वस्तूच्या किमती स्थिर आहेत. आकृतीच्या डावीकडील भागामध्ये x या खाजगी वस्तूचे DA व DB हे मागणी व G आहेत.DA + DB हा x या खाजगी वस्तूच्या बाजार मागणी व आहे. व G आहे. हाDA वDB च्या उजव्या बेरजेतून तयार केलेला आहे. या खाजगी वस्तूचा s हा पुरवठा व g आहे. या खाजगी वस्तूची A वB या दोन्ही उपभोग्त्यासाठीची किंमत ही oc इतकी आहे. व E या संतुलन बिंदुद्वारे दर्शविलेली आहे. E या बिंदुच्या ठिकाणी A व या Bदोन्ही व्यक्तीची एकूण मागणी खरेदी OH इतकी आहे. A हा व्यक्ती x या खाजगी वस्तूचे OF एवढे नग खरेदी करतो व b हा व्यक्ती og एवढे नग खरेदी करतो. A या व्यक्तीचे खाजगी वस्तूची खरेदी मागणी ही कमी आहे तर b या व्यक्तीची मागणी जास्त आहे. डाव्या बाजूची उजव्या भागामध्ये DA व DB हे Aव B चा व्यक्तीचे मागणी व g आहेत. ते y या सार्वजनिक वस्तूसाठीचे मागणी व आहेत.DA + DB व बाजार मागणी व आहे. ही

व्यक्तीगत मागणी उभी बेरीज केल्यानंतर मिळतो सर्व करदात्याद्वारे y या वस्तूचा उपभोग दिसतो. s हा पुरवठा व आहे. E1 या बिंदुमध्ये मागणी व पुरवठा संतुलन घेते. y या वस्तूचा a व b या व्यक्तीचा उपभोग on इतका आहे. व किमंत व ok इतकी आहे. या किमंती-- ही किंमत या व्यक्तीद्वारे ही किंमत या व्यक्तीद्वारे अदा केली जाते. यामुळे ok=OM+OL असे समीकरण मिळले. यावरून असे लक्षात येते की खाजगी वस्तूची मागणी विविध व्यक्तीद्वारे वेगवेगळी केली जाते. मात्र सार्वजनिक वस्तू या सर्व उपभोग्याना प्रमाणात उपलब्ध असतात.

**३.२.२. वॅगनर याचा सरकारच्या वाढत्या कार्याचा नियम :**

ॲडाल्फ वॅगनर या जर्मन अर्थतज्ञाने १९ व्या शतकामध्ये आपल्या अनुभवजन्य अभ्यासावरून सरकारच्या वाढत्या कार्याचे विश्लेषण केले आहे. त्याच्या मते मध्यवर्ती व स्थानिक सरकारच्या कार्यामध्ये सातत्याने वाढ होताना दिसून येते. सरकारच्या जुन्या कार्यासोबत नविन ही अनेक प्रकारची कार्य करावी लागतात. औद्योगिक देशामध्ये दरडोई उत्पन्नात व उत्पादनात सातत्याने वाढ होते या वाढीबरोबर सार्वजनिक क्षेत्राचाही होणे क्रमप्राप्त असते.

सरकारला जुन्या कार्यासोबत नविन कार्ये ही कार्य- करावी लागतात. केंद्र,राज्य, व स्थानिक सरकारच्या कार्यात सातत्याने होणारी वाढ ही महत्त्वाचा भाग आहे. कार्यामधील वाढ व फक्त ब्रिटन, अमेरिका,जर्मनी,फ्रान्स या देशापुरती मर्यादीत नसून जगातील सर्वच देशामध्ये ही वाढ होताना दिसून येते. औद्योगीक देशामध्ये दरडोई उपन्न व दरडोई उत्पादन मोठ्या प्रमाणावर वाढत आहे. या सर्वच देशातील सार्वजनिक क्षेत्राचे विस्तार होत असल्याचे दिसून येते. वॅगनर यांच्या मते सामाजिक प्रगती ही सार्वजनिक खर्च वाढण्यात मोठ्या प्रमाणावर जबाबदार आहे. आर्थिक विकास व श्रमविभागणी यामुळे आर्थिक जिवन वृद्धी ही गुंतागुतीची होत आहे. याचबरोबर सरकारचा पोलीस व्यवस्था व न्याय व्यवस्थेवरील खर्च वे वाढत आहे. त्याचबरोबर तंत्रज्ञानामुळे भांडवलाची मागणी दिवसेदिवस वाढत आहे. यातूनच सार्वजनिक महामंडळाचा उदय होत आहे. जेव्हा तांत्रिक प्रगती मक्तेदारी निर्माण करण्यास पोषक वातावरण निर्माण करते. त्यावेळी सरकारची भूमिका अत्यंत महत्त्वाची असते. वॅगनर यानी आरोग्य शिक्षण इ. सामाजिक सेवावरील खर्चाबाबतील राज्यांचा कार्ये वाढत असल्याचे निदर्शनास आणून दिले आहे.



वरील आकृतीमध्ये सार्वजनिक वस्तूचे दरडोई उत्पादन उभ्या अक्षावर दर्शविले आहे. व वास्तव दरडोई उत्पनातील वाढ ही आर्थिक विकासामुळे होते.

खालील कोष्टकांच्या साह्याने भारतामध्ये १९५०-५१ पासून सर्वच पातळीवरील सार्वजनिक खर्चात वाढ होत असल्याचे समजून येता येईल.

**कोष्टक क्र.१ : केंद्र व राज्य व केंद्रशासीत प्रदेशाचा एकूण खर्च (कोटी रु. मध्ये)**

| वर्ष | एकूण खर्च | स्थूल राष्ट्रीय उत्पादनांशी (GNP)एकूण खर्चाचे प्रमाण |
|---|---|---|
| १९५०-५१ | ११९० | ११.८ |
| १९६०-६१ | २५६० | १५.८ |
| १९७०-७१ | ८५०० | १९.९ |
| १९८०-८१ | ३६८५० | २७.१ |
| १९९०-९१ | १७६५५० | ३३.३ |
| २०००-२००१ | ५९८२६० | ३३.९ |

स्त्रोत : Economic Survey 2001-02

**कोष्टक क्र.१** मध्ये सार्वजनिक खर्च ११०० कोटी रूपयावरून ५,९८,५कोटी रू.नी वाढला. १९५०-५१ मध्ये तो स्थूल राष्ट्रीय उत्पादनाच्या ११.८ घेता त्यात वाढ होवून २०००-०१ मध्ये स्थूल राष्ट्रीय उत्पादनाचा ३४% एवढा झाला.

संरक्षण खर्चात वाढ, नागरी प्रशासनाचा विस्तार लोकशाही यंत्रणा केंद्र सरकारच्या इतर देशाबददलची वचनबद्धता देश उभारणीतील सरकारची कार्ये उदा. शिक्षण आरोग्य सुविधा किंमत पातळीतील वाढ, वाढते वेतन वाढते श्रमदल लोकसंख्या वाढ शहराचे वाढते प्रमाण इ. घटक वाढत्या खर्चास जबाबदार असल्याचे लक्षात येते.

भारतीय राज्य घटनेत विविध सूची तयार करन कामाची विभागणी विविध पातळीवर केली आहे. केंद्रसूची राज्यसूची व समवृत्ती सूचीद्वारे कार्याचे वाटप करण्यात आले. केंद्राबरोबरच राज्यानाही अनेक कल्याणकारी योजना राबवाव्या लागतात. दुसऱ्या महायुद्धापूर्वी भारतात नियोजन मंडळ कार्यरत नव्हते मात्र स्वांतत्र्यानंतर नियोजन मंडळाद्वारे कल्याणकारी कार्यवृत्तावर जास्त भर देण्यात आले. इटलीचे अर्थतज्ञ एफ. एस. नित्ती यांच्या अभ्यासाद्वारे सर्वच सरकारचा खर्च वाढत असल्याचे दिसून आले युद्धजन्य देश, शांतताप्रिय देश केंद्र सरकारे विकेंद्रीय सरकारे, लहान देश, मोठे देश, अशा सर्वच देशामध्ये सार्वजनिक खर्च वाढत असल्याचे दिसते.

**राज्याच्या कार्याचा विस्तार होण्याची कारणे :-**

१) **कल्याणकारी राज्य संकल्पना -** १९३० च्या महामंदीनंतर सरकारचे सदस्य बदलून ते कल्याणकारी बनले, कल्यालकारी सरकारचे मुख्य उद्दिष्ट हे प्रोत्साहन देणे, देशातील जनतेच्या सामाजिक व राजकीय जीवनात

सुधारणा करणे हे आहे. भूतकाळात ज्या वस्तू सेवा पुरविणे सरकारची जबाबदारी नव्हती अशा अनेक वस्तू व सेवा पुरविणे बंधनकारक ठरले. राज्यामध्ये गतीमान बदल झाले राज्याने व्यापार व्यवहार नियंत्रण नाही. पूर्ण रोजगार निर्माण करणे इ. आव्हानात्मक कार्ये स्विकारली. यासाठी मोठा खर्च अपेक्षित होता.

२) **युद्धे व युद्धायी तयारी –** २० व्या शतकात सार्वजनिक खर्च वाढण्याचे प्रमुख कारण म्हणजे संरक्षणावरील खर्च होय. देश जेवढा मोठा तेवढा संरक्षणावरील खर्च जास्त असतो. देशादेशातील तणावजन्य परिस्थितीकडे संरक्षण खर्च वाढत जातो. संरक्षण सामग्रीच्या यांत्रिकीकरणामुळे हा खर्च आणखीन वाढल्याचे दिसते. संरक्षणावरील खर्च व युध्दजन्य परिस्थिती नसतानाही होतो. भारतामध्ये १९५०–५१ मध्ये संरक्षणावरील खर्च मात्र १६ कोटी रूपये एवढा होता. त्यात वाढ होवून २००२–०३ मध्ये तो ४३६०० कोटी रू. एवढा झाला.

३) **लोकसंख्या वाढ व नागरीकरण –** १९९१ मध्ये भारताची लोकसंख्या ३६.११ कोटी होती. त्यामध्ये वाढ होवून २००१ मध्ये ती १०२ कोटी एवढी झाली. लोकसंख्या वाढल्यामुळे शिक्षणावरील खर्च वाढतो. रोजगार निर्मितीसाठी खर्च वाढवावा लागतो. नागरीकरणामुळे शहरामध्ये गर्दी होते व मुलभूत सोयीसुविधावरील खर्च वाढतो.

४) **लोकशाही संस्थांची निर्मिती –** लोकशाही देशामध्ये सरकार लोकनियुक्त असल्यामुळे जनतेच्या अपेक्षा करणे हे सरकारचे प्रमुख कार्य बनते.

५) **राष्ट्रीय उत्पन्नातील वाढ –** राष्ट्रीय उत्पन्न वाढल्यामुळे लोकांची सार्वजनिक वस्तूची मागणी वाढते व सार्वजनिक खर्च सातत्याने वाढतो.

६) **मंदीजन्य परिस्थिती –** मंदीच्या परिस्थितीतून देशास बाहेर काढण्यासाठी मोठ्या प्रमाणावर सार्वजनिक खर्च करून सरकारला रोजगार निर्मितीवर भर द्यावा लागतो.

७) **मिश्र अर्थव्यवस्था व समाजवादी विचारसरणी –** समाजवादी विचारसरणीनुसार सरकारचे प्रथम कर्तव्य हे जनतेचा विकास करणे हे असते. मिश्र अर्थव्यवस्थेत सार्वजनिक क्षेत्र व खाजगी क्षेत्राचा समावेश असतो. सार्वजनिक क्षेत्रावरील खर्च सरकारने करणे अभिप्रेत असते.

**डॉल्टन यांच्या मते खालील तीन कारणामुळे क्लॅनर यांचा नियम स्पष्ट होतो.**

१) आधुनिक काळात सार्वजनिक संघटनांची कार्यक्षमता खाजगी क्षेत्राच्या कार्यक्षमतेपेक्षा वाढल्यामुळे खर्च वाढतो.

२) सरकारला जुन्या कार्याबरोबरच नविन कार्ये करणे क्रमप्राप्त ठरते. सार्वजनिक वस्तू पुरविणे सरकारचे प्रमुख कार्य ठरते.

३) खाजगी क्षेत्र नफ्याच्या प्रेरणेने कार्ये करते. त्यासाठी जनतेची काळजी घेण्यासाठी सार्वजनिक क्षेत्रच कार्य करत असते.

अॅडाल्फ वॅगनर यांची परिकल्पना सर्वत्र मान्य पावलेली आहे.

### ३.३.३ वाइजमन पिकॉक परिकल्पना :


जॅक वाइजमन व ॲल्डन ची पिकॉक यांना त्याच्या " The growth of Public Expenditure in the United Kingdom " १९६१ या अभ्यासात १८९० ते १९५५ या कालावधीतील इंग्लडमधील सार्वजनिक खर्चाचा आढावा घेतला. त्यांच्या मते इंग्लंडमधील या कालावधीतील खर्च हा सातत्याने वाढला नसून तो कधी मोठ्या प्रमाणात वाढला असून काही काळ तो स्थिर राहिल्याचे स्पष्ट केले. त्यांनी सार्वजनिक खर्चातील चढ-उतार स्पष्ट केले. त्याच्या दृष्टीकोनामध्ये त्यांनी तीन संकल्पना स्पष्ट केलेल्या आहेत.

१) विस्थापण (Displacement)

२) परिक्षण (Inspection)

३) केंद्रिकरण (Concentration)

त्यांच्या मते राजकीय नेते/सरकार सार्वजनिक खर्चाचा विचार करताना लोकांच्या मतांचा विचार करते. त्याचबरोबर इतर माध्यमांचाही विचार करते. सार्वजनिक खर्चाचा विचार करत असतो. दिलेली किंमत व येणारे लाभ यांचा संबंध जोडला जात नाही. देशातील लोक कर वाढले असता त्यांचा विरोध करतात मात्र सार्वजनिक खर्चाबद्दल आग्रह धरतात. सरकारचा सार्वजनिक खर्च करांचे दर न वाढवता करता येते. जर उत्पन्न वाढत असेल तर मात्र उत्पन्नापेक्षा खर्चातील वाढ जास्त असेल तर करांचे दर वाढविणे अनिवार्य ठरते. देशामध्ये युध्दजन्य परिस्थिती निर्माण झाली तर मात्र करांचे दर वाढविणे क्रमप्राप्त ठरते. यातून विस्थापन परिणाम होतो. यांचा स्विकार पातळीवर परिणाम होतो. यातून नविन कर स्वीकारले जातात व ते पुढेही चालू राहतात. युध्दामुळे सरकारची जबाबदारी वाढते व यातून विदेशी कर्ज वाढते व सरकारचे लक्ष हे युध्दावर जास्त केंद्रित होते. यास परिक्षण परिणाम म्हणतात.




Time ( Years) The displacement offer

आकृती क्र. ३.३ मध्ये उभ्या अक्षावर सार्वजनिक क्षेत्र महसूल, सार्वजनिक क्षेत्र खर्च यांचे एकूण राष्ट्रीय उभ्या अक्षाशी असलेले प्रमाण दर्शविले आहे व आडव्या अक्षावर वेळ (वर्षे) दर्शविले आहे. G/GNP प्रमाणावरून आपणांस सार्वजनिक क्षेत्रांचे समग्र अर्थव्यवस्थेतील तुलनात्मक महत्व लक्षात येते. त्याचबरोबर त्यांना केंद्रिकरण परिणामही स्पष्ट केलेला आहे. केंद्र सरकारचा सार्वजनिक क्षेत्रावरील खर्च वाढत असल्याचे स्पष्ट झाले आहे. त्यांच्यामते इंग्लंडमध्ये सार्वजनिक क्षेत्राची तुलनात्मक वाढ ही टप्प्या-टप्प्याने होत आहे. अस्तित्वातील आर्थिक प्रश्न हा पर्यायी समाधान काढून सोडविले जाते व केंद्र सरकार जास्त प्रमाणावर सार्वजनिक क्षेत्रावर खर्च करते.

वाइजनन - पिकॉक परिकल्पना ही ॲडाल्फ वॅगनर यांच्या नियमापेक्षा वेगळी नाही. धान्य दृष्टीकोनाद्वारे आपणास सार्वजनिक खर्च वृद्धीची कल्पना येते व महत्व समजून येते.

### ३.३.४ कोलीन - क्लार्क परिकल्पना :

सार्वजनिक खर्चाच्या वृद्धीबद्दलची तिसरी परिकल्पना ही कोलीन क्लार्क या अर्थशास्त्रज्ञांनी मांडली. ही परिकल्पना त्यांनी त्यांच्या (Public Finance and Changes in the Valve of Money) या प्रबंधात मांडली. यास निर्णायक मर्यादा (Critical Limit) या नावानेही ओळखले जाते. हे कराभाराचा सहनशील पातळी बद्दलचे विश्लेषण आहे. कोलीन क्लार्क यांच्या मते सरकारची स्थूल राष्ट्रीय उत्पन्नातील (GNP) तील वाटा- २५% जास्त झाला तर भाववाढ होते. त्यांना त्याचे विश्लेषण विविध देशांच्या देशांतर्गत युध्द आकडेवारीवरून केलेले आहे.

ही परिकल्पना खालील तीन संस्थात्मक घटकावर अवलंबून आहे.

१. जेंव्हा सरकारकडून जमा केले जाणारे कर हे स्थूल देशांतर्गत उत्पन्नाच्या २५% एवढे घेतात. अशावेळी लोकांची वर्तणूक बदलते. यातून लोक कमी उत्पादक घेतात. कारण वाढलेल्या ---- मोठा भाग व करद्वारे सरकारकडे हस्तांतरित होतो. व हे प्रयत्नशील करपध्दतीत होते.

२. सरकारच्या वाढत्या खर्चास लोक कमी प्रतिसाद देतात. यातून समग्र पुरवठा कमी होतो. लोकांची खरेदाराही वाढते. व यातून भाववाढ होते व अर्थव्यवस्थेत तेजीची परिस्थिती निर्माण होते. कोलीन क्लार्क परिकल्पनेमध्ये दर्शविल्याप्रमाणे जगातील काही मोजक्याच देशामध्ये उच्च पातळीचे कर अस्तित्वात असल्याचे दिसते. बहुतांश देशात कराची एवढी उच्च पातळी असल्याचे दिसत नाही. मात्र युध्द परिस्थितीतीत करांचे दर वाढतात. फक्त सार्वजनिक खर्चामुळेच भाववाढ होत नसून भाववाढीत अनेक कारणे जबाबदार आहेत.

### ३.४ सार्वजनिक गुंतवणूकीचे नियम :

विविध पातळीवरील सरकारकडून सार्वजनिक प्रकल्पामध्ये गुंतवणूकीची अपेक्षा असते. सार्वजनिक प्रकल्पातील गुंतवणूकीमुळे आर्थिक वृध्दी साध्य करणे, राष्ट्रीय सुरक्षा करणे व सुरक्षित जीवन निर्माण करणे शक्य होते. अशा प्रकल्पातील गुंतवणूक करत असताना काही नियम.पाळणे आवश्यक असते त्याद्वारे अपव्यय टाळला जातो. सार्वजनिक प्रकल्पातील गुंतवणूकीचा मूळ उद्देश हा नफा निर्मिती नसतो. त्यामुळे खालील नियम पाळणे आवश्यक असते.

१) **वृद्धी :- महत्तमीकरण निकष** - (Growth Maximization Criterian)

विविध प्रकल्पासाठी गुंतवणूकीचे विविध निकष सांगीतले जातात. त्यातील सर्वच प्रकल्पांना लागू होणारा निकष म्हणजे वृद्धी महत्तसमीकरण होय. मात्र वृद्धी साध्य करण्यासाठी किंमत पातळी स्थिर असणे आवश्यक असते. त्याचबरोबरच उत्पन्नांचे पुर्नविभाजन महत्त्वाचे असते. जेणे करून वृद्धांचे फायदे गरीब लोकांना मिळतीला सार्वजनिक गुंतवणूक अशाच प्रकल्पामध्ये केले जातफे ज्यांचा परिपूर्ती कालावधी जास्त असतो व त्यातून तात्काळ उत्पन्न निर्माण घेत नाही प्रकल्प पूर्तता कालावधी जास्त राहील्यामुळे खर्च वाढतो व त्याचा भाववाढीवरही परिणाम घेतो.

२. **भांडवल** - उत्पादन निकष (Capital Output Criterian)

आर्थिक अभ्यासामध्ये भांडवल उत्पादन प्रमाणात अत्यंत महत्वाचे स्थान आहे. वाढीव व भांडवल उत्पादन प्रमाण हे याचे मोजकाच भूतकाळातील अर्थीक अनुभवानुसार काढले जाते त्याचे सूत्र खालील प्रमाणे आहे.

$$Cr = \frac{I_1 - I_0}{Q_1 - Q_1} = \frac{\Delta I}{\Delta Q}$$

Cr = Incrential Capital Output ratio

$I_1 - I_0$ = Investment made in period 1 and 0

$Q_1 - Q_1$ = Output Quantity in period 1 and 0

$\Delta$ I = Increment in Investment

$\Delta$ Q = Increment in Output

अर्थव्यवस्थेमध्ये क्षेत्रवार भांडवल- उत्पादन प्रमाण काढले जाते व प्रकल्पा- हे प्रमाण काढले जाते.

३) **राष्ट्रीय उत्पादन चाचणी निकष** - (National Product Test Criterian)

हा निकष जे - यांनी सुचविला त्यानी प्रकल्पाचे प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष मापन छाया किंमतीद्वारे करण्याचे मांडले उत्पादन व उपभोगाचा संधी खर्च हा अर्थव्यवस्थेत मोजला जात नाही. बाजार अर्थव्यवस्थेमध्ये आरोग्य, शिक्षण व पर्यावरण दर्जा याबद्दल बाजार किंमत मोजमापासाठी आकारल्या जात नाही. बाजार किंमती द्वारे संधी खर्च प्रदर्शित घेत नाहीत टिंबरजेन यानी. प्रकल्पचा प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष परिणाम असा फरक केला आहे. प्रत्यक्ष परिणामा म्हणजे एकूण राष्ट्रीय उत्पन्नातील बदल परिणाम म्हणजे उत्पादनामध्ये होणारे बदल होय. अप्रत्याक्ष परिणाम म्हणजे उत्पादनामध्ये होणारे बदल होय.

४) **सामाजिक सिमांत उत्पादनता निकष :-** (Social Marginal Productivity Criterian)

हा निकष के. ई. कार्न्ट यांनी मांडला.या सिद्धातांचा अनुभवजन्य अभ्यास हा एच.बी. चेनेरी यानी केला. चेनेरी यांच्या मते, राष्ट्रीय उत्पादनाचे मुख्य वाढविण्यासाठी संसाधनाचे कार्यक्षम वाटप येथे आवश्यक असते. संसाधनाच्या पर्याप्त वाटपासाठी भांडवलाची सामाजिक सिमांत उत्पादकता ही इतर वापराच्या समान झाली पाहिजे. संसाधनाचे कार्यक्षम वाटप हे सिमांत खर्च व किमंतीमध्ये समानता आण्यासाठी फायदेशीर असते. आणि

हे फक्त पूर्ण स्पर्धा बाजारातच शक्य असते. विकसित देशामध्ये सिमांत उत्पादकता जास्त महत्वाची नसते. कार्यक्षमततेच  मापन विकसनशील देशामध्ये महत्वाचे असते कारण असमानता असणाऱ्या अर्थव्यवस्थेमध्ये हे एक मार्गदर्शक ठरते. सार्वजनिक प्रकल्पाचा क्रमवारवी ही सामाजिक सिमांत उत्पादनतेवरून लावली जाते. सामाजिक सिमांत उत्पादनता जास्त असणाऱ्या प्रकल्पानांचा प्राधान्य दिले जाते. चेनेरी यानी प्रकल्पाच्या क्रमवारी ठरविण्यासाठी खालील सुत्र दिले.

**सामाजिक सिमांत उत्पादकता** $= \dfrac{V + V1 - (M + L + O + D)}{\Delta I}$

$\Delta I$ = गुंतवणूकीतील वाढ

V = उत्पादनाचे मुल्य

V1 = बाह्य अर्थव्यवस्थेचे मूल्य

M = कच्चा मााचा खर्च

L = श्रम

O = वरकड

D = घसारा

V + V1 = फायदा

M + L + O + D = खर्च

$$SMP = \frac{B - C}{\Delta I}$$

B = V + V1

C = M + L + O + D

**सामाजिक सिमांत उत्पादकता निकषांच्या मर्यादा :–**

१) हा निकष स्थानिक (Static) स्वरूपाचा आहे. त्यामुळे हा विकसनशील देशाना लागू करता येत नाही.

२) सिमांत उत्पादकता ही तंतोतत समान नसते. कारण गुंतवणूक व खूप मोठी किंवा खूप लहान प्रमाणात असू शकते.

३) यामध्ये चालू गुंतवणूकीचे भविष्यातील उत्पन्न वृद्धीवर होणारे परिणाम विचारात घेतले जात नाहीत.

४) यामध्ये उत्पादन घटकाच्या दर्जा व स्वरूपात होणारे बदल विचारात घेतले जात नाहीत.

५) यामध्ये विकासाचा वितरण संकल्पनाकडे दुर्लक्ष केलेले आहे.

६) याद्वारे उत्पादनाला महत्तम वाढ करता येते मात्र त्याचे भविष्यातील परिणाम अभ्यासता येत नाहीत.

७) हारवे लायबेनस्टाइन मते या म्हणजे विकसनशील देशाच्या आर्थिक विकासाबद्दलचे विवेचन नाही.

५) **पुर्नगुंतवणूक निकष** – हा निकष गॅलेसन व हॉर्वे लायबेनस्टाइन यांनी मांडला. यामध्ये कमी विकसीत देशातील गुंतवणूक वाटपाच्या समस्यांचा अभ्यास केलेला आहे. यास प्रवेग वृद्धी निकष() म्हणूनही ओळखले जाते. लायबेनस्टाइन यांच्या मते कमी विकसीत देशांनी सिमांत समाजिक उत्पादकता निकषासाठी असे उदयोग व प्रकल्प निवडले पाहीजेत की त्याच्यामध्ये भांडवल –श्रम प्रमाण कमी असावे. कमी विकसीत देशामध्ये सिमांत उपभोग प्राप्ती जास्त असते. यामुळे ज्यांना नफा मिळतो तेच गुंतवणूक करतात. बचती शिवाय भांडवल उभारणी करता येत नाही. लायबेनस्टाइन यांच्या मते नफा वाढविण्यासाठी असे सार्वजनिक प्रत्यक्ष निवडावेत. ज्यामध्ये भांडवल श्रम प्रमाण जास्त असेल त्यामुळे त्यांनी भांडवलाच्या पुर्नगुंतवणूकीस महत्त्व दिले.

त्यांनी खालील सूत्र दिले आहे.

$$T = \frac{P - eW}{C}$$

P = Output per machine

e = Number of Workders per machine

W = Real wage rate

C = Cost per machine

P - eW = Net Productivity per machine

यामध्ये सर्व नफा पुर्नगुंतवणूक केला जातो व सर्व वेतन उपभोगावर खर्च केले जाते असे गृहित धरले आहे. यामुळे वरील सूत्रामध्ये हे नफा दर दर्शवते, व गुंतवणूक सहगुणक आहे. लायबेनस्टाइन यांनी विकसनशील देशांनी सुध्दा भांडवलप्रधान तंत्राचा अवलंब करावा असे म्हटले.

६) **रोजगार शोषण नियम** (Employment Absorpiton Criterian) – इनस्टॉन या अर्थतज्ञाने रोजगार महत्तमीकरणाचा विचार मांडला. यांच्या मते उच्च श्रमप्रधान तंत्राचा वापर केला पाहीजे. विकसनशील देशाच्या चालू उपभोगाची गरज मोठ्या प्रमाणात असते. यामुळे पुर्नगुंतवणूक व बचत कमी असते. यांच्या मते विकसनशील देशात भांडवल दुर्मिळ असते व श्रम विपूल असते. यासाठी श्रमप्रधान तंत्राचा वापर जास्त करावा व यातून मोठ्या प्रमाणावर उत्पादक वाढते व रोजगार निर्माण होतो. या अर्थव्यवस्थेमध्ये भांडवल गुंतवणूक उत्पादनात वाढ होवू शकते. यातून श्रम सामावून घेण्याचा दर वाढतो.

७) **व्यवहारातील नियम** – (Balance of Payment Criterian) गुंतवणूक प्रकल्पावर व्यवहाराचे परिणाम मोठ्या प्रमाणावर होत असतात. विकसनशील देशामध्ये विदेशी चलन हे कर्ज प्रमाणात उपलब्ध असते. यातून व्यवहारातील समस्या निर्माण होतात. या देशांना कच्या मालाची आयात यंत्रसामग्री व तंत्रज्ञान मोठ्या प्रमाणावर आवश्यक असते व ते आयात करावे लागते. त्यामुळे प्रकल्प निवडताना असे प्रकल्प निवडले पाहिजे, ज्यामध्ये कमीत कमी विदेशी चलन लागेल. या देशांनी निर्यातक्षमता जास्त असलेले व आयात पर्यायीकरण करू शकणारे प्रकल्प निवडावेत.

वरील विश्लेषणावरून प्रकल्प बाबतचे विविध नियम आपण विचारात घेतले. मात्र व्यवहारात वापर करत असताना काय प्रश्न निर्माण होतात. सर्वात महत्वाचा व अवघड भाग असा की प्रकल्पाचे चालू व भविष्यकालीन लाभ मोजमाप करणे अशक्य असते. बाजार किंमती या गुंतवणूक करण्यासाठी मार्गदर्शक ठरू शकत नाहीत. कारण विकसनशील देशात बेरोजगार कमी व्याज दर कृत्रिमता इ. मुळे मागणी पुरवठ्यावर बंधने येतात. वरील सर्व नियमावर टिका केल्या असल्या तरी त्याचा वापर गुंतवणूक निर्माण होत असताना केला जातो.

### ३.४.१ **प्रकल्प मुल्यमापन :** (Project Evaluation)

प्रकल्प मुल्यमापन ही एक सुक्ष्म नियोजन पध्दती आहे. यातून प्रकल्पाची सामाजिक उपयुक्तता समजून येते. यामध्ये प्रत्येक गुंतवणूकीचे लाभ व खर्च मुल्यांकन केले जाते. यामध्ये कार्यक्षमता, तांत्रिकता, आर्थिकता, वित्तीयता व व्यवस्थापन इ. च्या आधारांवर मुल्यमापन केले जाते. याद्वारे प्रकल्प क्षेत्रातील जनतेवर कोणते परिणाम होतात हे स्पष्ट होते. लोकांच्या सामाजिक व आर्थिक स्थितीवर कोणते परिणाम होतात तेही समजते. हायमन यांच्या मते प्रकल्प मुल्यमापन म्हणजे एका नियोजित सामाजिक क्रियेची परिणाम तथ्य ---- समजून घेणे होय.

भारतीय नियोजन आयोगाचे मुल्यांकन महत्वाचे मानले. याद्वारे परतावी दराचा आढावा घेता येतो.

विकसनशील देशासाठी प्रकल्प मूल्यमापन तंत्र का आवश्यक आहे?

१) विकसनशील देशामध्ये प्रत्यक्ष बाजार किंमत हा खऱ्या सामाजिक खर्च व लाभाचा अत्यंत चूकीचा प्रदर्शक आहे. याचे घटक खालील प्रमाणे आहेत.

अ) विकसनशील अर्थव्यवस्थेतील भाववाढ

ब) विकसनशील देशातील चला मुल्य वृद्धी

क) वेतन हे सिमांत उत्पादकते बरोबर नसतात

ड) अस्पर्धात्मक भांडवल बाजार

इ) निर्यात मागणी अलवचिकता

ई) संरक्षणात्मक व्यापार धोरण

फ) बाजाराधिष्टीत अर्थव्यवस्थेचा अभाव

२) विकसनशील देश हे संसाधनाच्या दुर्मिळतेचा सामना करता यामध्ये भौतीक व मानवी संसाधनाचा समावेश घेतो या संसाधनाचा पर्याप्त प्रमाणात वापर व वि-- वापर करणे आवश्यक असते

३) विकसनशील देशासाठी सामाजिक खर्चलाभ निकष हा अत्यंत महत्वाचा असतो.

**प्रकल्प मुल्यमापनाच्या पायऱ्या (**Stages of Project Evaluation)

प्रकल्प मुल्यमापन ही बहु टप्पे.. आहे.

१) तंत्रज्ञानाचा स्पष्टता व आर्थिक वैशिष्ट्ये

२) प्रकल्पाना अर्थव्यवस्थेवरील उभारणी काळातील व चालू काळातील परिणाम

३) प्रकल्पाच्या परिणामाचे मूल्यमापन (प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष)

४) प्रकल्पनासाठीचे निकष निश्चीती.

**सार्वजनिक प्रकल्पाचे स्वरूप** (Nature of Public Project)

सार्वजनिक प्रकल्पास सरकारद्वारे निधी पुरविला जातो. हा प्रकल्प जनतेच्या फायद्यासाठी निवडला जातो. प्रकल्पासाठी प्रत्यक्ष व अप्रत्यक्षरीत्या किमंत वसूल केली जाते ती कराद्वारे किंवा वापर फी द्वारे वसूल केली जाते.

सार्वजनिक प्रकल्प खालील प्रमाणे वर्गीकरण केले जातात.

| गट | प्रकल्प |
|---|---|
| संरक्षण – | सैन्य साधने, यंत्रे व व्यवस्था |
| शिक्षण – | शाळा महाविद्यालये व विद्यार्थी |
| परिवहन – | हायवे – (महामार्ग) |
| उपयोगीत – | वीज, गॅस, टेलिफोन |
| संशोधन – | शेती, आरोग्य, अवकाश |

काही सार्वजनिक प्रकल्प उदा, -- व ग्रंथालये यांना एकमेव उद्दिष्टय असते. मात्र इतर प्रकल्पांना अनेक उद्दिष्टये असतात. यांना बहुपयोगी प्रकल्प असेही म्हणतात. उदा. रस्ते सरकारद्वारे ग्रामीण भागात तयार केले जात याद्वारे वाहतूक घेते व त्याचबरोबर त्या भागाचा आर्थिक विकास होतो यातून नविन दवाखाने, केंद्रे, कार्यालये, इमारती इ. तयार होतात. याचबरोबर त्या संबंधीत सेवा उद्योगही तयार होतात.

प्रकल्पाचे मुल्यमापन करत असताना नियोजनकारानी प्रकल्पापासून मिळणारे सर्व प्रकारचे लाभ विचारात घेतले पाहीजेत.

**प्रकल्प मुल्यमापनाचे मूलतत्वे –** (Fundamentels of Project)

प्रकल्प मुल्यमापनाचा प्रश्न हा उपभोक्ता संतोषाधीक्याशी असतो. उपभोक्ता संतोषाधीक्य / Consumer Surplus उपभोक्ता त्याची खरेदी त्या बिंदूपर्यत करतोफ ज्या बिंदूच्या ठिकाणी सिमांत मूल्य हे सिमांत खर्चाबरोबर असते. तो सदैव उपभोक्ता संतोषाधीक्य मिळविण्याचा प्रयत्न करतो.

**३.४.२ सार्वजनिक खर्च–लाभ विश्लेषण** (Social Cost Benefit Analysis)

बाजाराधिष्टीत अर्थव्यवस्थेमध्ये संसाधनाची वाटणी ही त्याच्या मागणी व पुरवठ्याच्या – घेते.किंमत हा एक संकेताद्वारे ग्राहकांची इच्छा व पुरवठा खर्च, यामध्ये संतुलन साधले जाते. बाजार संकेत ही वस्तूसाठी अस्तीत्वात नसताता उदा. रस्ते, पुल विमानतळ बाग, शिक्षण आरोग्य सेवा गृहसेवा इ. कारण या वस्तू सरकारद्वारे पुरविल्या जातात. यामधील बाह्यता ह्या मोठ्या प्रमाणावर असतात. काही वेळा निश्चित बाजार संकेत अस्तित्वात नसल्यामुळे अशावेळी प्रकल्पाची फायदेशीर रचना व्यक्तीगत राजकीय बाबीद्वारे ठरविला जातो.

संसाधनाच्या वाटणीतील आर्थिक कार्यक्षमता ही व्यक्ती न राहताती वस्तुनिष्ठ असली पाहीजे. सार्वजनिक क्षेत्रामध्ये संसाधनाची वाटणी करत असताना. राजकीय व्यक्तीगत हिताचा वापर केला जातो. मात्र मुळ उद्देश हा खर्च लाभ हा असला पाहिजे. खर्च लाभ तत्वाद्वारे सार्वजनिक क्षेत्रामध्ये संसाधनाची योग्य वाटणी करण्यास मदत होते. सरकारी क्षेत्रातील गुंतवणूक प्रकल्पानांचे मुल्यमापन करण्यासाठी खर्च - लाभ विश्लेषण हे एक अत्यंत महत्वाचे तंत्र आहे. भारतासारख्या विकसनशील देशामध्ये जेथे मानवी व भैतिक संसाधनाची कमतरता आहे अशा देशामध्ये प्रकल्प मुल्यमापन अत्यंत महत्त्वाचे ठरते. व संसाधने पर्याप्त प्रमाणात व विवेकी पणा ने वापरण्यास मदत होते.

**खर्च - लाभ विश्लेषणाचा अर्थ-** (Meaning of Cost Benefit Analysis)

सरकारच्या सार्वजनिक प्रकल्पाचा फायदेशीरपण प्रकल्पाद्वारे मिळणारे विशिष्ट मुदतीतील लाभ व त्याचबरोबर पूर्ण गुंतवणूक काळातील आर्थिक लाभ- इ.चा अभ्यास खर्च लाभ विश्लेषणामध्ये केला जातो. यामध्ये सर्व प्रकारचे खर्च व लाभ विचारात घेतले जातात. यामध्ये प्रत्यक्ष खर्च व अप्रत्यक्ष खर्च व त्याचबरोबर प्रत्यक्ष लाभ व अप्रत्यक्ष लाभ ही विचारात घेतले जातात.

**खर्च लाभ विश्लेषणाचे स्वरूप** : Nature of Cost Benefit Analysis

निर्णय प- ते जातीची वस्तुनिष्ठता आपल्यासाठी खर्च लाभ तंत्राची निवड केली जाते. यामध्ये एखाद्या विशिष्ट प्रकल्पाचे सर्व खर्च व लाभ विचारात घेतले जातात ते पैसा स्वरूपातही विचारात घेतले जातात. याद्वारे खर्च व लाभ यांचे एकत्रीकरण करता येत. एखादा नविन रस्ता बांधताना आपण खालील प्रमाणे विचारात घेतो. यामध्ये रस्ता बांधणी करत असताना खर्चामध्ये आपण बांधकाम खर्च, देखभाल खर्च, -ध्वनी पातळी प्रदुषण गर्दी, अपघात राज्याला इ.चा समावेश केला जातो लाभाचे मोजमाप करताना वेळेचा बचत, इंधन बचत, गर्दीची कमी. कमी अपघात चालविण्याचा आनंद इ.चा विचार करतो.

**खर्च लाभ विश्लेषणातील घटक :-** Elements in a Cost Benefit Analysis

**१) उद्दिष्टये -** विशिष्ट प्रकल्पाचे उद्दिष्ट्ये निश्चीत केलेली असतात. यामध्ये समाजाचे महत्तम राज्य कल्याण हा मूल्य उद्देश असतो. एखाद्या सिंचन प्रकल्पाचा उद्देश हा जास्तीत जात निश्चीत अशी जमीन सिंचनाखाली आणणे हा असतो. काही प्रकल्पाना बहु उद्दीष्ट्ये असतात. उदा. धरण बांधत असताना, पूरनियंत्रण सिंचन दळणवळण मनोरंजन इ. उद्दिष्ट्ये असतात सर्वसाधारणपणे उत्पन्न पुर्नवितरण दारिद्रय निमुलन प्रादेशिक विकासव विभागीय स्वयं निर्भरता इ. उद्दिष्टये असतात.

**विधान पंचायत -** Statement of Alternatives

उद्दिष्ट्ये साध्य करण्यासाठी अनेक पर्यायी प्रकार उपलब्ध असतात. उदा. एक मोठी धरणे किंवा अनेक लहान धरणे बांधकामाच्या विविध पद्धती अवलंबल्या जातात. पर्यायाचा खर्च व लाभ याचाही विचार यामध्ये केला जातो.

**लाभाचे विश्लेषण :-** Analysis of Benefits

यामध्ये अनेक लाभ मोजमाप केले जातात. कोणते लाभ महत्वाचे याचा विचार केला जातो. यामध्ये

प्रत्यक्ष लाभ व अप्रत्यक्ष लाभ असतात. प्रत्यक्ष लाभ हे थेट स्वरूपाचे असतात. ते वापर कार्यास मिळतात. अप्रत्यक्ष लाभास बाह्यता म्हटले जाते.

**खर्च लाभ विश्लेषणाच्या मर्यादा :-** Limitations of Cost Benefit Analysis

१) खर्च लाभ विश्लेषण हे सरकारचा विकासात्मक खर्चापेक्षा समस्या सोडवू शकत नाही.

२) याचा उपयोग फक्त मोठ्या प्रकल्पाचे मुल्यमापन करण्यासाठी घेतो.

३) याद्वारे सार्वजनिक वस्तूची पर्याप्त पुरवठा समस्या सोडविण्यासाठी याचा उपयोग येत नाही

४) देशाच्या दृष्टीने महत्वाच्या प्रकल्पासाठी याचा उपयोग होवू शकत नाही उदा. संरक्षण

५) काही अनिश्चीतता असतात त्या सोडवण्यासाठी या विश्लेषणाचा उपयोग होत नाही.

६) सामाजिक कल्याण फलनासाठी याचा उपभोग होत नाही.

**खर्च लाभ विश्लेषणाचे गुण :** ( Merits of Cost Benefit Analysis)

१) समान स्वस्थ व उद्दिष्ट्ये असलेल्या अनेक प्रकल्पाचे मूल्यमापन करण्यासाठी उपयुक्त

२) खर्च लाभ विश्लेषणाचा उपयोग ज्या ठिकाणी अनेक उद्दीष्ट्ये आहेत अशा ठिकाणीही होते पर्यायी खर्चाबद्दल याद्वारे मार्गदर्शन घेते

३) पर्यायी कार्यक्रमाचे विभाजनविषयक परिणाम मोजण्यासाठी खर्च लाभ विश्लेषणाचा वापर होतो.

४) ज्या प्रकल्पामध्ये उद्दिष्टये स्पष्ट आहेत व लाभ व खर्च मोजता येणारे आहेत अशा ठिकाणी हे विश्लेषण अत्यंत उपयुक्त ठरते.

खर्च लाभ विश्लेषण हे एक विवेकी तंत्र आहे. याचा उपभोग करून प्रकल्पाची व्यवहा- फायदेशीरपणा मोजता येतो मात्र पुर्णत: या तत्वावर अवलंबून राहता येत नाही.

**३.५ सार्वजनिक अंदाजपत्रक :-** Public Budget

अंदाज पत्रक (Budget) या शब्दाचा उत्पती फ्रेंच भाषेतील (Bougette) या शब्दापासून झालेली असून यास लहान पिशवी (Small bag) म्हणून ओळखले जाते. या पिशवीमध्ये वित्तीय प्रस्ताव असतात. लोकांची अंदाजपत्रकाबद्दल कमालीची उत्सुकता असलेली दिसून येते. वार्षिक अंदाजपत्रकात देशाचे वित्तमंत्री अनेक आर्थिक तरतूदी मांडतात. आधुनिक लोकशाही देशामध्ये अंदाजपत्रक हे सार्वजनिक अर्थव्यवस्थेची - म्हणून ही ओळखले जाते. सरकार ही अर्थव्यवस्थेतील विशेष व प्रशासकीय संस्था असते.

**व्याख्या :-**

प्रा. डिकॉक व डिनॉल यांच्या मते,

" A budget is a balanced estimate of expenditure and receipts of a given period of time. In the hands of administration the budget is a record of past performane a method of current control and a project of Entrance Plans."

**अंदाज पत्रकाची संकल्पना :-** (Concept of Budget)

अंदाजपत्रक हे सरकारचे वित्तीय नियोजन असते यामध्ये अंदाजपत्रक कालावधीत अंदाजीत खर्च महसुलाचे मोजमाप असते. प्रा. बेस्टबेल यांच्या मते " The budget has come to mean the financial arrangement of a give period with the visual implication that they have been submitted to the legislature for approval.

दियर्ड गोडे यांच्या मते," A government budget is a financial plan covering outlays and receipts of the government."

**अंदाजपत्रकाची वैशिष्ट्ये** : (Characteristics of Budget)

१) अंदाज पत्रकाचे सरकारच्या राजकोषीय धोरणाचा व कार्यक्रमाची मागील वर्षातील कामगिरीचा आढावा घेतला जातो. यावरून मागील वर्षी काय साध्य झाले काय करावयास हवे येते व काम केले पाहीजे इ. बाबी बद्दल विशेष माहीती मिळते.

२) अंदाजपत्रकामध्ये देशाच्या कोषागाराची स्थिती व देशाची चालू आर्थिक स्थिती यांचा समावेश केला. पाहीजे याद्वारे देशातील जनतेला अंदाजपत्रकाचे वस्तुनिष्ठ मुल्यमापन करता येते.

३) जे अंदाजपत्रकीय प्रस्ताव आहेत ते स्पष्ट असले पाहिजेत.

४) आर्थिक उद्दिष्ट साध्य करण्यासाठी अपेक्षित महसुल व खर्च हे सकारात्मक योगदान देणारे असले पाहिजेत

५) अंदाजपत्रक हे एक विशिष्ट वर्षासाठी असले पाहीजे.

**अंदाजपत्रकाचा उद्देश :-** (Significant of Public Budgetting)

१) अंदाजपत्रकाद्वारे धोरणाची निश्चिती केली जाते. उद्दिष्टये साध्य करण्यासाठी वृत्ती कार्यक्रम आखावा लागतो. उद्दिष्ट्ये स्पर्धात्मक असू शकतात.

**२)** अंदाजपत्रक म्हणजे धोरणाची अमंलबजावणी होय. अंदाजपत्रक हे व्यवस्थापनासाठी मार्गदर्शक असते. अंदाजपत्रक प्रशासकीय नियंत्रणाचे साधा असते.

३) अंदाज पत्रक हे एक कायदेशीर नियंत्रण आहे.

४) अंदाजपत्रकीय प्रस्ताव हा लोकांच्या माहीतीचा स्त्रोत असतो.

**सार्वजनिक अंदाजपत्रकाचे महत्व :-**

अर्थव्यवस्थेच्या कार्यावर सरकारच्या अंदाज पत्रकीय कार्यक्रमाचा महत्त्वाचा परिणाम होतो. ज्या अर्थव्यवस्थामध्ये कल्याणकारी राज्य व आर्थिक नियोजनाचा अवंलब केला जातो त्यामध्ये सार्वजनिक खर्च मोठ्या प्रमाणावर वाढत असल्याचे दिसते. यातून सरकार ही एक अत्यंत महत्त्वाची संस्था बनते या अर्थव्यवस्थामध्ये सरकारकडून कराद्वारे खूप मोठा महसूल जमा केला जातो त्याचबरोबर कर्ज ही घेतले जातो. त्याचबरोबर कर्जही घेतले जाते याचा परिणाम अर्थव्यवस्थेतील बचत व गुंतवणूकीवर होतो त्यातून उत्पन्न विभाजन बदलते. याचा

परिणाम संसाधनाच्या वाटणीवर होवून उपयोग वर्तणूक बदलते. अंदाजपत्रकाद्वारे व त्याचशा बाबीवर उपाय शोधला जातो. सार्वजनिक धोरणे निश्‍चितीसाठी अंदाजपत्रक अत्यंत महत्वाचे ठरते. अंदाजपत्रकामध्ये राजकोषीय धोरणे व वित्तीय धोरणे या दोघेचाही समावेश होतो.

सरकार आपले उत्पन्न व खर्च यामध्ये संतुलन साध्य करण्याचा प्रयत्न करत असते. खर्चावर नियंत्रण ठेवणे अत्यंत आवश्यक असते. हे न केल्यास, भ्रष्टाचार व अकार्यक्षमता वाढू शकते.

### ३.५.१ अंदाज पत्रकाचे वर्गीकरण :

सरकारला सरकारी महसूलाची सांगड सार्वजनिक खर्चाशी घालावी लागत असते. काहीवेळा सार्वजनिक खर्चावर निमंत्रणे घालावी लागतात. संघीय सरकाराद्वारे कोणत्याही एका प्रकारचे अंदाजपत्रक वाटण्यात आलेले नाही. .....द्वारे सर्वच गरजा पूर्ण करता येतील.

**कार्यकारी व कायदेविषयक अंदाजपत्रक : Executive and Legislative budget -**

**१)** कार्यकारी अंदाजपत्रक हे मुख्य कार्यकारी अधिकाऱ्याकडून बनवले जाते. हे कायदेमंडळापुढे सादर केले जाते व कायद्यात रूपांतर केले जाते. कायदेविषयक अंदाजपत्रक हे कायदेविषयक तज्ञ यांच्याद्वारे तयार केले जाते व ते स्वीकारले जाते. कार्यकारी अंदाजपत्रक बद्दल खालील तीन बाबी महत्त्वाच्या आहेत.

१) अंदाजपत्रातून येणाऱ्या निकालाबाबत मुख्य कार्यकारी अधिकारी असते.

२) तो सर्वसाधारण सरकारी धोरणाची शिफारस करतो.

३) सरकारच्या विविध विभागातील कार्यकारी विभागाद्वारे मोठ्या प्रमाणात खर्च केला जाते.

यावरून कार्यकारी अंदाजपत्रक हे महसुली, जमा व खर्चाबद्दलचे जास्त सक्षम व कार्यक्षम अंदाज वर्तविले जातात.

**२) परंपरागत अंदाजपत्रक व रोख अंदाजपत्रक : Conventional Budget & Cash Budget**

या बद्दलचे फरक अमेरिकेमध्ये स्पष्ट केलेले आहे. परंपरागत अंदाजपत्रकास प्रशासकीय अंदाजपत्रक म्हणून व ओळखले जाते. सरकारी कार्यक्षमता वित्तपुरवठा करताना सरकारने केंद्राद्वारे जमा केलेला महसूल कोषागारातील सर्वसाधारण निधी मध्ये जमा केला जातो व त्यातून खर्च केला जातो. यास परंपरागत अंदाजपत्रक म्हणतात.

रोख अंदाजपत्रकामध्ये विश्‍वस्त निधी महसुल व खर्च एकाच विधाना मध्ये नोंदविलेले असतात. याची जुळवाजुळव लोक व सरकार यांच्यामध्ये होणाऱ्या वास्तव रोख व्यवहारातून केली जाते. याद्वारे अर्थव्यवस्थेतील निधी प्रवाहाबाबतीत महसूल व खर्च याबाबतीत सरकारची भूमिका तंतोतपणे समजून येते.

**३) बहुविध व एकसंघ अंदाजपत्रक : Multiple and Unified Budget**

१९६८ पूर्वी अमेरिकांमध्ये अंदाजपत्रक हे विविध भागामध्ये विभागले जायचे यास बहुविध अंदाजपत्रक म्हटले जायचे याद्वारे प्रत्येक कार्याबद्दल वित्तीय नियंत्रण व कार्यक्षमता साध्य केली जायची. या अंदाजपत्रकाची शिफारस युद्धजन्य परिस्थितीत व इतर आणीबाणी परिस्थितीत केली जात असे. युद्ध आणिबाणी व मंदीच्या परिस्थितीतीत एक सर्वसाधारण अंदाजपत्रक हे सर्वसाधारण कार्यासाठी व आणीबाणी अंदाजपत्रक हे अल्पकाळासाठी

तयार केले जात असे. १९६९ च्या वर्षापासून अमेरिकेन प्रशासनाने एक संघ अंदाजपत्रक अवलंबयास सुरूवात केली. बहुविध अंदाजपत्रक हे विविध कार्यासाठी अमलबजावणी केले जात असे मात्र त्यातून अंदाजपत्रकाचे मुल्यमापन अवघड झाले. यामुळे एकसंघ अंदाजपत्रकाच्या वापरास सुरूवात केली. यामुळे राजकोषीय नियंत्रण सुलभ झाले. व नियोजन शक्य झाले.

**४) सर्वसाधारण व आणि बाणी अंदाजपत्रक : Ordinary and Emergency Budget**

१९३३ मध्ये अमेरिकेतील संघीय सरकारने सर्वसाधारण व आणीबाणी अंदाजपत्रकाचा अवलंब केला. सर्वसाधारण अंदाजपत्रकाद्वारे अर्थव्यवस्थेत स्थायी स्वरूपाच्या कार्यावर भर देण्यात आला व आणीबाणी अंदाजपत्रकाद्वारे युद्ध, मंदी इ.च्या बाबतीत कार्यावर भर देण्यात आला.

**५) संघीय, राज्य व व्यक्ति अंदाजपत्रक :**

संघीय व राज्य सरकारची अंदाजपत्रक हे कार्यकारी अधिकाऱ्याकडून तयार केले जाते. याची अमलबजावणी त्यांच्यावरच अवलंबून असे. मोठ्या आकाराच्या स्थानिक संस्थामध्येही याच प्रमाणे प्रक्रिया राबविली जाते. लहान आकाराच्या संस्थामध्ये मात्र नागरी मंडळ व कायदेविषयक मंडळ अंदाजपत्रक तयार करते व अमलबजावणी करतो. ही स्थानिक पातळीवर जास्त गुंतागुंतीचे नसते.

**६) तूट, अधिक्य व संतुलित अंदाजपत्रक :**

जेव्हा सार्वजनिक अंदाजपत्रक सार्वजनिक खर्चापेक्षा कमी असतो तेव्हा त्यास तुटीचे अंदाजपत्रक म्हणतात. जेव्हा महसूल खर्चापेक्षा जास्त असतो तेव्हा अधिक्याचे अंदाजपत्रक म्हणतात व जेव्हा महसूल व खर्च एकमेकाबरोबर असतात तेव्हा संतुलीत अंदाजपत्रक म्हणतात.

**७) महसुली व भांडवली अंदाजपत्रक :**

जगातील अनेक देशामध्ये अंदाजपत्रकाचे वर्गीकरण महसूली खाते व भांडवली खाते यामध्ये केले जाते. महसुली खात्यामध्ये आवर्ती (Recurring) स्वरूपाचे सर्व व्यवहारा मोजले जातात. तर भांडवली खात्यामध्ये अनावर्ती (Non-Recurring) स्वरूपाच्या सर्व व्यवहाराचा सर्व व्यवहाराचा समावेश येतो.

**८) विकासात्मक व विकासेत्तर अंदाजपत्रक :**

(Developmental and Non Developmental Budget)

हे वर्गीकरण भारतीय रिझर्व्ह बँकेने केलेले आहे. यामध्ये सरकार ही सामाजिक व आर्थिक विकासासाठी कार्य करणारी संस्था आहे हे स्पष्ट केलेले आहे. सरकारद्वारे विविध विकासात्मक कार्यक्रम तयार केले जातात. ते भांडवली खात्यावरील किंवा महसूली खात्यावरील असतात. महसुली अंदाजपत्रकामध्ये शिक्षण संशोधन आरोग्य व सार्वजनिक आरोग्य, कृषी व इतर सेवा, समुदाय विकास, उद्योग, वाहतूक व दळणवळण इ. यांचा समावेश होत. जर हा खर्च भांडवली साधनासाठी असेल तर त्यास भांडवली अंदाजपत्रक म्हटले जाते. विकासोत्तर (Non Development) खर्चामध्ये व्याज रक्कम, कर संकलन खर्च, प्रशासकीय सेवा, सुरक्षा सेवा संरक्षण सेवा अंतर्गत सुरक्षा सेवा, कर्ज परतफेड इ. चा समावेश होतो.

वरील प्रमाणे अंदाजपत्रकाचे विविध प्रकार आहेत.

### ३.५.२ कामगिरी अंदाजपत्रक व कार्यक्रम अंदाजपत्रक :

(Performance budgeting and Programe Budgeting)

**कामगिरी अंदाजपत्रक :**

परंपरागत अंदाजपत्रकाचा मुख्य भार हा सरकारच्या वित्तीय कामांवर होतो. यामध्ये सुरू केलेले कार्यक्रम त्यांचा खर्च व त्यापासून मिळणारे फायदे विचारात घेतले जात असत, सरकार विविध विभाग व संस्थांकडून माहिती जमा करत असे, मात्र या माहितीची एकमेकांशी सांगड अवघड होते. यातूनच पुढे कामगिरी अंदाजपत्रकाचा उदय झाला. कामगिरी अंदाजपत्रकाचा वापर सर्वप्रथम विविध प्रकारामध्ये १९४० मध्ये अमेरिकेत करण्यात आला. ए. ई. वुल यांनी प्रत्यक्ष व्यवहारातील परंपरागत अंदाजपत्रकापैकी कामगिरी अंदाजपत्रक तयार करावे असे म्हटले. हुवर कमिशन अहवालानंतर अमेरिकन सरकारने कामगिरी अंदाजपत्रक तयार करण्यास १९५१ पासून सुरूवात केली. त्यानंतर जगातील इतर देशांनीही याचा अवलंब केला. भारतामध्ये प्रशासनी सुधारणा कमीशनने कामगिरी अंदाजपत्रक तयार करण्याबाबतीत खालील आधारावर सूचना केल्या.

१. एखाद्या विभागासाठी केल्या जाणाऱ्या खर्चाबाबत उद्दिष्ट्ये व उद्देश याबद्दल जास्त स्पष्ट माहिती मिळते.

२. अंदाजपत्रकाचा चांगला आढावा घेण्यासाठी व ते समजून घेण्यासाठी अत्यंत उपयुक्त.

३. सरकारच्या सर्वच पातळीवर निर्णय प्रक्रिया सुधारणा करण्यासाठी उपयुक्त.

४. व्यवस्थापनाची जबाबदारी वाढविण्यासाठी उपयुक्त.

५. लेखापरिक्षण अहवाल हा जास्त उद्दिष्ट्यपूर्ण व परिणामकारक होण्यासाठी उपयुक्त.

वरील कामगिरी अंदाजपत्रक १९७०-७१ पासून अमलात आणल्याबद्दल समितीने सूचना केल्या. १९७५-७६ या वर्षापासून सरकारचा सर्व मंत्रालये व विभाग यांनी कामगिरी अंदाजपत्रक तयार करण्यास सुरूवात केली. कामगिरी अंदाजपत्रक तयार करण्याच्या मागील मुळ हेतू हा वित्तीय प्रक्रियेत कार्यक्षमता वाढविणे हा होता.

कामगिरी अंदाजपत्रक हा एक तांत्रिक दृष्टिकोन आहे. याद्वारे मिळणाऱ्या माहितीच्या आधारे एखाद्या योजनेवर केल्या गेलेल्या खर्चाचे परिणाम कोणते झाले. याबद्दलची पूर्ण माहिती मिळते. तांत्रिक निर्णय प्रक्रियेमध्ये खर्च लाभ विश्लेषण, परिचालन संशोधन (Operational Research) व पध्दती विश्लेषण इ. चा वापर केला जातो. कामगिरी अंदाजपत्रकामध्ये जास्त भार व कार्ये, कार्यक्रम, क्रिया व प्रकल्प यावर दिला जातो.

**कामगिरी अंदाजपत्रकाचे फायदे :-**

कामगिरी अंदाजपत्रक हे सरकारला व्यवस्थापनासाठी सोयीस्कर साधन आहे. यामध्ये काय साध्य करावयाचे आहे. यावर जास्त भर दिला जातो व प्रशासकाची ही एक प्रकारची चांगली सोय होते. भविष्यकाळात कोणत्या प्रकारचे बदल अपेक्षित आहेत. याची कल्पना यावरून येते. यामध्ये विविध पातळीवरील कामाचा आढावा घेता येतो व निर्णय प्रक्रिया चांगली होते. याद्वारे कायदेविषयक आढावा, नियंत्रण व धोरण निश्चिती प्रक्रिया अधिक सुकर होते. अंदाजपत्रक हे जास्त अर्थपूर्ण बनते. दीर्घकालीन धोरणाचा प्रत्यक्ष फायदा समजून घेता येतो.

**कामगिरी अंदाजपत्रकाच्या मर्यादा :-**

१) जे शासनाचे कार्य वस्तूनिष्टपणे मोजता येत नाहीत अशा ठिकाणी कामगिरी अंदाजपत्रक उपयोग होत नाही. उदा.- कायदा व सुव्यवस्था संरक्षण इ.

२) यामध्ये फक्त संस्थात्मक व वित्तीय मुल्यमापन केले जाते. गुणात्मक मुल्यमापन केले जात नाही.

३) जर विविध विभाग योग्य प्रकारे संघटीत असतील तरच याचा उपयोग होतो.

वरील प्रमाणे कामगिरी अंदाजपत्रक हे अर्थव्यवस्थेमध्ये निर्णय प्रक्रिया प्रभावी ठरविण्यास मदतकारक ठरते.

**कार्यक्रम अंदाजपत्रक :** (Programme Budget)

कार्यक्रम अंदाजपत्रक हे भविष्याबद्दल जास्त योजना आखणारे असते व त्यामध्ये सरकारच्या विविध आर्थिक व जागतिक धोरणाचे प्रक्षेपण असते. कार्यक्रम अंदाजपत्रकामध्ये मुख्य भर व अंदाजपत्रकाच्या वर्गीकरणावर असतो. त्यामध्ये कार्ये, कार्यक्रम व त्याचे उपविभाग यांचा समावेश असतो व वित्तीय आकडेवारी असते. नियोजन कार्यक्रम अंदाजपत्रक पध्दतीचे प्रथम अमेरिकेमध्ये सुरूवात केली गेली. यामध्ये सरकारच्या दीर्घकालीन धोरणे निश्‍चित केली जातात. व त्यातील काही येत्या कालावधीमध्ये कार्यक्रम निश्‍चित केला जातो. यामध्ये चालू काळातील वित्तीय आकडेवारीत जास्त प्रकाश टाकला जात नाही. कार्यक्रमामध्ये आदने व प्रदाने यातील संबंध स्पष्ट केला जातो. व इच्छीत फलश्रूतीसाठी विविध पर्याय उपयोगात आणले जातात. एका विशिष्ट विभागासाठी लागू केली गेली. त्यास कार्यक्रम अंदाजपत्रक म्हणतात व अनेक विभागासाठी लागू केले गेले तर त्यास नियोजित कार्यक्रम अंदाजपत्रक म्हटले जाते. यामध्ये सरकारी संसाधने वापरून उद्दिष्ट पूर्ण करणे हा हेतू असतो.

**कार्यक्रम अंदाजपत्रकाची सूत्रे :**

१. याद्वारे आपल्या अर्थ व्यवस्थेतील आर्थिक प्रश्नाचे मुलभूत स्वरूप कोणते ते समजते. आर्थिक प्रश्न दुर्मिळतेतून निर्माण होतात.

२. यामध्ये फक्त प्रकल्पकाची निवड महत्वाची नसून प्रकल्प कशा पध्दतीत पूर्णत्वास जातो. याकडे जास्त लक्ष वेधले आहे. उद्दिष्टाच्या साध्यतेचे संस्थात्मक मुल्यमापनही महत्वाचे असते.

३. परंपरागत अंदाजपत्रक पध्दतीत स्वयं यंत्रणा अस्तित्वात नसते. यामध्ये ती असते.

४. सरकारी अंदाजपत्रक हे वार्षिक असते. मात्र बरेचसे प्रकल्प हे दीर्घकालीन असतात. यामध्ये अंदाजपत्रकीय तरतूद व दीर्घकालीन धोरणे यामध्ये समन्वय महत्वाचा असतो. ही समस्या कार्यक्रम अंदाजपत्रकामध्ये सुटते.

५. निर्णय प्रक्रियेत समन्वय हा महत्वाचा असतो. तो या कार्यक्रम अंदाजपत्रकाद्वारे साधला जातो.

**कार्यक्रम अंदाजपत्रकाचे टप्पे :**

कामगिरी अंदाजपत्रक व कार्यक्रम अंदाजपत्रक हे एकसारखेच आहेत. मात्र तंतोतत एकसारखे नाही.

१. पहिल्या टप्प्यामध्ये विविध राजकोषीय धोरणे याचे उद्दिष्ट्ये व ध्येय निश्‍चित करणे हे असते. यावर जास्त

भर हा परिणामावर असतो.

२. दुसऱ्या टप्प्यामध्ये प्रकल्प योजना व कार्यक्रम संस्थात्मकदृष्ट्या विश्लेषण केले जातात व यासाठी खर्च लाभ विश्लेषण तंत्र वापरले जाते. यातील जास्त किफायतशीर शक्य पर्याय निवडले जातात. व वित्तीय उद्दिष्ट्ये साध्य करण्याचा प्रयत्न केला जातो.

३. तिसऱ्या टप्प्यामध्ये चालू धोरणे व कार्यक्रम हे भविष्यातील खर्च, लाभ, समस्या व विकास यांच्याशी संबंधीत असतात.

वरील प्रमाणे तीन टप्पे असतात.

**कार्यक्रम अंदाजपत्रकावरील मर्यादा :**

१. कार्यक्रम अंदाजपत्रक हे मुल्य निर्णयावर आधारीत उद्दिष्ट्ये व पसंतीक्रम ठरविण्यात अपयशी ठरले, किंवा पुरेसे नाही.

२. याद्वारे खर्च मोजमापासाठी पुरेशी तंतोतंत माहिती देवू शकत नाही. ही समस्या मोठ्या प्रमाणात संरक्षण प्रकल्पाबद्दल उद्भवते.

३. यामध्ये केंद्रिकरण जास्त प्रमाणावर आहे. यामध्ये नवनिर्मितीस जास्त संधी नाही.

४. यामध्ये निर्णय प्रक्रिया ही आर्थिक कार्यक्षमतेवर आधारीत आहे.

कार्यक्रम अंदाजपत्रकाच्या मर्यादा असल्या तरी. याचा वापर अनेक देश करताना दिसून येतात.

**३.५.३ शून्याधारीत अर्थसंकल्प :** (Zero Base Budgeting)

कोणत्याही अर्थसंकल्पामध्ये दुर्मिळ संसाधनांचा पर्यायी वापर करून विकास साध्य करणे हा असतो. अर्थसंकल्पाची आवश्यकता संसाधने दुर्मिळ असणे ही आहे. विविध सरकारद्वारे अर्थसंकल्प ठरवत असताना विविध पध्दती वापरल्या जातात. अंदाजपंकामध्ये तीन पातळीवरील व्यवस्थापनाचा समावेश असतो.

१) धोरण व्यवस्थापन : यामध्ये गरज ओळखणे, पर्यायांचे विश्लेषण, कार्यक्रमाची निवड व संसाधनांची वाटणी यांचा समावेश होतो.

२) संसाधन व्यवस्थापन : यामध्ये मुलभूत आधार व्यवस्थेची स्थापना, मुलभूत व अंदाजपत्रक संरचनेमध्ये सुधारणा व वित्तीय व्यवस्थापन यांचा समावेश होतो.

३) कार्यक्रम व्यवस्थापन : यामध्ये धोरणांची अंमलबजावणी व त्यासंबंधीत कार्ये, लेखापरिक्षण व मुल्यमापन यांचा समावेश होतो.

शून्याधारीत अंदाजपत्रक हे एक नवनिर्मित तंत्र आहे. यामध्ये खर्चाचा अपव्यय टाळला जातो. ही संकल्पना जूनी संकल्पना आहे. ही संकल्पना प्रथमत: १९२४ मध्ये मांडली. त्यांनी अंदाजपत्रकाचे वार्षिक समर्थन देण आवश्यक आहे असे म्हटले. शून्याधारीत अंदाजपत्रक सर्वप्रथम अमेरिकेतील कृषी विभागात १९६२ मध्ये मांडले. १९७३ मध्ये जिमी कार्टर यांनी अमेरिकेतील जॉर्जीचा या प्रांतात अंमलबजावणी केली. त्यानंतर अमेरिकेतील

अनेक राज्यांचा शून्याधारीत अर्थसंकल्प स्वीकारली. भारतामध्ये १९८७ -८८ मध्ये यांचा वापर केला गेला.

**शुन्याधारीत अर्थसंकल्प संकल्पना :-**

प्रा. आर.के ए. मसग्रेव्ह यांच्या मते " As the Tom suggests the idea is to consider the budget as a whole rather than to examine incremental change only."

**अर्थ संकल्पाची मांडणी मागील वर्षाचा संदर्भ न घेता करणे होय.**

पिटर ए. फार यांच्यामते शुन्याधारीत अर्थसंकल्पामध्ये प्रत्येक व्यवस्थापकाने त्याचे संपूर्ण अर्थसंकल्प हा नव्याने तयार करावयाचे त्याचे समर्थन द्यावयाचे असते व त्यानी एखाद्या विशिष्ट कार्यक्रमावर वित्त विषयक खर्च का करावयाचा याचे समर्थन द्यावे लागते. उदा. आरोग्य विभागाने प्लेन व कॉलरा यासारख्या आजारावर नियंत्रण मिळविण्यासाठी अर्थसंकल्प तयार करत असताना. शून्याधारीत आधारावर काही प्रश्न विचारले जातात. उदा. जर पोलिओ निर्मुलन कार्यक्रमास निधी दिला नाही तर काय होईल? शुन्याधारीत अर्थसंकल्पाच्या आधारे याची उत्तरे दिली जातात. उदा. पोलीओ रूग्णांच्या पालकाची वैद्यकीय व औषधोपचार बिले वाढत जातील. तरूण मुलामध्ये विकृती वाढेल, यामध्ये पोलीओ निर्मुलनाची सामाजिक खर्चाची तुलना ही सामाजिक लाभाबरोबर केली जाते. प्रत्येक विभागाने याबद्दलची समर्थन दिले पाहीजे. या सर्व कार्यक्रमाचे निर्णय पार्सल ((Decision Package) तयार केले जाते व त्याचे मूल्यमापन केले जाते. यामध्ये प्रत्येक विभागाने अंदाजपत्रकीय तरतूद ही तळापासून केलेली असते. व त्याचबरोबर पर्याया कार्यक्रमही सादर केलेले असतात. व त्यातून योग पर्याय निवडून संसाधनाची जुळवणी केली जाते यामध्ये भूतकाळातील यासंबंधीत कोणालाही तरतूदीचा विचार केला जात नाही. व हे एक स्वतंत्र असे अंदाजपत्रक / अर्थसंकल्प मध्ये सादर केले जाते.

**शून्याधारीत अर्थसंकल्पाची वैशिष्ट्ये :-**


१) विविध पातळीवर संसाधने जुळवणीसाठी कामगीरी साठी. कार्यक्रमाचे मूल्यमापन करणे

२) प्रत्येक संस्थेकडून उद्दिष्ट्ये निश्चित करणे

३) प्रत्येक संस्थेत कार्यक्रमपत्रिका ,ही निर्णय पार्सल मध्ये परावर्तीत करणे

४) निर्णय पार्सलचे मूल्यमापन करणे. शून्याधारीत अर्थसंकल्पाची संकल्पना ही कार्यक्षमता वाढविण्यासाठी अमलात आणली जाते. यातून पर्याप्त पातळीवर उद्दिष्ट्ये साध्य करणे हा उद्देश असतो. यामध्ये अस्तित्वातील दूर्मिळ आर्थिक संसाधानाचे पुर्नवाटप करणे व कार्यक्षमतेत सुधारणा करण्यासाठी आर्थिक संसाधनाची संस्था व गुणवतापूर्ण उपलब्धता करणे अपेक्षीत असते.

खालील आराखड्यावरून शून्याधारीत अर्थसंकल्प समजून घेता येइल




Traditional v/s. Zero Base Budgeting

**शून्याधारीत अर्थसंकल्पातील टप्पे :–**

टप्पा १. संघटनात्मक संरचना ओळखले व्यवस्थापन, निर्णय घटक व उद्दिष्ट्ये

टप्पा २. निर्णय पार्सल (Decision Package) ची निर्मिती व विकास

टप्पा ३. परस्पर पूर्ण पर्याय

टप्पा ४. निर्णय पार्सल चा क्रम व प्राधान्य क्रम

टप्पा ५. निवडलेल्या निर्णय पार्सला साठी संसाधनाची वाटणी व अर्थसंकल्प तयार करणे.

**शुन्याधारीत अर्थसंकल्पाचे फायदे :–**

१) याद्वारे ससांधनाची वाटणी परीणाम कारकपणे करता येते.

२) उच्च पातळीवरील व्यवस्थापनास संसाधनाचे पुर्नवाटप करणे शक्य होते.

३) यामध्ये कामाचे प्रयत्नाची पुनरावृत्ती टाळली जाते.

४) यामुळे आकडेवारी आधार मजबूत होतो व मुल्यमापन प्रक्रीया सुलभ होते.

५) संघटनात्मक ध्येय साध्य करण्यासाठी उपयुक्तत

६) यामध्ये प्रत्येक अर्थसंकल्पीय विनंतीचे समर्थन आवश्यक असते.

**शुन्याधारीत अर्थसंकल्पाच्या मर्यादा :–**

१) एकसारखे नसलेले व विभिन्न निर्णय पार्सल यांचे मूल्यमापन करण्यात अडचणी येतात यासाठी जास्तीची वेळ व प्रयत्न लागतात.

३) मोठ्या प्रमाणावरील निर्णय पार्सलचा क्रम लावणे अवघड ठरते.

४) यामध्ये प्रशासकीय व संवादात्मक कामे वाढतात.

५)   खर्च विषयक माहीती उपलब्ध नसते

वरील प्रमाणे शुन्याधारीत अर्थसंकल्प कार्यरत होतो.

## ३.६ सारांश :

विद्यार्थी मित्रानो प्रस्तुत घटकामध्ये आपण सार्वजनिक खर्च विषयक सिंमात व प्रकल्प मुल्यमापन बद्दल सखोल विश्लेषण केलेले आहे. सार्वजनिक खर्च वाढीबाबतचे अनेक दृष्टीकोन हे खर्च वाढण्याची विविध कारणे स्पष्ट करतात. आर्थिक विकास साध्य करण्यासाठी गुंतवणूक विषयक निर्णय महत्त्वाचे असतात. विकसनशील देशामध्ये भांडवलाचा तुटवडा असतो तो लक्षात घेवून गुंतवणूक विषयक निर्णय घेताना खर्च लाभ विचारात घेणे अत्यंत महत्त्वाचे असते. कोणताही प्रकल्प यशस्वीपणे पूर्ण होणे व त्याचे लाभ  सर्वच समाजास महाबत्तम स्वरूपात प्राप्त घेणे आवश्यक असते. त्यासाठी प्रकल्पाचे मूल्यमापन योग्य पद्धतीने घेणे गरजेचे असते सरकार विविध कार्यक्रमावर खर्च करत असतात त्याचे जास्तीत जास्त लाभ मिळावा यासाठी विविध स्वरूपाचे अंदाजपत्रक  स्वीकारते व त्याद्वारे महत्तम लाभ प्राप्त करण्याचा प्रयत्न करत असते.

## ३.७ पारिभाषिक शब्द व शब्दार्थ

१)   संसाधने : अर्थव्यवस्थेत उपलब्ध असलेली भौतिक व मानवी संसाधने.

२)   पुर्नगुंतवणूक : सर्वसामान्यपणे नफ्यातुन केली जाणारी गुंतवणूक होय.

३)   अंदाज पत्रक : सरकारचा महसूल व खर्चविषयक प्रस्ताव

४)   कार्यकारी अंदाजपत्रक : मूल्य कार्यकारी अधिकाऱ्याकडून तयार केले जाते.

५)   महसुली खर्च : असे खाते ज्यामध्ये आवर्ती स्वरूपाचा खर्चाचा समावेश असतो.

## ३.८ स्वयं अध्ययन प्रश्न व उत्तरे

### अ) योग्य पर्याय निवडा.

१)   सॅम्युअलसन यांनी त्यांच्या सिंद्धातामध्ये समस्याचे ---------- विश्लेषण केलेले आहे.

अ) संसाधनाची वाटणी   ब) संसाधनाचे विभाजन

क) 'अ' व 'ब' दोन्ही   ड) वरीलपैकी नाही.

२)   पिकॉक वाइजनन यांनी त्याच्या विश्लेषणात .... परिणाम स्पष्ट केला.

अ) विस्थापन परिणाम   ब) परिक्षण परिणाम   क) केंद्रीकरण परिणाम   ड) वरील सर्व

३)   कोणत्या गुंतवणूक निकषामध्ये छाया किंमतीचा आधार घेण्यात आला.?

अ) वृद्धी महत्तमीकरण निकष   ब) राष्ट्रीय उत्पाद चाचणी निकष

क) पुर्नगुंतवणूक निकष   ड) सामाजिक सीमांत उत्पादकता निकष

४) कोणत्या गुंतवणूक निकषास प्रवेग वृद्धी निकष म्हणून ओळखले जाते.

अ) पुर्नगुंतवणूक निकष ब) सामाजिक सिमांत उत्पादकता निकष

क) रोजगार शोषण निकष ड) वरीलपैकी नाही.

५) शुन्याधारी अर्थसंकल्पाचा अवलंब व प्रयत्न कोणी केला.

अ) जे.एफ. कान्ट ब) जीमी कार्टर क) हर्षमन ड) मसग्रेव्ह

**ब) एका वाक्यात उत्तरे लिहा.**

१) शून्याधारीत अर्थसंकल्प भारतात कोणत्या वर्षी लागू केला ?

२) विकासोत्तर खर्चामध्ये कशाचा समावेश होते?

३) कार्यकारी अंदाजपत्रक कोणाकडून तयार केले जाते?

४) कोलीन क्लार्क यांनी कोणता प्रबंध लिहिला

५) सरकारच्या वाढत्या कार्याचा नियम कोणी मांडला?

**स्वयंअध्ययन प्रश्नांची उत्तरे**

**अ) योग्य पर्याय निवडा.**

१) क, २) ड ३) ब ४) अ ५) ब

**ब) एका वाक्यात उत्तरे लिहा.**

१) १९८७-८८

२) व्याज रक्कम प्रशासकीय सेवा खर्च सुरक्षा सेवा खर्च

३) मुख्य कार्यकारी अधिकारी

४) Public finance and change in the value of money.

५) ॲडाल्फ वॅगनर

**३.९ सरावासाठी स्वाध्याय**

**दीर्घोत्तरी प्रश्न :-**

१. सॅम्युअलसन यांच्या सार्वजनिक खर्चाच्या शुद्ध सिद्धांताचे विश्लेषण करा.

२. सरकारच्या वाढत्या कार्याचा नियम स्पष्ट करा

३. गुंतवणूकीच्या विविध निकषांची चर्चा करा.

४. कामगिरी अंदाजपत्रक व कार्यक्रम अंदाजपत्रकाचे विश्लेषण करा.

**टीपा लिहा :**

१. प्रकल्प मुल्यमापन

२. कोलीन क्लार्क परिकल्पना

३. पिकॉक वाइजमन परिकल्पना

४. सार्वजनिक अंदाजपत्रक

५ शुन्याधारीत अंदाजपत्रक

६. असंतुलनाचा कालावधी कमी करणे

**३.१० संदर्भ ग्रंथ**


1. B. P Tyagi (204-05) Public finance, Jay Prakash Nath Co. Meerut
2. J. V. M. Sharma (2018) Public Finance Principies and Practice Oxford University New Delhi. Public Economics, Theory and Practice.
3. Om Prakash (2012) Vishal Publishing Company, Jalandhar - Delhi
4. K.P.M. Surdera K. K. Adley (2003) Public Finance Theroy and Practice, S. Chand and Company Ltd., New Delhi
5. R.C. Agarwal (2014-15) Public Finance Laxmi Narayan Agarwal, Agra.
6. प्रा. रा. सु. ओझरकर (२०११) राजस्व, विद्या प्रकाशन, नागपुर.


****

# घटक क्रमांक – ४
# करारोपणाचा सिद्धांत आणि सार्वजनिक कर्ज
# (Public Economics)
# Theory of Taxation and Public Debt

४.० उद्दिष्ट्ये

४.१ प्रस्ताविक

४.२ विषय विवेचन.

 ४.२.१ करभार

 ४.२.२ करारोपणाचे सिद्धांत

 ४.२.३ सार्वजनिक कर्जाचा सिद्धांत

४.३ पारिभाषिक शब्द, शब्दार्थ

४.४ स्वयं-अध्ययन प्रश्न आणि उत्तरे

४.५ सारांश

४.६ सरावासाठी स्वाध्याय

४.७ संदर्भ ग्रंथ

**४.० उद्दिष्ट्ये: या घटकाच्या अभ्यासानंतर आपणाला खालील गोष्टी कळू शकतील**

* कारभाराच्या विविध संकल्पना आणि करभाराचे सिद्धांत सांगता येतील.
* करारोपणाचे विविध सिद्धांतांची माहिती होईल.
* पर्याप्त कर आकारणी, कराचा अतिरिक्त भार, दुहेरी कर आकारणी, लाफर वक्र, वस्तू आणि सेवा कर इत्यादींची माहिती स्पष्ट करता येईल.
* सार्वजनिक कर्जाचे सिद्धांत, सार्वजनिक कर्जाचे महत्त्व मार्ग, आणि वर्गीकरण, सार्वजनिक कर्जाचा भार. सार्वजनिक कर्ज परत फेडीच्या पद्धती आणि कर्ज व्यवस्थापनाची तत्त्वे यांची माहिती होईल.

### ४.१ प्रस्तावना:

या पुर्वीच्या घटकांमध्ये आपण अर्थव्यवस्थेतील शासनाची भूमिका आणि कार्ये यांची माहिती घेतली आहे. तसेच सार्वजनिक निवडीबाबतचे सिद्धांत, संकल्पनांचा अभ्यास केला. खाजगी वस्तु आणि सार्वजनिक वस्तु म्हणजे काय हे समजून घेऊन सार्वजनिक वस्तूंच्या पुरवठ्याबाबतच्या विविध सिद्धातांचा अभ्यास केला. सरकारला आपली विविध कार्ये पार पाडण्यासाठी सार्वजनिक खर्च करावा लागतो. सार्वजनिक खर्चाबद्दलची मार्गदर्शक खर्च करावा लागतो. सार्वजनिक खर्चाबद्दलची मार्गदर्शक तत्त्वे लक्षात घेऊन सरकारला आपले अंदाजपत्रकीय धोरण ठरवावे लागते. अंदाजपत्रकीय व्यवहाराच्या दोन बाजु असतात. एक म्हणजे वेगवेगळ्या बाबीवरील खर्चाची बाजु आणि दुसरी म्हणजे त्यासाठी लागणाऱ्या वित्तीय साधनसामग्रीची जमवाजमव करणे.

महसुली उत्पन्न, सार्वजनिक कर्ज आणि तुटीचा अर्थभरणा याद्वारे सरकारत्न वित्तीय साधनसामग्री जमा करता येते. यापैकी महसुली उत्पन्न हे सर्वात महत्त्वाचे असते. महसुली उत्पन्न हे सर्वात महत्त्वाचे असते. महसुली उत्पन्न मिळविण्यामध्ये करआकारणीला अत्यंत महत्त्व असते. कारण बहुतांशी महसुली उत्पन्न हे करापासून मिळते. त्यामुळे करआकारणीशी संबंधित बाबींच्या अभ्यासाला विशेष महत्त्व प्राप्त होते. या घटकामध्ये आपण करआकारणीचे सिद्धांत समजून घेणार आहोत. पर्याष्ट करआकारणी, कराचे अतिरिक्त ओझे, दुहेरी करारोपण, लाकर वक्र आली वस्तू व सेवाकर यांचा अभ्यास करणार आहोत. तसेच करभाराचा अर्थ, विविध संकल्पना, आणि करभाराचे सिद्धांत समजून घेणार आहोत.

त्याचबरोबर सरकारला वित्तीय साधनसामग्री जमाविण्याचा दुसरा महत्त्वाचा मार्ग म्हणजे सार्वजनिक कर्जाची उभारणी करणे हा आहे. सार्वजनिक कर्जाच्या व्यवहाराचे अर्थशास्त्रीय विश्लेषणात सार्वजनिक कर्जा विषयीही मोठ्या प्रमाणात विश्लेषण करण्यात आले आहे. या घटकामध्ये आपण सार्वजनिक कर्जाचे मार्ग, महत्त्व,  वर्गीकरण सार्वजनिक कर्जाचा भार आणि परतफेड यांचा अभ्यास करणार आहोत.

### ४.२. विषय विवेचन :

### ४.२.१.१ : करभाराचा अर्थ : (Meaning of Tax Incidence)

आधुनिक काळात सरकारच्या महसुलाचा सर्वात महत्त्वाचा स्त्रोत म्हणजे करआकारणी हा होय. सरकार जेंव्हा कर आकारणी करते तेंव्हा करभरण्याची कायदेशीर जबाबदारी ज्या आर्थिक घटकावर असते तो घटक सरकारकडे कराची रक्कम भरतो. अर्थव्यवस्थेतील प्रत्येक आर्थिक घटक वेगवेगळ्या आर्थिक व्यवहारातून दुसऱ्या आर्थिक घटक वेगवेगळ्या आर्थिक व्यवहारातून दुसऱ्या आर्थिक घटकांशी संबंधित असतो. त्यामुळे कर भरण्याची कायदेशीर जबाबदारी असलेल्या घटकाने सरकारला कर भरला तरी त्याचा अंतिम भार कोण सहन करतो हे पहाणे आवश्यक असते. सरकार कर कोणावर लावते, तो कर सरकारी तिजोरीत कोण भरते आणि त्याचा अंतिम भार कोण सहन करते इत्यादी प्रश्नांची उत्तरे

शोधावी लागतात. करभाराच्या कल्पनेवरच कर आकारणीतील न्याय अवलंबून असल्याने तिच्या अभ्यासाला अत्यंत महत्त्व आहे. या पुढीलभागात आपण करभाराचा अर्थ, करभाराच्या विविध संकल्पना, करभाराचे सिद्धांत यांचा अभ्यास करणार आहोत.

करभाराचा अर्थ लक्षात घेण्यासाठी करप्रक्रिया लक्षात घेतली पाहिजे. सरकार जेंव्हा एकादा कर लावते तेंव्हा त्यामधून जी कर प्रक्रिया निर्माण होते तिच्यामध्ये तीन संकल्पनांचा समावेश होतो. त्यांचे स्पष्टीकरण पुढीलप्रमाणे देता येईल.

**१) कराघात (Impact of a Tax) :**

ज्या व्यक्तीकडून प्रथम कर वसूल करण्यात येतो त्या व्यक्तीवर कराचा आघात होत असतो. याचा अर्थ सरकार ज्या व्यक्तीवर कर आकारते आणि जिची कर भरण्याची कायदेशीर जबाबदारी असते तिच्यावर कराचा आघात होतो. दुसऱ्या शब्दात सांगावयाचे झाल्यास कराचा आघात हा करदात्यावर होत असतो.

ज्या आर्थिक घटकावर कर आकारला जातो तो आर्थिक घटक कराची रक्कम सरकारकडे भरतो. म्हणजे कराचा पैशातील तात्कालिक भार ज्याज्यावर पडतो त्यचेवर कराचा आघात झाला असे म्हणतात. उदा. एकादया वस्तूच्या उत्पादनावर कर बसविला तर त्या वस्तूचा उत्पादक तो कर भरतो. म्हणजे त्या वस्तूच्या उत्पादकांवर त्या कराचा आघात झाला.

**२) कर संक्रमण (Shifting of a Tax) :**

ज्या व्यक्तीवर कर आकारला जातो त्या व्यक्तीने तो दुसऱ्यावर ढकलण्याचा प्रयत्न केला आणि ती त्यामध्ये यशस्वी झाली तर या कर ढकल व्यवस्था प्रक्रियेला कर संक्रमण असे म्हणतात. कर संक्रमण ही अशी प्रक्रिया आहे की जिच्याद्वारे करदाता सरकारला भरलेला कराची अंशत: किंवा संपूर्ण रक्कम दुसऱ्याकडून वसूल करते ही प्रक्रिया वस्तू-सेवांच्या खरेदी -विक्रीव्यवहारातून केली म्हणजेच करदाता आपल्यावरील कराचा बोजा वस्तू किंमतीतून वसूल करण्याचा प्रयत्न करतो. कराचे हे संक्रमण पुढे किंवा मागे करता येऊ शकते. वस्तूच्या उत्पादकावरा बसविलेला कर तो त्या वस्तूच्या ग्राहकावर ढकलू शकतो. या क्रियेला पुढे होणारे किंवा अग्रगामी कर संक्रमण असे म्हणतात. याउलट उत्पादकावर बसविलेला कर तो उत्पादन घटक पुरवठादाराकडे ढकलला तर त्याला मागे होणारे किंवा प्रतिगामी कर संक्रमण असे म्हणतात. अशा रितीने करदाता आपल्यावरील कराचा भार दुसऱ्यावर ढकलण्याचा अवलंबून असते आणि करदाता त्यामध्ये कधी पूर्ण पणे तर कधी अंशत: यशस्वी होतो.

**३) करभार (Incidence of Tax) :**

कर संक्रमणाची प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर शेवटी जी व्यक्ती प्रत्यक्षपणे कर भरते तिच्यावर कराचा भार पडला असे समजण्यात येते. दुसऱ्या शब्दात सांगावयाचे झाल्यास कराचा पैशातील भार अंतिमत:

कोणावर स्थिरावतो त्यावर करभार पडत असतो. म्हणजेच करभाराचा संबंध हा कराच्या पैशातील अंतीम भाराशी असतो. ज्या व्यक्तीला शेवटी कराचे पैशातील ओझे सहन करावे लागते तिच्यावर करभार पडत असतो. उदा. समजा सरकारने साखर उत्पादनावर प्रतिकिलो एक रुपया कर बसविला. तर या कराचा कराघात साखर उत्पादकावर होतो. कारण तो प्रथमत: सरकारला या कराची रक्कम भरतो. परंतु ती कराची रक्कम तो साखरेच्या किंमतीत समाविष्ट करून साखर विकतो. त्यामुळे कराची ही रक्कम ग्राहकावर ढकलण्यात येते. डॉ. डाल्टन यांच्यामते कराचे अंतिम ओझे ज्या व्यक्तीला सहन करावे लागते त्याच्यावर करभार पडतो. थोडक्यात करारोपणात कराघात हा आरंभबिंदू असतो. करसंक्रमण ही अंतरिम प्रक्रिया आणि करभार हा अंतिम परिणाम असतो.

### ४.२.१.२ करभाराच्या विविध संकल्पना : (Different) :-

करभाराचे खरे स्वरूप स्पष्ट करण्यासाठी करभाराच्या विविध संकल्पनांचा अर्थ लक्षात घेणे आवश्यक आहे. डॉ. डाल्टन यांनी करभाराच्या मौद्रीक किंवा पैशातील भार आणि वास्तविक भार अशा दोन संकल्पना मांडल्या आहेत. मौद्रिक किंवा पैशातील भाराचे दोन प्रकार सांगितले आहेत.

**१) प्रत्यक्ष मौद्रीक भार (Direct Money Burden) :**

सरकारला कर भरल्यामुळे करदात्याला पैशाच्या स्वरुपात जो भार सहन करावा लागतो. त्यालाच कराचा मौद्रीक भार असे म्हणतात. पैशातील हा भार कराच्या रक्कमेइतकाच असतो.

**२) अप्रत्यक्ष मौद्रीक भार (Indirect Money Burden) :**

जेव्हा कर आकारल्यामुळे करदात्याला करापेक्षा अधिक रक्कम दयावी लागते तेंव्हा कराचा अप्रत्यक्ष मौद्रीक भार हा उत्पादक किंवा विक्रेता यांना सहन करावा लागतो. उदा. एकादया वस्तूच्या उत्पादनावर लावलेला कर त्या उत्पादकाला आधी सरकारला दयावा लागतो. मात्र त्या वस्तूची विक्री नंतर होणार असते. अशावेळी त्या उत्पादकाला सरकारला दिलेल्या कर रक्कमेवरील व्याज मिळत नाही. इतर वेळी अशा रक्कमेवरील व्याज त्याला मिळू शकले असते. म्हणून हा त्याच्यावरील कराचा अप्रत्यक्ष मौद्रीकभार ठरतो.

**ब) वास्तविक भार (Real Burden) :**

कराच्या वास्तविक भाराचे पत्यक्ष वास्तविक भार आणि अप्रत्यक्ष वास्तविकभार असे दोन प्रकार आहेत.

**प्रत्यक्ष वास्तविक भार (Dircet Real burden) :**

कर द्यावा लागल्यामुळे करदात्याला जो कल्याणाचा किंवा समाधानाचा त्याग करावा लागतो तो म्हणजे कराचा प्रत्यक्ष वास्तविक भार होय. गरिब आणि श्रीमंत अशा दोन्ही वर्गावर समान कर आकारला

तरी त्याचा अधिक भार हा गरिब वर्गावर पडतो. कारण गरिब वर्गाला करामुळे करावा लागलेला कल्याणाचा हा मोठा असतो.

**२) अप्रत्यक्ष वास्तविक भार (Indirect Real burden) :-**

करामुळे वस्तूंच्या किंमती वाढतात. त्यामुळे काही लोकांना वस्तूंची मागणी कमी करावी लागते. परिणामी त्यांच्या उपभोगात घट होते. उदा. कर लावल्यामुळे साखरेची किंमत वाढली तर गरिब वर्गाला ती परवडत नाही. म्हणून ते साखरेचा उपभोग कमी करतात. कराचा हा अप्रत्यक्ष वास्तविक भार होय. डॉ. डाल्टन यांच्या मते करभाराच्या अभ्यासामध्ये फक्त मौद्रीक भाराचाच विचार केला जातो आणि इतर भाराचा संबंध हा कराच्या परिणामाशी आहे.

श्रीमती उर्सुला हिक्स यांनी करभाराच्या औपचारिक करभार व प्रभावी करभार या आणखी दोन संकल्पना मांडल्या आहेत. औपचारिक करभार (Frmal Incidence) म्हणजेच मौद्रीक भार असून तो अशाच व्यक्तीवर पडतो जिच्यावर तो पडावा अशी सरकारची इच्छा असते. श्रीमती हिक्स यांची ही करभाराची संकल्पना डॉ. डाल्टन व प्रा. सेलिग्मन यांनी मांडलेल्या करभाराच्या संकल्पनेसारखीच आहे.

प्रभावी करभार (Effective Incidence) म्हणजे असा करभार की जो कर संक्रमणानंतर कर आकारणी केलेल्या वस्तू किंवा सेवा यांच्या मागणीपुरवठ्यातील बदलामुळे घडून येतो. करभारासंबधीची ही संकल्पना करभारा संबंधीच्या परंपरागत विचारापेक्षा वेगळी आहे.

**४.२.१.३ करभाराच्या पर्यायी संकल्पना (Alternative Concepts of Tax Incidence) :**

श्रीमती उर्सुला हिक्स, मसग्रेव्ह आदी अर्थ शास्त्रज्ञांनी करभाराच्या संकल्पनेला एका नव्या स्वरूपात मांडण्याचा प्रयत्न केला. त्यांनी भार हा शब्द परिणाम या अर्थाने वापरलेला आहे. त्यांच्यामते सरकारच्या अंदाजपत्रकीय धोरणामुळे उत्पन्नाच्या वितरणात होणाऱ्या बदलांना करभार असे म्हणावे. ते असे म्हणतात की ज्यावेळी सरकार अंदाजपत्रकीय धोरणात बदल करते तेंव्हा त्याच तीन महत्त्वाचे परिणाम दिसून येतात. १) जनतेकडून सरकारकडे साधनांचे हस्तांतरण २) एकूण उत्पादनावरील परिणाम ३) समाजातील उत्पन्नाच्या वितरणावरील परिणाम या लेखकांच्या विशेषत: मसग्रेव्ह यांच्यामते यापैकी तिसऱ्या प्रकारच्या परिणामाशी करभाराचा संबंध असतो. प्रा. मसग्रेव्ह यांनी पाच प्रकारच्या करभाराच्या संकल्पना मांडल्या आहेत.

**१) विशिष्ट करभार (Specific Tax Incidence) :**

सरकारच्या वास्तव स्वरुपातील खर्चात कोणताही बदल न होता केवळ कर धोरणामध्ये बदल केल्यामुळे समाजाच्या उत्पन्नाच्या वितरणात होणाऱ्या बदलाला विशिष्ट करभार असे म्हणतात. एका उदाहरणाच्या सहाय्याने याचे अधिक स्पष्टीकरण देता येईल. समजा अर्थव्यवस्था पूर्ण रोजगाराच्या स्थितीत कार्यरत आहे. अशावेळी सरकारने उत्पन्न कराचे दर कमी केले तर लोकांच्या हातात अधिक उत्पन्न राहून त्यांची वस्तु व सेवासाठी मागणी वाढेल त्यामुळे किंमतीत वाढ होईल. परिणामी सरकारच्या खर्चातही

होईल त्यावेळी सरकारला नविन चलन काढावे लागेल. त्यामुळे देशात चलनाविस्ताराची प्रवृत्ती निर्माण होते.

याउलट जर उत्पन्न कराचे दर वाढविले तर लोकांच्या हातातील पैसा कमी होऊन त्यांचा खर्च कमी होईल. आणि शेवटी अर्थव्यवस्थेत चलन संकोचाची स्थिती निर्माण होईल. म्हणून चलनाविस्तार व चलन संकोच या दोन्हींचा उत्पन्नाच्या व संपत्तीच्या वितरणावर परिणाम होतो. त्यांचा विशिष्ट कारभारात समावेश होतो.

### २) भेदजन्य करभार (Differential Tax Incidence) :

जेंव्हा दोन करापासून समान उत्पन्न गृहित धरले असते अशावेळी जर एका कराऐवजी दुसरा कर लावला तर त्याचे उत्पन्नाच्या वितरणावर जे परिणाम घडून येतात त्यांना भेदजन्य करभार असे म्हणतात. जेंव्हा एकाऐवजी दुसरा कर लावला आणि सरकारचे उत्पन्न तेच राहते तेंव्हा सरकारचा खर्चही तोच राहतो. परंतु भिन्न करांचे मागणीवर होणारे परिणाम भिन्न राहतील. त्यामुळे किंमतीच्या पातळीत बदल होईल जेंव्हा किंमतपातळी बदलते तेंव्हा साधनांचे पूर्वीसारखेच हस्तांतरण कायम राहण्याकरिता सरकारला आपल्या खर्चाच्या पातळीत बदल करावा लागतो. म्हणून मसग्रेव्ह यांच्यामते समान उत्पन्न देणाऱ्या दोन करधोरणामुळे उत्पन्न वितरणामध्ये जो फरक पडतो त्याला भेदजन्य कारभार असे म्हणतात. भेदजन्य करभाराची संकल्पना सरकारी खर्चाची वित्तीय व्यवस्था करण्यासाठी पर्यायी करधोरण शोधून काढण्यासाठी अत्यंत उपयुक्त आहे.

### ३) विशिष्ट खर्च भार (Specific Expenditure Incidence) :

जर सरकारने कर निश्चितीचे सूत्र व कराचे दर स्थिर ठेवले सरकारी खचात बदल केला तर त्याचे उत्पन्न वितरणावर काही परिणाम होतील. या परिणामानाच विशिष्ट खर्चभाद असे म्हणतात. सरकारी खर्चातील बदलामुळे लोकांच्या उत्पन्नात होणाऱ्या बदलांना विशिष्ट खर्चभार असे म्हणतात. सरकारी खर्चात वाढ झाली तर लोकांच्या हातात अधिक उत्पन्न येते. त्यामुळे वस्त्र व सेवांच्या किंमतीत वाढ होऊन चलनविस्ताराची प्रवृत्ती निर्माण होते. याउलट सरकारी खर्च कमी केल्यास लोकांचे उत्पन्न आणि पर्यायाने मागणी घटेल व चलन संकोचाची परिस्थिती निर्माण होईल. अशा रितीने सरकारी खर्चातील बदलाचे उत्पन्न वितरणावर दोन परिणाम दिसून येतात. ते म्हणजे सरकारी खर्चातील बदलाचे परिणाम आणि सरकारी खर्चातील बदलामुळे निर्माण झालेल्या चलन विस्ताराचे व चलनसंकोचाचे परिणाम.

### ४) भेदजन्य खर्चभार (Differential Expenditure Incidence) :

कररचना न बदलता संतुलित अंदाजपत्रक धोरणा अंतर्गत सरकारने सार्वजनिक खर्चात बदल केला तर त्याचे उत्पन्न वितरणावर जे परिणाम होतात त्यांना भेदजन्य खर्च भार असे म्हणतात. संतुलित अंदाजपत्रकीय धोरणात काही बाबींवरील सरकारी खर्चातील वाढीचे परिणाम हे इतर काही बाबींवरील

सरकारी खर्चातील कपातीद्वारे संतुलित ठेवण्याचा प्रयत्न केला जातो. अशा बदलाचे जे काही परिणाम उत्पन्न वितरणावर होतात त्यांना भेदजन्य खर्च भार असे म्हणतात. मसग्रेव्ह यांच्यामते विशिष्ट खर्च भार किंवा भेदजन्य खर्चभार या संकल्पना करभाराचा प्रश्न व साधनांचे हस्तांतरण यांच्या विश्लेषणाच्या दृष्टीने भेदजन्य करभाराच्या संकलाने इतकी उपयुक्त नाही.

### ५) संतुलित अंदाजपत्रक भार (Balance Budget Incidence)

अंदाजपत्रकाच्या कर आणि खर्च या दोन्ही बाजूमध्ये बदल करून उत्पन्न वितरणात बदल घडवून आणता येतात. संतुलित अंदाजपत्राकच्या चौकटीत कर व खर्च धोरणात बदल करून वितरणात जे बदल घडवून आणले जातात त्यांना 'संतुलित अंदाजपत्रक भार' असे म्हणतात. या संकल्पनेत चलनविस्तार चलनसंकोचाचे वितरणावरील परिणाम टाळले आहेत. परंतु यामध्ये एक महत्त्वाचा दोष आहे. वितरणातील कोणते बदल करबदलामुळे आहेत व कोणते बदल खर्चबदलामुळे आहेत हे ठरविणे कठिण आहे.

## ४.२.१.४ करभाराचे सिद्धांत (Theories of Tax Incidence)

करभार हा कर संक्रमणाचा अंतिम परिणाम असतो. त्यामुळे कर संक्रमणाच्या विविध कारणांचा अभ्यास महत्त्वाचा ठरतो. जेंव्हा आपल्याला एकदा कर का संक्रमित होतो, तो कोणाकडे संक्रमित होतो याची माहिती घेतली तरच कराच्या परिणामांचे अकलन होते. त्यामुळे कर संक्रमणाच्या प्रक्रियेचा विचार करणे अत्यावश्यक ठरते. निरनिराळ्या अर्थशास्त्रज्ञांनी करसंक्रमणाचे शास्त्रीय विवेचन केले आहे. निसर्गवादी अर्थशास्त्रज्ञ, ॲडम स्मिथ, डेव्हीड रिकार्डो, मॅन्सफिल्उ, प्रा. सेलिग्मन, प्रा. एजवर्थ इत्यादी अर्थशास्त्रज्ञांनी कर संक्रमणाच्या तत्त्वज्ञानाची चर्चा केली आहे. सर्वसाधारणपसंक्रमाणाबाबतचे तीन सिद्धांत मांडले आहेत. त्यांची थोडक्यात माहिती पुढीलप्रमाणे सांगता येते.

### १) केंद्रीकरण सिद्धांत (Concertration Theory) :

हा सिद्धांत मांडण्याचे काम निसर्गवादी अर्थशास्त्रज्ञानी केले. या सिद्धांतानुसार सर्व करांचे केंद्रीकरण शेवटी किंवा अंतिमत: समाजातील एका घटकावरच होते. त्यांच्यामते कर कोठेही आणि कुणावरही आकारला तरी त्याच्या भाराचे संक्रमण होत जाऊन शेवटी कराचा भार हा जमीनदार वर्गावर पडतो. त्यांनी असे प्रतिपादन केले की भूमी हा एकच घटक खऱ्या अर्थाने उत्पादक आहे. कारण त्यांच्यामते फक्त भूमी या घटकापासूनच निव्वळ उत्पन्न मिळते. याचा अर्थ जीमनीतून उत्पादन घेण्यासाठी आपण जेवढा खर्च करतो त्यापेक्षा कितीतरी अधिक मूल्य जमिनीच्या उत्पन्न मिळत नाही. शेती इतर क्षेत्रात उत्पादनमूल्य हे त्यासाठी वापरलेल्या उत्पादन घटकांच्या मूल्याइतकेच असते. तसेच श्रमिकांना मिळणारी मजुरी ही निर्वाह वेतन पातळीपेक्षा कमी असल्यामुळे त्यांचेवर कर वसविता येत नाहीत. त्यामुळे शेवटी भूमी हाच एक असा स्त्रोत शिल्लक राहतो की ज्याच्यावर कर लावणे भाग पडते कारण इतर कोणत्याही क्षेत्रावर कर आकारल्यास तो संक्रमित होऊन शेवटी शेती उत्पन्नावर स्थिराविता त्यामुळे निसर्गवादी अर्थशास्त्रज्ञानी असे प्रतिपादन केले की करामधील विविधता काढून टाकून केवळ जमिनीच्या उत्पन्नावर

कर आकारला जावा. त्यामुळे करपद्धतीत सुलभता येईल आणि कर जमा करण्याचा खर्च कमी होईल. याचा अर्थ निसर्गवादी अर्थशास्त्रज्ञांनी एक कर पद्धतीचा पुरस्कार केला.

**सिद्धांताची मर्यादा :**

निसर्गवादी अर्थशास्त्रज्ञानी मांडलेल्या कर केंद्रीकरणाच्या सिद्धांताबाबत पुढे बराच विवाद झाला. ॲडम स्मिथ आणि नंतर आधुनिक अर्थशास्त्रज्ञ याला सिद्धांताला विरोध केला. त्यांनी भूमी हा एकच उत्पादकशास्त्रे आहे हे अमान्य केले. त्यांनी असे प्रतिपादन केले की आर्थिक क्रिया ह्या उत्पादक आहेत. त्यामुळे कारभाराचे वितरण समानेच्या तत्त्वानुसार सर्व समाज घटकावर झाले पाहिजे. म्हणून त्यांनी एक कर पद्धतीला विरोध केला. परंतु या सिद्धांताच्या प्रतिपादनास त्यांनी एक सुधारणाचा सुचविली त्यांचेमते अर्थव्यवस्थेत खंड आणि नफा हे प्रकारचे अधिक्य निर्माण होतात. त्यामुळे सर्व करांचा भार शेवटी या दोन वाढाव्यावर स्थिरावला पाहिजे. तसेच आजच्या कल्याणकारी समाजामध्ये एकाच घटकावर कर लावणे अन्याय कारक ठरते. त्यामुळे आधुनिक काळात केंद्रीकरण सिद्धांताचे समर्थन करता येत नाही.

**सिद्धांताचा गुण :**

या सिद्धांताबाबत विवाद झाला असला तरी या सिद्धांतामध्ये काही चांगले गुण आहेत. सर्वात महत्त्वाचे तत्त्व म्हणजे कर हे सरतेशेवटी आधिक्यातूनच दिले जातात. ज्या ठिकाणी अधिक्य असते तेथे कराचा भार संक्रमित केला जातो. दुसरे असे की ज्या व्यक्तीजवळ अधिक्य नसते तिच्यावर कर आकारणे अन्यायकारक होय. यासंदर्भात हॉब्सन यांनी असे म्हटले की उत्पादन आणि उपभोग यांचा अपव्यय आणि नुकसान टाळण्यासाठी सर्व कर हे करयोग्य आर्थिक वाढव्यावर आकारले जावेत. थोडक्यात आजच्या परिस्थितीत केंद्रीकरण सिद्धांताला मर्यादा पडतात. म्हणजेच त्याचे तात्त्विक आणि व्यावहारिक आधारावर समर्थन करता येत नाही.

**२) विकेंद्रीकरण सिद्धांत (The Diffusion Theory) :**

कर संक्रमणाचा विकेंद्रीकरण सिद्धांत हा फ्रेंच अर्थशास्त्रज्ञ मॅन्सफिल्ड आणि कॅनार्ड यांनी मांडला आहे. हा सिद्धांत निसर्गवादी अर्थशास्त्रज्ञांच्या केंद्रीकरण सिद्धांताच्या अगदी विरुद्ध आहे. अर्थव्यवस्थेतील सर्व आर्थिक घटक हे परस्परांवर अवलंबून असतात. जर अर्थव्यवस्थेत श्रमिकांचे वेतन हे निर्वाह पातळीला किंवा त्यापेक्षा कमी ठरत नसतील तर आर्थिक वाढावा सर्वाकडे असतो. अशा परिस्थितीत कोणत्याही एका ठिकाणी आकारलेला कर हा सर्व क्षेत्रात पसरत जातो. काही लोकांच्यामते अर्थव्यवस्थेत वस्तु आणि सेवांच्या खरेदी-विक्रीचे व्यवहार सातत्याने असल्यामुळे त्यामधुन कारभाराचे संक्रमण एवढ्या प्रमाणावर होते की अंतिम करभार नेमका कोणावर किती पडला हे शोधणे अशक्य होते. याचा अर्थ सर्व कर हे कोणत्याही एका घटकांवर केंद्रीत होत नाहीत तर ते समाजाच्या विविध घटकामध्ये विकेंद्रीत झालेले असतात. कर आकरणी केली की काही काळातच त्याचा भार संक्रमित होऊ लागतो आणि

शेवटी त्याचा भार संपूर्ण समाजावर वितरित होतो. मॅन्सफिल्ड यांनी ही कल्पना स्पष्ट करण्यासाठी तळ्यात टाकलेल्या दगडाचे रूपक घेतले आहे. तळ्यातील किंवा विहिरीत दगड टाकताच एक वलय निर्माण होते आणि त्यापासून अनेक वलये निर्माण घेऊन संपूर्ण तळ्याच्या पृष्ठभागावर पसरतात. त्याप्रमाणे कराचा भार ही संपूर्ण समाजावर पसरतो.

या संदर्भात. प्रा. कॅनार्ड यांनी असे म्हटले आहे की भूमी, श्रम आणि भांडवल हे तीन घटक करयोग्य वाढाव्याची निर्मिती करतात. आणि खरेदी-विक्रीच्या व्यवहारातून कराचे समाजातील सर्व घटकांमध्ये वितरण होते. करांचे हे असे वितरण होण्यास काही कालावधी लागतो. परंतू कराचा भार सरतेशवेटी उत्पन्नाच्या आधिकयावरच पडतो.

करभाराच्या विकेंद्रीकरण सिद्धाताचे काही गुण दोष आहेत. हा सिद्धांत हे स्पष्ट करतो की कर जिथे लावले जातात तेथेच ते थांबत नाहीत. तर अशा करांचे संक्रमण घेत जाऊन शेवटी सर्वसमाजावर त्याचे न्याय पद्धतीने वितरण होत असते. दुसरा महत्त्वाचा गुण म्हणजे या सिद्धांतानुसार कर हे उत्पन्नाच्या वाढाव्यावर लावले जातात.

करभाराचे वितरण संपूर्ण समाज घटकावर होते हो या सिद्धांताचे प्रतिपादन अर्थातच काही गृहितावर आधारलेले आहे. त्यापैकी सर्वात महत्त्वाचे गृहितक म्हणजे बाजार हा पुरेसा स्पर्धात्मक असतो आणि उत्पादन घटक हे जलद व सहजपणे कोणत्याही विशेष खर्चाशिवाय एका वापरातून दुसऱ्या वापरात जाऊ शकतात. अशा परिस्थितीत प्रथम कर कोणावर आकारले जातात याला फारसे महत्त्व राहत नाही. कारण काळाच्या ओघात ते संक्रमित घेऊन सर्व समाजात पसरत असे असले तरी या सिद्धांतावर काही आक्षेप घेण्यात आले आहेत. डॉ. डाल्टन हे या सिद्धांताच्या प्रतिपादनाशी सहमत नाहीत. त्यांच्यामते ह्या सिद्धांताचा दृष्टिकोन म्हणजे कराचा भार आणि परिणाम यांचे निश्चितीतील मोठ्या कठीण अडचणीपासून दूर पळण्याचा प्रकार आहे. अर्थात काही कराच्या बाबतीत त्यांचे परिणाम व्यापक प्रमाणावर पसरतात. योग्य विश्लेषणाच्या दृष्टीकोनाचा वापर करून करभार व कराचे परिणाम यांचे अंदाज बांधणे शक्य व्हावे.

तसेच या सिद्धाताने करभार कसा आणि कोणत्या प्रमाणात वितरित होतो हे स्पष्ट केलेले नाही. म्हणजेच करारोपणातील न्यायाचा प्रश्न या सिद्धांताने लक्षात घेतलेला नाही. त्यामुळे आजच्या काळात हे मत कोणीही मान्य करणार नाही. आणखी एक महत्त्वाचा मुद्दा म्हणजे या सिद्धांतातील गृहित गोष्टी अवास्तव आहेत. उदा. बाजार प्रत्यक्षात पुरेसा स्पर्धात्मक नसतो. विविध कारणामुळे उत्पादन घटकही सहजरित्या गतीशील नसतात. त्यामुळे कर हे अर्थव्यवस्थेत पुर्णपणे प्रसारीत होतील अशी अपेक्षा करणे समर्थनीय नाही.

### ३) करसंक्रमणाचा आधुनिक सिद्धांत/मागणी पुरवठ्याचा सिद्धांत

**(Modern Theory Demand and Supply Theory) :**

कर संक्रमणाबाबतचा हा सिद्धांत सर्वाधिक मान्यताप्रत आहे. कर संक्रमणाचा हा सिद्धांत डॉ. मार्शल यांच्या मूल्य विश्लेषणावर आधारित आहे. या सिद्धांताची मांडणी वेगवेगळ्या स्वरुपात करण्यात आली आहे. त्यांच्यामध्ये काही मुद्दे, मांडणीची पद्धती व तर्काच्या काही बाबी या बाबतीत थोडासा भेद आहे. असे असले तरी करारोपणाच्या क्षेत्रात मुल्य सिद्धांताची तत्त्वे वापरण्याचे कार्य या सिद्धांतात करण्यात आले आहे. त्यांच्या आधारे करसंक्रमण आणि करभाराचे वितरण कसे होते हे स्पष्ट करण्यात आले आहे. या सिद्धांताचे स्पष्टीकरण अनेकांनी दिले असले तरी त्यामध्ये प्रामुख्याने प्रा. सोलिग्मन व प्र. एजवर्थ यांचा उल्लेख करावा लागतो.


करभाराचे संक्रमण हे वस्तु व सेवांच्या खरेदी-विक्रीच्या व्यवहारातून संक्रमित केले जातात. याचा अर्थ करभाराचे संक्रमण वस्तु व सेवांच्या किंमतीद्वारे संक्रमित करता येतात. वस्तु व सेवांच्या किंमती निश्चित करण्यामध्ये किंवा त्यामध्ये सुधारणा बदल करणे हे मागणी व पुरवठ्याच्या सापेक्ष लवचिकतेवर अवलंबून असते. त्यामुळे एकादया कराचे संक्रमण हे मागणी किंवा पुरवठा वक्रातील बदलाद्वारे केले जाते. आणि करभाराचे वितरण हे मागणी व पुरवठ्याच्या लवचिकते नुसार होते.

करसंक्रमणाचे यापुर्वी जे सिद्धांत मांडण्यात आले त्यामधील गुण आधुनिक सिद्धांतात समाविष्ट आहेत. त्यामधील एक प्रमुख तत्त्व म्हणजे सर्व कर प्रत्यक्षपणे करयोग्य आर्थिक आधिक्यावर आकारले जावेत. करदाता उत्पादक असो किंवा उपभोक्ता असो जर त्याला आर्थिक आधिक्य मिळत असेल तर कराचा भार सहन करतो अन्यथा तो कराचा भार दुसऱ्यावर ढकलण्याचा प्रयत्न करेल. आधुनिक सिद्धांतानुसार कर हा उत्पादन खचाृचा एक भाग होय. त्यामुळे कर हे वस्तूच्या उत्पादन किंवा विक्रीवर कर आकारण्यात येतो त्या वस्तूची किंमत वाढवून करदाता करभाराचे संक्रमात करण्याचा प्रयत्न करतो. थोडक्यात करभाराचे संक्रमण करण्यासाठी वस्तूची किंमत वाढविणे आवश्यक ठरते.

यावरुन हे स्पष्ट होते की करसंक्रमण आणि करभाराचे वितरण हे किंमत निश्चितीच्या प्रक्रियेवर अवलंबून असते. डॉ. भारती यांच्या मते कोणत्याही वस्तूची किंमत ही मागणी पुरवठ्याच्या समत्ते ठरत असते. म्हणजेच करभाराचे उत्पादक विक्रेता आणि उपभोक्ता यांच्यामधील वितरण हे मागणी पुरवठ्याच्या लवचिकतेवर अवलंबून राहते. जर वस्तूच्या मागणीची लवचिकता अधिक असेल तर विक्रेत्याला सहन करावा लागणारा कराचा भार मोठा राहिल आणि जर वस्तूच्या पुरवठ्याची लवचिकता अधि असेल तर उपभोक्याला सहन करावा लागणारा कराचा भार मोठा राहिल. प्रत्यक्षात वस्तूचा विक्रेता आणि उपभोक्ता यांच्यामध्ये करभाराचे वितरण हे मागणी व पुरवठा यांच्या लवचिकतेच्या गुणोत्तरावर अवलंबून असते. याचे अधिक स्पष्टीकरण पुढील आकृतीच्या ४.१.१ आधारे करता येईल.

आकृती क्र. ४.१.१: मागणी पुरवठ्याची लवचिकता आणि कारभाराचे वितरण. या स्पष्टीकरणासाठी

आकृती क्र. ४.१.१




विशिष्ट एक वस्तू आणि त्यावर प्रतिनग एका विशिष्ट एक वस्तू आणि त्यावर प्रतिनग एका विशिष्ट कराचे उदाहरण घेतले आहे. सुरुवातीला आपण असे समजू की या कराचा आघात हा विक्रेत्यावर आहे. आकृतीतील मम आणि पप हे त्यावस्तूचे मुळचे मागणी आणि पुरवठा वक्र आहेत. तसेच वस्तूची मूळची किंमत ‘नक’ इतकी आहे. आता या वस्तूवर प्रतिनगाला पप, इतका कर आकारला. तर पुरवठा वक्र पप वरुन प१प१ असा बदलतो. त्यामुळे वस्तूची किंमत नक वरुन न१ क१ इतकी होते. या न१ क१ किंमती पैकी न१ अ१ इतका भाग वस्तूच्या विक्रेत्याला आणि अ१ क१ इतका भाग सरकारला कररूपाने मिळाते. याचा अर्थ अ१ क१ या करभारापैकी म्हणजे वस्तूच्या मागणीतील प्रमाणशीद बदलाचे वस्तूच्या किंमतीतील प्रमाणशीद बदलाशी असलेले गुणोत्तर होय. ‘अ१ ब’ इतका भार हा विक्रेत्यावर पडतो आणि बक१ इतका भार उपभोक्त्यावर पडतो. कारण आता ते वस्तूला प्रतिनग न१ क१ इतकी किंमत देत आहेत.

‘अ१ क१’ या प्रतिनग करभाराचे अपभोक्ता आणि विक्रेता यांच्यामधील वितरण हे पुरवठ्याच्या लवचिकतेच्या मागणीच्या लवचिकतेशी असलेल्या गुणोत्तराने निश्चित झाले आहे. मागणीची लवचिकता (Ed) याचे सूत्र पुढीलप्रमाणे आहे.

$$\text{मागणीची लवचिकता} = \frac{\text{नन१} \;/\; \text{क१ ब}}{\text{अन} \qquad \text{नक}}$$

तसेच पुरठ्याची लवचिकता म्हणजे वस्तूच्या पुरवठ्यातील प्रमाणशीद बदलाचे किंमतीतील बदलाच्या प्रमाणाशी असलेले गुणोत्तर होय. याचे सूत्र पुढीलप्रमाणे आहे.

$$\text{पुरवठ्याची लवचिकता (Es)} = \frac{\text{न न}_१ \ /\text{ब अ}_१}{\text{अन}/ \ \text{नक}}$$

$$\text{म्हणून} \ \frac{\text{पुरवठ्याची लवचिकता (Es)}}{\text{मागणीची लवचिकता (Ed)}} = \left( \frac{\text{नन}_१ \ / \ \text{बअ}_१}{\text{अन} \ / \ \text{नक}} \right) / \left( \frac{\text{नन}_१ \ / \ \text{बअ}_१}{\text{अन} \ / \ \text{नक}} \right($$

$$= \frac{\text{क}_१ \ \text{ब}}{\text{ब अ}_१} = \frac{\text{उपभोकत्यावरील करभार}}{\text{विक्रेत्यावरील करभार}}$$

याउलट जर सदर कर हा उपभोक्त्यावर म्हणजे वस्तूच्या खरेदीदारावर बसविला तर त्याचा वस्तूच्या मागणीचा वक्र हा खालच्या बाजूला स्थानांतरीत येऊन तो म$_१$ म$_१$ होईल आणि खरेदीदार वस्तूची अ१ न१ इतकी किंमत विक्रेत्याला देईल व क१ अ१ इतका कर सरकारला देईल. पण करभाराचे वितरण हे वरीलप्रमाणेच होईल.

मागणी व पुरवठ्याची लवचिकता आणि करभाराचे वितरण याबाबतीत पुढीलप्रमाणे निष्कर्ष निघतात.

१) जर पुरवठ्याची लवचिकता आणि मागणीची लवचिकता समान असतील तर करभाराचे खरेदीदार आणि विक्रेता याच्यामध्ये समान वितरण होईल आणि वस्तूची किमंत कर रक्कमेच्या निम्याने वाढेल.

२) जेंव्हा पुरवठ्याची लचखिकतस हर मागणीच्या लवचिकतेपेक्षा अधिक असते तेंव्हा करभाराचा मोठा भाग हा खरेदीदारात सहन करावा लागेल. आणि वस्तूची किंमत कर रक्कमेच्या निम्याहून अधिक प्रमाणात वाढेल.

३) जेंव्हा पुरवठ्याची लवचिकता ही मागणीच्या लवचिकतेपेक्षा कमी असते तेंव्हा करभाराचा मोठा भाग हा विक्रेत्याला सहन करावा लागेल. आणि वस्तूची किंमत ही कर रक्कमेनिम्याहून कमी प्रमाणात वाढेल.

४) जर वस्तूची मागणी ही पूर्णपणे लवचिक असेल आणि त्याचा पुरवठा पूर्णपणे अवलवचिक असेल तर संपूर्ण करभार हा तीच राहील म्हणजेच किंमतीत बदल होणार नाही.

५) जर वस्तूची मागणी ही पुर्णपणे अलवचिक आणि वस्तूचा पुरवठा पुर्णपणे लवचिक असेल तर कराचा संपूर्ण भार हा खरेदीदारावर पडेल. आणि वस्तूची किंमत ही कराच्या रक्कमे इतकी वाढेल.

६) जर वस्तूंचा पुरवठा वक्र पूर्णपणे लवचिक आणि मागणी ही सापेक्षतेने अलवचिक असेल तर संपूर्ण करभार हा खरेदीदाराला सहन करावा लागेल.

७) जर वस्तूचा पुरवठा हा पूर्णपणे अलवचिक आणि वस्तूची मागणी लवचिक असेल तर संपूर्ण करभार हा विक्रेत्याला सहन करावा लागेल.

या संदर्भात असे म्हणता येईल की पूर्णपणे लवचिक मागणी ही क्वचीतच आढळते तर पूर्णपणे अलवचिक पुरवठा ही संकल्पनाही केवळ कल्पनात्मक आहे. म्हणून प्रत्यक्षात वस्तूवरील करभाराचे वितरण हे विक्रेते आणि खरेदीदार यांच्यामध्ये त्याच्या पुरवठ्याच्या आणि मागणीच्या लवचिकतेच्या बलानुसार होते.

**४.२.१.५ संक्रमण कर (निर्धारक घटक) (Factors determining tax - Shifting) :-**

**वस्तूवर आकारलेला कर पूर्णत: किंवा अंशत: संक्रमित होतो.** किंवा संक्रमित होतच नाही. कर संक्रमणाची ही प्रक्रिया अनेक व्यावहारिक व तात्वि घटकावर अवलंबून असते. त्या घटकांची थोडक्यात माहिती पुढीलप्रमाणे पहाता येईल.

**अ) व्यावहारिक घटक –** (Practical factors) कराचे संक्रमण हे काही व्यावहारिक घटकावर अवलंबून असते. या व्यावहारिक घटकामध्ये पुढील गोष्टींचा समावेश होतो.

**१) कराचे दर (Tax Rate) :-**

कराच्या दरावर कराचे संक्रमण अवलंबून असते. कराचे दर जेवढे जास्त असतील तेवढी विक्रेत्यामध्ये व खरेदीदारामध्ये त्याच्या भारापासून बचाव करण्याची प्रवृत्ती अधिक राहील परिणामी कराचे संक्रमण तेवढेच कठीण होईल. प्रगतशील दराने कर आकारले तर त्याचा भार वेगवेगळ्या व्यक्तीवर/संस्थावर भिन्न प्रमाणात पडतो. त्यामुळे त्यांचे संक्रमण सहजतेने होत नाही. वस्तूंवर जेव्हा एका विशिष्ट दराने कर आकरले जातात तेंव्हा कमी दर्जाच्या व कमी किंमतीच्या वस्तूवर अधिकभार पडतो. अशा स्थितीमध्ये त्याचे संक्रमण कठीण होते.

**२) कराचा आधार (Tax Base) :-**

ज्या करांचा आधार हा अधिक व्यापक असतो अशा करांचे संक्रमण अधिक सहजपणे घेते. कारण या प्रकारचा कर अत्यंत व्यापक आणि स्पर्धा करणाऱ्या तसेच वैकल्पिक वस्तु व क्रियापर्यंत पोहचलेला असतो त्यामुळे कर संक्रमणाच्या प्रयत्नाना मोठ्या प्रमाणावर आकर्षित करतात.

**३) कराचे स्वरूप (Nature of Tax ) :-**

कराचे स्वरुप कसे आहे यावर कराचे संक्रमण अवलंबून असते. कर व्यक्तीच्या उत्पन्नावर, संपत्तीवर ाहे की वस्तूंच्या उत्पादनावर विक्रीवर आहेत यावर त्यांचेी संक्रमण ठरते. व्यक्तीच्या उत्पन्नावर, संपत्तीवर कर आकारल्यास त्यांचे संक्रमण होत नाही. याउलट कर हे वस्तुंच्या उत्पादनावर किंवा विक्रीवर आकारले असतील तर त्यांचे संक्रमण करता येते.

### ४) कराचे क्षेत्र (Tax Area) :-

कर किती क्षेत्रासाठी लावला जातो त्याचीही करसंक्रमणात महत्त्वाची भूमिका असते. जर कर हा पूर्णपणे स्थानिक क्षेत्रासाठीचा असेल आणि तो मोठ्या प्रमाणात लावला असेल तर त्याचे संक्रमण काठीण होते. मात्र जर त्याचे दर कमी असतील तर फारशा अडचणी शिवाय त्याचे संक्रमण होऊ शकते. स्थानिक क्षेत्रासाठी लावलेल्या करांचे संक्रमण कठीण असते कारण लोक अशावेळी वस्तु बाहेरून खरेदी करण्याचा प्रयत्न करतात. स्थानिक करांच्या तुलनेत मोठ्या क्षेत्रासाठी किंवा देशव्यापी करांचे संक्रमण अधिक सहजतेने होऊ शकते. कारण अशा कराशी संबंधित आर्थिक व्यवहाराचे क्षेत्र फार विस्तृत असते.

### ५) सरकारची करनिती (Government's Tax Policy ) :-

सरकारची करनिती आणि करांचे संक्रमण यांचा अतिशय घनिष्ठ संबंध आहे. सरकार आपल्या करनितीद्वारे कराचा भार प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष रितीने कोणावर संक्रमित होईल हे ठरवून देते. तर करभार उपभोक्त्यांकडे संक्रमित होऊन त्यानीच तो सहन करावा असे सरकारचे धोरण असेल तर कर संक्रमण अनिवार्य ठरते. याउलट सरकारचे धोरण करसंक्रमण होऊ नये असे असेल म्हणजेच सरकार प्रत्यक्ष करांची आकारणी करत असेल तर त्यांचे संक्रमण होणार नाही. तसेच युद्धकाळात किंवा आणीबाणीच्या परिस्थितीत सरकार वस्तूंच्या किंमती, मजुरीचे दर, लाभाचे दर इत्यादीवर प्रतिबंध लावते तेंव्हा करांचे संक्रमण करणे शक्य होत नाही.

### ६) करदात्यांचे आर्थिक वर्ग (Economic Class of Tax Payers ) :-

करदाता समाजातीत कोणत्या आर्थिक वर्गातील आहे यावर कराचे संक्रमण सुलभ राहील की कठीण राहील हे अवलंबून असते. जर उत्पादक वर्गावर कर आकारले तर ते ढोक आणि किरकोळ व्यापाऱ्यांच्या माध्यमातून उपभोक्त्याकडे कराचा भार संक्रमित करतात. याचा अर्थ उत्पादक वर्गाला कर संक्रमण करण्याची संधी असते. याउलट उपभोक्ता वर्गावर कर लावल्यास त्याला तो संक्रमित करता येत नाही. त्यामुळे त्याला एकच वर्ग राहतो तो म्हणजे आपल्या वेतनात किंवा लाभात वाढ करण्याची मागणी करणे हा उपाय यशस्वी झाला नाही तर या वर्गाला कराचा भार सहन करण्याशिवाय दुसरा पर्याय शिल्लक राहत नाही या दोन वर्गांच्या मध्ये येणारे वर्ग आपल्यावरील कराचा भार पुढे किंवा मागे ढकलू शकातात.

### ७) वस्तूचा प्रकार (Kind of Commodity ) :-

ज्या वस्तूवर कर आकारला जातो तीवस्तू कोणत्या प्रकारची आहे यावर करसंक्रमण अवलंबून असते. म्हणजेच कर आधारलेल्या वस्तूला पर्यायी वस्तु आहे की नाही यावर करसंक्रमण अवलंबून राहतो. अत्यावश्यक वस्तूंवर कर आकारल्यास तर ते सहजतेने संक्रमित करता येतात. उदा मीठावरील कर याउलट कर आकारलेल्या वस्तूला पर्यायी वस्तु असेल व तिच्यावर कमी कर आकारले जात असतील तर कर संक्रमण करणे कठीण होते.

**ब) तात्विक घटक (Theoretical Factors) :-**

कर संक्रमण हे वस्तूच्या किंमतीमध्ये बदल करून होत असते. म्हणजेच किंमत हे कर संक्रमणाचे माध्यम असते. त्यामुळे वस्तूच्या किंमतीवर प्रभाव टाकरणारे घटक अत्यंत महत्त्वाचे ठरतात. वस्तूच्या किंमत निश्चितीवर जे घटक प्रभाव टाकतात अशा घटकांचा कर संक्रमणाच्या किंमत निश्चितीवर जे घटक प्रभाव टाकतात अशा घटकांचा कर संक्रमणाच्या तात्विक घटकामध्ये समावेश करण्यात येतो. यामधील प्रमुख घटकांची थोडक्यात माहिती पुढीलप्रमाणे पहाता येईल.

**१) मागणी व पुरवठ्याची लवचिकता (Elasticity of Demand and Supply ) :-**

कर संक्रमण आणि करभाराचे वितरण ठरविण्यामध्ये मागणी व पुरवठ्यांची लवचिकता महत्त्वाची भूमिका पार पाडतात. (मागणी व पुरवठ्याच्या लवचिकतेचा करभाराच्या वितरणावर होणारा परिणाम कर संक्रमणाच्या आधुनिक सिद्धांतामध्ये स्पष्ट केला आहे तो कृपया पहा.)

**२) उत्पादन खर्चाची स्थिती आणि स्पर्धेची परिस्थिती :-**

उत्पादन व्यायाचे वाढता उत्पादन खर्च, स्थिर उत्पादन खर्च आणि घटता उत्पादन खर्च असे तीन नियम आहेत. तर स्पर्धेच्या दृष्टिकोनातून पुर्णस्पर्धा, मक्तेदारी आणि मक्तेदारीयुक्त स्पर्धा या तीन महत्त्वाच्या अवस्था आहेत. त्यांचा करभार संक्रमणावर पडणारा प्रभाव पुढीलप्रमाणे थोडक्यात स्पष्ट करता येईल,

**३) पुर्णस्पर्धा (Perfect Competition ) :-**

पुर्ण स्पर्धेच्या परिस्थितीत वस्तूची किंमत उद्योगधंदा ठरवितो. यांचा वस्तूची एकूण मागणी व एकूण पुरवठा यांच्या समतोलातून किंमत ठरते. आणि ही किंमत सर्व उत्पादनसंस्था स्वीकारतात. पुरवठ्याच्या दृष्टीने विचार करता हे संक्रमण पुरवठ्याच्या लवचिकतेवर अवलंबून राहते. पुर्णस्पर्धेच्या परीस्थितीत वस्तूचे उत्पादन तीन उत्पादन व्यय नियमानुसार होत असते. या नियमांचा वस्तूंच्या किंमतीवर आणि पर्यायाने करभार वाटपावर होत असतो. तो पुढीलप्रमाणे असतो.

**१) वाढता उत्पादन खर्च आणि करभार वितरण :–**

वाढता उत्पादन खर्च नियमात जसजसे वस्तूचे उत्पादन वाढते तसतसा वस्तूचा सीमांत उत्पादन खर्च वाढू लागतो. अशावेळी वस्तू वर आकारल्यास वस्तूंची किंमत कररकमेपेक्षा कमी रकमेने वाढतो. ह्यामुळे कराच्या काही भागाचे खरेदीदारावर संक्रमण होऊ शकते.

**२) स्थिर उत्पादन खर्च आणि करभार वितरण :–**

स्थिर उत्पादन खर्च नियम अनुभवास येतो तेंव्हा पुरवठा वक्र हा पूर्णपणे लवचिक म्हणजे लक्ष असाल समांतर होतो. कररकमेइतकी वाढते. त्यामुळे संपूर्ण करभार हा खरेदीदारावर पडतो.

### ३) घटता उत्पादन खर्च आणि करभराचे वितरण :-

घटता उत्पादन खर्च अनुभवास येत असताना कर आकारल्यास वस्तूची किंमत करापेक्षा जास्त रकमेने वाढते. कारण कर आकारल्यामुळे वस्तुच्या मागणीतील घटी बरोबर वस्तूचा पुरवठा कमी होतो. त्यामुळे वस्तूचा सरासरी उत्पादन खर्च वाढतो. त्यामुळे या परिस्थितीत वस्तूच्या खरेदीदारावर कररकमेपेक्षा जास्त ओझे पडते.

### ब) मक्तेदारी आणि करभार वितरण :-

मक्तेदारीमध्ये विक्रेता एकच असून त्याला कोणीही स्पर्धक नसतो. त्यामुळे त्याचे पुरवठ्यावर पूर्ण नियंत्रण असते. मक्तेदारीत करभाराचे वितरण कसे होते हे लक्षात घेताना कराची आकारणी कशी होते हे विचारात घेतले पाहिजे. मक्तेदारीत पुढील तीन प्रकारे कर लावले जावू शकतात.

### १) उत्पादनाच्या प्रमाणानुसार कर :-

मक्तेदाराला उत्पादनाच्या प्रमाणात कर द्यावा लागत असेल तर सीमांत खर्च वाढत जातो. म्हणून पुर्वीच्या किंमतीला वस्तू विकणे तोट्याचे ठरते. मक्तेदाराचा प्रयत्न महत्तम नफा मिळविण्याचा प्रयत्न असतो. अशावेळी करभाराचे या वितरणात मागणी पुरवठ्याची लवचिकता महत्त्वाची ठरते. कर आकारणी केल्यानंतर खर्च वक्र वरच्या बाजूने स्थानांतरित होतात. त्यामुळे सीमांत प्राप्ती व सीमांत खर्च याच्या नव्या संतुलनाच्या आधारे मक्तेदारी उत्पादनाची मात्रा व किंमत निश्चित करतो. या परिस्थितीत काही करभार मक्तेदाराला सहन करावा लागतो. याचा अर्थ मक्तेदाराला जो अतिरिक्त नफा मिळत होता तो करआकारणीनंतर कमी होतो.

### २) निश्चित रकमेचा कर :-

निश्चित रकमेच्या करामुळे वस्तूचा सीमांत उत्पादन खर्च बदलत नाही. परंतू सरासरी उत्पादन खर्च वाढतो. जर कर आकारणी केल्यामुळे मक्तेदाराने पुरवठा कमी करून किंमत वाढविली तर त्याचा नफा कमी होईल. कारण अशावेळी सीमांत प्राप्ती व सीमांत खर्च हे समान असणार नाहीत. जेंव्हा हे समान असतात तेंव्हाच मक्तेदाराला महत्तम नफा मिळतो. अशावेळी करभार खरेदीदाररावर ढकलणे शक्य होत नाही. म्हणजे संपूर्ण करभार मक्तेदाराला सहन करावा लागतो.

### ३) उत्पादन वाढीबरोबर घटणारा कर आणि करभाराचे वितरण :-


जेंव्हा उत्पादन वाढीबरोबर कर कमी होत जातो तेंव्हा उत्पादन वाढीसाठी व उत्पादित वस्तूची किंमत कमी करण्यासाठी मक्तेदाराला एक प्रकारे प्रेरणा मिळत असते. या परिस्थितीत संपूर्ण करभार मक्तेदाराला सहन करावा लागतो. किंमत कमी आकारण्यामुळे मक्तेदाराच्या लाभाचा काही भाग खरेदीदाराकडे जातो. परंतू प्रत्यक्षात अशी कर आकारणी करणे कठीण असते.

### क) मक्तेदारीयुक्त स्पर्धा असताना करभार वितरण :-

पुर्ण स्पर्धा व मक्तेदारी या स्थिती प्रत्यक्षात कवचितच आढळून येतात. प्रत्यक्षात या दोन्हींचे कमी जास्त प्रमाणात मिश्रण असलेल्या आवस्था असतात. मक्तेदारीयुक्त स्पर्धेत खरेदीदार आणि विक्रेते अनेक असतात. विक्रेत्यामध्ये स्पर्धा असते आणि त्याच्या मालात थोडासा फरक असतो. तेंव्हा उत्पादनसंस्थेच्या उत्पादन व किंमत निर्णयाचा परिणाम इतर उत्पादन संस्थावर होत असतो. त्यामुळे मक्तेदारीयुक्त स्पर्धेत करभाराचे वितरण खरेदीदार आणि विक्रेते यांच्यामध्ये मागणी पुरवठयाच्या लवचिकतेनुसार होत असते. पण मक्तेदारीयुक्त स्पर्धेतील करसंक्रमण हे पुर्णस्पर्धेतील संक्रमणाप्रमाणे निश्चित स्वरुपाचे नसते तर त्यात बरीचशी अनिश्चितता असते.

### ४.२.१.६ करभाराचे मापन (Measurement of Tax Incidence) :-

प्रा. मसग्रेव्ह यांनी लॉरेंज वक्राच्या सहाय्याने करभाराचे मापन सुचविले आहे. त्याचे स्पष्टीकरण पुढील आकृती ४.१.२ च्या आधारे दिले आहे.




**आकृती ४.१.२. : लॉरेंज वक्र आणि करभाराचे मापन.**

वरील आकृती ४.१.२ मधील समांतर अक्षावर उत्पन्न प्राप्त करणाऱ्यांची शेकडेवारी आणि उर्ध्व अक्षावर उत्पन्नाची शेकडेवारी दर्शविली आहे. अक हा वक्र उत्पन्नाचे पुर्णपणे समान वाटप दर्शवितो. अलक हा सुरुवातीच्या उत्पन्न वाटपाचा लॉरेंज वक्र आहे. त्यावेळचा उत्पन्न वाटपाच्या समानतेचा सहगुणांक अलकब/अकब आहे. आता कर रचनेतील बदलामुळे किंवा खर्चातील बदलामुळे किंवा या दोन्ही म्हणजेच अंदाजपत्रकीय धोरणातील बदलामुळे लॉरेंज वक्रान बदल होतो. समजा तो अमक झाला.

ज्याद्वारे हे स्पष्ट होते की अंदाजपत्रकीय धोरणाच्या अंमलबजावणीमुळे उत्पन्न वाटपात बदल घडून आला. त्यामुळे उत्पन्न वाटपाचा सहगुणांक अमकब/अकब हा राहतो. अशावेळी करभाराचे मापन हे खालील गुणोत्तराच्या आधारे करता येते.

$$\text{ग} = \frac{\text{अमकब/अकब}}{\text{अलकब/अकब}} = \frac{\text{अमकब}}{\text{अलकब}}$$

जर 'ग' चे मूल्य हे एक पेक्षा मोठे असेल तर करभार हा प्रगतशील असतो. 'ग' चे मूल्य हे एक असेल करभार हा प्रमाणशीद असतो 'ग' चे मूल्य हे एक पेक्षा कमी असेल करभार हा प्रतिगामी असते.

मसग्रेव्ह यांच्यामते बऱ्याचदा करभार आणि परिणाम यांच्यामध्ये फरक करणे हे अतिशय कठीण असते. त्यामुळे या अंतिम निर्णय हा मसग्रेव्ह यांच्यामते आवडीचा मुद्दा असतो अर्थ काहीजण उत्पन्नाच्या वाटपावरील परिणामाला करभार समजू शकतात तर कहीजण त्याला कराचा परिणाम असे म्हणू शकतात. काही लेक त्याला अंदाजपत्रकीय धोरणाचा विरणात्मक परिणाम असे महणतात. याबाबतीत असे निदर्शनास आणल्यास आले आहे की करभाराची व्याख्या ही सरकार करभाराचे विश्लेषण करताना कोणते उद्दिष्ट डोळ्यासमोर ठेवते यावर अवलंबून असते. वेगवेगळी सरकारी याबाबतीत वेगवेगळी उद्दिष्टये ठेवू शकतात. मसग्रेव्ह यांच्यामते 'कल्याण' हे उद्दिष्ट ठेवले असेल तर दोन्ही म्हणजेच वितरणात्मक आणि उत्पादनावरील परिणाम हे करभारामध्ये समाविष्ट केले पाहिजेत.

### ४.२.२. करारोपणाचे सिद्धांत : (Theories of Taxation) :-

**प्रस्तावना :**

प्रत्येक मोठ्या प्रश्नांचे स्पष्टपणे आकलन होण्यासाठी लहान लहान भाग करून अभ्यास करणे उपयुक्त ठरते. त्यानुसार जरी करभाराचा विचार हा अंदाजपत्राकाच्या खर्चाच्या बाजू पासून वेगळा करता येत नसला तरी अभ्यासाच्या सोयीसाठी सरकारच्या खर्चापासून होणारे लाभ बाजूला ठेवून केवळ करभाराचा अभ्यास करता येईल. करभार आणि त्याचे समाजातील लोकामध्ये होणारे विभाजन याचा अभ्यास करताना काही गोष्टी आपण मनात ठेवल्या पाहिजेत. त्यापैकी पहिली गोष्ट म्हणजे कर हे सक्तीचे देणे असते आणि त्याच्या बदल्यात करदात्याला कोणत्याही विशिष्ट लाभाची अपेक्षा ठेवता येत नाही. याचा अर्थ सरकार पुरवित असलेल्या वस्तु अगर सेवांची जी किंमत आकारत असते त्यापेक्षा कर हा वेगळा असतो.

दुसरी गोष्ट म्हणजे कराच्या बाबतीत कराघात आणि करभार या दोन महत्त्वाच्या संकल्पना आहेत. कराचा आर्थिक भार सुरुवातीला ज्याच्यावर पडतो त्याचेवर कराघात झाला असे म्हणतात. परंतु ती व्यक्ती तो भार समाजातील इतर व्यक्तींवर ढकलु शकते. हा कराचा भार अंतिमत: ज्याचेवर स्थिरावतो त्याचेवर करभार पडला असे म्हणतात. करभाराचे अंशत: किंवा पूर्णत: संक्रमण शक्य असते. ते प्रामुख्याने मागणी व पुरवठ्याच्या लवचिकतेवर अवलंबून असते. इथे करारोपणाचा विचार करताना आपण करभाराचा

विचार करणार आहोत हे लक्षात ठेवले पाहिजे.

तिसरी गोष्ट म्हणजे प्रत्येक कराचे काही परिणाम होत असतात. ते फक्त करदात्याला होणाऱ्या तोट्याच्या बाबतीतच असतात असे नसून रोजगार उत्पन्नपातळी व उत्पन्नाचे वाटप इत्यादीवरही होत असतात. परंतु जेंव्हा आपण करभाराचे समाजातील लोकामध्ये होणारे वितरण अभ्यासतो तेंव्हा करांचे अर्थव्यवस्थेवर होणारे हे परिणाम बाजूला ठेवून केवळ करभाराचे समाजातील वितरण अभ्यासत असतो हेही लक्षात ठेवले पाहिजे.

करारोपणाबाबतचे सिद्धांत हे कर आकारणीच्या तत्त्वाहून सर्वार्थाने वेगळे नाहीत. तर ते करतत्त्वांचेच विशेष स्वरुप आहे. विशेषत: करआकरणीचे न्याय किंवा समतेचे तत्त्व प्रत्यक्षात अंमलात आणण्याच्या दृष्टीने त्यांचे अधिक विश्लेषण करून करारोपणासाठी जी तत्त्वे स्पष्ट करण्यात आली आहेत त्यातच करारोपणाचे सिद्धांत असे संबोधले जाते. निरनिराळ्या अर्थशास्त्रज्ञानी याबाबत वेगवेगळे सिद्धांत/तत्त्वे मांडली आहेत. त्यापैकी पुढील दोन तत्त्वांचा/दृष्टीकोनांचा अभ्यास आपल्याला करायचा आहे.

**४.२.२.१ करारोपणाचे लाभतत्त्व/लाभसिद्धांत (Benefit Principle) :-**

करारोपणाच्या लाभतत्त्वाचा उगम हा फार पुर्वीचा असुन त्याची मूळं ही राज्याच्या करार सिद्धांतात **(Contract Theory of State)** सापडतात. प्राध्यापक एकडविन आर. सेलिगमन यांच्यामते या सिद्धांताच्या विकासामध्ये अनेक विचारवंतानी, लेखकांनी योगदान दिले आहे त्यामध्ये प्रामुख्याने ग्रोटियस, हॉब्ज, लॉक, ह्यूम आणि रुसो यांचा समावेश आहे. १९ व्या शतकात यू. मॅझेलो, इमिल सॅक्स्, नट विकसेल, अँटोनियो डी. विटी. डी. मार्को यांनी तर विसाव्या शतकात इरिक लिंढाल, होवर्ड आर. बोवेन यानी या तत्त्वाचे स्पष्टीकरण देण्याचा प्रयत्न केला आहे.

या सिद्धांताचा मूलभूत आधार म्हणजे सरकार आणि जनता यांचेमध्ये कराराचे संबंध असतात. सरकार जनतेला विविध वस्तू आणि सेवा पुरविते आणि समाज अशा वस्तू व सेवांच्या खर्चपूर्तीसाठीची रक्कम सरकारला देतो. जे. एस. मील यांचे संकल्पनेनुसार सरकार आणि करदाते यांच्यामध्ये संबंध हे quid pro quo म्हणजेच देवाण घेवाणीचे असतात.

या दृष्टीकोनामध्ये उत्पन्न आणि संपत्तीच्या वाटपात समानता आणण्याचा प्रश्न लक्षात घेतलेला नाही. तसेच कर धोरणाच्या आर्थिक वृद्धी व आर्थिक स्थैर्य निर्माण करण्यासाठीच्या संभाव्य वापराचा विचार केलेला नाही. तर लाभतत्त्वाचा दृष्टीकोन हा लोकांना मिळालेल्या लाभाचा एका विशिष्ट पद्धतीने करारोपण करण्याचा आधार म्हणून वापर करतो. थोडक्यात खाजगी आणि सार्वजनिकरित्या वस्तु व सेवांचा कसा पुरवठा केला जाऊ शकतो याचे स्पष्टीकरण या सिद्धांताने देण्याचा प्रयत्न केला आहे.

हा सिद्धांत असे गृहित धरतो की उत्पन्न आणि संपत्तीचे वाटप हे योग्य आहे आणि त्यामध्ये बदल घडवून आणण्याची आवश्यकता नाही. अशा परिस्थितीत सरकारने पुरविलेल्या वस्तू आणि सेवांचा समाजातील

लोकांना मिळालेल्या लाभाचे आकलन व मोजमाप केले की करारोपण करता येते. परंतु लाभ/समाधान हे व्यक्तीगत बाब असल्याने त्याचे शास्त्रशुद्ध मापन करण्याची पद्धती अस्तित्वात नाही. त्यामुळे सर्वसाधारणपणे सामान्य ज्ञानाच्या आधारावरील एकादी पद्धती त्यासाठी वापरता येईल. उदा. लोकांना मिळालेले उत्पन्न हे त्यांना मिळालेल्या लाभाचा निदर्शक मानता येईल. असे गृहित धरता येते की शासनाच्या संरक्षण सेवेशिवाय अर्थव्यवस्था /समाजांचे अस्तित्व टिकून राहणे शक्य नाही. म्हणून असा निष्कर्ष काढता येतो की समाजातील व्यक्तींना मिळणारे उत्पन्न हे त्यांना सरकार कडून मिळणाऱ्या संरक्षणाच्या प्रमाणात असते. त्यामुळे लाभतत्त्वाचा मुख्य गाभा हा होता की शासनाकडून मिळणाऱ्या संरक्षणाबद्दल नागरिकांनी कर भरला पाहिजे.

अर्थात ही गोष्ट लक्षात घेणे महत्त्वाचे आहे की या मर्यादित अर्थाने केल्या जाणाऱ्या या तत्त्वाच्या बाबतीत अर्थशास्त्रांच्यामध्ये मतभिन्नता होती उदा. रूसो आणि सिस्मॉंडी यांचे असे प्रतिपादन होते की श्रीमंताना शासनाकडून अधिक संरक्षणाची गरज आहे. तर जे. एस.मील व अन्य विचारवंताचे असे म्हणणे होते की श्रीमंताडून होणाऱ्या शोषणापासून संरक्षण मिळण्याची गरिबांना अधिक गरज असते. याचा अर्थ एका गटाला वाटत होते की प्रगतशील करारोपणाची आवश्यक्ता आहे. तर दुसरा गट हा प्रतिगामी करारोपणाच्या बाजूचा होता.

आपल्याला असे दिसून येते की १९ व्या शतकात आणि विसाव्या शतकाच्या सुरूवातीला राज्याच्या वितीय व्यवहारांचे पर्याप्त प्रमाण आणि करभाराचे पर्याप्त वितरण यांचे स्पष्टीकरण देण्यासाठी अर्थशास्त्रज्ञ यू. मॅझोला यांनी खाजगी वस्तू आणि सार्वजनिक वस्तू यांच्यातील भेद स्पष्ट केला. ते म्हणतात की सार्वजनिक वस्तुंचा उपभोग सर्व उपभोक्ते घेतात. म्हणजेच अशा वस्तूंच्या बाबतीत वर्जन तत्त्व लागू करता येत नाही. त्यामुळे कराचे न्याय तत्त्व असे म्हणणार नाही की सर्व करदात्यांनी सार्वजनिक वस्तूसाठी सारखाच कर भरावा. तर सर्व करदात्यांनी सर्व करदात्यांनी त्यांना सार्वजनिक/सरकारी सेवापासून प्राप्त होणाऱ्या सीमांत उपयोगितेच्या प्रमाणात कर भरावा. याउलट ऑस्ट्रीयन अर्थशास्त्रज्ञ इमिल सॅक्स १८८७ मध्ये असे प्रतिपादन करतात की ज्या सार्वजनिक वस्तूंच्या बाबतीत वर्जन तत्त्व लागू करता येत नाही. म्हणजेच कोणताही उपभोक्ता अशा सेवेच्या लाभापासून वंचित राहत नाही. तेंव्हा करदात्यांना हे मान्य करावे लागेल की त्यांना सार्वजनिक सेवा पासून मिळसणाऱ्या सापेक्ष लाभाच्या प्रमाणात कर दिला पाहिजे. या संदर्भात त्यांनी प्रमाणशीद उत्पन्न कर सुचविला होता.

स्वीडीश अर्धशास्त्रज्ञ नट विकसेल यांनी १८८६ मध्ये हा सिद्धांत नैतिक आधारावर मांडला. त्यांच्यामते कर आकारण्याची ही चांगली पद्धती आहे कारण ती सरकारी सेवा स्वीकारायची की नाही याबाबत करदात्याला मुभा/स्वातंत्र्य देते. त्यांच्या प्रतिपादनाचा मुख्य गाभा हा होता की कर पद्धती ही ऐच्छिक आणि एकमताच्या कृती आधारलेली असली पाहिजे. परंतु आपल्याला हे लक्षात घेतले पाहिजे की कर पद्धती ही ऐच्छिक दृष्टीकोनावर ठेवल्यास उत्पन्न व संपत्तीच्या वाटपात समानता आणण्याच्या कराच्या

भूमिकेचा त्याग करावा लागेल. त्यामुळे विकसेल हे मान्य करतात की त्यांचा हा सिद्धांत लागू करण्यासाठी प्रथम उत्पन्न वाटप हे समानेच्या आधारावर झालेले असले पाहिजे. करदात्याना निवड स्वातंत्र्य देताना आणखी एक अडचण निर्माण होते. ती म्हणजे करदात्यांना आपली सरकारी सेवाबाबत आपले खरे खुरे मागणीपत्रक व्यक्त करण्याची प्रभावी यंत्रणार नाही.

१८८८ मध्ये इटालियन अर्थशास्त्रज्ञ ॲटानिओ डी. विटी डी. मार्को यांनीही या सिद्धांताचे इमिल सॅक्स् यांच्या विचाराशी मिळतेजुळते स्पष्टीकरण दिले आहे. त्यांच्यामते नागरिक आपल्या उत्पन्नाच्या प्रमाणात सरकारी सेवांचा लाभ घेतात. त्यामुळे त्यांनी प्रमाणशीद करारोपणाचे समर्थन केले. परंतु याबाबतीत ते उत्पनाच्या सीमांत उपयोगितेबद्दलचा प्रश्न उपस्थित करतात. ज्यांचे उत्पन्न जास्त असते त्यांनी अधिक कर दिला पाहिजे. परंतु त्यांच्या उत्पन्नाची सीमांत उपयोगिता कमी असते. परिणामी मार्कोही ॲडमस्मिथ प्रमाणे लाभ दृष्टिकोन आणि त्यागाचे समान वाटप यांचे मिश्रण सुचवितात. श्रीमंतानी अधिक कर दयावा याचे कारण ते सरकारी सेवांचा अधिक लाभ घेतात हे नाही तर त्यांच्या कर देण्यामध्ये कमी त्याग सामावलेला असतो. हे असते.

१९१९ मध्ये एरिक लिंडाल यांनी आपल्या स्वेच्छा विनिमय प्रमेयाच्या द्वारे लाभतत्त्वाचे अधिक औपचारिक व ठोस स्वरुपाचे स्पष्टीकरण दिले आहे. त्यांनी करदेयताच्या मोबदल्यात ज्यांना सरकारी सेवाबाबत पसंती व्यक्त करण्याचे स्वातंत्र्य आहे अशा दोन करदात्याच्या संदर्भात या तत्त्वाची चर्चा केली आहे. दुसऱ्या शब्दात सांगावयाचे झाल्यास हे एक प्रकार सरकारला भरलेला कर आणि प्राप्ट झालेली सरकारी सेवा यांच्यातील स्वेच्छा विनिमयाचे स्पष्टीकरण आहे. दोन व्यक्तींचा समाज आहे असे मानून त्यांनी राज्याच्या व्यवहारांची पर्याप्त पातळी आणि दोन व्यतीमधील करभाराचे संतुलित वितरण यांचे स्पष्टीकरण देण्याचा प्रयत्न केला आहे. लिंडाल यांनी उत्पन्नाच्या समान वितरणाची समस्या दुर्लक्षित करून जसे उत्पन्न वाटप झाले आहे तसे लक्षात घेऊन पुढील तीन प्रश्नांची उत्तरे देण्याचा प्रयत्न केला आहे. पहिला प्रश्न म्हणजे सरकारच्या वितीय व्यवहाराची म्हणजेच उत्पन्न आणि खर्चाची पातळी कोणती असावी? दुसरा प्रश्न हा एकूण सार्वजनिक खर्चाचे विविध वस्तू व सेवांमध्ये वाटप कसे करावयाचे? आणि तिसरा प्रश्न म्हणजे करदात्यामध्ये कराचा भार कसा वितरीत करायचा?

**लाभ तत्त्वाचे परिक्षण :**

करभाराच्या वितरणाबाबतच्या लाभ तत्त्वाचे / सिद्धांताचे गुण पुढीलप्रमाणे सांगता येतील.

१) या तत्त्वाचे महत्त्वाचे वैशिष्टय म्हणजे सार्वजनिक सेवापासून मिळणाऱ्या लाभामुळे करारोपणाची समर्थनीयता सिद्ध झालेली आहे.

२) जेंव्हा सरकारी सेवेपासून मिळणारा लाभ मोजता येतो तेंव्हा लाभानुसार कर आकारणी करणे शक्य होते.

३) लाभतत्त्वामध्ये राजकोषीय व्यवहारांची उत्पन्न आणि खर्च अशी अंगे एकत्रित विचारात घेतली आहेत. त्यामुळे लाभांश व करांश एकाच वेळी निश्चित केली जातात.

**लाभ सिद्धांताच्या मर्यादा :–**

लाभतत्त्वाचे वरील गुण असले तरी हे तत्त्व स्वीकार्य होऊ शकत नाही. कारण या तत्वाला पुढील महत्त्वाच्या मर्यादा आहेत.

**१) कर ही किंमत नसते :–** लाभतत्त्वाची सर्वात महत्त्वाची आणि मूलभूत मर्यादा म्हणजे नागरिकांनी सरकारी सेवांच्या तरतुदीसाठी दिलेले योगदान हे काटेकोरणे कर म्हणता येत नाही. तर त्याचे स्वरुप नागरिकांनी त्यांना पुरविलेल्या सरकारी सेवांबद्दल स्वच्छेने दिलेली किंमत असे असते. त्यामुळे त्याला कर असे संबोधता येणार नाही

**२) लाभ मापनातील अडचण :–** समाजातील नागरिकांच्या सरकारी सेवापासून मिळालेल्या लाभाचे व्यक्तीगत पातळीवर मापन करणे अत्यंत कठीण आहे. विविध प्रकारच्या गुंतागुंतीच्या सेवांचा व्यक्तीला मिळणारा लाभ मोजता येतो असे हा सिद्धांत गृहित धरतो. परंतू हे गृहितक अवास्तव आहे लाभाचे प्रतिनिधीत्व करण्यासाठी कोणतेही प्रॉक्सी घेतल्यास ते अचूक ठरत नाही.

**३) कल्याणकारी सेवा :–** सरकार सामाजिक कल्याणाच्या उद्देशाने सार्वजनिक सेवा उपलब्ध करूनदेते. म्हणजेच अशा सेवा पुरविण्यामागे व्यक्तीगत लाभ हा उद्देश नसतो. उदा. संरक्षणासारख्या सेवेचा खर्च मोजता येतो पण त्याचा सामाजिक किंवा व्यक्तीगत लाभ मोजणे अशक्य आहेत.

**४) प्रतिगामी स्वरूप :–** सरकारने पुरविलेल्या काही सेवांचा लाभ श्रीमंत आणि गरिबांना सारखाच होतो. लाभतत्त्वानुसार कारारोपण केल्यास दोन्ही प्रकारच्या लोकांना सारखेच कर बसवावे लागतील. त्यामुळे असे कर प्रतिगामी ठरतात.

**५) अन्यायाची शक्यता :–** लाभ तत्त्वाचा वापर केल्यास करपद्धतीत न्यायापेक्षा अन्याय होण्याची शक्यता अधिक आहे. कारण काही सामाजिक सेवांचा लाभ गरिबांना जास्त होतो. अशावेळी लाभ तत्त्वानुसार कर आकारणी केल्यास गरिबाकडून जास्त कर गोळा करावे लागतील. उदा. पेन्शनर लोकांकडू संपूर्ण पेन्शन कररूपाने वसुल करावी लागेल.

**६) सेवाचे बदलते स्वरूप :–** सरकारकडून पुरविल्या जाणाऱ्या सेवांचे पुर्वी मर्यादित स्वरूप होते. परंतु आलिकडील काळात सरकारी सेवांचे स्वरुप अत्यंत व्यापक झाले आहे. त्यामुळे करारोपणाचे दृष्टीने लाभतत्त्वाचा उपयोग करणे अत्यंत कठीण आहे.

**७)** राजस्वात उत्पन्न आणि संपत्तीचे वाटपाचा प्रश्न फार महत्त्वाचा असतो. तसेच आर्थिक स्थैर्याचा प्रश्न ही महत्त्वाचा असतो. लाभतत्त्व या दोन्ही प्रश्नाकडे फारसे लक्ष देत नाही.

**८) मर्यादित वापर :** लाभतत्त्वाचा वापर फार मर्यादित प्रमाणात करता येतो. ज्या सेवांच्या बाबतीत लाभाचे मोजमाप शक्य असते तिथे हे तत्त्व लागू करता येते. उदा. एकादा रस्ता/पूल बांधला असेल तर त्याचा वापर करणाऱ्यावर कर आकारता येईल. पर त्याचा राष्ट्रीय करपद्धतीचे एक मूलभूत तत्त्व म्हणून स्वीकार करता येत नाही.

**९) कल्याणकारी राज्याची संकल्पना :** स्वीकारण्यात आली आहे. त्यामुळे समाजाच्या कल्याणाच्या महत्तमीकरण्यासाठी सरकारला विविध सार्वलनिक सेवा जनतेला पुरवाव्या लागतात. आधुनिक काळात राज्यवित्तीय व्यवहारांचा सामाजि –आर्थिक उद्दिष्ये साध्य करण्यासाठी उपयोग केला जातो करआकरणीचे लाभ तत्त्व हे त्यांच्याशी विसंगत ठरते.

**समारोप :** पुर्वी शासनाच्या मर्यादित कार्यक्षेत्रांच्या पद्धतीत हे तत्व उपयुक्त समजले जात होते. परंतु अलिकडील काळात शासनाच्या कार्यक्षेत्रात झालेल्या बदलामुळे हे तत्त्व कालबाह्य झालेले आहे. असे असले तरी समाजातील संपन्न वर्गासाठी सरकारने उपलब्ध करुन दिलेल्या विशिष्ट सेवांच्या बाबतीत करारोपणासाठी लाभतत्त्वाचा घेणे योग्य ठरेल.

**४.२.२.२. करदेय क्षमता तत्त्व (Ability to Pay Principle of Taxation) :–**

**प्रस्तावना :**

करदात्यामध्ये कारभाराचे न्यायपुर्ण रितीने विरतण झाले पाहिजे हे एक सर्वसाधारण तत्त्व आहे. न्याय कर याचा अर्थ नागरिकांकडून त्याच्या आर्थिक क्षमतेप्रमाणे घेतलेले कर असा होतो. कर म्हणजे कोणत्याही प्रत्यक्ष लाभाची अपेक्षा न ठेवता सक्तीने सरकारला नागरिकांनी दिलेले योगदान होय. हा कराचा खरा अर्थ या तत्त्वाने लक्षात घेतला आहे. त्यामुळे हे तत्त्व सरकार आणि नागरिक यांच्यामध्ये व्यापारी किंवा निम–व्यापारी संबंध असतात हे असे मानत नाही. या तत्त्वानुसार व्यक्तीने सरकारला कर दिला पाहिजे कारणतिला तो भरता येतो. आणि व्यक्तीचा एकूण कारभारातील हिस्सा हा तिच्या सापेक्ष करदेय क्षमतेवरुन ठरेल. अ‍ॅडमस्मिथ यांच्या ‘समता’ तत्वात हा विचार आहे. तरी सुद्धा त्यांचा मुख्य भर हा लाभतत्वावरच होता. करदेय क्षमतेचे प्रभावी समर्थन करण्याचे श्रेय जे–एस मील यांचेकडे जाते. त्यांच्यामते ‘सर्वाना समान कायदा’ हे सरकारच्या कारभाराचे सूत्र असले पाहिजे म्हणून करबाबतही सर्वाना समान नियम लागू केला पाहिजे. करांची समानता याचा अर्थ त्यागाची समानता असा होतो. जेंव्हा सामान्य हितासाठी सर्वांना समान त्याग करावा लागतो तेंव्हाच कराचे न्याय वितरण झाले होते असे मिलने प्रतिपादन केले आहे.

**करदेयक्षमता तत्त्व :**

सेलिगमन यांच्यामते'' करदेय क्षमता तत्त्वाचा मुख्य मुद्दा हा आहे की, समाजातील विविध घटका मध्ये करांचे ओझे अशा रितीने विभागले जावे की ते न्याय आणि समता तत्त्वाशी सुसंगत असेल. आणि

समता तत्त्वाची अंमलबजावणी तेंव्हाच होईल जेंव्हा करांचे ओझे करदात्यांच्या सापेक्ष क्षमतेनुसार निश्चित केले जाते.

एजवर्थ आणि पिगू यांनी या तत्त्वाचे स्पष्टीकरण देताना करविभागणीत समता तत्त्वाबरोबर कल्याणावर (Welfare aspect) भर दिला. पिगू आणि नंतर डाल्टन यांनी 'कर आकारणी व सार्वजनिक खर्च विचार करून क्षमता तत्त्वाची व्यापक स्वरूपातील मांडणी केली आहे.

**ज्ञ) १) मनोवैज्ञानिक आधार :**

करदेय क्षमता तत्त्वाचे मनोवैज्ञानिक आधारावर समर्थन केले जाते. कर दिल्याचा करदात्यांच्या मनावर परिणाम होतो म्हणजेच कर भरल्यामुळे आपण त्याग केल्याची मनोभावना निर्माण होते. या संदर्भात प्रत्येक करदात्याला आपण समान त्याग केल्याची अनुभूती वाटली पाहिजे, करदेय क्षमता तत्त्वाच्या आधारे करारोपण केल्यास प्रत्येक्ष करदात्याला आपल्या क्षमतेनुसार कर भरावा लागतो. त्यामुळे साहजिकच सर्व करदात्याना आपण समान त्याग करीत आहोत असे वाटते.

**२) उत्पन्नाची घटती सीमांत उपयोगिता :**

व्यक्तीच्या उत्पन्नात जसजशी वाढ होत जाते तसतशी त्यापासून मिळणारी सीमांत उपयोगिता घटत जाते. त्यामुळे समान त्यागाची प्रतिस्थापना करण्यासाठी ज्याचे उत्पन्न जास्त आहे त्याचेवर अधिक कर आणि ज्याचे उत्पन्न कमी आहे त्याचेवर कमी कर बसविला पाहिजे. तसेच अतिगरीब लोकांवर आकारला जाऊ नये कारण त्यांची करदेयक्षमता नसते.

**३) आर्थिक सामर्थ्य :**

व्यक्तीचे आर्थिक सामर्थ्य हे उत्पन्न, मालमत्ता किंवा संपत्ती यावर अवलंबून असते. त्यामुळे व्यक्तीच्या आर्थिक सामर्थ्यानुसार कर आकारणे न्याय ठरते. यासंदर्भात हॉब्सनने आर्थिक आधिक्य (Economic Surplus) ची संकल्पना मांडली आहे. व्यक्तीच्या उत्पन्नाच्या ज्या भागावर कर आकारता येतो त्याला आर्थिक आधिक्य असे म्हणता येते. त्यामुळे असे आर्थिक आधिक्य जितके जास्त तितकी कर भरण्याची क्षमता जास्त असते. म्हणून आर्थिक आधिक्यानुसार कर आकारणे न्यायाचे ठरते.

**करदेय क्षमतेचे मापन/करदेय क्षमतेचे निर्धारक घटक :-**

करदेय क्षमता मापनाच्या बाबतीत दोन दृष्टीकोन स्वीकारले जातात ते पुढीलप्रमाणे आहेत.

**१) वस्तूनिष्ठ दृष्टिकोन (Objective Faculy Principle) :-**

या दृष्टिकोनानुसार करभार वितरण रचना ही काही वस्तूनिष्ठ निकषावर अवलंबून असली पाहिजे. यासंदर्भात आपण ज्याच्या आधारे नागरिकांची सापेक्ष करदेय क्षमता निश्चित करता येईल असा एकदा करदेयक्षमता निश्चित करता येईल असा एकदा करदेयक्षमता निर्देशांक विचारात घेऊ शकतो. याबाबतीत

खालील तीन निर्देशांक आहेत.

**अ) उत्पन्न (Income)** :- व्यक्तीचे उत्पन्न हा त्याच्या करदेय क्षमतेचा एक महत्त्वाचा मानय्यताप्राप्त निदर्शक मानता येतो. ज्या नागरिकांचे उत्पन्न जास्त आहे त्यांनी जास्त कर भरावा असे मानता येते. ॲडम स्मिथ यांनी कर कसोट्यांची चर्चा करताना असे प्रतिपादन देताना आपल्या क्षमतेच्या म्हणजेच सरकारच्या संरक्षणांतर्गत प्राप्त करीत असलेल्या उत्पन्नाच्या प्रमाणात दिले पाहिजे. याचा अर्थ या दृष्टिकोनानुसार ज्याचे उत्पन्न अधिक आहे त्याने अधिक कर भरला पाहिजे.

उत्पन्नाच्या आधारे कर आकारताना पुढीलबाबी लक्षात घेतला पाहिजेत.

अ) उत्पन्नवर कर आकारताना तो केवळ निव्वळ उत्पन्नावर आकारला जावा. याचा अर्थ उत्पन्न मिळविण्यासाठी करण्यात आलेला खर्च हा उत्पन्नातून वजा करावा.

ब) किमान राहणीमान खर्चाचा विचार करून एक विशिष्ट मर्यादेपर्यंतचे उत्पन्न हे कररहित उत्पन्न (करमाफ उत्पन्न) समजले जावे.

क) करदेय क्षमतेचा निदर्शक म्हणून उत्पन्नाचा विचार करताना उत्पन्नाचे स्वरूप-अर्जित की अनर्जित आहे हे लक्षात घ्यावे. जर उत्पन्न अनर्जित स्वरूपाचे (व्याज, लाभांश, भांडवली नफा इ.) असेल तर त्यावर अधिक कर आकारले जावेत.

ड) करदेय क्षमतेचा निदर्शक म्हणून व्यक्तीच्या उत्पन्नाचा विचार करताना उत्पन्नाबरोबरच व्यक्तीवर असलेल्या जबाबदाऱ्यांचाही विचार करावा लगेल. कारण समान उत्पन्न असलेल्या व्यक्तींवर भिन्न-भिन्न जबाबदाऱ्या असू शकतात.

इ) उत्पन्न हे करदेय क्षमतेचा निर्दशक मानून कर आकारणी करताना त्याचे व्यक्तीच्या काम करण्याच्या इच्छा आणि शक्तीवर होणारे प्रतिकूल परिणामही विचारात घेतले पाहिजेत.

**ब) संपत्ती (Property) :-**

व्यक्तीजवळ असलेली संपत्ती हा व्यक्तीच्या करदेयक्षमतेचा दुसरा महत्त्वाचा निदर्श मानला जातो. संपत्ती म्हणजे जमीन, इमारत, दागदागिने इत्यादी होय. अडचणीच्या वेळी अथवा विविध धोक्याविरोधी सुरक्षितता पुरविण्याचे काम संपत्ती करत असते. त्यामुळेच पुर्वी व्यक्तीचे आर्थिक सामर्थ्य हे तिच्याजवळील संपत्तीवरुन ठरत असे. म्हणून संपत्ती हा करदेच क्षमतेचा एक मापदंड मानला जात असे. ज्या व्यक्तीकडे संपत्ती अधिक त्या व्यक्तीवर अधिक कर लावावा.

परंतु करदेय क्षमतेचा निदर्शक म्हणून 'संपत्ती' चा वापर करताना काही अडचणी/मर्यादा निर्माण होतात. उदा व्यक्तीजवळ असणाऱ्या संपत्तीचे बाजारमुल्य मापणे कठीण असते. उदा. जमीन इमारत. इत्यादी. तसेच अशा संपत्तीचे मुल्य शहरी व ग्रामीण भागात वेगवेगळे असते. शिवाय संपत्तीपासून मिळणारे

उत्पन्न हे अनिश्चित किंवा चढउतार होणारे असते. त्याशिवाय समान संपत्ती असलेल्या व्यक्तीवरील जबाबदारी सारखीच असेल असे नाही. त्यामुहे 'संपत्तीचा' करदेय क्षमतेचा निदर्शक म्हणून उपयोग करताना अडचणी उद्‌भवतात.

**क) उपभोग खर्च (Consumption Expenditure) :-**

अलिकडील नागरिकांचा उपभोगखर्च हा करदेय क्षमतेचा एक वस्तूनिष्ठ निदर्शक मानला जातो प्रा. आयर्विंग फिशर आणि प्रा. कॅल्डॉर यांनी या निदर्शकावर भर दिला आहे. प्रा. कॅल्डॉर यांच्यामते उत्पन्न व संपत्ती हे करदेय क्षमतेचे खरे मापदंड नव्हेत तर उपभोगखर्च हाच खरा मापदंड आहे. कारण उत्पन्न व संपत्तीचे रूपांतर उपभोगात होते तेंव्हाच व्यक्तीचे आर्थिक कल्याण होते. म्हणून व्यक्तीला उपभोग खर्च हाच तिच्या करदेयक्षमतेचा निर्धारक घटक होय. निदर्शकाच्या समर्थनार्थ खालील मुद्दे मांडले जातात.

१) उपभोग खर्च म्हणजेच अर्थव्यवस्थेतील साधनसामग्री काढून घेणे किंवा वापरात आणणे प्रमाणात काढून घेणे तिने सरकारला अधिक कर देणे न्याय ठरते.

२) उत्पन्नावर कर आकारल्यास लेक कमी उत्पन्न दाखवून चुका करण्याचा प्रयत्न करतात. त्यामुळे चुकविलेल्या उत्पन्नावरील सरकारचा महसूल बुडतो. उपभोग खर्चाच्या बाबतीत उत्पन्न लपवण्याचा व परिणामी करचुकवेगिरी करण्याचा प्रश्‍न निर्माण होत नाही.

३) ज्या व्यक्ती चैनीच्या, विलासी वस्तूवर खूप मोठ्या प्रमाणावर खर्च करतात त्यांची साहजिकच करदेय क्षमता मोठी असते. त्यामुळे अशा व्यक्तीवर अधिक प्रमाणात कर आकारणे योग्य ठरते.

४) करआकारणी करताना लोकांच्या उत्पन्नाचे विविध मार्ग शोधणे हे कठीण काम असते. उपभोग खर्च मात्र सहजासहजी शोधता येतो. म्हणून तो व्यक्तीच्या करदेय क्षमतेचा निदर्शक ठरतो.

५) विकसनशील देशामध्ये उपभोग खर्चावरील करआकरणीचा एकजादा फायदा असतो. अशा देशात लोकांची सीमांत उपभोग प्रवृत्ती अधिक असते. ह्यामुळे उत्पन्नातील वाढीबरोबर उपभोगावरील खर्च वाढतो. लेक वाढलेल्या उत्पन्नाचा बराच मोठा भाग दागदागिने, जमीन, प्लॉट, बंगले इत्यादीवर खर्च करीत असतात. अशा उपभोग खर्चावर अधिक कर आकारून सरकारला अधिक महसूल जमा करता येतो.

**मर्यादा :**

१) कर आकारणीसाठी 'उपभोगखर्च' हा कायदेयक्षमतेचा निदर्शक म्हणून वापरात आणावयाचा झाल्यास जे लोक आपल्या उत्पन्नाचा मोठा भाग बचत व गुंतवणूकीसाइी वापरतात ते करभारापासून वाचतात. असे होणे हे समता तत्वाच्या विरोधी ठरते.

आकृती क्र. ४.२.२ : समान सीमांत त्याग

२) उपभोग खर्चासंबंधीची माहिती/आकडेवारी उपलब्ध होण्यातील अडचणी 'उपभोग खर्च' करदेयक्षमतेचा निदर्शक म्हणून वापरण्यावर मर्यादा घालतात.

३) वेगवेगळ्या लोकांच्या राहणीमानाची पातळी वेगवेगळी राहते. त्यामुळे उच्च उपभोग खर्चावर अधिक कर आकारणे अयोग्य किंवा बेकायदेशीर ठरण्याची शक्यता असते

**समारोप** - सर्व साधारणपणे लोकांच्या कायदेयक्षमतेच्या मानपाचा उत्पन्न' हाच सर्वात महत्त्वाचा आणि समाधानकारक निदर्शक मानला जातो. आणि संपत्ती व उपभोग खर्च हे करदेय क्षमतेच्या मापनाचे पूरक निदर्शक मानता येतात.

**२) व्यक्तीनिष्ठ दृष्टिकोन (Subjective Approach) :-**

हा दृष्टिकोण करदात्यांच्या कर भरल्याबद्दलच्या मानसिक प्रतिक्रियावर आधारलेला आहे. कर भरल्यामुळे करदात्याला त्याग करावा लागतो. हा त्याग करआकारणीचा वास्तवभार असतो. त्यामुळे तो त्याग प्रत्येक करदात्याच्या बाबतीत समान असला पाहिजे. करारोपणात समानता याचा अर्थ करदात्यांच्या त्यागाची समानता होय. म्हणून करभाराचे विरतण अशापद्धतीने झाले पाहिजे की प्रत्येक करदात्याला समान त्यागाची अनुभूती झाली पाहिजे. याचा अर्थ करारोपणात न्यायपूर्ण समानता प्रस्थापित होण्यासाठी एकाच प्रकारच्या आर्थिक परिस्थितीत राहणाऱ्या लोकांशी कर आकारताना भिन्न-भिन्न व्यवहार केला पाहिजे. याचा अर्थ जे आर्थिक सुस्थितीत आहेत त्यांचेवर अधिक करभार आणि ज्यांची आर्थिक स्थिती साधारण आहे त्यांचेवर कमी करभार पडेल अशी कर आकारणी केली पाहिजे. थोडक्यात हा दृष्टिकोण असे प्रतिपादन करतो की सर्व कर दात्यांनी समान त्याग केल्यास करभाराचे न्याय वितरण झाले असे म्हणता येते. समान त्याग या संकल्पनेचा अर्थ स्पष्ट करण्यासाठी तीन वेगवेगळ्या संकल्पना मांडल्या जातात.

**१) समान एकूण त्याग (Equal Absolute Sacrifice) :-**


समान एकूण त्याग प्रस्थापित व्हायचा असेल तर प्रत्येक करदात्यावर कर आकारणीमुळे पडणारा एकूण वास्तव भार हा सारखाच असला पाहिजे. करदात्यावरील वास्तव भार म्हणजे कर दिल्यामुळे करदात्याला उपयोगितेचा जो त्याग करावा लागतो तो होय. समान एकूण त्याग तत्वाला हे अभिप्रेत अ प्रत्येक करदात्याने केलेला एकूण उत्पन्न उपयोगिता त्याग समान असला पाहिजे. याचा अर्थ कर भरण्यापुर्वीची उत्पन्न उपयोगिता आणि कर भरल्यानंतरची उत्पन्न उपयोगिता यामधील फरक हा प्रत्येक करदात्याच्या बाबतीत सारखाच असला पाहिजे. पुढील उदाहरणाच्या साहाय्याने याचे अधिक स्पष्टीकरण देता येईल.

समजा 'आर' आणि 'पी' या दोन व्यक्तींना समाज आहे. आता या संदर्भात समान एकूण त्याग तत्त्वाची मांडणी पुढीलप्रमाणे करता येईल.

$(U(Y) - U(Y-T)_A = (U(Y-T)_B$

यामधील म्हणजे U उपयोगिता, Y म्हणजे एकूण उत्पन्न, T म्हणजे कर.

यांचे पुढील आकृती क्र. ४.२.१ आधारे स्पष्टीकरण देता येते.




वरील आकृती ४.२.१ मध्ये OX अक्षावर उत्पन्न आणि OY अक्षावर उत्पन्न उपयोगिता दाखविली आहे. आर म्हणजे श्रीमंताचे उत्पन्न OR इतके आणि पी म्हणजे गरीबाचे उत्पन्न OP इतके आहे. TU हा वक्र एकूण उत्पन्न उपयोगिता दर्शविणारी वक्र आहे. RT इतकी एकूण कर रक्कम वसूल करावयाची आहे. RA इतकी आर ची कर भरण्यापुर्वीची एकूण उत्पन्न उपयोगिता आहे. तर पी. ची कर भरण्यापुर्वीची एकूण उत्पन्न उपयोगिता PC इतकी आहे.

आर. व्यक्तीने आरपी इतका कर भरल्यानंतर त्याची एकूण उत्पन्न उपयोगिता PC इतकी आहे. म्हणजेच त्याने AB इतका उत्पन्न उपयोगितेचा त्याग केला. पी व्यक्तीने इतका कर भरल्यानंतर त्याची उत्पन्न उपयोगिता TE इतकी आहे. आणि त्याने CD इतका उत्पन्न उपयोगितेचा त्याग केला आहे. या दोन व्यक्तीनी कर भरल्यामुळे केलेला उत्पन्न उपयोगितेचा त्याग अनुक्रमे AB आणि CD हा समान आहे. आणि एकूण करमहसूलापैकी आर चा वाटा RP आणि पी चा वाटा PT इतका आहे.


२) समान प्रमाणशीर त्याग () हे तत्व असे प्रतिपादन कारते की कर भरल्यामुळे करदात्याला जो एकूण उपयोगितेचा त्याग करावा लागतो त्याचे करपुर्व उत्पन्नाशी असलेले प्रमाण सर्व करदात्यांच्या बाबतीत सारखेच असले पाहिजे. याचा अर्थ ज्यांचे उत्पन्न अधिक आहे त्यांनी अधिक कर भरला पाहिजे. उदा. समजा आर आणि पी यांची उत्पन्नाची उपयोगिता अनुक्रमे २०० व १०० युनिट आहे. आर.ची कर भरल्यामुळे उपयोगितेची हानी २० युनिट म्हणजे त्याच्या एकूण उपयोगितेच्या १० टक्के

आहे. तर पी. ने सुद्धा आपल्या एकूण उपयोगितेच्या १० टक्के म्हणजेच १० युनिट एवढी ---- सहन करण्या इतका कर भरला पाहिजे. आकृती मध्ये दाखविल्याप्रमाणे आर व्यक्ती श्रीमंत असल्यामुळे अधिक कर भरेल तर पी ही व्यक्ती श्रीमंत असल्यामुळे अधिकर कर भरेल तर पी ही व्यक्ती कमी कर भरेल. आर ही व्यक्ती $RR_1$ आणि पी ही व्यक्ती $PP_1$ इतका कर भरेल. परिणामी त्यांच्या उपयोगितेच्या त्यागाचे त्यांच्या उत्पन्नाशी असणारे प्रमाण सारखे राहील.

**३) समान सीमांत त्याग (Equal Marghinal Sacrifice)**

**न्यूनतम सकल त्याग (Leasy Aggregate Sacrifice) :-**

हे तत्त्व असे प्रतिपादन करते की वेगवेगळ्या करदात्यावरील कराचा भार अशा रितीने निश्चित केला पाहिजे की ज्यामुळे प्रत्येक करदात्याला करामुळे करावा लागणारा सीमांत त्याग समान असला पाहिजे. जेंव्हा प्रत्येक करदात्याचा सीमांत त्याग समान होईल तेंव्हा समाजाचा एकूण त्याग न्यूनतम होईल सरकारचे उद्दिष्ट जर समाजाचे महत्तम कल्याण साध्य करणे हे असेल तर करामुळे समाजाला करावा लागणारा त्याग न्यूनतम असला पाहिजे. याचा अर्थ असा होतो की एका विशिष्ट पातळीखालील उत्पन्न हे कर मुक्त असले पाहिजे आणि श्रीमंतावर अधिक दराने कर आकारणी केली पाहिजे. उदा. आर या व्यक्तीचा कर भरल्यामुळे करावा लागणारा सीमांत त्याग हा पी. व्यक्तीने केलेल्या सीमांत त्यागापेक्षा कमी असेल तर करभार वितरणाची फेररचना करावी लागेल. ज्यामध्ये पी. वरील कराचा पैशातील भार काही प्रमाणात आर या व्यक्तीकडे हस्तांतरीत करावा लागेल जेणे करून त्यांचा सीमांत त्याग समान होईल. पी. वरील कर काही प्रमाणात कमी केल्यामुळे त्याच्याकडे कर भरल्यानंतरचे उत्पन्न थोडे अधिक राहील आणि म्हणून पैशाची उपयोगिता लहान राहिल तर आर वरील करात थोडी वाढ केल्यामुळे त्याचे करारोपनानंतरचे उत्पन्न कमी राहील. म्हणजेच त्याची पैशाची सीमांत उपयोगिता वाढेल. खालील आकृी ४.२.२ च्या आधारे याचे अधिक स्पष्टीकरण देता येईल.



वरील आकृती ४.२.२ मध्ये अक्ष अक्षावर उत्पन्न आणि अय अक्षावर उत्पन्नाची सीमांत उपयोगिता मोजली आहे. आकृतीतील MU हा वक्र उत्पन्नाची सीमांत उपयोगिता दर्शविणारा वक्र आहे. आर व्यक्तीचे उत्पन्न OR आणि पी. चे उत्पन्न DP इतके आहे जर RP इतका कर महसूल जमा करायचा असेल तर त्याचा संपूर्ण भार हा आर व्यक्तीवर पडेल. कारण RP हे आर चे पी च्या उत्पन्नापेक्षा अधिकय आहे.

जर RP पेक्षा अधिक कर जमा करावयाचा असेल तर हा जादाचा कर आर आणि पी यांच्यामध्ये समान पद्धतीने विभागला पाहिजे जेणे करून दोघाकडे समान व्ययराक्य उत्पन्न आणि म्हणून समान सीमांत उपयोगिता राहील. आकृतीत दाखविल्याप्रमाणे RT इतका कर जमा करायचा असेल तर आर ने RQ इतका आणि पी ने  PQ इतका कर भरला पाहिजे. आकृतीतील PQ हे QT च्या बरोबर आहे. परिणामी दोघाकडे OQ इतके उत्पन्न राहील आणि त्यांची उत्पन्नाची सीमांत उपयोगिता QL इतकी राहील.

**करदेय क्षमता तत्त्वाचे गुण/फायदे**

१) करदेय क्षमता तत्त्व करआकरणीत करदात्याच्या करदेय क्षमतेच्या निकषाची पूर्तता करते. म्हणजेच करदात्यांच्या सापेक्ष करदेय क्षमतेनुसार करभाराचे वितरण करण्यास मदत करते

२) हे तत्त्व कर आकारणीमध्ये समतल आणि उर्ध्व समता तत्त्वाची पूर्तता करण्यास उपयुक्त ठरते.

३) कर आकरणीच्या सामाजिक न्याय' या उद्दिष्टाची पूर्तता होण्यास हे तत्व उपयुक्त आहे.

४) करदेय क्षमता तत्त्व हे भक्कम अशा समता तत्त्वावर आधारित असल्याने लोकांना नैतिक आवाहन करण्यास उपयुक्त आहे.

५) हे तत्त्व कर आकारणीत प्रगतशीलता आणण्यास मदत करते.

६) उत्पन्नातील विषमता कमी करण्यासाठी हे तत्त्व उपयोगी ठरते.

७) महत्तम सामाजिक साध्यकरण्यासाठी त्यागाचे किमानीकरण आणि लाभाचे महत्तमीकरण करणे गरजेचे असते. त्यासाठी हे तत्त्व मदत करते.

८) सरकारच्या अंदाजपत्रकाचे पर्याष्ट आकारमान निश्चित करण्याच्यादृष्टीने 'महत्तम सामाजिक लाभाचे तत्त्व मांडण्यात आले आहे. या तत्त्वामध्ये करभार वितरणाचे हे तत्त्व समाविष्ट आहे.

**करदेय क्षमता तत्त्वाचे तोटे/मर्यादा.**

१) हे तत्त्व उत्पन्नापासून मिळणाऱ्या उपयोगितेचे संख्यालक मापन करता येते या गृहितावर आधारलेले आहे. परंतू प्रत्यक्षात हे गृहितक अवास्तव आधारलेले आहे. परंतू प्रत्यक्षात हे गृहितक अवास्तव आहे. कारण उपयोगिता ही एक मानसिक स्थिती असते.

२) 'समान त्याग' या संदर्भात तीन संकल्पना मांडल्या आहेत. त्यामुळे त्यापैकी नेमकी कोणती संकल्पना वापरावी या बाबत संभ्रम तयार होतो.

३) हे तत्त्व उत्पन्नाची सीमांत उपयोगिता ही वाढत्या उत्पन्ना बरोबर घटत जाते या गृहितावर आधारलेले आहे. परंतू मसग्रेव्ह यांच्यामते वाढत्या उत्पन्नाबरोबर व्यक्तीच्या गरजा वाढत जातात. म्हणून उत्पन्नाची सीमांत उपयोगिता वाढते.

४) पैशाची सीमांत उपयोगिता वाढत्या उत्पन्नाबरोबर घटत जाते हे मानले तरी सीमांत उपयोगिता घटीच्या दराबाबत खात्री देता येत नाही. कारण वेगवेगळ्या व्यक्तीच्या बाबतीत हा दर वेगवेगळा राहील.

५) उपयोगितेची आंतरव्यक्ती तुलना ही अवास्तव ठरते. कारण व्यक्ती व्यक्तीमध्ये शारिरिक, मानसिक, भावनिकदृष्टया भिन्नता असते. म्हणून उत्पन्नाची उपयोगिता दर्शविणारा सर्वांचा एकच समान वक्र असणार नाही.

६) समान त्यागासंबंधीच्या तीन संकल्पनापैकी सर्वाधिक मान्य असणारी संकल्पना समान सीमांत त्याग ही आहे. परंतु ती अत्यंत संदिग्ध असून प्रत्येक करदात्याची सीमांत त्याग मोनावा लागेल आणि ते प्रत्यक्षात अशक्य ठरते.

७) करदात्याच्या त्यागाचे मोजमाप त्यांनी कररूपाने किती उत्पन्न गमाविले यावरून केले जाते. परंतु समान उत्पन्न गमाविलेल्या दोन व्यक्तीचा त्याग समान असेलच असे नाही. कारण त्यांच्या उत्पन्नाचे मार्ग भिन्न-भिन्न असू शकतात. उदा. रूपाने मिळणारे उत्पन्न आणि मालमत्तेपासून मिळणारे उत्पन्न त्यामुळे त्यांच्यावर सारखाच कर आकारल्यास ते अन्यायाचे ठरते.

८) करदेय क्षमता तत्त्व हे अप्रत्यक्ष करांना लागू पडत नाहीत उदा. वस्तू आणि सेवावरील कर.

### ४.२.२.३ पर्याप्त करारोपणाचा सिद्धांत : (The Theory of Optimal Taxation)

करारोपणाच्या विविध तत्त्वांचा अभ्यास केल्यानंतर एक प्रश्न निर्माण होतो. तो म्हणजे करआकारणीची पर्याष्ट मर्यादा काय असू शकते काय? हा प्रश्न विशेषत: सार्वजनिक वित्त आणि कल्याणकारी अर्थशास्त्राशी सुसंगत व महत्त्वाचा आहे. परंतु या प्रश्नाचे उत्तर देण्यासाठी करआकारणीची पर्याप्त मर्यादा निश्चित करणारे निकष कोणते ते पहावे लागते. सर्वसाधारणपणे हे निकष पुढीलप्रमाणे सांगता येतात.

१) पर्याप्त करआकारणीचा पहिला निकष म्हणजे करदात्यांना सहन करावा लागणारा संसाधनांचा खर्च कमीत कमी ठेवणे. या संदर्भात हे लक्षात घेतले पाहिजे की कर आकरणी केल्यामुळे सरकारला तो कर जामा करण्याचा खर्च करावा लागतो. पण त्याचबरोबर करदात्यांना संसाधनांचा खर्च सहन करावा लागतो. करांचे विविध उपाय ठरविताना करआकारणी कारणारी यंत्रणा करदात्यांना सहन करावा लागणारा हा संसाधनांचा खर्च विचारात घेतला जातो. परंतू करदात्यांचा वेळ आणि श्रम या रूपातील

खर्च विचारात घेतला जात नाही. असा खर्च सुद्धा कर यंत्रणेने विचारात घेऊन तो कमी कमी राहील असे करारोपण केले पाहिजे.

२) पर्याप्त करआकारणीचा दुसरा निकष म्हणजे करआकारणीतील न्यायाचे किंवा समतेचे मापन हा असला पाहिजे. यासंदर्भात करारोपणाच्या विविध तत्त्वांची- लाभतत्त्व सेवाखर्चतत्त्व, करदेय क्षमता तत्त्व चर्चा आपण केली आहे. याबाबतीत आपण हा निष्कर्ष काढू शकतो की अर्थशास्त्रज्ञाच्यंमध्ये या तत्त्वाबाबत सर्वसाधारण एकमत दिसून येत नाही. परंतु पर्याष्ट कर आकारणीच्यादृष्टीने निकष अत्यंत महत्त्वाचा आहे हे लक्षात घेतले पाहिजे.

३) पर्याप्त करआकरणीचा तिसरा निकष हा आर्थिक कार्यक्षमतेच्या मापनाचा असू शकतो. परंतु हा निकष खूप व्यापक क्षेत्र विचारात घेत असून आर्थिक कार्यक्षमतेच्या संकल्पनेचा कोणता अर्थ घेतो यावर सर्व अवलंबून असते. उदा. या संदर्भात आपण करआकारणीमुळे घेणाऱ्या संसाधनांच्या वाटपात होणारे बदल लक्षात घेऊ शकतो किंवा अन्य काही करण्यावस्थेच्या परिणामांचा विचार करू शकतो. आर्थिक कार्यक्षमतेचा कोणताही अर्थ घेतला तरी सर्वात महत्त्वाचे म्हणजे एकूण करव्यवस्था ही करदात्यावर/समाजावर शक्य तेवढा कमीत कमी मृतभार टाकरणारी असली पाहिजे.

पर्याप्त करआकारणीची संकल्पना वरीलपैकी कोणत्याही निकषानुसार विचारात घेतली तरी तीन पातळ्यावरील निर्णय महत्त्वाचे असतात. ते पुढीलप्रमाणे

१) करआकारणीची एकूण रक्कम आणि तीचे प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्ष करातील विभागणी.

२) प्रत्यक्ष करांची रचना व दरपत्रक, आणि

३) अप्रत्यक्ष करांची रचना व दरपत्रक.

प्रत्यक्षात वरील तीनही पातळीवरील निर्णय हे परस्परावर अवलंबून असतात आणि महत्त्वो म्हणजे अतिरिक्त गुंतागुंत घडविणारे असतात. आधुनिक सरकारला अंदाजपत्रकीय वित्तीय सामगी जमविण्याचे कराबरोबरच इतर मार्ग उपलब्ध आहेत. उदा. सार्वजनिक कर्जाची उभारणी तुटीचा अर्थभरणा इ. या वस्तूस्थितीमुळे अशी गुंतागुंत निर्माण होते.

करआकारणीची एकूण रक्कम आणि अंदाजपत्रकीय एकूण साधनांची रचना यासंबंधीच्या प्रश्नांची चर्चा या पुस्तकात इतरत्र केली आहे. या निर्णया संदर्भात निश्चित असे काही सर्वसाधारण नियम सांगणे शक्य नाही. त्यामुळे त्याची सविस्तर चर्चाही शक्य नाही. वस्तू-सेवावरील कराबाबत मात्र अर्थशास्त्रज्ञ निर्णय करताना त्यांचे संसाधनांच्या विरतणावरील परिणाम विचारात घेतात. एक विशिष्ट संसाधनांचे वाटप हे सर्वात कार्यक्षम मानतात आणि त्यापासूनचे विचलन हे अर्थव्यवस्थेवर पडणारा खर्च समजला जातो. असे एक संसाधनांचे वाटप आहे की जे पॅरेटोच्या निकषाशी सुसंगत आहे. पॅरेटोच्या निकषाच्या धर्तीवरील निकष असे दर्शवितो की एका प्रकारे साध्य केलेल्या संसाधनांच्या वापर कार्यक्षमता ही

बदलता किंवा वाढविता येत नाही जोपर्यंत इतर काही मार्गाने ती कमी केली जात नही. ही संसाधन पर्याप्तता अशा बदलातून एकाद्या क्षेत्रातील कार्यक्षमतेतील वाढ ही दुसऱ्या क्षेत्रातील कार्यक्षमतेतील घटीपेक्षा अधिक असू शकते याकडे दुर्लक्ष करते. असे असले तरी पॅरेटो पर्याप्तता लक्षात घेऊन करआकारणीच्या बाबतीत एक मार्ग सुचविता येतो तो म्हणजे निश्चित रकमेचा (Lump-Sum) कर आकारणे. कारण असे प्रतिपादन केले जाते की हा कर उत्पादकांना करावा लागणाऱ्या सीमांत खर्चावर आणि ग्राहकांच्या सीमांत उपयोगितेवर परिणाम करत नाही. परंतू यासंदर्भातही असा प्रश्न उपस्थित होतो की प्रत्यक्ष कराचा उत्पन्न परिणाम घडून येत असतो. वस्तूंच्या सीमांत उपयोगितेचे कोष्टक भिन्न भिन्न असल्यामुळे या उत्पन्न परिणामामुळे सीमांत उपयोगितेत बदल घडून येतो. तसेच हे सष्टीकरण एकूण कर भाराचे करदात्यामध्ये कसे वितरण करायचे याविषयी मार्गदर्शन करत नाही. करासंबंधीच्या कोणत्याही निर्णयाचा उत्पन्न वितरण आणि कल्याणावर परिणाम होत असतो आणि वस्तू व सेवांच्या मागणीतील बदलाद्वारे प्रत्यक्ष संसाधनांच्या वितरणावर परिणाम होतो. नफ्यावरील कर हा फॅरेटोच्या निकषाशी सुसंगत आहे. हा कर उत्पादन आणि गुंतवणुकीचे निर्णय याबाबत तटस्थ असतो असे दावा केला जातो. परंतु अशा करामुळे भांडवल निर्मितीतील हे होणाऱ्या घसरणीच्या शक्यतेकडे दुर्लक्ष केले जाते. जेंव्हा उत्पन्न मिळविणाऱ्या लोकांच्या लक्षात येते की नफ्यावरील करामुळे उत्पन्न घटते तेंव्हा ते बचत करून उत्पन्न मिळविण्याऐवजी वर्तमान उपभोग वाढविण्याचे निर्णय घेऊ शकतात. त्याच्या परिणामी आर्थिक वृद्धीदर कीम होऊ शकतो.

याचा अर्थ करआकारणीच्या पर्याप्ततोची चर्चा करताना आपण वृद्धी पर्याप्तता आणि अर्थव्यवस्थेची कार्यात्मक कार्यक्षमता विचारात असलेली पाहिजे. 'तटस्थ' कारांद्वारे सरकार आपल्याला आवश्यक असलेला महसूल जमा करू शकते यावर वादविवाद घेऊ शकतो. ज्याचा विशेषत: वस्तू व सेवांच्या उत्पन्न लवचिकतेचा विचार करायला पाहिजे. थोडक्यात या प्रश्नासंदर्भात समाधानकारक आणि व्यवहारिक उपाय काढणे गतिमान परिस्थितीत फारच कठीण ठरते.

अप्रत्यक्ष करांचा विचार करता त्यांच्या बाबतीत पॅरेटो पर्याप्तता मार्गदर्शक म्हणून विचारात घेता येणे शक्य नाही. त्याची दोन महत्त्वाची कारणे आहेत. एक म्हणजे पॅरेटो पर्याप्तता बाह्यतांचे विस्तृत प्रमाणावरील अस्तित्व लक्षात घेत नाही. आणि दुसरे म्हणजे बचत दर व गुंतवणूकीचा आकृतीबंध यातील सर्वसाधारणपणे असे प्रतिपादन केले जाते की सर्व वस्तूंवर एकसमान दराने कर आकरल्यास निश्चित रकमेच्या (Lump Sum) कराप्रमाणे महसूल जमा करता येईल. कारण असे म्हटले जाते की सर्व करदात्यांच्या उत्पन्नात प्रमाणीत घट होते. परिणामी या करामुळे संसाधनाच्या वितरणावर परिणाम होत नाही. परंतू असा निष्कर्ष काढताना काही मजबूत व अवास्तव गृहिते धरावी लागतात. उदा. सर्व उत्पन्न प्राप्त करणाऱ्यांची सर्व उपभोग्य वस्तूसाठी असलेल्या मागणीची लवचिकता समान असते. कारण जर वस्तूंच्या मागणीच्या बाबतीत भिन्नता असेल तर सर्व वस्तूवर एकसमान दराने कर आकारणे शक्य नसते.

प्रा. पिगू यांनी आपल्या 'Study in Public Finance' मध्ये बाह्यतेशी संबंधित प्रश्नाचा प्रभावीपणे

**आकृती क्र. ४.२.४ नविन कल्याणाचे अर्थशास्त्र अंतर्गत कराचे अतिरिक्त ओझे**

विचार मांडला आहे. एकदा बाह्यतांचे अस्तित्व मान्य केले वस्तूवरील असमान दराने करआकारणीचे महत्त्व वाढते. सार्वजनिक वस्तू मध्ये बाह्यता असतात हे सर्वमान्य आहे. त्यामुळे त्यांच्या बाबतीत सीमांत सामाजिक खर्च आणि सीमांत सामाजिक लाभ यामध्ये समानता प्रस्थापित करण्याच्या दृष्टीने असमान दराने करआकारणी अतिशय आवश्यक ठरते. परंतू प्रत्यक्षात सीमांत लाभ आणि खर्च यांचे मापन अतिशय कठीण आहे. तसेच बाह्यतांना प्रतिबंध म्हणून कर आकारणी करणे यासंदर्भात चर्चा करताना ही गोष्ट गृहित धरली जाते की सरकार स्वत:साठी कर महसुलाची आवश्यकता नसते. परंतू प्रत्यक्षात सरकारला आपल्या सतत वाढणाऱ्या खर्चासाठी कर आकारणी करावी लागते. एवढेच नव्हे तर संसाधन वाटपात सुधारणा करण्याऐवजी विस्कळीतपणा आणणारे कर सरकारला आकरावे लागतात. त्यामुळे ही सर्व चर्चा हेच अधोरे करते की या दोन कर पद्धतीमध्ये पर्याप्त मिश्रण घडवून आणण्याची गरज आहे.

पर्याप्त करआकारणी या बाबतीतील ही सैद्धांतिक चर्चो सिद्धांतकरांना कल्याणकारी विचार आणि कर आकारणीच्या कार्यक्षमतेच्या मुद्दा यासंदर्भात वास्तवतेला जवळचा निष्कर्ष काढण्यासाठी मदत करते ह्यांना अधिक खोलवर दृष्टी प्राप्त झाल्याने कर आकरणीच्या समता आणि कार्यक्षमता दोन उद्दिष्टमधील आंतर संबंधाची  चर्चा करण्यासाठी अधिक सक्षमता लाभले. परंतु या सिद्धाताच्या या घडीला अनेक मर्यादा स्पष्ट होतात. उदा. हा सिद्धांत कर जमकरण्याच्या खर्चाचा समावेश करू शकलेला नाही किंवा पर्यायी करपद्धतीच्या निवडीवर पुरेसा प्रकाश टाकू शकलेला नाही. त्यामुळे त्याचा कर सुधारणा सुचविण्यासाठी वापर करता येत नाही. म्हणून आजही हा सिद्धांत सैद्धाति प्रतिमानाच्या रूपातच आहे जो बऱ्याच गृहितावर आधारित आहे.

**४.२.२.४ करांचे अतिरिक्त ओझे (Excess Burden of Taxes) :-**

करआकारणीचा पैशातील भार आणि वास्तवभार असे दोन प्रकारचे भार करदात्यावर पडतात. याशिवाय करदात्यावर एक अतिरिक्त किंवा दुय्यम भारही पडण्याची शक्यता असते. कर आकारणी केल्यामुळे वस्तूंच्या किंमत गुणोत्तरात/प्रमाणात बदल घडून येतो. जेंव्हा एकादया वस्तूवर दुसऱ्या वस्तूऐवजी कर आकारला तेंव्हा त्या दोन वस्तूंच्या किंमत प्रमाणात बदल घडून येतो. म्हणजेच एक वस्तू करआकारणीनंतर सापेक्षतेने स्वस्त होते. परिणामी करदात्याला कर न बसविलेली वस्तू कर बसविलेल्या वस्तू ला पर्याय म्हणून निवडावी लागते. या परिस्थितीत ही निवड करदात्याच्या त्या दोन वस्तूंच्या बाबतीतील पसंतीक्रमाच्या विरोधी होऊन ती त्याच्यावर लादली जाते.

उपभोकत्याच्या या खर्चाच्या पुनर्वितरणामुळे त्याची कल्याण पातळी घटते. उपभोक्त्याच्या कल्याणाच्या पातळीतील ही घट म्हणजे त्याचेवरील कराचा दुय्यम भार असतो. अशा या दुय्यम भारालाच कराचे


अतिरिक्त ओझे असे म्हटले जाते. हे अतिरिक्त कर ओझे पर्यायतेच्या शक्यतेच्या प्रमाणाबरोबर धनात्मक/सकारात्मक स्वरूपात बदलते. कर आकारणी केल्यामुळे वस्तूंच्या किंमत गुणोत्तरात ऐवढा मोठा बदल होतो तेवढ्या प्रमाणात वस्तूंची पर्यायता वाढते. पुढील एका उदाहरणाने याचे अधिक स्पष्टीकरण देता येईल. समजा 'क्ष' आणि 'य' या दोन वस्तू पर्यायी वस्तू आहेत. आणि 'क्ष' वस्तूवर उत्पादन कर आकारला जातो कर आकरण्यापूर्वी 'क्ष' ची किंमत प्रतिनगाला १५ रु. आणि 'य' वस्तूची किंमत प्रतिनगाला २० रु. आहे. आता 'क्ष' वर प्रतिनग ५ रुपये एवढा उत्पादन कर बसविला तर 'क्ष' ची किंमत आता २० रुपये होईल.

कर आकारण्यापूर्वी 'क्ष' वस्तूच्या किंमतीचे 'य' च्या किंमतीशी असलेले प्रमाण ०.७५ रु = १.० रूपचा असे आहे. परंतु 'क्ष' वस्तूवर कर आकारल्यानंतर हे प्रमाण १.० रु =१.० य असे होते म्हणजेच आता 'क्ष' वस्तू ही 'य' वस्तू तुलनेत महाग ठरते. म्हणून करदाता 'क्ष' चे कमी नग आणि 'य' चे अधिक नग खरेदी करेल. याचा अर्थ तो आता कर न बसविलेल्या 'य' वस्तूचा 'क्ष' वस्तूला पर्याय म्हणून खरेदी करतो. त्यामुळे आताचा या दोन वस्तूंचा खर्च उपभोक्यात्याला कमी समाधान देईल. कारण तो त्याच्या दोन वस्तूबाबतच्या मूळच्या (करपुर्व) पसंतीक्रमाच्या पेक्षा वेगळा आरे. थोडक्यात यामुळे त्याच्या समाधानात/कल्याणात घट होते किंवा नुकसान होते. उपभोक्त्याच्या कल्याणातील ही घट म्हणजेच कराचे अतिरिक्त ओझे आहे.

म्हणून विविध करांची निवड ही काही वस्तूनिष्ठ निकषाच्या आधारे केली जाते. की ज्यामुळे सार्वजनिक खर्चाची विभागणी ही करभारवितरणाच्या अपेक्षित आकृतीबंधानुसार होईल. आणि या प्रक्रियेत करांचे अतिरिक्त ओझे टाळण्याचा प्रयत्न केला जावा. मसंग्रेव्ह यांच्या शब्दात करांची अशाप्रकारे रचना केली जावी की हे कार्य (अतिरिक्त ओझे टाळण्याचे) सर्वाधिका कार्यक्षमपणे पार पाडले जाईल. आणि त्यापुढे कर हे शक्य तेवढ्या प्रमाणात तटस्थ असावेत बाजारपेठेतील अनावश्यक हस्तक्षेप हा कराचे अतिरिक्त झाले लादणारा ठरु शकतो. म्हणून तो टाळण्याचा प्रयत्न करावा.

**अतिरिक्त ओझे सिद्धांत (Excess Burden Theory) :**

करांचे अतिरिक्त ओझे सिद्धांत पुढील दोन संदर्भात विकसित करण्यात आला आहे. १) जुने कल्याणाचे अर्थशास्त्र (Old Welfare Economics) आणि २) नविन कल्याणाचे अर्थशास्त्र (New welfare economics) यापैकी पहिल्या विश्लेषात व्यक्तींच्या उपयोगितेची तुलना केलेली असून त्याचे विश्लेषण डॉ. अल्फ्रेड मार्शल आणि ए. सी. पिगू यांनी केले आहे. पिगूनी कराच्या अतिरिक्त ओझ्यास कराचा प्रकटेन परिणाम (Announcement effect) असे म्हटले आहे. तर डॉ. मार्शल यांनी कराच्या अतिरिक्त ओझ्याचे आपले स्पष्टीकरण जुन्या कल्याणाच्या अर्थशास्त्राच्या उपयोगिता विधानाच्या आधारे दिले आहे. या दोघांनी कराच्या अतिरिक्त ओझ्याचे /भाराचे दिलेले स्पष्टीकरण. पुढील आकृतीच्या ४.२.३ च्या आधारे स्पष्ट करता येईल.




**आकृती क्र. ४.२.३ : कराचे अतिरिक्त ओझे/भार**

वरील आकृतीत 'अक्ष' अक्षावर वस्तु आणि 'अय' अक्षावर खर्च किंमत दर्शविली आहे. KD हा मागणी वक्र आणि SS हा पुरवठा वक्र आहे. सी या बिंदूने करपुर्व समतोल दर्शविला आहे. त्यावेळी वस्तूचे उत्पादन OB इतके आणि किंमत OM किंवा BC इतकी आहे.


आता समजा MS \ RT इतका कर प्रतियुनिट बसविला. तर MS हा नविन पुरवठा वक्र प्राप्त होतो. त्यामुळे नविन समतोल R या बिंदूने दर्शविला असून त्यावेळी OA इतके उत्पादन आणि AR इतकी किंमत निश्चित होते.

आता उपभोक्त्याचे जाभाधिक्य KCM - KRL = LRCM इतके कमी होते. तसेच उत्पादकाच्या वाढाव्यात MCP - NTP = MCTN कारण उत्पादकाला AT एवढी किंमत मिळते जी उपभोक्ता आणि उत्पादक यांच्या वाढाव्याचे एकूण नुकसान LRCM + MCTN = LRCN परंतू यापैकी LRTN इतका भाग (करमहसूल) सार्वजनिक खचाृच्या रूपाने म्हणजेच सार्वजनिक कल्याणासाठी खर्च होतो म्हणून तो भाग वाढण्यातील तूट/नुकसान मानता येत नाही. फक्त CRT (छायांकित भाग) हा कराचा अतिरिक्तभार आहे.

**नविन कल्याणाचे अर्थशास्त्र अंतर्गत कराचे अतिरिक्त ओझे :-**

हे आंशिक समतोल (Partial Equilibrium) आणि सर्वसाधारण समतोल (General Equilibrium) या संदर्भात स्पष्ट केले आहे. आंशिक समतोलाच्या संदर्भात कराचे अतिरिक्त ओझे एम. एफ. आंशिक समतोलाच्या संदर्भात कराचे अतिरिक्त ओझे डब्ल्यू जोसेफ यांनी स्पष्ट केले आहे. त्याचे स्टिगलर

आणि बोल्डिंग यानी समर्थन केले आहे. या दृष्टीकोनाने व्यक्तीच्या उपयोगितेची तुलना टाळली असून समवृत्ती वक्र दृष्टीकोनाच्या आधारे स्पष्टीकरण दिले आहे. ते पुढीलप्रमाणे स्पष्ट करता येईल.




**आकृती क्र. ४.२.४ : नवीन कल्याणाचे अर्थशास्त्र अंतर्गत कराचे अतिरिक्त ओझे**

वरील आकृतीत OX अक्षावर X आणि OY अक्षावर Y वस्तूंचे मापन केले आहे. उपभोक्त्याचे एकूण उत्पन्न X वस्तूंच्या संदर्भात OC इतके आणि Y वस्तूच्या संदर्भात OD इतके आहे. उपभोक्त्याचे सुरुवातीचे संतुलन या $I_3$ समवृत्ती वक्रावरील E बिंदूने दर्शविले आहे.

आता BC इतके Y किंवा KD इतके Y एवढा उत्पन्नकर उपभोक्त्यावर लावला. तर त्यांची अंदाजपत्रक रेषा DC ऐवजी KB इोईल. आणि नविन समतोल $I_2$ या समवृत्ती वक्रावरील L या बिंदूने प्रस्थापित होईल $I_2$ हा समवृत्तीवक्र $I_3$ च्या डाव्या बाजूस खालच्या बाजूस असल्यामुळे कमी समाधानाची पातळी दर्शवितो.

X आणि Y वस्तूवर एक सर्वसाधारण उपभोग कर आकारला तर अशीच परिस्थिती तयार होईल. कारण आता कर आकारलेल्या X वस्तूच्या संदर्भात उपभोक्त्याचे उत्पन्न OA इतके होते. पण Y वस्तूच्या बाबतीत तेच म्हणजे OD एवढे उत्पन्न राहते. त्यामुळे नविन समतोल हा $I_1$ या समवृत्तीपत्रकावरील M या बिंदूने निश्चित होईल. सरकारची महसुलाची रक्कम ME इतकी म्हणजेच BC या उत्पन्न कर महसुला इतकीच राहते. परंतु हा नविन समतोलाचा बिंदू $I_2$ पेक्षा खालच्यापातळीवरील समवृत्तीवकावर आहे. परिणामी उपभोक्त्याची समाधानाची पातळी आणखीन वाईट/कमी होते. कारण उपभोगकर (अप्रत्यक्ष कर) X आणि Y वस्तूंच्या किंमत गुणोत्तरात बदल घडवून आणतो. जे DA या अंदाजपत्रकी रेषेमुळे स्पष्ट

होते. याचा अर्थ उपभोक्ता हा कर आकारलेल्या वस्तू (X) ऐवजी कर न आकारलेली वस्तू (Y) पर्यायी वस्तू म्हणून स्वीकारतो. ही प्रक्रिया $I_2$ वरून $I_1$ कडे जाणारी करदात्याच्या कल्याणाची पातळी कमी करते.

**(The Excess Burden Under General Equilibrium)**

सर्वसाधारण समतोलाच्या स्थितीतील कराचा अतिरिक्त भार हा पुढील आकृतीच्या आधारे स्पष्ट करता येईल. त्यासाठी आपण पुढील बाबी गृहित धरुया.

१) बाजारपेठेत वस्तूंसाठी पूर्ण स्पर्धेची स्थिती आहे.

२) श्रमपुरवठा व बचत हे स्थिर आहेत.

३) उपभोक्त्याचे उत्पन्न व आवड सारखीच आहे. म्हणजेच समवृत्ती वक्र नकाशा प्रत्येकासाठी सारखाच आहे.

सर्वसाधारण समतोलाच्या परिस्थितीती संसाधनांच्या कार्यक्षम वितरणासाठी पुढील अट पूर्ण होणे आवश्यक ठरते.


$MRT_{XY} = MRS_{XY} = P_x / P_y$

MRS = सीमांत पर्यायता दर XY = X आणि Y वस्तू

$P_x$ = X ची किंमत $P_y$ = P ची किंमत


स्वर्धात्मक समतोलामध्ये वरील अटींची पूर्तता होते. त्यामुळे वरील गृहित गोष्टींच्या आधारे डोईकर (Headtax) किंवा पोल टॅक्स् तसेच सर्वसाधारण उत्पन्न कर व सर्वसाधारण उपभोग कर हे जर सारखाच कर महसूल प्राप्त करत असतील तर ते (Lump = Sum) निश्चित रकमेचे कर ठरतात. आणि ते करदात्यावर समान भार टाकतील परंतू एक निवडक उत्पादन कर मात्र हलका (inferior) ठरतो. कारण तो कराचा अतिरिक्त भार करदात्यावर टाकतो.

**आकृती क्र. ४.२.५ : सर्वसाधारण समतोल स्थितीतील कराचा अतिरिक्त भार.**



**शून्य अतिरिक्त ओझे (Zero Excess Burden) :-**

अतिरिक्त ओझे टाकत नाही असा कर शोधणे फार कठीण आहे. फक्त डोईकर (Head tax) हे शून्य अतिरिक्त ओझे टाकणारा एकमेव कर म्हणून सांगता येतो. हा कर दरडोई एका निश्चित रकमेचा असतो आणि त्यालाच पोल टॅक्स असेही म्हणतात. हा कर शून्य अतिरिक्त भार निर्माण करतो याचे कारण म्हणजे हा कर आकारल्यामुळे वस्तूंच्या किंमत गुणोत्तर काहीच बदल होत नाही. त्यामुळे करदात्याला हा कर भरल्यामुळे एका वस्तू ऐवजी दुसरी वस्तू निवडावी लागत नाही. तसेच या करामुळे करदात्याला आपला विविध वस्तूंबाबतचा पंसतीक्रम किंवा उत्पन्न आणि विश्रांती यामधील पसंतीक्रम बदलावा लागत नाही. त्यामुळे या कराचा फक्त सर्वसाधारण भार करदात्यावर पडतो आणि कोणताही अतिरिक्त भार पडत नाही. याचे अधिक स्पष्टीकरण पुढील आकृतीच्या आधारे देता येईल.




वरील आकृतीत 'अक्ष' अक्षावर 'क्ष' वस्तूचे आणि 'अय' अक्षावर 'य' वस्तूचे मापन दर्शविले आहे. उपभोकत्याचे 'क्ष' वस्तूच्या संदर्भात 'अब' इतके आणि 'य' वस्तूच्या संदर्भात 'अक' इतके उत्पन्न असून 'कब' ही उत्पन्न/अंदाजपत्रक रेषा आहे. सव१ हा समवृत्ती वक्र असून उपभोक्त्याच्या सुरुवातीचा समतोल 'इ' बिंदूने दर्शविला आहे. या समतोलाच्यावेळी 'क्ष' वस्तूचे 'लइ' आणि 'य' वस्तूचे अम इतकी नगसंख्या आहे.

आता डोईकर/ पोलटॅक्स् 'क्ष' वस्तूच्या संदर्भात 'अ$_1$' किंवा 'य' वस्तूच्या संदर्भात 'कड' इतका आकारण्यात आला असे समज. त्यामुळे अंदाजपत्रकीय रेषा 'कब' च्या ऐवजी 'डअ$_1$' अशी होते. ही नवीन अंदाजपत्रक रेषा जुन्या रेषेला समांतर आहे. आता उपभोक्त्याचा नविन समतोल 'फ' या बिंदूने

दर्शविला आहे. कारण या बिंदून सव$_२$ हा समवृत्ती वक्र अंदाजपत्रक रेषेला स्पर्श करतो. या नव्या समतोलाच्या वेळी 'क्ष' वस्तूची 'अअ$_१$' इतकी आणि य वस्तूची अड इतकी नगसंख्या आहे. याचा अर्थ हा डोईकर बसविल्यामुळे या दोन वस्तूच्या नगसंख्येत अनुक्रमे बअ$_१$ आणि कड इतकी घट होते. कारण तेवढ्याप्रमाणात उपभोक्त्याचे उत्पन्न कमी होते परंतु या करामुळे 'क्ष' आणि 'य' या दोन वस्तूंच्या किंमत गुणोत्तरात कोणाही बदल होत नाही. कारण कर बसविण्यापुर्वीचा किंमत गुणोत्तर अक - अब हे कर

$$\text{आकारल्यानंतरच्या } \frac{\text{अ३}}{\text{अअ}_१} \text{ या किंमत गुणोत्तराइतकेच}$$

आहे. याचा अर्थ हा कर बसविल्याने या दोन वस्तूंच्या उपभोगात प्रमाणशीर घट घडून येते. आणि उपभोक्यत्याच्या या दोन वस्तूंच्या प्रसती आकृतीबंधात बदल होत नाही. म्हणून या कराचे अतिरिक्त ओझे शून्य आहे.

### ४.२.२.५ द्विगुण करारोपण (Double Taxation)

**प्रस्तावना :**

आधुनिक काळात सर्वच देशातील सरकारच्या खर्चात मोठ्या प्रमाणात वाढ होत आली आहे. त्यामुळे हा वाढता खर्च भागविण्यासाठी सरकारला वाढत्या उत्पन्नाची गरज आहे. सरकारला अधिक उत्पन्न मिळविण्यासाठी अधिक करआकारणीचा अवलंब करावा लागतो. पण करआकारणी करताना करदात्यांमध्ये कराचा भार समानतेने विभागून दयावयाचा असतो असे करआकरणीचे न्याय तत्त्व सांगते. उत्पन्नाची पर्याप्तता आणि करभाराची समानता या उद्दिष्ट्यांच्या पूर्तीसाठी करांची अनेकता ही केवळ उपयुक्तच नव्हे तर व्यावहारिकदृष्टया अटळ ठरते. त्यामुळे द्विगुण किंवा बहुगुण करारोपण अनिवार्य होऊन बसते. द्विगुण किंवा बहुगुण करारोपण ही संज्ञा विशिष्ट अर्थाने वापरली जाते. द्विगुण करारोपणाचा अर्थ निर्मिती, परिणाम आणि त्यावरील उपाययोजना याविषयीची माहिती पुढीलप्रमाणे पहाता येईल.

**अर्थ आणि व्याख्या :-**

व्यक्ती दोन किंवा दोनपेक्षा जास्त कर देत असेल तर त्या प्रकाराला द्विगुण किंवा बहुगुण करारोपण असे म्हणता येणार नाही. तर एकाच व्यक्तीवर किंवा वस्तूवर दोनदा करारोपण केल्यास ते द्विगुण करारोपण होईल असे प्रा. सेलिगमन यांनी म्हटले आहे. या बाबतीत मुख्य गोष्ट कराचा आधार (Fax base) ही असते. कराचा आधार वस्तू, संपत्ती, उत्पन्न, मालमत्ता इत्यादी काहीही रहू शकते. द्विगुण करारोपणाचे स्वरुप लक्षात येण्याच्या दृष्टीने व्यक्ती, कराचा आधार किंवा करारोपणाचे लक्ष्य व करारोपणाचा कालावधी या तीन गोष्टी महत्त्वाच्या आहेत.

१) एकाच व्यक्तीवर दोन वेगवेगळ्या आधारावर कर लादल्यास ते द्विगुण करारोपण ठरणार नाही. उदा. एकाच व्यक्तीने उत्पन्नकर आणि विक्रीकर दिला तर ते द्विगुण करारोपण नव्हे

२) तसेच कराचा आधार तोच ठेवून जर भिन्न भिन्न व्यक्तीवर कर आकारला तर तो द्विगुण करारोपणाचा प्रकार होणार नाही. उदा. संपत्तीकर वेगवेगळ्या व्यक्तींनी आपल्या संपत्तीनुसार संपत्तीकर भरला तर ते द्विगुण करारोपण नव्हे.

३) तसेच त्याच व्यक्तीवर त्याच आधारावर दोन भिन्न कालावधीत कर द्यावे लागत असतील तर तो द्विगुण करारोपणाचा प्रकार होणार नाही.

थोडक्यात एकाच करआधारावर एकाच कालावधीत दोन कर दयावे लागले तो द्विगुण करारोपणाचा प्रकार होतो.

**द्विगुण करारोपणाची निर्मिती :–** पुढीलप्रमाणे स्पष्ट करता येईल

१) जेंव्हा एकाच व्यक्तीच्या उत्पन्नावर दोन भिन्न राष्ट्रांची सरकारे कर आकारतात तेंव्हा द्विगुण करारोपण होते. एकाच व्यक्तीच्या उत्पन्नावर ती व्यक्ती ज्या देशात राहते तेथील सरकार कर आकारते. तसेच ज्या देशात त्या व्यक्तीने उत्पन्न मिळविले त्या देशाचे सरकारही कर आकारते. त्यामुळे द्विगुण करारोपण होते.

२) जेंव्हा एकाच देशातील दोन सरकारे एकाच व्यक्तीच्या उत्पन्नावर उत्पन्नकर आकरतात तेंव्हा द्विगुण करारोपण हे उदा. अमेरिकेत फेडरल सरकार व राज्य सरकारे असे कर लावतात.

३) जेंव्हा एकच सरकार एकाच व्यक्तीच्या उत्पन्नावर किंवा संपत्तीवर दोनदा कर आकारते तेंव्हा द्विगुण करारोपण होते. उदा. संयुक्त भांडवली मंडळाच्या नफ्यावरील कर– नफा विररित होण्यापूर्वी लावलेला कर आणि नफ्याच्या वितरणानंतर हिस्से दारांना मिळालेल्या लाभांशावरील कर. कायद्याच्यादृष्टीने संयुक्त भांडवली मंडळ आणि त्याचा नफा व हिस्सेदार आणि त्यांना मिळालेला लाभांश हे वेगवेगळे असतात. त्यामुळे या द्विगुण करारोपणाचे समर्थन केले जाते. पण नैतिकतेच्या दृष्टिने हे कितपत बरोबर आहे असा प्रश्न आहे. कारण एकच उत्पन्न असल्याने परिणामाच्या दृष्टीने ते पक्षपात करणारेच आहे.

४) व्यक्तीच्या उत्पन्नावर उत्पन्नकर आकारला जातो तेंव्हा द्विगुण करारोपणाची निर्मिती होते. कारण व्यक्तीचे उत्पन्न हे उपभोगखर्च निर्मिती होते. कारण व्यक्तीचे उत्पन्न हे उपभोगखर्च आणि बचत या दोघात विभागले जाते. आणि बचतीपासून मिळालेल्या उत्पन्नावर करआकरणी केली जाते. त्यामुळे बचत करणारे हा दुहेरी कराघात सहन करतात. पण आपले सर्व उत्पन्न उपभोगावर खर्च करणारे मात्र एकदाच करभरातात.

५) व्यक्तीच्या उत्पन्नाप्रमाणेच संपत्ती व मालमत्तेवर द्विगुण करारोपण केले जाऊ शकते एकादी व्यक्ती मालमत्ता दुसऱ्या राज्यात असते. तेंव्हा दोन्ही राज्यांना संपत्तीकर लावण्याचा अधिकार प्राप्त होतो. त्यामुळे द्विगुण करारोपण होते.

६) जेंव्हा एकाच प्रकारच्या कर्जाच्या रक्कमेवर धनको व ऋणको या दोघांनाही कर द्यावा लागतो तेंव्हा द्विगुण करारोपण होते. कारण कराचा आधार एकच म्हणजे कर्जाची रक्कम असते.

७) जेंव्हा एकाच व्यक्तीच्या भांडवल व उत्पन्न या दोहोवर कर आकारला जातो तेंव्हा द्विगुण करारोपण होते.

**द्विगुण करारोपणाचे परिणाम :**

१) भांडवल आणि उत्पन्न यांच्यावर कर लावल्यामुळे जे द्विगुण करारोपण होते त्यामुहे मौद्रिक स्त्रोतांच्या गतिशीलतेत अडथळे निर्माण होतात.

२) द्विगुण करारोपणामुळे आंतरराष्ट्रीय व्यापार व गुंतवणूक यांच्यासाठी अत्यंत आवश्यक असलेली उत्पादक स्त्रोतांची मुक्त आवक -जावक प्रतिबंधित होते.

३) द्विगुण करारोपणामुळे उत्पादक स्त्रोतांचे वितरण विस्कळीत होते. व युक्त वितरण झाले नाही. तर शेवटी महत्तम उत्पादन व महत्तम कल्याण ही उद्दिष्टये साध्य होऊ शकत नाहीत.

४) द्विगुण करारोपणामुळे एकाच परिस्थितीतील दोन व्यक्तीमध्ये पक्षात केला जातो. जर एकाच परिस्थितीतील दोन व्यक्तींमध्ये पक्षापात केला जातो. जर एकाच परिस्थितीतील सर्व व्यक्तींना सर्वच कर मग ते दोन असोत की दहा असोत दयावे लागत असतील तर समतेच्यादृष्टीने यात काहीच वावगे नाही. परंतू जेंव्हा यातील काही व्यक्तींना एकदा व बाकीच्यांना दोनदा कर भरावे लागतात तेंव्हा पक्षपात निर्माण होतो. म्हणजेच द्विगुण करारोपणामुळे कराच्या भाराचे वितरण समान व न्याय पद्धतीने करता येत नाही. त्यामुळे कराचे न्यूनतम सकल त्यागाचे तत्त्व साध्य करता येत नाही. म्हणून द्विगुण करारोपणाला विरोध केला जातो.

**उपाययोजना :** द्विगुण करारोपणाचे परिणाम टाळण्याच्यादृष्टीने अर्थशास्त्रज्ञ व सरकार विचार करू लागली आहेत. सर्वसाधारणपणे त्यासंदर्भात पुढील उपाययोजना सुचविल्या जातात.

१) व्यक्तीचे एका देशातील वास्तव्य आणि तिचे दुसऱ्या देशातील उत्पन्न या दोन कारणामुळे दोन्ही देशांना कर आकरण्याची संधी मिळते व आंतरराष्ट्रीय क्षेत्रा द्विगुण करारोपण होते. तसे पाहिले तर दोन्ही देशातील सरकारांची चूक नसते. पण व्यक्तीला मात्र त्याच उत्पन्नावर दोनदा कर दयावा लागतो. त्यामुळे या प्रकारचे करारोपण टाळण्यासाठी जे उपाय शोधून काढायचे ते सर्व राष्ट्रांनी मिळून परस्पर करार व परस्पर समायोजन करून शोधून काढले पाहिजेत. परंतू अशाप्रकारचे परस्पर करार सहजासहजी घडून येत नाहीत. कारण राष्ट्रांचे हितसंबंध परस्परविरोधी असतात. त्यामुळे एकच तत्त्व सर्वांना लागू होत नाही. ज्या देशांचा फारसा विकास झालेला नसतो अशा देशात परदेशी व्यक्तीने गुंतवणूक करून उत्पन्न मिळविले तर त्याावर कर लावून महसूल मिळविण्याचा प्रयत्न केला जातो. ह्या उत्पन्नावर कर लावला नाहीतर सरकारी खजिन्यात भरटाकण्याचा एक मोठा स्त्रोत ते गमावून बसतात. याउलट या

देशातील लोकांना बाहेरच्या देशात उत्पन्नमिळविण्याची फारशी संधी मिळत नाही. त्यामुळे दुसऱ्याकडून भरपाईजन्य लाभ मिळविण्याची शक्यताही नसते. म्हणून असे देश उत्पन्नाचे स्थान दा आधार धरून ठेवतात.

तर दुसऱ्या बाजूस जे देश सधन असून ज्यांचे रहिवाशी इतर देशात भरपूर गुंतवूणक करून उत्पन्न मिळवितात ते देश नागरिकत्वाच्या आधाराला प्राधान्य देतात.

२) दुसरा उपाय म्हणजे उत्पन्नाच्या उगम (Origin of Income) किंवा संपत्तीचे स्थान (Location of Property ) हा करारोपणाचा आधार समजायचा, म्हणजे व्यक्तीने उत्पन्न कोठे मिळविले आहे किंवा व्यक्तीची संपत्ती कोठे आहे त्यानुसार त्या सरकारने कर लावावयाचा उदा. समजा एकादी व्यक्ती भारताची नागरिक आहे व तिची संपत्ती अमेरिकेत आहेत व त्यापासून त्याला काही उत्पन्न मिळते. तेंव्हा त्यावर अमेरिकन सरकारने कर लावावा. तेथे भारताने नागरिकत्वाच्या आधारे कर लावू नयेत. परंतू प्रत्यक्षात याबाबत एकमत होणे कठीण आहे.

३) तिसरा उपाय मिर स्वरूपाचा आहे. म्हणजे नागरिकत्त्व व संपत्तीचे स्थान या दोन्ही आधारांचा समन्वय करून कर लावायचा. उदा. स्थावर संपत्तीवर तिच्या स्थानाप्रमाणे कर लावायचा आणि इतर प्रकारच्या संपत्तीवर नागरिकत्त्वाच्या आधारावर कर लावायचा असा समन्वय साधता येतो.

४) चौथा उपाय म्हणजे राजनिष्ठेचा उपाय होय. काही अर्थशास्त्रज्ञांच्या मते द्विगुण करारोपणाच्या समस्येची सोडवणूक राजनिष्ठेच्या तत्त्वानुसार करावी. म्हणजे व्यक्तीची राजनिष्ठा हा निकष ठरवून त्यानुसार करारोपण करावे. व्यक्तींने दोन्ही देशावर निष्ठा व्यक्त केली तर दोन्ही सरकारांनी करारोपण करायला हरकत नाही. पण द्विगुण करारोपण टाळण्यासाठी व्यक्तीचे सगळे उत्पन्न करयोग्य ठरवावे आणि राजानिष्टेच्या प्रमाणात कराची विभागणी करावी. परंतु राजनिष्ठेची विभागणी काटेकोरपणे कधीच होणार नाही ही अडचण आहे.

### ४.२.२.६ लाफर वक्र : (Laffer curve) :-


सरकारच्या वाढत्या खर्चासाठी करमहसुल पुरेशा सरकारच्या वाढत्या खर्चासाठी करमहसुल पुरेशा प्रमाणात जमा करणे त्याला खूप महत्त्व निर्माण झाले. त्यासाठी कर आणि करांचे दर महत्त्वाची भूमिका पार पाडतात. कर महसूल प्राप्त करण्यामध्ये कराच्या दराला अनन्यसाधारण महत्त्व आहे. कारमहसूल आणि कराचे दर यांच्यातील संबंध स्पष्ट करण्यासाठी लाफर वक्राची संकल्पना मांडण्यात आली आहे. ही संकल्पना सर्वप्रथम १८७७ मध्ये आफ्रिकन विद्वान खलडून यांनी मांडली. परंतू तिला प्रसिद्धी देण्याचे काम १९७० मध्ये वानास्की यांनी केले. आणि पुढे ऑर्थर लाफर यांनी या वक्रासंबंधी अधिक संशोधन केले. त्यामुळे या वक्राला लाफर वक्र असे नाव देण्यात आले आहे.

**लाफर वक्राची संकल्पना :–** ही संकल्पना कराचे दर आणि त्यापासून मिळणारे उत्पन्न यांच्यातील

संबंध स्पष्ट करते. या संकल्पनेनुसार कराचे दर सातत्याने वाढविल्यास प्रारंभी करापासून मिळणारे उत्पन्नात होणारी ही घट वाढत्या दराबरोबर मोठ्या प्रमाणात असते.

लाफर वक्राची ही संकल्पना कराची उत्पन्न लवचिकतेवर अवलंबून आहे. जसजसे करायचे दर वाढतात तसतसे कर भरल्यामुळे करदात्यांच्या उत्पन्नात घेणारी घट वाढत जातो. म्हणजेच त्यांची उत्पन्नाची सीमांत उपयोगिता वाढते. अशावेळी आपण स्वर भरल्यामुळे खूप मोठा त्याग करीत आहोत असे लोकांना वाटू लागते. त्यामुळे कर चुकविण्याची प्रवृत्ती वाढते. तेसच अधिक उतन्न मिळविण्याच्या इच्छेवर प्रतिकूल परिणाम होतो करदर वाढल्यामुळे करदात्याला मोठी रक्कम भरावी लागते. परिणामी बचत व गुंतवणूक करण्यासाठी पैसा कमी पडतो व त्यांची आर्थिक प्रेरणा कमी होते. परिणामी कर महसुलात घट होवू लागते.

कराचे दर आणि त्यापासून मिळणारे उत्पन्न यांच्यातील हा विशिष्ट संबंध पुढील आकृतीच्या आधारे स्पष्ट करता येईल.




**आकृती ४.२.६ : लाफर वक्र**

वरील आकृतीमध्ये अक्ष अक्षावर कराचे दर अणि 'क्षय' अक्षावर करापासून मिळणारे उत्पन्न दर्शविले आहे. कराचे दर प्रारंभी वादत असताना करापासूनचे उत्पन्न वाढत गेल्याचे आकृतीवरून स्पष्ट होते. कराचा दर ५ टक्के वरून ३० टक्के होईपर्यंत करापासूनचे उत्पन्न वाढत जाऊन ते ३५० कोटी रु. होते. ('क' बिंदू) त्यानंतर कर दर वाढत जाताना करापासूनचे उत्पन्न घटत जाते आणि कराचा दर ६० टक्के असताना करापासूनचे उत्पन्न १०० को. रू हून कमी होते. आकृतीतील अकब हा लाफर वक्र असून तो हे दर्शवितो की कराचे दर विशिष्ट मर्यादेपर्यंत वाढेपर्यंत करापासूनचे उत्पन्न वाढत जाते आणि नंतर कराच्या दरवाढीबरोबर ते घटत जाते. अशाप्रकारे कराचे दर आणि कराचे उत्पन्न यांचेतील संबंध लाफर वक्राने स्पष्ट केले आहेत.

### ४.२.२.७ वस्तू आणि सेवा कर (Goods and services Tax-GST) :-

**अर्थ :-** करांचे प्रत्यक्ष कर आणि अप्रत्यक्ष कर असे दोन प्रकार पडतात. अप्रत्यक्ष करामध्ये उत्पादन शुल्क, विक्रीकर, करमणूक कर, व्यवसाय कर, प्रवेशकर, जाहिरात कर इत्यादींचा समावेश होतो. एकादया देशामध्ये सत्तेचे विकेंद्रीकरण केलेले असेल तर केंद्र सरकार आणि घटक राज्यांची सरकारे अप्रत्यक्ष कर आकारतात. अर्थात कर लावणे, वसूल करणे व त्याचा महसूल वापरात आणणे याबाबतीत केंद्र व राज्य सरकारचे अधिकार ठरवून दिलेले असतात. अप्रत्यक्ष कर हे वस्तू व सेवांचे उत्पादन, विनिमय आणि उपभोगांशी संबंधित सर्व व्यवहारावर आकारले जातात. या करांचे सर्वात महत्त्वाचे वैशिष्टय म्हणजे त्यांच्या करभाराचे संक्रमण करता येते. याचा अर्थ अशा करांचा अंतिम भार हा उपभोक्त्याावर पडतो. अस करसंक्रमण हे वस्तू व सेवांच्या किंमतीतील बदलाद्वारे होत असल्याने या करांचा एक महत्त्वाचा परिणाम म्हणजे वस्तू व सेवांच्या किंमतपातळीत वाढ घडून येते. हा परिणाम अप्रत्यक्ष करांची संख्या किती आहे तसेच त्यांचे दर किती आहेत यावर अवलंबून असतो. करांची संख्या आणि दर मोठा असेल तर हा परिणामही मोठा असतो. करांची संख्या आणि दर मोठा असेल तर हा परिणामही मोठा असतो. करांची संख्या आणि दर मोठा असेल तर हा परिणामही मोठा असतो. त्यामुळे त्याचे उत्पादन, रोजगार, उपभोग/राहणीमान यााावर नकारात्मक परिणाम होत असतात. म्हणून सर्व अप्रत्यक्ष कराऐवजी एकच कर लावण्याची कल्पना मांडण्यात आली. हा कर म्हणजेच वस्तू व सेवा कर (Goods and Services Tax GST) होय.

वस्तू व सेवा कर म्हणजे देशात वस्तू आणि सेवावर एकसन्मान दराने एकच कर आकारणे होयय.याचा अर्थ देशातील सर्व अप्रत्यक्ष कर रद्द करून वस्तू व सेवा कर हा एकच कर आकारण्याची पद्धती म्हणजे वस्तू व सेवा कर प्रणाली स्वीकारणे होय.

**वस्तू आणि सेवा कराचे प्रकार :** वस्तु व सेवा कराचे मुख्यत: तीन प्रकार आहेत.

**१) केंद्रीय वस्तु व सेवा कर (CGST) :** हा कर केंद्रीय सरकारकडून आकारला जातो. उदा. महाराष्ट्रामध्ये येणाऱ्या सर्व वस्तू व सेवा यावर केंद्र शासनातर्फे आकारला जाणारा कर.

**२) राज्य वस्तू व सेवा कर (SGST) :** हा कर राज्य सरकारमार्फत आकारला जातो. उदा. महाराष्ट्रामध्ये येणाऱ्या सर्व वस्तू व सेवा यावर महाराष्ट्र शासनातर्फे आकारला जाणारा. कर.

**३) एकीकृत वस्तू व सेवा कर (IGST) :** हा कर केंद्र सरकारच्या वतीने राज्या राज्यामध्ये म्हणजेच आंतरराज्य होणाऱ्या वस्तू व सेवांच्या देवाणघेवाणीवर आकारला जातो.

**वस्तू व सेवा कराचे स्वरूप (Nature of GST) :** केंद्र व राज्याच्या अनेक अप्रत्यक्ष करांच्या ऐवजी व्यवहारात संपूर्ण राष्ट्र आकारण्यात येणारा एकच अप्रत्यक्ष कर असे वस्तू व सेवा कराचे स्वरूप आहे. हा कर उत्पादनावर नसतो तर जेंव्हा त्याचे पुरवठ्यात रूपांतर होते तेंव्हा त्यावर आकारला जातो. हा प्रत्येक टप्प्यावर होणाऱ्या मुल्यवृद्धीवर आकारला जातो हा प्रत्येक टप्प्यावर होणाऱ्या मुल्यवृद्धीवर आकारला जातो. म्हणून प्रत्येक पुढच्या टप्प्यावर पुर्वीच्या टप्प्यावर भरलेल्या करासाठी सूट आहे.

वस्तु व सेवा कराचा अंतिम भार हा ग्राहकाने/उपभाक्त्याने सहन करावा अशी अपेक्षा आहे. गतीमान अर्थव्यवस्थेत आर्थिक विनिमय व्यवहारात वस्तू बरोबरच अनेक सेवांचा वापर होतो. त्या सर्वांना करजाळ्यात आणण्यासाठी वस्तू व सेवाकर उपयुक्त ठरतो.

**वस्तू व सेवा कराची वैशिष्टये (Features of GST) :-**

वस्तु व सेवा कराची प्रमुख वैशिष्टये पुढीलप्रमाणे :

१) हा कर वस्तु व सेवांच्या सर्व विनिमय व्यवहारांना लागू होतो.

२) सर्व व्यवहारासाठी आदान कर परिपूर्ती लागू असते.

३) सर्व वस्तू व सेवांच्या व्यवहारावर एकाचवेळी केंद्र व राज्य सरकार जीएसटी आकारू शकतात.

४) करदाता एकाचवेळी केंद्र सरकार व राज्य सरकार यांच्या खात्यावर कर भरतो.

५) प्रत्येक करदात्याला पॅन संलग्न टॅक्स पेयर आयडेंटीफिकेशन नंबर दिला (TIN) जातो. त्यामुळे कर प्रक्रिया सुलभ होते.

६) करदात्याना कर भरणा करण्यासाठी केंद्र व राज्य सरकारना समान फॉर्ममध्येच ठराविक काळाने कर प्रपत्र भरावे लागते.

**वस्तु व सेवा कराचे फायदे :**

१) देशभरात वस्तू व सेवावर समान करआकारणी करणे वस्तू व सेवा कर प्रणालीत शक्य होते. त्यामुळे भिन्न भिन्न दराने कर आकारणीमुळे होणारे दुष्परिणाम टाळता येतात.

२) देशभरात वस्तु आणि सेवांच्या विनिमय व्यवहारावर एक समान दरानेवस्तु व सेवा कर आकारल्यामुळे देशाच्या विविध भागात वस्तू व सेवांच्या किंमती समान राहण्यास मदत होते.

३) देशातील वेगवेगळ्या प्रदेशात वेगवेगळ्या दराने अप्रत्यक्ष करांची आकारणी केली जाते तेंव्हा गुंतवणूकीसाठीच्या प्रेरणा बाबत तफावत राहते. वस्तू व सेवा कर देशभर एकसमान दराने आकारला जात असल्यामुळे ही तफावत दूर होऊन गुंतवणुकीला चालना मिळते.

४) वस्तु व सेवा कराची आकारणी सर्वच वस्तू व सेवा वर केली जाते. त्यामुळे पुर्वी ज्या वस्तु सेवा कर जाळ्याच्या बाहेर होत्या त्यासर्व वस्तू सेवा करजाळ्यात येतात. त्यामुळे करांचा पाया विस्तृत होऊन सरकारला अधिक कर उत्पन्न मिळू शकते.

५) वस्तु व सेवा कर हा अप्रत्यक्ष कर असल्याने आणि अनेक कराऐवजी तो एकच कर आकारला जात असल्यामुळे सरकारला करावा लागणारा कर वसुलीचा खर्च कमी होतो.

६) वस्तु व सेवा कर प्रणाली स्वीकारल्यामुळे संपूर्ण देश एकसंघ बाजारपेठ होते. प्रत्येक राज्यांचे वस्तुवरील कराचे दर वेगळे असल्याने वस्तूंच्या किंमतीत फरक पडत होता. त्यामुळे देशांची एकसंघ बाजारपेठ निर्माण होत नसते. वस्तू व सेवा कर प्रणालीमुळे ते शक्य होते.

७) वस्तू व सेवा कर प्रणालीमध्ये आदांना वरील भरलेल्या कराची बजावट दिली जाते. केंद्र व राज्य सरंकारे स्वतंत्रपणे वेगवेगळे कर आकारतात तेंव्हा अशी वजावट दिली जात नतसे. वस्तू व सेवा करप्रणालीत अशी वजावट देण्यासाठी सर्व व्यवहार ऑनलाईन नोंद केले जातात. त्यामुळे कर चुकवेगिरीला आळा बसण्यास मदत होते.

८) एकाच कराची समान दराने आकारणी व एकसंघ बाजारपेठ निर्माण होत असल्याने अर्थव्यवस्थेतील गुंतवणुकीस चालना मिळते. त्यामुळे आर्थिक विकासाचा वर्ग वाढण्यास मदत होईल.

९) विविध कर आकारले जातात तेंव्हा करदात्याला अनेक कायद्रयांचे पालन करावे लागते त्यासाठी बराच वेळ व पैसा खर्च होतो. कारण अनेक विवरणपत्रे तयार करून सादर करावी लागतात. वस्तू व सेवा करप्रणालीत एकच कर असून सर्वच व्यवहार संगणकामार्फत होत असल्यामुळे अचूकता येण्यास व कार्यपूर्ती लवकर होण्यास मदत होते.

१०) काही अत्यावश्यक वस्तू वस्तू व सेवाकर कक्षेतून वगळता येतात. त्यामुळे त्यांच्या किंमतवाढीवर नियंत्रण राहील. तसेच अन्य वस्तूवर त्यांच्या आकारावरून कमी जास्त दाराने वस्तू सेवा कर आकारता येतो. त्यामुळे सर्वसामान्यांना कर कमी भरावा लागेल. उदा आलिशान गाड्यावर जास्त दराने तर छोट्या गाड्यावर कमी दराने वस्तू व सेवा कर आकारता येईल.

१) केंद्र व राज्य सरकारकडून आकारले जाणारे अनेक कर रद्द होतात त्यामुळे विशेषत: राज्यांच्या कर उत्पन्नावर त्याचा नकारात्मक परिणाम होतो. त्यासाठी केंद्र सरकारला काही भरपाई योजना कराव्या लागतात. त्या केंद्रसरकारने केल्या तर राज्यांना ९ जीएसटी चा फारसा त्रास होणार नाही.

२) वस्तू व  सेवा कर हा अनेक कर रद्द करून लावणेत येतो.  पण त्याचे दर उच्च ठेवण्यात आले तर वस्तू व सेवांच्या किंमती उच्च राहतील आणि लोकांना त्या सहन कराव्या लागतील. तसेच काही अत्यंत महत्त्वाच्या वस्तू सरकारने महसूल प्राप्तीच्या उद्देशाने जीएसटी कक्षेबाहेर ठेवले तर जीएसटी मुळे किंमती कमी होण्याचा लाभ ग्राहकांना मिळणार नाही. उदा. आपल्या देशात पेट्रोलियम पदार्थ– पेट्रोल डिसेल हे जीएसटी कक्षे बाहेर ठेवण्यात आले आहेत. त्यामुळे लोकांना त्यावरील विविध उच्च कर भरावे लागतात.

३) वस्तू व सेवा कर प्रणाली बाबत व्यापाऱ्यांना पुरेशी व योग्य माहिती दिली गेली नाही तर जीएसटी कार्यप्रणालीबाबत त्यांना अनेक अडचणींना तोंड द्याव लागते. अशावेळी त्यांचेकडून जीएसटी. कारप्रणालीला विरोध होऊ शकतो.

४) ग्रामीण भागातील कमी शिक्षित किंवा नीरक्षर व्यापारीवर्गाला संगणकाचे पुरेसे ज्ञान नसते. त्यामुळे जीएसटी अंतर्गत व्यवहारांची ऑनलाईन नोंदी करण्यात अडचणी येतात.

५) जीएसटी प्रणाली अंतर्गत करपरतावा देण्याची पद्धती जर गुंतागुतीची असेल तर लोकांना ती त्रासदायक होईल आणि परतावा मिळण्याबाबत दिरंगाई होण्याची शक्यता राहील. तसेच जीएसटी भरणा दरमहा करप्रस्ताव आगाऊ भरून करावा लागल्यास त्यामधील त्रूटीसाठी दंड किंवा व्याजासह भरावा लागत असेल तर अशी तरतूद जाचक ढरण्याची शक्यता राहते.

थोडक्यात जीएसटी करप्रणालीचे वरीलप्रणामे काही फायदे तोटे आहेत. तोटे हे प्रामुख्याने करप्रशासनाशी संबंधित आहेत. ते कसोशीने कमी करण्याचे आणि संबंधितांना आवश्यक माहिती पुरविणारी यंत्रणा पुरेशा प्रमाणात तयार केली तर तोट्यांचे प्रमाण कमी होईल. आणि कालांतराने ही कर प्रणाली गती घेऊन अर्थव्यवस्थेला लाभदायक ठरेल.

### ४.२.३ : सार्वजनिक कर्जाचा सिद्धांत : (Theory of Public Debt) :-

**अर्थ :** सार्वजनिक कर्ज म्हणजे सार्वजनिक सत्तांनी उभारलेले कर्ज होय. केंद्र सरकार, राज्य सरकारे व स्थानिक पातळीवरील सत्तांनी जे कर्ज उभारलेले असते त्यालाच सार्वजनिक कर्ज असे म्हणतात. प्रा. शिरास यांनी सार्वजनिक कर्जाची व्याख्या पुढीलप्रमाणे केली आहे.

सरकार देशातील नागरिकांकडून किंवा विदेशी नागरिकांकडून जे कर्ज उभारते त्याला सार्वजनिक कजृ असे म्हटले जाते सरकारने सार्वजनिक खर्चासाठी लोकाकडून कर्ज घेण्याची पद्धती जुनीच आहे. परंतु प्राचीन अर्थशास्त्रज्ञांना सरकारने कर्ज उभारणे फारसे आवडत नव्हते. उदा. ॲडम स्मिथ यांनी सरकारी कार्जाचा विरोध करून ते फक्त अपराधात्मक प्रसंगी घेतले जावे असे मत मांडले होते. कारण त्यांच्यामते सरकारी कर्जामुळे अनाठायी, उधळपट्टी, युद्धखर्च इत्यादी अनावश्यक खर्चाला उत्तेजन मिळते. मात्र आधुनिक अर्थशास्त्रज्ञ यापेक्षा वेगळे मत मांडतात. त्यांच्यामते सार्वजनिक कर्ज हे कर शुल्क या

स्त्रोताप्रमाणेच सरकारच्या उत्पन्नाचा एक स्त्रोत आहे. अर्थात हे उत्पन्न कायम स्वरूपाचे नसते. कारण ते परत करायचे असते. त्यामुळे फार तर ते अल्पकालीन उत्पन्न समजता येईल. याबाबतीत काही अर्थशास्त्रांचे मत असे आहे की सरकारच्या उत्पन्नात फक्त त्याच स्त्रोतांचा समावेश करावा की जे सदैव सरकारजवळच राहतात. म्हणजेच सरकारला तो परत करावा लागत नाही.

**सार्वजनिक कर्ज आणि खाजगी कर्ज यांची तुलना :-**

सार्वजनिक कर्जाचे खरे स्वरुप समजून घेण्यासाठी त्याची खाजगी कर्जाशी तुलना करणे उपयुक्त ठरते. सार्वजनिक कर्ज आणि खाजगी कर्ज यामध्ये काही साम्य आणि भेद आहेत.

**साम्य :** सरकारी कर्ज आणि खाजगी कर्जामध्ये खालील बाबतीत समानता दिसून येते.

**१) उद्देश :-** सार्वजनिक आणि खाजगी कर्ज उभारण्यामागे असलेले उद्देश जवळजवळ सारखेच असतात. व्यक्तीला आकस्मिकपणे येणाऱ्या संकटाना व अडचणींना तोंड देण्यासाठी कर्जाची गरज भासते. तसेच व्यक्तीला उद्योग-व्यवसायासाठी भांडवलाची आवश्यकता असते. म्हणून कर्जाची आवश्यकता असते. सरकारही याच उद्देशानी कर्ज उभारते. आर्थिक विकासासाठी आणि नैसर्गिक आपत्तीना तोड देण्यासाठी सरकारला प्रचंड प्रमाणावर खर्च करावा लागतो. त्यासाठी नेहमीचे उत्पन्न स्त्रोत अपुरे पडतात. तेंव्हा सरकार सार्वलनिक कर्ज उभारते.

**२) परतफेड :-** व्यक्तीला घेतलेल्या कर्जाची व्याजासह परतफेड करावी लागते तशीच सरकारलाही आपल्या कर्जाची परतफेड करावी लागते. घेतलेल्या कर्जाच्या अटींचे पालन न केल्यास किंवा परतफेड करण्याबाबत चालढकल केल्यास व्यक्तीची प्रतिष्ठा कमी होते. त्याचप्रमाणे सरकास्वाही प्रतिष्ठा कमी होत असते थोडक्यात व्यक्ती आणि सरकार या दोघांनाही घेतलेल्या कर्जांची परतफेड करावीच लागते.

**भेद :-** सार्वजनिक कर्ज आणि खाजगी कर्ज या दोघांत उपयोग आणि व्यवस्था या दृष्टीने काही महत्त्वाचे भेद आहेत. ते पुढीलप्रमाणे

**१) सक्ती :** सरकारकडे सर्वाधिकार असल्यामुळे ते जनतेला कर्ज देण्यासाठी सक्ती करू शकते. व्याजाचादर परतफेडीची मुदत आणि अटीबाबतही सरकार लोकांवर सक्ती करू शकते. याउलट खाजगी व्यक्तीला कर्जाबाबत अशी सक्ती करू शकत नाही.

**२) गुप्तता :** सरकार जेंव्हा सार्वजनिक कर्ज उभारते तेंव्हा त्याची प्रसिद्धी करते. म्हणजेच सार्वजनिक कर्जाच्याबाबतीत कोणत्याही प्रकारची गुप्तता नसते. याउलट व्यक्ती स्वत:चे कर्जविषयक व्यवहार शक्यतो गुप्त ठेवण्याचा प्रयत्न करते. त्यामुळे समाजाला व्यक्तीच्या कर्जासंबंधी काहीच कळत नाही.

**३) व्याजाचा दर :** सरकारची प्रतिष्ठा व पत व्यक्तीच्या तुलनेत बरीच मोठी असते. त्यामुळे सरकार कमी व्याजदराने अधिक सहजपणे कर्ज प्राप्त करू शकते. व्यक्तीला मात्र तसे करता येत नाही.

**४) कर्जाचा उपयोग :** सरकार सार्वजनिक कर्ज हे सार्वजनिकहितासाठी उपयोगात आणते. त्यामुळे सरकारला कर्ज देणाऱ्या व्यक्तीचेही त्यामध्ये हित साधले जाते. याउलट व्यक्ती जे कर्ज घेते ते स्वत:साठीच उपयोगात आणते. इतरांच्याहिताचा विचार तिच्या समान नसतो.

**५) कर्जाचा आकार आणि तारण :** कोणत्याही प्रकारचे तारण न ठेवता सरकार सहजतेने मोठीमोठी कर्जे उभारू शकते. कारण सरकारची. आर्थिक स्थिती, पत व प्रतिष्ठा याबद्दल सर्वांनाच माहिती असते. परंतू व्यक्तीला लहान आकाराचेही कर्ज मिळविण्यासाठी तारण द्यावे लागते.

**६) बाह्य कर्ज :** सरकारला देशातील लोकांकडून जसे कर्ज मिळूशकते तसेच विदेशातूनही मिळू शकते. म्हणजेच सरकारला परदेशातील लोकाकडून संस्थांकडून, सरकारकडून कर्ज घेता येते. याउलट व्यक्तीला विदेशातून बहुधा कर्ज मिळत नाही. प्रतिष्ठित व मोठ्या व्यावसायिकांना परदेशांतून कर्ज मिळू शकते. पण त्यासाठी भारत सरकारला हमी द्यावी लागते. याचे कारण म्हणजे सरकारच्या तुलनेत व्यक्तीची विदेशातील पत व प्रतिष्ठा बरीच कमी असते.

**७) कर्जाचा कालावधी :** सरकार सर्वसाधारणपणे दीर्घकाळासाठी कर्ज घेते. कारण सरकारला आर्थिक विकासाची मोठमोठी कार्ये पार पाडावयाची असतात. शासनसंस्था ही नेहमीच अस्तित्त्वात असते. सरकार जरी बदलले तरी विकासाच्या योजना बदलत नाहीत. याउलट व्यक्तीचे जीवन मर्यादित आणि अनिश्चित असते. त्यामुळे व्यक्तीच्या कर्जाचा कालावधी हा दहा-वीस वर्षांचा असतो.

**८) कर्जाची परतफेड :** सरकार जनतेवर कर आकारून त्याद्वारे येणाऱ्या उत्पन्नातून कर्जाची परतफेड करू करू शकते. अथवा नविन कर्जे उभारून जुनी कर्जे परत करू शकते. त्यामुळे सरकारला कर्ज परतफेडीसाठी फारशा अडचणी सहन कराव्या लागत नाहीत. याउलट व्यक्तीला कर्जपरतफेडीची व्यवस्थाकरावी लागते आणि त्यासाठी येणाऱ्या अडचणी सहन कराव्या लागतात.

**९) कर्ज परतफेडीस नकार :** सरकार ही सार्वभौम सत्ता असल्यामुळे कर्जाची परफेडीस नकार देवू शकते. मात्र व्यक्तीला आपले कर्ज फेडण्यास नकार देता येत नाही. परंतु प्रत्यक्षात सरकार कर्ज परतफेड नाकरत नाही. कारण तसे केल्यास सरकारची देशात आणि परदेशात प्रतिष्ठा राहणार नाही.

**१०) कर्जाचा प्रभाव :** सार्वजनिक कर्जाचा अर्थव्यवस्थेवर परिणाम घडून येतो. देशातील उत्पादन, संपत्तीचे वितरण आर्थिक कल्याण इत्यादीवर सार्वजनिक कर्जाचे परिणाम झालेले दिसून येतात. अर्थव्यवस्थेत जाणिवपूर्वक बदल घडवून आणण्यासाठी सरकार कर्ज घेत असते उदा. आर्थिक विकासाचे प्रकल्पराबविणे, तेजी मंदी नियंत्रित करणे. परंतू खाजगी कर्जाचा असा प्रभाव पडत नाही.

**११) कर्ज आणि गरजांची तृप्ती :** सरकार सामुदायिक गरजांच्या पूर्तीसाठी कर्ज उभारते. सरकारला आपली कर्तव्ये पार पाडण्यासाठी इतर सर्व प्रकारच्या स्त्रोतापासून मिळणारे उत्पन्न कमी पडते तेंव्हा सरकार कर्ज उभारून आपले कर्तव्य पूर्ण करते. याउलट व्यक्ती मात्र आपल्या व्यक्तीगत गरजांच्या

पूर्ततेसाठी कर्ज घेते. व्यक्तीला कर्ज मिळाले नाही तर ती आपल्या काही गरजा अतृप्त ठेवते.

### ४.२.३.२ सार्वजनिक कर्जाचे महत्त्व :-

अलिकडील काळात सार्वजनिक कर्ज हा वित्तीय साधनसामग्री उभारण्याचा महत्त्वाचा मार्ग ठरला आहे. सार्वजनिक कर्ज म्हणजे जनतेच्यावतीने सरकारने घेतलेला मोठी जबाबदारी असते. त्यामुळे सरकार सार्वजनिक कर्जे उभारता विशिष्ट उद्देश डोळ्यासमोर ठेवत असते. त्या उद्देशावरून सार्वजनिक कर्जाचे महत्त्व स्पष्ट होते. ते थोडक्यात पुढील प्रमाणे सांगता येईल.

**१) देशाचे बाह्य आक्रमणापासून संरक्षण :-**

बाह्य आक्रमणापासून देशाचे संरक्षण आणि अंतर्गत शांतता व सुव्यवस्था हे देशाचा आर्थिक विकास होण्यासाठी अत्यंत आवश्यक असते. आधुनिक काळात युद्ध करणे व युद्ध सज्जता ठेवणे यासाठी फार मोठा खर्च करावा लागतो. युद्ध खर्च हा तातडीचा आणि तात्कालिक असतो. युद्धाचा हा अवाढव्य खर्च करांच्याद्वारे भागविणे शक्य नसते. शिवाय कर गोळा करण्यासाठी काही कालावधी लागतो. त्यामुळे इतर सर्व साधनांचा उपयोग करूनही सरकारला युद्धाखर्चासाठी सार्वजनिक कर्ज हा एक चांगला पर्याय असतो. तेंव्हा अशा सार्वलनिक कर्जाद्वारे सरकारला देशाचे बाह्य आक्रमणापासून संरक्षण करणे शक्यक होते व देशाचे सार्वभौमत्त्व टिकविण्यास मदत होते.

**२) समाजाचे नैसर्गिक आपत्तीपासून संरक्षण :-**

दुष्काळ, महापूर भूकंप, वादळ, इत्यादीपासून समाजाचे संरक्षण करणे हे सरकारचे एक महत्त्वाचे भरपाई देणे, पुनर्वसन करणे इत्यादीसाठी सरकारला मोठा खर्च करावा लागतो. अशा आकस्मिक व असाधारण परिस्थितीत कर्जाद्वारे रक्कम उभारणे अधिक सोपे ठरते. कारण कराद्वारे उत्पन्न जमा करण्यास वेळ लागतो.

**३) संसाधनांचा पर्याप्त वापर :-**

देशातील उपलब्ध नैसर्गिक व मानवी संसाधनांचा पर्याप्त उपयोग करून जलद आर्थिक विकास साध्य करण्यासाठी मोठ्या प्रमाणावर भांडवलाची गरज असते. विकसनशील देशातील सरकारला करमहसुलाद्वारे भांडवल उभारण्यामध्ये अनेक अडचणी असतात. तेंव्हा उपलब्ध संसाधनांचा पर्याष्ट वापर करण्यासाठी लागणारे भांडवल उभारण्याचा एक मार्ग म्हणजे सार्वजनिक कर्ज होय. सरकार देशांतर्गत आणि बाह्य देशाकडून सार्वजनिक कर्ज घेऊन संसाधनाच्या वापरातून उत्पादन, रोजगार व उत्पन्नात वाढ घडवून आणु शकते.

**४) आर्थिक विकास :-**

आधुनिक काळात सार्वजनिक कर्जाचे महत्त्व वाढण्याचे कारण म्हणजे आर्थिक विकास साध्य

करण्याचे सरकारचे प्रयत्न होय. विशेषत: विकसनशील देशामध्ये आर्थिक विकासासाठी आवश्यक असलेल्या वित्तीय स्त्रोतांची कमतरता असते. त्यामुळे अशा देशातील सरकारे अंतर्गत आणि बाह्य देशातून कर्ज उभारून आर्थिक विकासासाठीचा पैसा उभा करतात. आर्थिक विकासासाठी लागणाऱ्या पैशाचे प्रमाण मोठे असते. तो पैसा करारोपणाच्या आधारे जमविण्यास मर्यादा असतात. शिवाय त्यासाठी करारोपण केल्यास त्याचा जनतेवर भार पडून लोकांच्या उत्पादक प्रेरणावर प्रतिकूल परिणाम होतो. तसेच आर्थिक विकासाच्या योजना योग्य पद्धतीने पूर्ण केल्या तर कर्जाद्वारे निर्माण किलेल्या संपत्तीतून उत्पन्न प्राप्त होवू लागते.

दुसरे असे की विकासनशील देशात आर्थिक विकासासाठीची भांडवल उभारणी सरकारलाच करावी लागते. कारण त्यासाठी लागणारे भांडवल मोठे असते आणि फलप्राप्तीचा कालावधी मोठा असतो. म्हणून खाजगी उत्पादक त्यासाठीच्या पुढाकार घेत नाहीत.

**५) कल्याणकारी राज्याची संकल्पना राबविणे :-**

विसाव्या शतकात बहुतेक सर्व देशामध्ये कल्याणकारी राज्याच्या संकल्पनेला मान्यता मिळाली. अलिकडील नव आर्थिक उदारीकरणाच्या काळात सरकारने आपल्या काही जबाबदाऱ्या कमी करण्याचे प्रयत्न केले आहेत. मात्र कल्याणकारी राज्याची संकल्पना टाकून दिलेली नाही. त्यामुळे शिक्षण, आरोग्य सुविधा सामाजिक सुरक्षितता इत्यादी कल्याणकारी बाबीवर सरकारला मोठा खर्च करावा लागतो. असा खर्च चालविणे सरकारला सार्वलनिक कर्जामुळे शक्य होते. म्हणून सार्वजनिक कर्ज महत्त्वाचे ठरते.

**६) आर्थिक मंदीचे नियंत्रण :-**

भांडवलशाही अर्थव्यवस्थेत आर्थिक तेजी-मंदीची चक्रे सतत उद्भवत असतात. मंदीच्या काळात वस्तू व सेवांच्या किंमती घटतात. त्यामुळे उत्पादकांचा नफा कमी होऊन उत्पादन व रोजगार पातळीत घट होते. मंदीची ही परिस्थिती सर्वसाधारणपणे वस्तू व सेवांच्या मागणीच्या कमतरतेमुहे निर्माण होते. म्हणून ती दूर करण्यासाठी वस्तू  व सेवांची मागणी वाढविण्याचा प्रयत्न करावा लागतो. त्यासाठी सरकारला लोककल्याण व आर्थिक विकासाच्या कार्यावरील खर्चात मोठी वाढ करावी लागते. पण त्यासाठी सरकारचे उत्पन्न वाढावे लागते. मंदीच्या काळात अधिक कर आकारणी करून सरकारला उत्पन्न वाढविणे शक्य आणि योग्यही नसते. अशावेळी सरकारला सार्वलनिक कर्जाचा आधार घ्यावा लागतो. सरकारने बँकाकडून कर्ज घेऊन सार्वजनिक कामे सुरू केल्यास रोजगार आणि उत्पन्न वाढण्यास मदत होते. त्यामुळे वस्तू व सेवांची मागणी वाढून अर्धव्यवस्था उर्जितावस्थेकडे जाऊ लागते.

**७) भाववाढीचे नियंत्रण :-**

अर्थव्यवस्थेत चलनाविस्ताराची परिस्थिती निर्माण झाल्यास किंमतपातळीत मोठी वाढ घडून येते. लोकांच्या हातातील पैसा वाढून त्यांची क्रयशक्ती वाढते. अशावेळी सरकारने कर्ज उभारले तर लोकाजवळील

अतिरिक्त क्रयशक्ती कमी होण्यास मदत होते. त्यामुळे चलनविस्ताराला आणि किंमतीना आळा बसतो. परंतु काही अर्थशास्त्रज्ञांच्या मते कर्जापेक्षा कर हे चलनविस्ताराला अधिक चांगल्याप्रकारे प्रतिबंध करू शकतात. कर्जामुळे सरकारची जबाबदारी वाढते. कारण कर्जाची रक्कम व्याजासह परत करावयाची असते.

**८) पायाभूत संरचना :-**

जलद आर्थिक विकास साध्य करण्यासाठी पायाभूत संरचनेचा विकास अत्यावश्यक ठरतो. धरणे, कालवे लोहमार्ग, रस्ते, वीजकेंद्रे, बंदरे इत्यादीसाठी मोठ्या प्रमाणावर भांडवल गुंतवणुकीची गरज असते. अशा प्रकारच्या पायाभूत संरचनेसाठी सरकारने सार्वजनिक कर्ज उभारले तर ते समर्थनीय ठरते. कारण अशी गुंतवणूक ही उत्पादक असते. तिच्यामुळे देशातील उत्पादकता वाढून सरकारलाही जास्तउत्पन्न मिळू लागते. परिणामी कर्जाची परतफेड करणे शक्य होते.

**९) सार्वजनिक उपक्रम :-**

सरकार सार्वजनिक क्षेत्रात मूलभूत व अवजड उद्योगधंदे, यांचा विकास करून आर्थिक विकासाला प्रचंड चालना देऊ शकते. अशा उद्योगासाठी मोठ्या प्रमाणावर भांडवल गुंतवणूक आवश्यक असते. सरकारला आपल्या नेहमीच्या महसुलाच्या मार्गाने असे पुरेसे उत्पन्न मिळविता येणे कठीण असते. अशावेळी सार्वजनिक कर्जाची उभारणी करून आवश्यक भांडवल उभारणे महत्त्वाचे ठरते. सार्वजनिक क्षेत्राच्या विकासामुळे खाजगीक्षेत्रातील उत्पादन व रोजगार वाढीस चालना मिळते.

**१०) जुन्या कर्जाची परतफेड :-**

आधुनिक काळात सरकार कधी-कधी नविन खर्चाची पूर्ती करण्यासाठी नव्हे तर जुन्या कर्जाची परतफेड करण्यासाठी सार्वजनिक कर्जाची उभारणी करते. याचा अर्थ जेंव्हा जुन्या कर्जाच्या परतफेडीची वेळ येते तेंव्हा त्यासाठी लागणारा पैसा सरकार नवीन कर्ज काढून उभा करते. जुन्या कर्जावरील व्याजाचा दर जास्त असेल तर नविन कर्जे थोड्या कमी व्याजदराने मिळविण्याचा प्रयत्न केला जातो. परंतू सरकारला सर्वच कर्जाच्या बाबतीत हा मार्ग उपभोगात आणता येत नाही. कारण तसे केल्यास उत्तरोत्तर सरकारचा कर्जबाजारीपणा वाढत जाईल. त्यामुळे काही अल्पकालीन कर्जाच्या बाबतीत या मार्गाचा वापर केला जातो.

**११) लोकमत अनुकूल करणे :-**

लोकांची करदेयक्षमता कमी असल्यास किंवा फार मोठ्या प्रमाणात असंतोष निर्माण होतो. असा असंतोष टाळण्यासाठी सरकार कराऐवजी सार्वजनिक कजाृचा मार्ग अनुसरून उत्पन्न वाढविते. कधी-कधी जनतेची करदेयक्षमता अधिक असूनही लोकांना आपल्या बाजूला वळविण्यासाठी सरकार जादा कर लावत नाही आणि सार्वजनिक कर्ज उभारून आपला खर्च भागविते.

### ४.२.३.३. सार्वजनिक कर्जाचे मार्ग (Sources of Public Debt) :-

सरकार देशातील किंवा परदेशातील ज्या व्यक्ती व संस्थाकडून कर्ज उभारू शकते त्या सर्वांना सार्वजनिक कर्ज उभारण्याचे मार्ग किंवा स्त्रोत असे म्हणतात. त्यांना सार्वजनिक कर्जाची उगमस्थाने असेही म्हणतात. कोणत्याही देशातील सरकार ज्या मार्गाने सार्वजनिक कर्ज उभारते त्यांची थोडक्यात माहिती पुढीलप्रमाणे देता येईल.

**१) देशातील व्यक्ती (Individuals the country) :-**

जेंव्हा सरकारला कर्ज उभारणी करायची असते तेंव्हा सरकार आपले कर्जरोखे विक्रीस काढते. देशातील लोक सरकारचे कर्जरोखे विकत घेतात. कारण सरकारी कर्जरोखे हे गुंतवणुकीचे एक चांगले साधन समजले जाते. सरकारी कर्जरोख्यामागे सरकार उभे असल्यामुळे ही गुंतवणूक सुरक्षित मानली जाते. शिवाय त्यापासून व्याज मिळत असल्याने कर्जरोख लाभदायक ठरतात. देशातील लोकांनी सरकाी कर्जरोख्यांची खरेदी केली तर त्याचा अर्थ लोकांनी सरकारला कर्ज दिले असा होतो. त्यामुळे देशातील लोकांकडून कर्ज उभारणे हा सर्वाजनिक कर्जाचा एक महत्त्वाचा मार्ग आहे.

**२) देशातील वित्तीय संस्था (Financial Institutions of the Country) :-**

देशात व्यापारी बॅकाव्यतिरिक्त कर्जपुरवठा करणाऱ्या अन्य वित्तीय संस्था असतात. त्यांना बँकेत्तर वित्तीय संस्था असेही म्हणतात. उदा. विमा कंपन्या, विविध विश्वस्त संस्था इत्यादी. अशा संस्था सरकारी कर्जरोख्यात आपला पैसा गुंतवितात. कारण सरकारी कर्जरोख्यातील गुंतवणूक ही सुरक्षित व लाभदायकही असते. तसेच सरकारी कर्जरोख्यांत रोखता (Liquidity) बरीच असते. देशातील अर्थपुरवठा करण्याऱ्या अशा संस्थानी सरकारी कर्जरोख्यात आपल्या पैशाची गुंतवूणक केली तर त्याचा अर्थ त्या संस्थानी सरकारला कर्ज दिले असे होते. त्यामुळे सार्वजनिक कर्ज उभारण्याचा तो एक मार्ग ठरतो.

**३) देशातील व्यापारी बँका (Commercial Banks of the Country) :**

सरकार जेंव्हा कर्ज उभारण्यासाठी कर्जरोख्यांची विक्री सुरू करते तेंव्हा देशातील व्यापारी बँका सरकारी कर्जरोख्यांची खरेदी करतात. कारण बँकांनाही गुतवणुकीचे सुरक्षित व लाभदायक साधन हवे असते. तसेच कर्जरोख्यामध्ये रोखता असल्याने व्यापरी बँकांना ते गुंतवणुकीचे आकर्षक साधन वाटते. व्यापारी बँकांना ते गुंतवुणकीचे आकर्षक साधन वाटते. व्यापारी बँका स्वत:जवळील पैशाच्या सहाय्याने किंवा पतपैशाची निर्मिती करून सरकारी कर्जरोख्यांची खरेदी करतात. त्यामुळे देशातील व्यापारी बँका हा सरकारी कर्ज उभारण्याचा एक महत्त्वाचा मार्ग असतो.

**४) देशातील मध्यवर्ती बँक (Central Bank of the Country) :**

देशाची मध्यवर्ती बँक सरकारी कर्जरोखे किंवा ऋणपत्रे खरेदी करून सरकारला कर्ज देते. देशाची मध्यवर्ती बँक ही सरकारची बँक म्हणून कार्य करीत असते. देशातील व्यापारी बँकाप्रमाणेच मध्यवर्ती बँक आपल्याजवळचा

पैसा सरकारी कर्ज रोख्यात गुंतविते. मध्यवर्ती सरकार आपल्याला हवे तेंव्हा सरकारी ऋणपत्रे मध्यवर्ती बँकेला देऊन कर्ज उभारू शकते घटक राज्य सरकारे देखील मध्यवर्ती बँक ही सार्वजनिक कर्ज उभारण्याचा एक मार्ग आहे.

**५) सार्वजनिक कर्जाचे परकीय मार्ग (External Sources of Public Debt) :** देशाचे सरकार इतर देशातील व्यक्ती अर्थ पुरवठा करणाऱ्या संस्था, परकीय बँका, मोठमोठ्या कंपन्या विदेशी सरकार यांचेकडून सार्वजनिक कर्ज उभारू शकते. तसेच आंतरराष्ट्रीय वित्तीय संस्था कडूनही सरकार कर्ज घेऊ शकते. उदा. आंतरराष्ट्रीय नाणेनिधी, जागतिक बँक, आंतरराष्ट्रीय वित्त महामंडळ इत्यादी. सरकारला परदेशातून मिळणारे कर्ज हे परकीय चलनातून प्राप्त होते. परदेशातून उभारलेल्या कर्जाचा उपयोग आर्थिक विकासाची कामे, युद्धखर्च व युद्धसाहित्य खरेदी, विदेणी देणी देणे इत्यादीसाठी करता येतो. घटक राज्य सरकारांना केंद्र सरकारच्या मान्यतेने विदेशातून कर्ज उभारतो येते. विशेषत: विकसनशी देशाना विदेशातून मिळणाऱ्या कर्जाचे अनन्यसाधारण असे महत्त्व असते. अर्थात अशा विदेशी कर्जाची सरकारला विदेशी चलनात कर्जफेड करावी लागते.

### ४.२.३.४ सार्वजनिक कर्जाचे वर्गीकरण (Classification of Public) :-

आधुनिक काळात सरकारे विविध प्रकारांनी कर्ज उभारतात. कर्जाच्या स्वरुपात रचनेत, कालावधी उद्देश इत्यादी बाबतीत भिन्नता असल्यामुळे सार्वजनिक कर्जाचे वेगवेगळ्या पद्धतीने वर्गीकरण केले जाते.

**१) अंतर्गत कर्जे आणि बाह्य कर्जे (Internal and External Debt) :-**

सार्वजनिक कर्ज उभारण्याच्या क्षेत्रानुसार हे वर्गीकरण केले जाते. **अंतर्गत कर्जे :** जेंव्हा सरकार स्वत:च्या देशातील व्यक्ती आणि संस्थाकडून कर्जे घेते तेंव्हा ते अंतर्गत कर्ज असते. उदा. भारत सरकारने भारतातील व्यक्ती आणि संस्थाकडून कर्ज उभारले तर ते अंतर्गत कर्ज होय. अंतर्गत कर्ज हे देशाच्या चलनामध्ये घेतले जाते. अशा कर्जामुळे देशातील पैसा देशातच राहतो. त्यामुळे अर्थव्यवस्थेचे कोणतेही नुकसान होत नाही. त्याचप्रमाणे अंतर्गत कर्जाचा देशाच्या राष्ट्रीय उत्पन्नावर कोणताच परिणाम होत नाही कारण देशातील कर्ज देणारी व्यक्ती ही करदेणारी देखील असते. त्याने दिलेल्या करातून त्याच्या कर्जावरील व्याज त्याला दिले जाते. त्यामुळे या कर्जावरील व्याजाचा देशातील उत्पादनक्षमतेवर प्रत्यक्षरित्या होत नाही. तसेच देशांतर्गत कर्जामुळे देशातील एकूण क्रयशक्तीत बदल होत नाही. कारण धनको व ऋणको हे एकाच देशाचे असतात.

अंतर्गत कर्जामुळे देशाच्या स्वातंत्र्यावर कोणत्याही प्रकारची बंधने येत नाहीत. या कर्जाचा उपयोग देशातील उत्पन्नातील विषमता कमी करण्यासाठी करता येतो. देशांतर्गत कर्ज हे स्वेच्छेने घेतले जाऊ शकते किंवा सक्तीने घेतलेजाऊ शकते. अंतर्गत कर्जाच्या बाबतीत एक महत्त्वाची गोष्ट लक्षात घेतली पाहिजे ती म्हणजे ही कर्जे घेतल्यामुळे त्या पैशाचा इतर कर्यासाठी वापर होऊ शकत नाही. सरकार

**बहिर्गत कर्जे :** सरकार दुसऱ्या देशातील व्यक्ती, संस्था/किंवा आंतरराष्ट्रीय संस्थाकडून कर्जे घेते त्यांना बहिर्गत कर्जे असे म्हणतात. उदा. भारत सरकारने कर्जे घेतले त्यांना बहिर्गत कर्जे असे घेतले तर ते भारताचे विदेशी कर्ज होय. ही कर्जे दुसऱ्या देशाच्या चलनात प्राप्त होतात. बहिर्गत कर्जामुळे देशातील क्रयशक्तीत वाढ होते. परंतू जेंव्हा ती कर्जे परत केली जातात. तेंव्हा देशातील क्रयशक्ती कमी होते. मात्र बाह्य कर्जामुळे देशाला त्या कर्जाच्या उत्पादकतेचा लाभ मिळतो. बाह्य कर्जामुळे आर्थिक विकास आणि विनिमयदराचे स्थैर्य हे उद्दिष्ट साध्य येते. परंतू विदेशी कर्जामुळे देशाच्या स्वातंत्र्यावर बंधने येण्याची मोठी शक्यता असते. कारण कर्जे देशात विदेशी सरकार किंवा आंतरराष्ट्रीय वित्तीय संस्था कर्ज घेणाऱ्या देशावर जाचक आर्थिक व राजकीय अटी लादत असतात. हा विदेशी कर्जाचा सर्वात मोठा तोटा आहे. तसेच सतत विदेशी कर्ज घेतले व त्याची परतफेड लांबणीवर टाकणे असे घडल्यास अशा कर्जाचा भार जनतेला सहन करावा लागतो.

**२) उत्पादन कर्जे आणि उनुत्पादक कर्जे (Productive and Unproductive) :-**

सार्वजनिक कर्जाच्या उपयोगाच्या आधारे त्यांचे उत्पादक आणि अनुत्पादक कर्जे असे वर्गीकरण करता येते.

**उत्पादक कर्जे :** जी कर्जे उत्पादक निर्माण करण्यासाठी वापरली जातात त्यांना उत्पादक कर्जे असे म्हणतात. अशा उत्पादक कर्जाच्या वापरांतून सरकारला उत्पन्न मिळते त्याच्या आधारे कर्जाचे व्याज व मुद्दल परत करता येते. सरकारने उत्पादकता वाढविण्यासाठी केलेली कोणतीही गुंतवूणक किंवा प्रकल्प जर गुंतवणूक केलेल्या भांडवलावरील व्याज आणि झीज खर्च भरून काढण्याइतके उत्पन्न दोन असेल तर त्यासाठी काढलेले कर्ज हे उत्पादक कर्ज समजले जाते. उदा. रेल्वे, वीजकेंद्रे लोखंड व पोलाद, सिंचन योजना इत्यादीसाठी कर्जाचा वापर केल्यास ते उत्पादक कर्ज ठरते. येथे उत्पादक या शब्दाचा अर्थ संकुचित घेतला आहे. व्यापक अर्थाने 'उत्पादक' हा शब्द घेतला तर अनेक सरकारी खर्चाचा त्यामध्ये समावेश करावा लागेल. उदा. सरकारने समाजहिताच्यादृष्टीने उपयुक्त अशा प्रकल्पावर खर्च केला आणि त्यापासून खर्च भरून निघेल व परतफेडीची सोय होईल एवढे उत्पन्न मिळाले नाही. तरी व्यापक अर्थाने हा खर्च उत्पादकच समजला पाहिजे. समाजाच्या अंतिम हिताची कसोटी लावून मोबदल्याची फारशी अपेक्षा न ठेवता सरकारने प्रकल्प चालविले तरी त्यासाठीचे कर्ज हे व्यापक अर्थाने उत्पादकच ठरते. उदा. शिक्षण, आरोग्य, मनोरंजन इत्यादी

**अनुत्पादक कर्जे :–** ज्या कर्जाच्या रक्कमेच्या उपयोग कोणत्याही प्रकारची मत्ता निर्माण करण्यासाठी केला जात नाही अशा कर्जाला अुनत्पादक कर्जे असे म्हणतात. दुसऱ्या शब्दात सांगावयाचे झाल्यास सरकार ज्या कर्जाचा उपयोग अतिरिक्त उत्पन्न मिळविण्यासाठी करत नाही ते कर्ज अनुत्पादक होय. युद्धखर्चासाठी किंवा नैसर्गिक आपत्ती निवारणासाठी घेतलेले कर्ज हे अनुत्पादक कर्ज समजले जाते. उदा. भूकंप, महापूर, वादळ, दुष्काळ यांच्या निवारणासाठी घेतलेली कर्जे.

### ३) ऐच्छिक कर्ज आणि सक्तीचे कर्ज : (Voluntaey and cmpulsory Debts) :-

सरकार कर्जे घेताना त्यासाठी सक्ती करते की नाही या अधारावर हे वर्गीकरण केले जाते.

**ऐच्छिक कर्ज :** जी कर्जे लोकांनी स्वखुशीने सरकारला दिलेली असतात ती ऐच्छिक कर्जे होत. बहुतांशी सार्वजनिक कर्जे ही ऐच्छिकच असतात. देशातील लोक सरकारला राष्ट्रप्रेमाच्या व मदतीच्या भावनेने कर्ज देतात. तसेच सर्व बाह्य कर्जे ही ऐच्छिकच असतात. लोकांनी स्वत:हून कर्जे द्यावीत यासाठी व्याजाचा दर, करातून सूट इत्यादी आकर्षक सवलती सरकार जाहीर करते. संकटाच्यावेळी सरकारने असे आवाहन केल्यास सरकारला मोठ्या प्रमाणावर कर्ज उपलब्ध होऊ शकते. जर सरकार योग्यपद्धतीने लोकांना आवाहन करत नसेल किंवा लोकांचा सरकारच्या कार्यावर विश्वास नसेल तर मात्र मोठ्या प्रमाणात कर्ज उभारता येत नाही.

**सक्तीची कर्जे :** जेंव्हा ऐच्छिक कर्जाद्वारे अपेक्षेइतके कर्ज उभारता येत नाही तेंव्हा सरकार लोकांवर सक्ती करते. अशा प्रकारे सक्ती करून लोकाकडून जी कर्जे जमा केली जातात त्याना सक्तीची कर्जे असे म्हणतात. युद्ध, नैसर्गिक संकटे, आर्थिक संकटे येतात तेंव्हा सरकार सक्तीने लोकाकडून कर्जे वसुल करते. भारतात १९६२ मध्ये सुरू केलेली सक्तीची बचत योजना हा सक्तीच्या कर्जाचाच एक प्रकार होता. अशा कर्जामुळे लोकांची बचत होते. तसेच संकटाच्यावेळी या कर्जाद्वारे सरकारला हुकमी पैसा प्राप्त होतो. सक्तीने घेतलेले कर्ज हे करासारखेच ठरते. परंतू त्या दोहोमध्ये एक महत्त्वाचा फरक असतो तो म्हणजे सक्तीने घेतलेले कर्ज सरकार परत करणार असते. सर्वसाधारणपणे लोकांचा सक्तीच्या कर्जाला विरोध असतो. कारण सरकारने कोणत्याही प्रकारे केलेली सक्ती लोकांना आवडत नसते.

### ४) निधिक कर्जे आणि अनिधिक कर्जे (Funded and Unfunded Debts) :-

कर्ज परतफेडीसाठी लागणाऱ्या कालावधी नुसार हे वर्गीकर केले जाते.

**निधिक कर्जे :** ज्या कर्जाच्या परतफेडीचा कालावधी निश्चित नसतो किंवा बराच मोठा असतो त्यांना निधिक कर्जे असे म्हणतात. या कर्जाची परतफेड एक वर्षानंतर केली जाते किंवा केलीच जात नाही. अशी कर्जे सरकार कायमच्या गरजा भागविण्यासाठी घेत असते. सरकार अशा कर्जाच्या बाबतीत मुद्दल किंवा व्याज यापैकी एकाची फेड निवडू शकते. इग्लंडमध्ये निधिक कर्जाचे मुद्दल कधीच परत केले जात नाही. परंतु त्याचे व्याज नियमितपणे द्यावे लागते. असे कर्ज हे दीर्घकाळासाठी असते. म्हणजे या कर्जाची परतफेड अनिश्चित काळापर्यंत पुढे ढकलता येते. सरकार आपल्या सोयीनुसार अशा कर्जांची परतफेड करू शकते या कर्जाचा फायदा म्हणजे सरकारला ही कर्जे ताबडतोब परत करावी लागत नाहीत. असे कर्ज हे सरकारच्यादृष्टीने अत्यंत सोयीचे असते. युद्धासारख्या परिस्थितीत सरकारला असे कर्ज काढता येते. अशा कर्जांना रोख्यांचा आधार असतो. म्हणून ती कर्जदात्यांना भरवशाची वाटतात. अशा कर्जाच्या परतफेडीसाठी करकार एका निधीची स्थापना करते म्हणून त्याना निधिक कर्जे असे म्हणतात.

**अनिधिक कर्जे :** ज्या कर्जाच्या परतफेडीचा कालावधी निश्चित असतो अशा कर्जाना अनिधिक कर्जे किंवा अल्पकालीन कर्जे असे म्हणतात. भारतात ज्या कर्जाची परफेउ एक वर्षाच्या आत केली जाते त्यांना निधिक कर्जे असे म्हणतात. भारतातील कोषागार ऋणपत्रे (Treasury Bills) ही अशा प्रकारची कर्जे आहेत. या प्रकारच्या कर्जाची काटी वैशिष्ट्ये आहेत. ती म्हणजे

१) हे कर्ज अल्पकालावधीसाठी असल्यामुळे धनकोच्या दृष्टीने सोयीचे असते.

२) हे कर्ज निश्चित वेळी किंवा त्यापुर्वीही परत करता येतात.

३) या कर्जाचा उपयोग प्रामुख्याने सरकारच्या तातडीच्या खर्चासाठी केला जातो.

४) या कर्जाचा भार सरकारवर फार काळ राहत नाही.

५) या कर्जाची रक्कम किंवा संख्या वाढली तर त्याचे निधीक कर्जात रूपांतर करता येते.

६) या कर्जाच्या परफेडीसाठी कोणताही निधी निर्माण केला जात नाही म्हणून त्याला निधिक कर्ज असे म्हणतात.

**५) शोध्यकर्जे आणि अशोध्य कर्जे (Redeemable and Irredeemable Debts) :-**

कर्जाच्या परतफेडीच्या अटी लक्षात घेऊन हे वर्गीकरण केले जाते.

**शोध्य कर्जे:** ज्या कर्जाची भविष्यात एका निश्चित तिथीला परतफेड करण्याचे आश्वासन सरकार देत असते त्या कर्जाना शोध्य कर्जे असे म्हणतात. या कर्जाच्या बाबतीत सरकार वचनबद्ध असल्यामुळे त्याचे मुद्दल आणि व्याज परफेडीची व्यवस्था सरकारला करावी लागते. या कर्जाच्या परतफेडीसाठी सरकारने कराद्वारे पैसा उभारण्याचे ठरविले तर सरकारला जुन्या करांचे दर वाढवावे लागतात किंवा नविन कर आकारावे लागतात. त्यामुळे या कर्जाच्या परतफेडीच्या वेळी जनतेवर कराचा भार पडतो.

या कर्जाना स्थायी कर्जे (Perpetual lons) असेही म्हणतात. या कर्जाचे कालावधीच्या आधारे अल्पकालीन, मध्यम कालीन आणि दीर्घकालिन कर्जे असे तीन प्रकार भाग पडतात. अल्पकालीन कर्जे सर्वसाधारणपणे तीन, सहा किंवा नऊ महिन्यांच्या कालावधीत परिपक्व होतात. कोषागार ऋणपत्रे ही या प्रकारची कर्जे होत. या कर्जावरील व्याजदर अतिशय कमी असतात. दीर्घकालीन कर्ज हे साधारणपणे दहा वर्षानंतर परिपक्क होतात आणि त्यावरील व्याजदर जास्त असतो. या दोन कर्जाच्या मध्ये जी कर्जे असतात त्याना मध्यमकालीन कर्जे असे म्हणतात. या कर्जाचा कालावधी साधारणपणे पाच वर्षांचा असतो.

**अशोध्य कर्जे :** ज्या कर्जाच्या परतफेडीबाबत सरकारने कोणतेही अभिवचन दिलेले नसते अशा कर्जाला अशोध्य कर्ज असेम्हणतात. सरकारकडून या कर्जाचे व्याज एका निश्चित दराने दिले जाते. या कर्जाची परतफेड केली जात नाही असे नाही. परंतु त्यांची निश्चित मुदत, किंवा निश्चित दृष्टा ठरविलेला नसतो. या कर्जाची संख्या फार मोठी नसते. सरकार या कर्जाची परतफेड करताना कर आकारून रक्कम

प्राप्त करते. त्यामुळे करारोपणाचा भार जनतेला सहन करावा लागतो. मात्र अशी कर्जे फारशी नसल्यामुळे कराचा भार मोठा नसतो.

**६) श्रीमती उर्सुला हिक्स् यांनी केलेले कर्जाचे वर्गीकरण :–** सार्वजनिक कर्जाची उत्पादकता लक्षात घेऊन श्रीमती उर्सुला टिक्स् यानी कर्जाचे खालील तीन प्रकार केले आहेत.

अ) मृतभार कर्जे (Dead Weight Public Debt) ज्या कर्जाच्या परतफेडीसाठी सरकारजवळ आवश्यक मूल्याइतकी मत्रा किंवा संपत्ती नसते तेंव्हा अशा कर्जाची परतफेड कर आकारणीद्वारे केला जाते. म्हणून त्यांना मृतभार कर्जे असे म्हणतात. अशी कर्जे सर्वसाधारणपणे उनुत्पादक कार्यासाठीच घेतलेली असतात. उदा. युद्धखर्च.

**ब) निष्क्रीय कर्जे (Passive Debt) :-** जे कर्ज सरकारने अशा कार्यासाठी घेतलेले असते की त्यापासून जनतेला उपयोगिता मिळते परंतू सरकारला उत्पन्न मिळत नाही अशा कर्जांना निष्क्रीय कर्जे असे म्हणतात. दुसरे म्हणजे अशा कर्जामुळे श्रमाची किंवा भांडवलाची उत्पादकता वाढत नाही म्हणून या कर्जाला निष्क्रीय कर्जे असे संबोधण्यात येते. उदा. सार्वजनिक बाग, प्राणीसंग्रहालय, करमणूक केंद्रे इत्यादीसाठी सरकारने कर्ज घेऊन खर्च केला तर लोकांना त्यापासून आनंद मिळतो. पण सरकारला मात्र फारसे उत्पन्न मिळत नाही.

**क) सक्रिय कर्जे (Active Debt) :-** जे कर्ज सरकारने अशा कार्यासाठी घेतलेले असते की ज्याच्यामुळे जनतेची प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षपणे उत्पादनशक्ती वाढते त्याना सक्रिय कर्जे असे म्हणतात. ही कर्जे उत्पादक स्वरूपाची असून त्यांच्याद्वारे राष्ट्रांची संपत्ती वाढण्यास मदत होते. उदा. सिंचन व्यवस्था रस्ते, लोहमार्ग, शिक्षण, आरोग्यव्यवस्था इत्यादीसाठी घेतलेली कर्जे ही सक्रीय कर्जे असतात.

**७) इतर वर्गीकरण (Other Classifications) :-** सार्वजनिक कर्जाच्या वरील प्रमुख वर्गीकरणाबरोबरच इतर काही वर्गीकरणे आहेत ती पुढीलप्रमाणे.

**१) एकूण कर्ज आणि शुद्ध कर्ज (Gross and Net Debt) :-**

कोणत्याही एका वेळी सरकारची जेवढी कर्जे असतात ती सर्व एकत्रित केली की सरकारचे एकूण कर्ज किती आहे हे समजते. यालाच सकल कर्ज असेही म्हणतात. या एकूण कर्जातून ऋणशोधून निधीसाठी बाजूला ठेवलेली रक्कम वजा केल्यानंतर जी रक्कम शिल्लक राहते त्याला शुद्ध कर्ज असे म्हणताते.

**२) व्याज साहित्य कर्ज आणि व्याजरहित कर्ज (Interest bearing and Non-Interest bearing Debts) :-**

सरकार ज्या कर्जावर कर्जदात्यांना निश्चित दराने आणि निश्चित कालावधी नंतर व्याज देते अशा कर्जाना व्याजसहित कर्जे असे म्हणतात. याउलट ज्या कर्जावर सरकार व्याज देण्याचे कोणतेही वचन

कर्जादात्यांना देत नाही अशा कर्जांना व्याजरहित कर्जे असे म्हटले जाते.

**३) विक्रेय कर्जे आणि अविक्रेय कर्जे (Marketable and non-Marketable) :-**

सार्वजनिक कर्जाचे हे वर्गीकरण कर्जाच्या विक्रशी संबंधित आहे. ज्या सरकारी ऋणपात्रांची बाजारात स्वतंत्रपणे खरेदी-विक्री केली जाते त्यांना विक्रेय कर्जे असे म्हणतात. अलिकडील काळात सरकारची बहुतांश कर्जे ही विक्रेय कर्जे आहेत. याउलट ज्या सरकारी कर्जांची ------बाजारात खरेदी-विक्री होऊ शकत नाही अशा कर्जांना अविक्रेय कर्जे असे म्हणतात. उदा. पोस्ट खात्याची बचत पत्रे ही बाजारात विकली जाऊ शकत नाहीत. ती पोस्ट खात्याकडून विकत घ्यावी लागतात आणि पोस्ट खात्यालाच परत विकावी लागतात.

**४) अविलंबीत कर्जे आणि विलंबित कर्जे- (Collable and Non - Collable Debts) :-**

सार्वजनिक कर्जाचे हे वर्गीकरण कर्जाच्या परिपक्वतेची परतफेडीशी सांगड घालण्याच्या क्रियेच्या आारे केले जाते. अविलंबित कर्जाच्या बाबतीत कर्ज घेणाऱ्याला मुद्दल परतफेउ करण्याची सवलत देलेली असते. सार्वजनिक कर्ज घेतेवेळी अशी एक तिथी निश्चित केली जाते की ज्या तिथीनंतर व परिपक्तेच्या आधी कर्जदात्याला कर्जाचे मुद्दल परत करण्याची सवलत दिलेली असते. तसेच या कर्जाच्या प्रतिस्थापनाची व पूर्ण परतफेडीची निवड करण्याचे स्वातंत्र्य ऋणकोला दिलेले असते. याउलट विलंबित कर्जाच्या बाबतीत अशाप्रकारचे स्वातंत्र्य दिलेले नसते.

वरील चार प्रकारची वर्गीकरणे ही अमेरिकेच्या सार्वजनिक कर्जाच्या बाबतीत लागू होणारी आहेत. परंतु प्रत्यक्ष व्यवहारात ह्या कोणत्याच वर्गीकरणाचा फारसा उपयोग होत नाही.

**४.२.३.५ सार्वजनिक कर्जाचा भार- (Burden of Public Debt) :-**

कर आणि सार्वजनिक खर्चामुळे देशातील एका वर्गाकडून दुसऱ्या वर्गाकडे क्रयशक्तीचे हस्तांतरण घडून येते. त्याचप्रमाणे सार्वजनिक कर्जामुळेही क्रयशक्तीचे हस्तांतरण घडून येते. कर्ज घेणे, त्यावरील व्याज देणे, व्याज देण्यासाठी कर आकारणे आणि कर्जाची परतफेड करणे या सर्वांमुळे क्रयशक्तीच्या हस्तांतरणाची एक मालिकाच तयार होते. या हस्तांतरणाचे देशातील उत्पादन, विसरण आणि आर्थिक स्थैर्य यावर परिणाम होत असतात. या परिणामातून कर्जाचा भार निर्माण होतो. सरकारच्या कर्जाच्या व्यवहारामुळे देशातील कोणत्या प्रकारे आणि किती त्याग करावा लागला याचा शोध घेणे महत्त्वाचे असते. त्यामुळे सार्वजनिक कर्जाचा भार समजून येतो. याचा अर्थ सार्वजनिक कार्जाचे परिणाम म्हणजेच कर्जाचा भार होय.

**सार्वजनिक कर्जाच्या भाराचे मापन :** कर्जाच्या भाराचे मापन हे सर्वसाधारणपणे कर्जाचे स्वरूप, कर्जाचे स्थान, आणि किंमतपातळी या तीन गोष्टींच्या आधारे केले जाते.

**१) कर्जाचे स्वरूप :- (Nature of Debt) :-**

सार्वजनिक कर्ज उत्पादक आहे की अनुत्पादक आहे यावर त्याचा भार अवलंबून असतो. सार्वजनिक कर्ज हे उत्पादक स्वरूपाचे असेल तर त्याचा समाजावर भार न पडता उलट समाजाला लाभ होईल. ज्या उत्पादक कर्यासाठी कर्ज घेतले असेल त्या कार्याची पूर्तता झाली की समाजाला त्याचे लाभ प्राप्त होतील. उदा. धरणे, कारखाने, रेल्वे, वीजकेंद्रे, इत्यादीसाठी सरकारने कर्जे घेतली तर त्या प्रकल्पांच्या पूर्ततेनंतर त्याचे लाभ समाजाला मिळतात. याउलट सरकारने जर अनुत्पादक कारणामुळे कर्ज घेतले तर त्याचा निश्चितपणे समाजावर भार पडतो. अशा कर्जाचे मौद्रीक आणि वास्तविक असे दोन प्रकारचे भार निर्माण होतात.

**२) कर्जाचे स्थान- (Place of Debts) :-**

सार्वजनिक कर्जाच्या भाराचे मापन कर्जाचे स्थान/क्षेत्र कोणते आहे यावर अवलंबून असते. सरकार आपल्या देशातील व्यक्ती व संस्थाकडून कर्ज घेते तसेच दुसऱ्या देशातील व्यक्ती व संस्था व सरकार यांचेकडूनही होते. त्यावरून सार्वजनिक कर्जाचे अंतर्गत कर्जे व बाह्य कर्जे असे दोन प्रकार पडतात. यापैकी प्रत्येक कर्जाचा भार वेगळ्या प्रकारे पडत असल्याने त्यांचा स्वतंत्र सविस्तर विचार करणे आवश्यक ठरते.

**अ) अंतर्गत कर्जाचे भार- (Burden of Internal Debts) :-**

सरकार जेंव्हा अंतर्गत कर्ज घेते तेंव्हा सरकार आणि कर्ज देणारे प्रत्येक्ष हे एकाच देशातील असतात. सर्वसाधारणपणे कोणत्याही कर्जाचे प्रत्येक्ष मौद्रीकभार प्रत्यक्ष वास्ताविकभार आणि अप्रत्यक्ष वास्तविकभार असे तीन प्रकारचे भार निर्माण होतात. अंतर्गत कर्जाच्या बाबतीत या तीन प्रकारच्या भारांची चर्चा पुढीलप्रमाणे करता येईल.

**१) प्रत्यक्ष मौद्रिक भार - (Direet Money Burden) :-**

अंतर्गत कर्जाच्या बाबतीत प्रत्यक्ष मौद्रिक भार निर्माण होत नाही. कारण सरकार आणि कर्जदाते हे एकाच देशातील असतात. त्यामुळे सार्वजनिक कर्जामुळे निर्माण होणारी ऋयशक्तीच्या हस्तातरणाची मालिका ही देशातल्या देशात चालते. सरकार जेंव्हा अंतर्गत कर्ज घेते तेंव्हा कर्जदात्याकडून ऋयशक्तीचे सरकारकडे हस्तांतरण होते. सरकारला मिळालेला हा पैसा सरकार ज्यांच्याकडून वस्तु व सेवाखरेदी करते त्यांच्याकडे हस्तांतरीत होतो. कर्जाची परतफेड करण्यासाठी सरकार करआकारणी करते तेंव्हा देशातील करदात्याकडून ऋययशक्तीचे सरकारकडे हस्तांतरण होते. कर्ज परतफेडीच्यावेळी पैसा सरकारकडून कर्जदात्यांकडे जातो. या हस्तांतरण मालिकेत देशातील पैसा सरकारकडून कर्जदात्यांकडे जातो. या हस्तांतरण मालिकेत देशातील पैसा देशातच राहतो. त्यामुळे अंतर्गत कर्जाचा प्रत्यक्ष मौद्रिक भार निर्माण होत नाही असे म्हटले जाते.

### २) प्रत्यक्ष वास्तविक भार- (Direct Real Burden) :-

क्रयशक्तीच्या हस्तांतरणामुळे उत्पन्न व संपत्तीचे हस्तांतरण घडून येते. त्याचा परिणाम समाजातील मूळच्या उत्पन्न व संपत्तीच्या वाटपावर होतो. समाजातील संपत्तीची वाटणी गरीब व श्रीमंत वर्गामध्ये झालेली असते आणि ती समान किंवा असमानही असू शकते. सार्वजनिक कर्जव्यवहारामुळे झालेल्या ऋयशक्तीच्या हस्तांतरणामुळे संपत्तीच्या वितरणात अधिक समानता झाली. म्हणजेच श्रीमंताकडून अधिकसंपत्ती गरिबांकडे गेली तर त्यामुळे समाजाला प्रत्यक्ष वास्तविक (Direct Real Burden) झाला असे म्हणता येईल.

याउलट क्रयशक्तीच्या हस्तांतरणामुळे संपत्तीचे वितरण अधिक असमान झाले. म्हणजेच गरिबांकडून श्रीमंताकडे अधिक संपत्ती गेली तर त्यामुळे प्रत्यक्ष वास्तविक भार (Direct Real Burden) निर्माण झाला असे म्हणतात. घेतलेल्या कर्जाचे मुद्दल आणि व्याज देण्यासाठी सरकार लोकांवर कर आकरणी करते. सरकार प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्ष कर आकारते. कर्ज पतरफेडीसाठी सरकारने प्रत्यक्ष कर प्रगतशीलदराने आकारले तर संपत्तीचे वाटप अधिक समान होण्यास मदत होईल. पण सरकारने प्रत्यक्ष कर प्रगतशील दराने आकारले नाहीत आणि प्रत्यक्ष कराऐवजी अप्रत्यक्ष करावर अधिक भर दिला तर कारण सरकारची व कर्जरोखे खरेदी प्रामुख्याने श्रीमंतवर्ग करतो.

संपत्तीचे वितरण अधिक असमान होईल. कारण अप्रत्यक्ष कराचा भार गरीब व श्रीमंत या दोन्ही वर्गावर पडत असला तरी तो प्रामुख्याने गरीबांवर अधिक प्रमाणात पडतो. करापासून मिळणारे उत्पन्न सरकार कर्जपरतफेडीसाठी वापरते. त्यामुळे गरिबांकडून श्रीमंताकडे संपत्ती हस्तांतरीत होते. परिणामी गरिबांची ऋयशक्ती आणि आर्थिक कल्याणही कमी होते. समाजात गरिबांची संख्या मोठी असल्याने समाजातील बहुसंख्य घटकावर प्रत्यक्षवास्तविक भार पडतो. कर्जामुळे ऋयशक्तीचे हस्तांतरण समाजातील बहुसंख्य जनतेवर प्रत्यक्ष वास्तविक भार पडतो. कर्जामुळे ऋयशक्तीचे हस्तांतरण समाजातील तरूण वर्गाकडून प्रौढ वर्गाकडे व क्रियाशील लोकांकडून निष्क्रीय लोकाकडे होत असेल तर प्रत्यक्ष वास्तविक भार अधिक तीव्र आहे असे समजले जाते. अशा प्रकारे सरकारच्या अनुत्पादक कर्जामुळे संपत्तीच्या वितणातील विषमता वाढलेली दिसून येते. सार्वजनिक कर्जाचा हा परिणाम म्हणजेच अंतर्गत सार्वजनिक कर्जाचा प्रत्यक्ष वास्तविक भार होय.

### ३) अप्रत्यक्ष रास्तविक भार : (Indirect Real Burden)

अंतर्गत सार्वजनिक कर्जाचा उत्पादनावर होणारा परिणाम म्हणजे अप्रत्यक्ष वास्तविक भार होय. सर्वसाधारणपणे सरकारची कर्जे अनुत्पादक असल्यामुळे त्यांचा उत्पादनावर विपरित परिणाम होतो. हा परिणाम म्हणजेच कर्जाचा अप्रत्यक्ष वास्तविक भार होय. हा परिणाम लक्षात घेण्यासाठी कर्जाचे पुढील तीन गोष्टीवर होणारे परिणाम पाहिले पाहिजेत.

**अ) कर्ज आणि बचत करण्याची शक्ती - (Ability to work and save)**

सार्वजनिक कर्जाची परतफेड करण्यासाठी सरकार कर आकारणी करते. ह्याचा करदात्यांच्या काम व बचत करण्याच्या शक्तीवर परिणाम होतो. करामुळे लोकांची क्रयशक्ती घटते. त्यामुळे त्यांचे राहणीमान घसरून काम करण्याची शक्ती कमी होते. तसेच या उत्पन्न घटीमुळे लोकांच्या बचत करण्याच्या शक्तीवर विपरित परिणाम होतो. म्हणजेच त्यांची बचत करण्याची शक्ती कमी होते.

अर्थात येथे हे लक्षात घ्यावे लागते की सार्वजनिक कर्ज हे अनुत्पादक असेल तर त्याच्या परतफेडीसाठी कर आकारणी करावी लागते. पण जर हे उत्पादक कार्यासाठी वापरले तर कर्जाची परतफेड त्याच्या वापरातून उत्पन्नात झालेल्या वाढीच्या आधारे करता येते. आणि ज्यांना या कार्याचा लाभ मिळतो. त्यांची काम व बचत करण्याची शक्ती वाढते. तसेच कार्ज परतफेडीसाठी सरकारने सार्वजनिक खर्चात कपात केली तर ज्यांना अशा खर्चाचे लाभ मिळतात. त्यांचे उत्पन्न कमी होते. म्हणून त्यांच्या काम व बचत करण्याच्या शक्तीवर प्रतिकूल परिणाम होतोश

**ब) काम आणि बचत करण्याची इच्छा – (Willingness to work and save)**

सार्वजनिक कर्ज परतफेडीसाठी सरकार जी कर आकारणी करते. त्यामुळे करदात्याची काम व बचत करण्याची इच्छ यावर विपरित परिणाम होतो. तसेच जे लोक सरकारी कर्जरोखे विकत घेतात. त्यांना त्यापासून नियमित व्याज–उत्पन्न मिळत राहते. त्यामुळे त्यांची काम व बचत करण्याची इच्छा कमी होते. परिणामी उत्पादन व रोजगार पातळीवर प्रतिकूल परिणाम होतो.

**क) उत्पादक साधनांचे स्थानांतरण – (Transfer of Productive Resources)**

सरकार सार्वजनिक कर्ज घेते आणि ते विविध कार्यासाठी खर्च करते. तेंव्हा देशातील उत्पादक साधनांचे खाजगी क्षेत्राकडून सार्वजनिक क्षेत्राकडे स्थानांतरण होते. हे स्थानांतरण कमी उत्पादक कार्याकडून अधिक उत्पादक कार्याकडे होते. तेंव्हा ते समाजाला लाभदायक असते. ज्या ठिकाणी खाजगी गुंतवणूकदार भांडवल गुंतवणूक करीत नाहीत. अशा ठिकाणी सरकारने सार्वजनिक कर्जाद्वारे गुंतवणूक केल्यास त्यामुळे होणारे साधनांचे हस्तांतरण उत्पादीत वाढीला अनुकूल असते. परंतु जर सरकारने सार्वजनिक कर्जाचा उपयोग अनुत्पादक कार्यासाठी केला तर त्यामुळे होणारे उत्पादक साधनांचे स्थानांतरण हे उत्पादन वाढीला प्रतिकूल ठरते. उदा– सार्वजनिक कर्जाचा उपयोग युध्द खर्चासाठी केला तर जे उत्पादक साधनांचे स्थानांतरण होते. ते उत्पादनवाढीला घातक ठरते. परंतु याबाबतीत असे म्हणता येते की सार्वजनीक कर्जामुळे वर्तमान काळातील उत्पादनावर प्रतिकूल परिणाम होत असला तरी भविष्यकालीन उत्पादनावर त्याचा अनुकूल परिणाम होतो.

**ब) बाह्य कर्जाचा भार - (Burden of External Debt)**

बाह्य कर्जे ही परदेशातील धनकोकडून व सरकारकडून घेतलेली असतात. या कर्जाच्या बाबतीतही संपत्तीचे हस्तांतरण होत असते. आणि ते देशातल्या देशात न होता देशातून परदेशात होते. त्यामुळे बाह्य कर्जाचा भार

निर्माण होतो. हा भारही तीन प्रकारचा असतो.

**१) बाह्य कर्जाचा प्रत्यक्ष मौद्रीक भार : (Dierct Money Burden of External Debt)**

सरकार जेंव्हा बाह्य कर्ज घेते तेंव्हा धनको देशाकडून ऋणको देशाकडे पैशाचे हस्तांतरण होते आणि जेंव्हा अशा कर्जाची परतफेड केली जाते. तेंव्हा ऋणको देशाकडून धनको देशाकडे पैशाचे हस्तांतरण होते. सरकारने विदेशी कर्जाचा उपयोग युध्दासारख्या अनुत्पादक कारणासाठी केला असेल तर त्या विदेशी कर्जाचा संपूर्ण रकमेचा भार ऋणको देशावर पडतो. कारण त्याची परतफेड करवाढीतून किंवा जनतेच्या बचतीतून केली जाते. त्यामुळे राष्ट्राचे मौद्रिक भार निर्माण होत नाही. परंतु बाह्य कर्जाचा प्रत्यक्ष मौद्रीक भार निर्माण होतो.

**२) बाह्य कर्जाचा प्रत्यक्ष वास्तविक भार : (Dierct Real Burden of External Debt)**

बाह्य सार्वजनिक कर्जाच्या परतफेडीमुळे ऋणको राष्ट्राच्या आर्थिक कल्याणात जी प्रत्यक्ष घट होते तिला बाह्य कर्जाचा प्रत्यक्ष वास्तविक भार असे म्हणतात. बाह्य कर्जाच्या परतफेडीसाठी सरकार कर आकारणी करते. ह्या कर आकारणीचा भार श्रीमंतावर अधिक व गरीबावर कमी पडत असेल तर बाह्य कर्जाचा प्रत्यक्ष वास्तविक भार कमी असतो. याउलट जर अशा कर आकारणीचा भार गरीबावर अधिक व श्रीमंतावर कमी पडत असेल तर बाह्य कर्जाचा प्रत्यक्ष वास्तविक भार हा जास्त असतो. बाह्य कर्जाच्या परतफेडीची रक्कम धनको राष्ट्र जर ऋणको राष्ट्रातून वस्तू व सेवा खरेदी करण्यासाठी वापरत असेल तर त्या प्रमाणात ऋणको देशातील जनतेचा वस्तू व सेवांचा उपभोग कमी होतो. समाजाच्या उपभोगातील ही घट म्हणजेच आर्थिक कल्याणात झालेली घट होय.

**३) बाह्य कर्जाचा अप्रत्यक्ष वास्तविक भार : (Indirect Real Burden of External Debt)**

बाह्य कर्ज परतफेडीसाठी सरकारने करवाढ केली किंवा सार्वजनिक खर्चात कपात केली तर त्याचा देशातील उत्पादन, रोजगार, तसेच लोकांच्या काम व बचत करण्याच्या शक्ती व इच्छेवर जो प्रतिकूल परिणाम होतो. तो म्हणजे बाह्य कर्जाचा अप्रत्यक्ष वास्तविक भार होय. थोडक्यात बाह्य कर्जाच्या परतफेडीमुळे देशातील उत्पादनात जे अडथळे येतात ते म्हणजे बाह्य कर्जाची अप्रत्यक्ष वास्तविक भार असतो.

**४) किंमत पातळी आणि कर्जाचा भार : (Price level and Burden of  Debt)**

कर्जाचा भार आणि किंमत पातळी यांचा संबंध असतो. जर किंमतपातळीत वाढ झाली म्हणजे पैशाचे मूल्य घटले. तर कर्जाचा वास्तविक भार वाढतो. याउलट किंमतपातळीत घट झाली तर कर्जाचा वास्तविक भार कमी होतो. सरकारने चलनविस्तार करून कर्ज परत फेड केल्यास किंवा कर्ज परतफेडीच्या रकमेचा धनको राष्ट्राने ऋणको राष्ट्रातून वस्तू सेवा खरेदी केल्यास किंमत पातळी वाढते. किंमतपातळीतील ही वाढ एका विशिष्ट मर्यादेच्याआत असेल तर, देशातील आर्थिक व्यवहाराना चालना मिळून कर्जाचा वास्ताविा भार कमी होईल. सरकारने कर्ज परत फेडीसाठी करवाढ आणि खर्च कपात केली तर त्यामुळे समानाचे वास्तविक उत्पन्न घटतेव देशातील किंमत पातळी कमी होते. किंमत पातळीतील ही घट निश्चित उत्पन्न असलेल्या लोकांची क्रयशक्ती वाढवीत असली तरी देशात मंदीसदृश्य परिस्थिती निर्माण करीत असल्यामुळे त्याचा समाजावर अधिक भार पडतो.

### ४.२.३.६ सार्वजनिक कर्जाच्या परतफेडीच्या पद्धती (Methods of Redumption)

सरकारला सार्वजनिक कर्ज व्याजासह परत फेडावे लागते. सार्वजनिक कर्जाचे आर्थिक ,सामाजिक, राजकीय परिणाम होत असतात. त्यामुळे सार्वजनिक कर्जाची शक्यतो लवकर परतफेड करणे चांगले असते. सार्वजनिक कर्जाची परतफेड करण्यासाठी सरकारला पुढील पद्धतींचा अवलंब करता येतो.

**१) ऋणनकार/ ऋणनिषेध (Debt Repudiation)**

ऋणनकार म्हणजे कर्ज परत करण्यास नकार देणे होय. सरकार घेतलेल्या कर्जाचे मुद्दल किंवा व्याज यापैकी काहीही परत करण्यास नकार देऊ शकते. सरकार कर्जनकार पूर्णपणे किंवा अंशतः देऊ शकते. तसेच अंतर्गत व बाह्य कर्जाबाबत असा नकार देऊ शकते.सार्वजनिक कर्जातून मुक्त होण्याचा हा सोपा मार्ग आहे. परंतू कर्ज नकाराचे विविध परिणाम संभवतात. तेव्हा ऋणनकाराच्या दोन्ही बाजू विचारात घ्याव्या लागतात.

ऋणनकाराची अनुकूल बाजू म्हणजे सामाजिक आर्थिक पुनर्रचनेचे ते एक साधन ठरू शकते. सरकार ज्यांच्याकडून कर्ज घेते ते श्रीमंत लोक संख्येने फार थोडे असतात मूठभर श्रीमंत लोक हाच समाजावर एक प्रकारचा अन्याय आहे असे काही लोकांचे मत आहे. तेव्हा त्यांच्याकडून घेतलेल्या कर्जाच्या परतफेडीला नकार दिल्यामुळे त्यांच्यावर होणार अन्याय हा सर्वसामान्य लोकांच्या दृष्टीकोनातून न्यायच असतो. सरकारला पुन्हा कर्जच घ्यायचे नसेल तर ऋणनकार योग्य ठरू शकेल. तसेच ऋणनकारामुळे निर्माण होणाऱ्या अंतर्गत लोकांच्या असंतोषाला किंवा दुसऱ्या देशाकडून होणाऱ्या कारवाईला तोंड देण्यास सरकार तयार असेल तर ऋणनकार देण्यास कीाही हरकत नाही ऋणनकाराची दुसरी बाजू म्हणजे ऋणनकारामुळे काही विशिष्ट लोकांवर अन्याय होतो. सरकार कर्जाच्या बाबतीतील करार पाळत नसेल तर ते अन्यायच करत असते. कर्जनकारामुळे सरकार लोकांचा विश्वास गमविते आणि भविष्यात पुन्हा कर्ज मिळण्याचा मार्ग बंद होतो. त्याचा सरकारच्या आर्थिक योजनावर विपरित परिणाम होतो. प्रत्यक्षात सर्वसाधारणपणे कोणतेही सरकार कर्ज परतफेडीस नकार देत नाही. केवळ अपवादात्मक परिस्थितीत सरकार कर्ज परतफेड नाकारू शकते. पहिल्या महायुद्धाच्या आणि जागतिक महामंदीच्या नंतरच्या काळात कर्जनकारा संबंधीच्या भाषेत व तंत्रात बराच बदल झाला आहे. ऋणनकार च्या ऐवजी दुसरे सौम्य शब्द वापरण्यात येतात. उदा. परतफेडीत खंड (Default) विलंब काळ हस्तांतरण (Transfer Moratorium) परतफेडीचे स्थागितीकरण (Suspension of Repayment) इत्यादी. अंतर्गत कर्जाच्या बाबतीत काही सरकारे अंशतः ऋणनकार करतात. उदा. कर्जावरील व्याजाचा दर मोठ्या प्रमाणात घटवितात. त्यामुळे लोकांचा – कमी प्रमाणात निर्माण होतो. थोडक्यात कर्जनकार हा अप्रिय आणि आत्यंतिक असा निर्णय असल्यामुळे बहुतेक सरकारे ऋणनकार न करता कर्जपरतफेडीचा मार्ग स्वीकारतात

**२) ऋणशोधन– (Repayment of Debt)** सार्वजनिक कर्जाच्या भारातून सुटका करून घेण्यासाठी त्या कर्जाची परतफेड करणे आवश्यक ठरते. सरकारने घेतलेल्या कर्जाची नियमितपणे व वेळेवर परतफेड करणे हा सर्वात योग्य मार्ग आहे.सार्वजनिक कर्जाची परतफेड करण्याच्या पद्धती पुढीलप्रमाणे आहेत.

**अ) कर्जखरेदी (Buying of Loans)** कर्ज परतफेड करण्याची ही जुनी पद्धत आहे.या पद्धतीत सरकार मुद्राबाजारात स्वतःची ऋणपत्रे किंवा कर्ज रोखे खरेदी करते आणि नंतर ती रद्द करते. या मार्गाने सरकार आपले थोडे थोडे कर्ज फेडू शकते. सरकार कर्जाची मुदत संपण्यापुर्वी आणि व्याजदर कमी असताना रोख्यांची व ऋणपत्रांची खरेदी करूशकते. सरकारचे अंदाजपत्रक शिलकी असेल तेव्हा ऋण खरेदी करायला हवी. परंतु या पद्धतीमध्ये कर्जफेडीच्या दृष्टीने कोणतीही सुसंबध्दता दिसून येत नाही. तसेच प्रत्यक्षात किती कर्जाची परतफेड होईल. याची कल्पना येत नाही. असे काही दोष सोडले तर ही पद्धती सरळ,सोपी आणि सोयीची आहे.

**ब) कर्ज परिशोधन निधी – (Sinking fund)** निर्माण करणे हा सार्वजनिक कर्ज परतफेडीच्या विविध मार्गापैकी सर्वात महत्त्वाचा आणि योजनाबद्ध मार्ग आहे. सरकारने आपले कर्ज परत करण्यासाठी निर्माण केलेला निधी म्हणजे कर्ज परिशोधन निधी होय. कर्ज घेतेवेळी असा एक निधी निर्माण केला जातो की त्यामध्ये दरवर्षी सरकारकडून एक निश्चित रक्कम टाकली जाते. त्यामुळे कर्जाचे मुद्दल आणि व्याज फेडण्याइतकी रक्कम जमा होते. कर्ज परिशोधन निर्माण करण्याची दुसरी एक पद्धती आहे.  त्यामध्ये सरकार नविन कर्ज घेऊन कर्ज परिशोधन निधी निर्माण करते. खऱ्या अर्थाने कर्ज परिशोधन निधी निर्माण करायचा असेल तर तो नविन कर्जाच्या नव्हे तर अंदाजपत्रकीय अधिक्यातून निर्माण केला पाहिजे. कर्ज परिशोधन निधीचा कालावधी ठरविताना काही गोष्टी विचारात घेतल्या पाहिजेत. लोकांच्यावरील कराचा भार, लोकांची करदेयक्षमता,कर्जाचा कालावधी इत्यादींचा विचार करूनच कर्ज परिशोधन निधी उभारल पाहिजे. शोधन निधीचा कालावधी हा अल्प असला पाहिजे. उत्पादक कर्ज असेल तर शोधन निधीचा कालवधी हा त्यातून निर्माण होणाऱ्या मतांच्या आयुष्याइतका असल पाहिजे. तसेच युद्ध कर्जासाठी शोधन निधी तयार करताना त्याचा कालवधी अत्यंत कमी असल पाहिजे. कारण त्यामुळे युद्धकर्जाचा अर्थव्यवस्थेवरील भार अल्प काळच राहतो.

### वार्षिक देणी (Annuity)

कर्जपरिशोधन निधीची जी वार्षिक देणी असतात ती कालावधीच्या दृष्टीने निश्चित केली जातात. सर्वसाधारणपणे वार्षिक देणीची पुढील तीन वर्गात विभागणी केली जाते.

१) स्थिर परिशोधन निधी :- या निधीत दरवर्षी जमा केली जाणारी रक्कम स्थिर म्हणजे एकसारखीच असते.

२) वाढता परिशोधन निधी – यामध्ये दरवर्षी जमा केली जाणारी रक्कम वाढत जाते.

३) घटता परिशोधन निधी –  यामध्ये दरवर्षी जमा केली जाणारी रक्कम घटत जाते.

### संकलित परिशोधन निधी (Cumulative Sinking Fund)

या निधीमध्ये प्रत्येक वर्षी काही ना काही बचतीशी भर घातली जाते. काळानुसार या निधीची रक्कम वाढत असल्यामुळे या निधीमुळे कर्ज परतफेड लवकर होऊ शकते. या निधीत दरवर्षी भर म्हणून टाकावयाची रक्कम ही कमी जास्त असू शकते. या रक्कमेवरून संकलित निधीचे पुढील तीन प्रकार पडतात.

१) पूर्ण संकलित निधीः या निधीत वर्षाच्या शेवटी जेवढी बचत होते ती सर्व भर म्हणून टाकली जाते.

२) आंशिक संकलित निधी : या निधीत वर्षाच्या शेवटी जेवढी बचत होते त्याचा काही भाग जमा केला जातो.

३) अधिक पूर्ण संकलित निधी – या निधीत वर्षाच्या शेवटी जेवढी बचत होते त्यापेक्षा जास्त भर टाकली जाते.

**कर्ज परिशोधन निधीचे प्रकार :**

सरकारने घेतलेली सर्व कर्जे सारख्याच स्वरूपाची नसतात. त्यामुळे कर्जाच्या प्रकारानुसार कर्ज परिशोधन निधीचे पुढील तीन प्रकार केले जातात.

**१) मुक्त शोधन निधी –** (Free sinking fund) जो परिशोधन निधी कोणत्याही कर्जाच्या पर फेडीसाठी वापरता येतो त्याला मुक्त शोधन निधी असे म्हणतात.

**२) विशेषोपयुक्त शोधन निधी (Attached sinking fund)** जेव्हा परिशोधन निधी हा एकाद्या विशिष्ट कर्जाच्या परतफेडीसाठी वापरला जातो त्याला विशेषोपयुक्त शोधन निधी असे म्हणतात.

**३) आंशिक मुक्त व विशेषोपयुक्त शोधन निधी–** (Partly free and partly attached sinking fund) – शोधन निधीचा हा प्रकार म्हणजे पहिल्या दोन प्रकारांचे मिश्रण आहे. कोणत्याही कर्जाच्या परतफेडीसाठी तसेच विशिष्ट कर्जाच्या परत – फेडीसाठी या निधीचा उपयोग करता येतो. त्यामुळे व्यावहारिक दृष्टीने हा प्रकार सर्वात सोयीस्कर ठरतो.

सार्वजनिक कर्जाची परतफेड करण्याच्या पद्धतीपैकी कर्ज परिशोधन निधी हा सर्वात महत्वाचा आणि नियोजनबध्द मार्ग आहे. परंतू त्याचा एक महत्वाचा दो– आहे तो म्हणजे सरकार आर्थिक अडचणीच्या काळात या निधीचा उपयोग आपली इतर देणी देण्याची वापरण्याची शक्यता असते.

**३) भांडवल कर (Capital Levy)** भांडवल कर म्हणजे करदात्यांच्या संग्रहित संपतीच्या भांडवली किमतीपर आकारलेला कर होय. हा कर आकारून सरकार कर्जाची परतफेड करू शकते. सर्वसाधारणपणे युद्ध खर्चाकरिता घेतलेल्या कर्जाची परतफेड भांडवल कर लावून केली जाते. डॉ. डाल्टन यांनी यालाच ऋणशोधन कर (Debt Redumption Levy) असे म्हटले आहे.

रिकार्डो आणि मिल यांनी इंग्लंडमध्ये या कराचा पुरस्कार केला होता. नेपोलियनबरोबर युद्ध झाले तेव्हा इंग्लंड मोठे कर्ज झाले. तेव्हा रिकार्डोने त्याच्या परतफेडीसाठी रिकार्डोने या कराची कल्पना आग्रहाने मांडली. ही कल्पना हॅन्सन, पिगु, लॉरेन्स, एजवर्थ, डॉ.डाल्टन यांनी उचलून धरली.

**भांडवल कराची वैशिष्टये :**

भांडवलकराची काही वैशिष्टये आहेत.

१) हा कर लावताना सरकारपुढे कर्जपरत फेड सामाजिक सुधारणा असे उद्देश असतात.

२) या करासोबत इतर करही लावण्यात येतात.

३) या कराबरोबर नेहमी लावला जाणारा कर म्हणजे नागरिक कर होय.

४) हा कर लावताना संपत्तीचे मूल्यमापन एकादाच केले जाते.

५) या कराची वसुली दोन प्रकारे म्हणजे कराची संपूर्ण रक्कम केवळ युद्ध कर्ज फेडण्यासाठी भांडवल कर लावू नये तर शांततेच्या काळात उभारलेल्या कर्जाचा भार हलका करण्यासाठी हा कर लावावा.

**भांडवल करावरील आक्षेप** : भांडवल कराच्या समर्थनार्थ वरील मुद्दे मांडले जात असले तरी त्या कराच्या विरोधातही काही आक्षेप किंवा मुद्दे मांडण्यात आले आहेत. ते पुढीलप्रमाणे

१) युद्धकाळात नेमकी किती संपत्ती जमा केली आणि त्या संपत्तीचे नेमके मूल्य किती? हे शोधून काढणे अत्यंत कठीण आहे

२) हा कर उधळपट्टीला उत्तेजन देणारा आहे. कारण ज्यानी काटकसर करून संपत्ती जमविली त्यांना हा कर भरावा लागतो. तर ज्यांनी उधळपट्टी करून संपत्ती जमविली नाही त्यांना या करापासून मुक्तता आहे.

३) या करामुळे जनतेच्या काम,बचत आणि गुंतवणूक करण्याच्या इच्छेवर प्रतिकूल परिणाम होऊन आर्थिक विकासात अडथळे निर्माण होतात.

४) भांडवल कराचा भार एका विशिष्ट वर्गावर पडत असल्याने त्यांच्यात असंतोष निर्माण होतो.

५) या करामुळे लोकांचा सरकारच्या वित्तीय प्रशासनावरील विश्वास कमी होतो.

६) या करामुळे परदेशातून येणाऱ्या भांडवली प्रवाहाला ओहोटी लागण्याची शक्यता आहे.

भांडवल कराच्या गुणांचा व त्यावरील आक्षेपांचा एकत्रित विचार केल्यास युद्धकाळातील कर्जाची परतफेड करण्याचा तो एक उत्तम मार्ग आहे असे डॉ. डाल्टन यांनी म्हटले आहे. भांडवल कर युद्धकाळात किंवा युद्ध सम- - लगेचच लावला तर त्याला श्रीमताकडून विरोध होणार नाही. कारण त्यांना त्याची जाणिव असते.

४) **ऋण परिवर्तन (Debt conversion)** सार्वजनिक कर्जाचा भार हलका करण्याचा आणखी एक मार्ग म्हणजे ऋण परिवर्तन होय. ऋण परिवर्तन म्हणजे जास्त व्याजदर असलेल्या कर्जाचे कमी व्याज दराच्या कर्जात रूपांतर करणे होय. या पद्धतीत कर्जाची परतफेड होत नाही तर त्याचे केवळ स्वरूप बदलते. ज्यावेळी व्याजाचा दर जास्त होता त्यावेळी सकारला केर्ज घेणे भाग पडले असेल तर व्याजाचा दर कमी झाल्यानंतर व्याजाचा भार कमी करण्याच्या दृष्टीने सरकार त्याचे कमी व्याजदराच्या कर्जात रूपांतर करते. सर्वसाधारणपणे ऋण परिवर्तन हे कर्ज परत करण्याची वेळ येते तेव्हा किंवा कर्जदात्यांनी संमती दिल्यास मुदतीपूर्वी करता येते. कर्जाचे परिवर्तन सरकारची पत चांगली असेल आणि व्याजाचा दर कमी असेल तर यशस्वी होते. तसेच कर्ज परिवर्तन यशस्वी झाले असे तेव्हांच म्हणता येईल जेव्हा त्या परिवर्तनामुळे मुद्दलात वाढ होणार नाही. कर्ज परिवर्तनाची पद्धती सोपी व लोकांना समजेल अशी पाहिजे. कर्ज परिवर्तनात काही मर्यादा आहेत. जेव्हा कर्ज परतीची एकदाच घेतली जाते किंवा टप्प्याटप्याने घेतली जाते.

५) हा कर प्रगतशील असल्यामुळे न्यूनतम करमुक्त मर्यादेवरील संपत्तीवर अधिक प्रमाणात लावण्यात येतो.

**भांडवल कराचे समर्थन** : वेगवेगळ्या अर्थशास्त्रज्ञानी या कराचे समर्थन केले. प्रा.पिगू व डॉ.डाल्टन यांनी या

करांचे भक्कम समर्थन केले आहे. या कराच्या समर्थनासाठी पुढील मुद्दे मांडले जातात.

१) युद्धासाठी काळात घेतलेले कर्ज हे अनुत्पादक असल्याने ते समाजावर मृतभार असते. म्हणून ते शक्य तेवढ्या लवकर फेडणे आवश्यक असते. त्यामुळे एकदाच भांडवल कर लावून ते कर्ज फेडणे देशाच्या हिताचे असते.

२) युद्धकाळात काही लोक भरपूर नफा मिळवून श्रीमंत झालेले असतात. त्यामुळे युद्धाच्या कर्जाची परतफेड करण्यासाठी अशा लोकांवर भांडवल कर आकारणे न्याय ठरते.

३) युद्धकाळात श्रीमंतांपेक्षा गरिबांना अधिक हाल अपेष्टा सहन कराव्या लागतात. म्हणून केवळ श्रीमंतावर लावण्यात येणारा भांडवल कर समतेच्या दृष्टीकोनातून न्याय ठरतो.

४) युद्धकाळात समाजातील तरुणवर्ग प्राण पणाला लावून लढतो. त्याचकाळात श्रीमंत धनसंचय करतात. म्हणून युद्ध कर्ज फेडण्यासाठी श्रीमंतांवर कर लावणे योग्य ठरते या संदर्भात प्रा. शिरास म्हणतात- तरुणांनी युद्धात आपले प्राण अर्पण करणे योग्य असेल तर श्रीमंतांनी कर रूपाने आपली संपत्ती दयावी हेही योग्य ठरते.

५) चलनविस्ताराला आळा घालण्यासाठी हा कर उपयुक्त ठरतो कारण या करामुळे श्रीमंताजवळील अतिरिक्त क्रयशक्ती काढून घेता येते

६) युद्धानंतर मंदी आल्यास सार्वजनिक कर्जाचा वास्तविक भार वाढतो. त्यामुळे युद्धकर्ज ताबडतोब परत करण्याच्या दृष्टीने श्रीमंतांवर भांडवली कर लावणे योग्य ठरते.

७) युद्धामुळे उत्पन्न व संपत्तीच्या वाटपातील विषमता वाढते. तेव्हा ती कमी करण्याच्यादृष्टीने भांडवल कर मदत करतो.

८) भांडवल कराद्वारे युद्धकर्जाची ताबडतोब परतफेड केली तर लोकांना भविष्यकाळात त्यासाठी करारोपण होणार नाही असे वाटून समाधान प्राप्त होते.

९) युद्धकर्ज परत करण्यासाठी दीर्घकाळ करारोपण केल्यास त्याचे व्यक्तीच्या काम बचत आणि गुंतवणूक करण्याच्या प्रेरणेवर प्रतिकूल परिणाम होते. भांडवल कर आकारून युद्धकर्ज तात्काळ फेडले तर हा परिणाम टाळता येतो. वरील मुद्दे लक्षात घेऊन डॉ. डाल्टन यांनी असे मत व्यक्त केले की वेळ निश्चितपणे ठरलेली असते तेव्हा कर्ज परिवर्तन शक्य होत नाही. दुसरे व्याजाच्या दरात घट केल्यामुळे सरकारची बचत होत असली तरी उत्पन्न करापासून मिळणाऱ्या महसूलात घट होते. कारण ज्यांच्या जवळ सरकारी कर्जरोखे असतात त्यांना आता व्याज उत्पन्न कमी मिळते. म्हणून ते आयकर कमी भरतात. प्रत्यक्षात कर्ज परिवर्तन हा कर्जाचा भार कमी करण्याचे प्रभावी साधन कधीच ठरलेले नाही. त्यामुळे त्याचा उपयोग केवळ एक सहाय्यक साधन म्हणून केला पाहिजे.

### इतर पद्धती (Other Methods)

**१) अंदाजपत्रकातील अधिक्याचा उपयोग –** सरकारचे अंदाजपत्रक शिलकी असेल तर त्याअधिक्याचा उपयोग कर्ज परतफेडीसाठी केला जातो. परंतु हल्ली सरकारचे शिल्लकी अंदाजपत्रक सहसा आढळून येत नाही.

आणि ते शिलकी असेल तर त्यातील शिल्लक किती आहे हे महत्वाचे असते. अशी शिल्लक फारशी नसेल तर त्याचा कर्ज खरेदीसाठी वापर केला जात नाही. तसेच शिलकी अंदाजपत्रकामुळे करदात्यांना सरकारने आपल्याकडून जादा कर घेऊन खर्च कमी केला असे वाटण्याची शक्यता असते. म्हणून करदात्यांना शिलकी अंदाजपत्रक आवडत नाही. त्यामुळे या पद्धतीचे महत्व केवळ तात्विक स्वरूपाचे झाले आहे.

**२) व्याजात सक्तीची घट :** जेव्हा सरकारला उच्च व्याजदराने घेतलेल्या कर्जाची परतफेड करणे शक्य नसते किंवा फार कठीण वाटते तेव्हा सरकार या पद्धतीचा वापर करू शकते. म्हणजे सरकार कर्जदात्यावर व्याजदर कमी करण्यासाठी सक्ती करते. परंतू या पद्धतीत सरकार कर्जदात्याला दिलेल्या वचनाचा भंग करीत असल्यामुळे सरकारची विश्वासार्हता कमी होते.

**३) प्रगतशील करारोपण** : कर्ज परतफेडीसाठी आवश्यक पैसा जमा करण्यासाठी सरकार वाढत्या उत्पन्नावर वाढत्या उत्पन्नावर वाढत्या दराने कर बसवू शकते. पण या पद्धतीचा वापर जपूण करावा लागतो. कारण तीव्र स्वरूपाच्या प्रगतशील करारोपणाचा बचत आणि गुंतवणूकीवर अनिष्ट परिणाम होतो.

**४) चलनविस्तार** :

सरकार चलनविस्तार करून कर्जपरत फेडीसाठी आवश्यक तरतूद करू शकते. त्यामुळे पैशाचे मूल्य घटते. परिणामी धनकोना व्याजासहित कर्जाची रक्कम परत मिळत असली तरी पैशाचे मूल्य कमी झाल्यामुळे बरेच नुकसान सहन करावे लागते.

**५) कर्जाचे पुनः शोधन :** सरकार नविन कर्ज घेऊन जुने कर्ज परत करू शकते. ज्यावेळी कर्जाचा भार बराच मोठा असतो तेव्हां सरकार या पध्दतीचा अवलंब करते. परंतू नविन कर्ज हे अधिक व्याजदराने घेतले जात असेल तर भविष्यकाळात सार्वजनिक कर्जाचा भार आणखी वाढतो.

### ४.२.३.७ कर्ज व्यवस्थापनाची तत्त्वे (Principles of Debt Management)

सार्वजनिक कर्ज व्यवस्थापनाचा संबंध कर्ज उभारण्याच्या व परतफेडीच्या पद्धतींचा देशाच्या आर्थिक परिस्थितीवर प्रतिकूल परिणाम होऊ नये याच्याशी आहे. उकट सार्वजनिक कर्ज व्यवहारामुळे आर्थिक स्थैर्य निर्माण होण्यासाठी आणि आर्थिक विकासासाठी आवश्यक असणारे भांडवल प्राप्त होण्यासाठी मदत झाली पाहिजे. त्यामुळे कर्जाचे व्यवहार करताना सरकार ही उद्दिष्टये साध्य करण्यासाठी ज्या पद्धतींचा मार्गाचा सरकार अवलंब करते त्यांचा समावेश कर्ज व्यवस्थापनात होतो.

### कर्जव्यवस्थापनाचा अर्थ व व्याख्या : (Definition of Debt Mangement)

सार्वजनिक कर्ज व्यवस्थापनाचा संबंध सार्वजनिक कर्जाचे मार्ग स्वरूप, अटी, कर्ज परिपक्वतेचा आकृतीबंध व मालकीचे स्वरूप, कर्जाची परतफेड इत्यादीशी असतो. थोडक्यात सार्वजनिक कर्ज व्यवस्थापन हे सार्वजनिक कर्ज व्यवस्थापन हे सार्वजनिक कर्जाची रचनात्मक वैशिष्ट्ये ठरविण्याशी संबंधित असते. दुसऱ्या शब्दात सांगावयाचे झाल्यास सार्वजनिक कर्ज व्यवस्थापन हे कर्ज उभारणे आणि परतफेड करण्याशी संबंधित आहे.

**सार्वजनिक कर्ज व्यवस्थापनाची तत्वे : (Principles of Public Debt Management )**

अलिकडील काळात सार्वजनिक कर्जाचे व्यवस्थापन अत्यंत महत्वाचे झाले आहे. कारण विकसित आणि विकसनशील देशातील सरकारे सार्वजनिक कर्जाचा सर्रास वापर करतात. सरकारच्या सार्वजनिक कर्ज व्यवहारांचा अर्थव्यवस्थेच्या कामकाजावर फार मोठे आणि महत्वाचे परिणाम घडून येतात. तसेच सरकारची राज्यवित्तीय आणि वित्तीय धोरणे एकमेकाशी अत्यंत निगडीत आहेत. त्यामुळे सरकारची आर्थिक उद्दिष्ट्ये साध्य करण्याच्या दृष्टीने त्यांच्यामध्ये समन्वय असणे आवश्यक आहे. त्यासाठी सार्वजनिक कर्जाचे योग्य व्यवस्थापन महत्वाचे ठरते. सार्वजनिक कर्ज व्यवस्थापनाची काही महत्वाची तत्वे आहेत. ती पुढीलप्रमाणे स्पष्ट करता येतील.

**१) सार्वजनिक कर्जावरील व्याजखर्च कमीत कमी :**

या तत्वानुसार सरकारने सार्वजनिक कर्ज उभारल्याचे व परत फेडीचे व्यवहार अशारीतीने केले पाहिजेत की व्याजरूपाने करावा लागणारा खर्च हा कमीत कमी राहिला पाहिजे. सार्वजनिक कर्ज व्यवस्थापनाचे हे सर्वात महत्वाचे तत्व आहे. कारण सरकारला कर्जावरील व्याज आणि मुद्दल परत करण्यासाठी जुन्या करांचे दर वाढवावे लागतात किंवा नविन करांची आकारणी करावी लागते. त्यामुळे जर सार्वजनिक कर्जावरील व्याजखर्च कमी असेल तर स्वाभाविकच कमी करारोपण करावे लागेल. त्यामुळे करारोपणाचे लोकांच्या काम बचत आणि गुंतवणूक करण्याच्या इच्छेवर आणि क्षमतेवर होणारे प्रतिकूल परिणाम हे अल्प असतील. देशाच्या मध्यवर्ती बँकेने आपल्या चलनविषयक धोरणाच्या माध्यमातून अर्थव्यवस्थेतील व्याजदर कमी ठेवले तर सार्वजनिक कर्जावरील व्याजखर्च किमान ठेवता येईल. कारण जेंव्हा व्याजदर कमी असतात तेंव्हा सरकारला आपले कमी व्याजदराचे कर्जरोखे बाजारात विकणे शक्य होते. परंतु असे कमी व्याजदराचे धोरण अर्थव्यवस्थेत भाववाढीची परिस्थिती निर्माण होण्यास कारणीभूत ठरत असते. त्यातून आर्थिक अस्थैर्य निर्माण होण्याची शक्यता राहते.

**२) गुंतवणूकदारांच्या गरजांची पूर्तता/समाधान : (Satisfaction of the Needs of Investors)**

काही अभ्यासकांच्या मते सरकारने सार्वजनिक कर्जाचे व्यवस्थापन अशारितीने केले पाहिजे की त्यामधून गुंतवणूकदारांच्या सरकारी ऋणपत्रांच्या प्रकाराबाबतच्या आणि अटी-शर्थींच्या बाबतीतील गरजांची पूर्तता होऊ शकेल, कारण सरकारने गुंतवणूकदारांच्या या अपेक्षा पूर्ण केल्या नाहीत तर सरकारला आवश्यक सार्वजनिक कर्ज उभारण्यात अडचणी निर्माण होतील. उदा. जर सरकारला अल्पमुदतीच्या कर्जाचे दीर्घ मुदतीच्या कर्जात रूपांतर करावयाचे असेल तर दीर्घ मुदतीच्या कर्ज रोख्यावर आकर्षक व्याजदर द्यावा लागेल. गुंतवणूकदारांना सरकारच्या नविन ऋणपत्रांची खरेदी करण्यासाठी आपल्याजवळील दीर्घ मुदतीच्या कर्जरोख्यांची कोणत्याही नुकसानीशिवाय रोख पैशात रूंपातर करण्याची मुभा देता येईल. अशावेळी सरकारच्या कर्जाची सर्वसाधारण रोखता जवळपास सारखीच राहते.

जेंव्हा सार्वजनिक कर्ज व्यवस्थानाद्वारे गुंतवणूकदारांच्या गरजांची पूर्तता केली जात नाही. तेंव्हा भांडवल बाजारात काही अडथळे निर्माण होतात. ऋणपत्रे व कर्जरोखे धारक या ना त्या कारणासाठी त्यांची विक्री करतात.

सरकारने जर गुंतवणूकदारांना उच्च व्याज देण्याचा प्रयत्न केला तर सार्वजनिक कर्जावरील व्याजखर्च वाढतो. त्यामुळे काही लोक असे प्रतिवादन करतात की सरकारने परिपक्वतेनुसार सार्वजनिक कर्जाची परतफेड करून कर्जाचा भार कमी करणे उत्तम असते. परंतु अशा कर्जफेडीसाठी सरकारने जर जादा चलननिर्मितीचा मार्ग अवलंबिला तर अर्थव्यवस्थेत भाववाढीची परिस्थिती उद्‌भवते आणि जर अतिरिक्त कर आकारणीचा मार्ग स्वीकारला तर अर्थव्यवस्थेत घसरणीची परिस्थिती निर्माण होण्याची शक्यता राहते. त्यामुळे सार्वजनिक कर्ज व्यवस्थापनाने या दोन्ही गोष्टी टाळण्यासाठी सार्वजनिक कर्ज परतफेडीच्या विविध पध्दीमध्ये समतोल राखण्याचा प्रयत्न केला पाहिजे.

### ३) अल्पकालीन कर्जाचे दीर्घकालीन कर्जात रूपांतर करणे :

### (Funding of short Term Debt into Long Term Debt)

असे प्रतिपादन करण्यात आले आहे की सार्वजनिक कर्ज व्यवस्थापनाने शक्य तेवढे अल्पकालीन कर्ज हे दीर्घकालीने कर्जाद्वारे परत करावे. विशेषत: ते कधीही परिपक्व न होणाऱ्या – ब्रिटिश कन्सोलप्रमाणे – कर्जाद्वारे परत करावे. परंतु ते अशारितीने केले जावे की त्यामुळे आर्थिक स्थैर्य अडचणीत येऊ नये. पण या धोरणाचे फायदे फार मोठे नसतात. कारण खाजगी अल्पकालीन कर्ज असते आणि त्यामुळे वित्तीय व्यवस्थापन गुंतागुंतीचे होते. दुसरे असे की या धोरणाचा अवलंब केल्यास दीर्घकालीन निधीसाठीची मागणी वाढल्याने दीर्घकालीन व्याज दर वाढतील. त्यामुळे भविष्यकाळात अंदाजपत्रकीय खर्चात वाढ होईल. त्याचवेळी अर्थव्यवस्थेतील अल्पकालीन कर्जाची मागणी कमी झाल्याने अल्पकालीन व्याजदर कमी होतील. दीर्घकालीन व्याजदरातील या अनावश्यक वाढीमुळे खाजगी क्षेत्रातील गुंतवणूकीचा दर आणि आकारमान कमी होण्याची शक्यता राहते. ज्यामुळे आर्थिक घसरण आणि बेरोजगारी वाढण्याची शक्यता निर्माण होईल. म्हणून सार्वजनिक कर्ज व्यवस्थापनाने असे कर्ज व्यवस्थापन करताना दीर्घकालीन व्याजदरात अनावश्यक मोठी वाढ होणार नाही याची खबरदारी घेतली पाहिजे. पण जर अर्थव्यवस्थेतील खाजगी क्षेत्रातल गुंतवणूक कमी करण्याची गरज असेल तर सरकार मात्र सरकार अल्पकालीन कर्जे ही दीर्घकालीन कर्जाद्वारे परत करू शकते. परंतु जर अल्पकालीन व्याजदर फार कमी झाले आणि इतर देशात ते अधिक असतील तर अल्पकालीन भांडवलाचे दुसऱ्या देशात स्थलांतर होण्याची शक्यता राहते. ते देश हिताच्या दृष्टीने चांगले नाही. त्यामुळे सरकारने या उपयाचा वापर अशारितीने केला पाहिजे की, त्याचे फारसे वाईट परिणाम होणार नाहीत आणि गुंतवणूकदारांच्या गरजांची पूर्तताही होईल.

### ४) सार्वजनिक कर्ज धोरणाचा वित्तीय व राज्यवित्तीय धोरणाशी समन्वय आवश्यक :–

### (Public Debt Policy must be Co-ordinated with Fiscal and Monetary Policy )

आर्थिक स्थैर्य राखणे आणि आर्थिक विकासाला चालना देणे यासाठी सार्वजनिक कर्ज विषयक धोरणाचा राज्यवित्तीय व वित्तीय धोरणाशी समन्वय असणे अत्यावश्यक आहे. उदा– जर सरकारने सार्वजनिक कर्जावरील व्याज खर्च कमी ठेवण्यासाठी मध्यवर्ती बँकेला अल्प व्याज दराचे धोरण अनुसरण्यास सक्ती केली तर त्यामुळे अर्थव्यवस्थेत भाववाढीची परिस्थिती निर्माण होऊन आर्थिक स्थैर्य धोक्यात येते. म्हणून सार्वजनिक कर्जविषयक

धोरणाच्या राज्यवित्तीय व वित्तीय धोरणाशी योग्य अशा समन्वयाद्वारे आर्थिक अस्थैर्याची परिस्थिती टाळली पाहिजे. थोडक्यात सार्वजनिक कर्जविषयक धोरण, राज्यवित्तीय धोरण आणि वित्तीय धोरण या तीन धोरणांची अंमलबजावणी अशाप्रकारे केली पाहिजे की त्यांच्याद्वारे आर्थिक वृध्दी आणि आर्थिक स्थैर्य साध्या करण्यास मदत होईल.

**५) कर्ज परिपक्वता, वितरण आणि कर्जधारकांचे प्रकार :**

**(Debt Maturity Distribution and Kinds of Debt holders )**

जर सार्वजनिक कर्जाचा मोठा भाग हा अल्पकालीन कर्जाचा असेल आणि अल्पकालीन कर्जाचा मोठा भाग हा जर बँकांचा असेल तर रोखतेच प्रमाण उच्च राहते आणि त्यामुळे जेंव्हा भाववाढ विरोधी धोरणाची आवश्यकता असते. अशावेळी भाववाढीच्या परिस्थितील मोठी चालना मिळते. अशारितीने सार्वजनिक कर्जाची उच्च रोखता भाववाढीचे नियंत्रण करणे कठीण करते. तसेच सरकारने अशा कर्जाची खरेदी करणे हाही भाववाढी विरोधी उपाय परिणामकारक ठरणार नाही. व्यक्तींनी धारण केलेले उच्च रोखता असणारे कर्ज हे मंदी विरोधी उपाय म्हणून वापरता येणे शक्य आहे. त्यासाठी सरकारने जर ऋणपत्रांच्या किंमती वाढविल्या तर लोक त्यांचे रोख पैशात रूपांतर करण्यास प्रेरित होतील. परिणामी त्यांच्या हातातील पैसा वाढून एकूण खर्च वाढण्यास मदत होईल.

वरील सर्व तत्वांचा साफल्याने विचार केल्यास स्वाभाविकपणे हे स्पष्ट आहे की सार्वजनिक कर्ज व्यवस्थापनाची सर्वच उद्दिष्टचे साध्य करणे शक्य असणार नाही. उदा- व्याजाचे दर कमीत कमी ठेवण्याचे धोरण स्वीकारण्यास भाववाढीची परिस्थिती उद्‌भवते आणि अल्पकालीन कर्जे दीर्घकालीन कर्जाद्वारे परत केली तर अर्थव्यवस्थेत घसरण आणि बेरोजगारी निर्माण होते. म्हणून सार्वजनिक कर्जाचे व्यवस्थापन अशारितीने केले जावे की त्याचे शक्य तितके अधिक आर्थिक लाभ प्राप्त होतील आणि कमीत कमी दुष्परिणाम सहन करावे लागतील.

**४.३ पारिभाषिक शब्द**

१. करभार - कराचा पैशातील अंतिम भार

२. करदेय क्षमता - कर भरण्याची आर्थिक क्षमता

३. कराचा अतिरिक्त भार- करामुळे वस्तूंच्या किंमत गुणोत्तरात होणाऱ्या बदलामुळे करदात्याच्या कल्याणातील घट

४. दुहेरी करारोपण - एकाच व्यक्तीवर किंवा वस्तूवर दोनदा करारोपण

५. वस्तू व सेवा कर - देशात वस्तू आणि सेवावर एकसमान कर्जाचा दराने आकारलेले कर

६. प्रत्यक वास्तविक भार - कराचा उत्पन्न वसंपत्तीच्या वितरणावर होणारा परिणाम

७. अप्रत्यक्ष वास्तविक भार- कराचा उत्पादनावर होणारा परिणाम

८. कर्ज व्यवस्थापन सार्वजनिक - कर्ज उभारणे व परतफेड करण्याचे व्यवस्थापन

**स्वयं – अध्ययन प्रश्न आणि उत्तरे**

**प्र १.(अ) योग्य पर्याय निवडा**

१. सरकार जेव्हा एकदा कर लावते तेव्हा त्यामधून जी कर प्रक्रिया निर्माण होते तिच्यामध्ये ......संकल्पनेचा समावेश होतो.

(अ) कराघात (ब) करभार (क) करसंक्रमण (ड) वरील सर्व

२. करभाराच्या औपचारिक करभार आणि प्रभावी करभार या संकल्पना ...... यांनी मांडल्या आहेत.

(अ) डॉ. डाल्टन (ब) उर्सुला हिक्स् (क) प्रा. मसग्रेव्ह (ड)यापैकी एकही नाही.

३. करामधील विविधता टाळून केवळ जमिनीच्या उत्पन्नावर कर आकारल जावा असे ..... सिद्धांताने प्रतिपादन केले.

(अ) केंद्रीकरण (ब) विकेंद्रीकरण (क) आधुनिक (ड) सर्व

४. जेव्हा पुरवठ्याची लवचिकता ही मागणीच्या लवचिकतेपेक्षा अधिक असते तेव्हां कराचा ..... भाग हा खरेदी दाराला सहन करावा लागेल.

(अ) संपूर्ण (ब) अर्धा (क) मोठा (ड) यापैकी एकही नाही.

५. करारोपणाच्या सिद्धांताने उत्पन्न आणि संपत्तीच्या वाटपात समानता आणण्याचा प्रश्न विचारात घेतला नाही.

(अ) लाभ (ब) करदेय क्षमता (क) दोन्ही (ड) यापैकी कोणतेही नाही

६. करदेय क्षमता तत्वाचे समर्थन ....... याच्या आधारे केले आहे.

अ) मनोवैज्ञानिक आधार ब) उत्पन्नाची घटती सीमांत उपयोगिता क) आर्थिक सामर्थ्य ड) वरील सर्व

७) पर्याप्त कर आकारणीमध्ये ....... पातळीवरील निर्णय महत्वाचे असतो.

अ) कर आकारणीची एकूण रक्कम आणि तिचे प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष करातील विभागणी

ब)प्रत्यक्ष करांची रचना व दरपत्रक क) अप्रत्यक्ष करांची रचना व दरपत्रक ड) वरील सर्व

८. सार्वजनिक कर्ज परतफेडीचा ....... हा सर्वात महत्त्वाचा व योजनाबध्द मार्ग आहे.

अ) कर्जखरेदी ब) कर्ज परिशोधन निधी क) भांडवलकर ड) यापैकी एकही नाही.

९. कर संक्रमणाचा आधुनिक सिद्धांत ...... यांच्या मूल्य सिद्धांतावर आधारित आहे.

अ) ॲडम स्मिथ ब) रिकार्डो क) डॉ. मार्शल ड) यापैकी एकही नाही.

१०. ...... यांच्या मते उत्पन्न व संपत्ती हे करदेय क्षमतेचे खरे माप दंड नव्हते तर उपभोग खर्च हाच खरा मापदंड आहे.

अ) प्रा. कॅल्डॉर ब) डॉ. मार्शल क) डॉ. डाल्टन ड) एजवर्थ

**(ब) एका वाक्यात उत्तरे लिहा.**

१. कराघात म्हणजे काय?

२. करभार म्हणजे काय ?

३. भेदजन्य करभार म्हणजे काय?

४. विशिष्ट करभार म्हणजे काय ?

५. कर संक्रमणाचा विकेंद्रीकरण सिद्धांत कोणी मांडला.

६. पुरवठ्याची लवचिकता आणि मागणीची लवचिकता समान असेल तर करभाराचे वितरण कसे होते.?

७. करारोपणाचा लाभ सिध्दांत काय प्रतिपादन करतो?

८. करो अतिरिक्त ओझे म्हणजे काय?

९. द्विगुण / दुहेरी करारोपण म्हणजे काय?

१०. लाफर - काय दर्शवितो?

११. वस्तू व सेवा कर म्हणजे काय?

१२. निष्क्रीय कर्जे म्हणजे काय?

१३. भांडवल कर म्हणजे काय?

१४. सार्वजनिक कर्ज व्यवस्थापनाचा अर्थ स्पष्ट करा.

**स्वयं -अध्ययन प्रश्नांची उत्तरे**

**प्र १. अ) योग्य पर्याय निवडा.**

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १) ड | २) ब | ३) अ | ४) क | ५) अ |
| ६) ड | ७) ड | ८) ब | ९) क | १०) अ |

**प्र.१ ब) एका वाक्यात उत्तरे**

१) कराचा पैशातील तात्कालिक भार ज्याच्यावर पडतो त्याचे बरोबर कराचा आघात झाला असे म्हणतात.

२) करभाराचा संबंध हा कराच्या पैशातील अंतीम भाराशी असतो. ज्या व्यक्तीला शेवटी कराचे पैशातील ओझे सहन करावे लागते तिच्यावर करभार पडत असतो.

३) जेव्हा दोन करापासून समान उत्पन्न गृहित धरले असते अशावेळी जर एका कराऐवजी दुसरा कर लावला तर त्याचे उत्पन्नाच्या वितरणावर जे परिणाम घडून येतात त्यांना भेदजन्य करभार असे म्हणतात.

४) सरकारच्या वास्तव स्वरूपातील खर्चात कोणताही बदल न होता केवळ कर धोरणामध्ये बदल केल्यामुळे

समाजाच्या उत्पन्न वितरणात होणाऱ्या बदलाला विशिष्ट करभार असे म्हणतात.

५) करसंक्रमणाचा विकेंद्रीकरण सिद्धांत फ्रेंच अर्थशास्त्रज्ञ मॅन्सफिल्ड आणि कॅनार्ड यांनी मांडला आहे.

६) पुरवठ्याची लवचिकता व मागणीची लवचिकता समान असेल तर विक्रेता आणि खरेदीदार यांच्यामध्ये करभाराचे समान वितरण होते.

७) सरकारने पुरविलेल्या वस्तू व सेवापासून लोकांना मिळणाऱ्या लाभाच्या प्रमाणात त्यानी कर भरला पाहिजे असे लाभ सिद्धांत प्रतिपादन करतो.

८) कर आकारणी केल्यामुळे वस्तूंच्या किंमत गुणोत्तरात बदल घडून येतो. त्यामुळे उपभोक्त्याला कराव्या लागणाऱ्या खर्चाच्या पुनर्वितरणामुळे त्याच्या कल्याणाच्या पातळीत जी घट होते त्यालाच कराचा अतिरिक्त भार म्हणतात

९) सरकारने एकाच व्यक्तीवर किंवा करआधारावर एकापेक्षा जास्त वेळा कर आकारणी करणे म्हणजे दुहेरी करारोपण होय.

१०) लाफर – कराचे दर आणि करापासून मिळणारे उत्पन्न यांच्यातील विशिष्ट संबंध दर्शवितो.

११) देशातील वस्तू व सेवावर एक समान दराने एकच कर आकारणे या वस्तू व सेवा कर (GST) असे म्हणतात.

१२) जी कर्जे सरकारने अशा कार्यासाठी घेतलेले असते की त्यापासून जनतेला उपयोगिता मिळते परंतू सरकारला उत्पन्न मिळत नाही अशा कर्जाना निष्क्रीय कर्जे असे म्हणतात.

१३) भांडवल कर म्हणजे करदात्यांच्या संग्रहित संपत्तीच्या भांडवली किंमतीवर आकारलेला कर होय. सर्वसाधारणपणे युद्धासाठी घेतलेल्या कर्जाच्या परतफेडीसाठी भांडवल कर आकारला जातो.

१४) सार्वजनिक कर्ज व्यवस्थापनाचा संबंध सार्वजनिक कर्जाचे मार्ग, स्वरूप,अटी कर्ज परिपक्वतेचा आकृतीबंध व मालकीचे स्वरूप आणि कर्जाची परतफेड इत्यादीशी असतो.

**४.५ सारांश :**

१) करप्रक्रियेमध्ये कराघात, करसंक्रमण आणि कारभार या तीन संकल्पनांचा समावेश होतो. सरकारने कर लावल्यावर तो भरण्याची कायदेशीर जबाबदारी ज्याच्यावर असते त्याच्यावर कराघात होतो. करदात्याकडून करभार दुसऱ्यावर ढकलण्याची जी क्रिया होते तिला करसंक्रमण असे म्हणतात आणि कराचा भार शेवटी ज्याच्या स्थिरावतो त्याच कर भार पडला असे म्हणतात. करभाराच्या विविध संकल्पना मांडून करभाराचे खरे स्वरूप स्पष्ट करण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे. त्यामध्ये मौद्रीक भार आणि वास्तव भार अशा दोन मुख्य संकल्पना असून त्यांचे प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्ष अशा दोन उपसंकल्पना सांगण्यात आल्या आहेत. उर्सुला हिक्स, मसग्रेव्ह यांनी करभाराच्या पर्यायी संकल्पना मांडल्या आहेत.

२) करभार हा करसंक्रमणाचा अंतिम परिणाम असतो. निरनिराळ्या अर्थशास्त्रज्ञांनी कर संक्रमणाच्या तत्वांची चर्चा केली आहे. त्यामध्ये केंद्रीकरण सिद्धांत,विकेंद्रीकरण सिद्धांत आणि आधुनिक सिद्धांत यांचा समावेश होतो. कर संक्रमणाच्या प्रक्रियेवर काही व्यावहारिक व तात्विक  घटकांचा प्रभाव पडतो. प्रा.मसग्रेव्ह यांनी लॉरेंज – सहाय्याने करभाराचे मापन सुचविले आहे.

३) करारोपणाबाबत लाभ सिद्धांत आणि करदेयक्षमता सिद्धांत मांडण्यात आले आहेत. लाभ सिध्दांताने उत्पन्न व संपत्तीच्या वाटपात समानता आणण्याचा प्रश्न लक्षात घेतलेला नाही. मात्र करदेय क्षमता तत्वाने त्यावर भर दिला असून करदेय क्षमतेचे निर्धारक घटक स्पष्ट केले आहेत.

४) करारोपणाच्या विविध तत्वांचा अभ्यास केल्यानंतर एक प्रश्न निर्माण होतो. तो म्हणजे करआकारणीची पर्याप्त मर्यादा काय असू शकते. याचे उत्तर म्हणून पर्याप्त कर आकारणी निश्चित करणारे निकष आणि त्यासंबंधी महत्वाची चर्चा या घटकामध्ये करण्यात आली आहे.

५) कर आकारणीचे पैशातील भार व वास्तव भार याबरोबरच करदात्यावर एक अतिरिक्त किंवा दुय्यम भार पडत असतो. कर आकारणीमुळे करदात्यांना आपल्या खर्चाचे पुनर्वितरण करावे लागले. त्यामुये त्यांच्या अतिरिक्त भार असतो. त्यासंबंधीच्या सिद्धांताचे जुने व नवे कल्याणाचे अर्थशास्त्राच्या संदर्भात स्पष्टीकरण दिले जाते.

६) वाढता खर्च भागविण्यासाठी सकारला वाढत्या उत्पन्नाची गरज आहे. त्यासाठी सरकारला अधिक करआकारणी करावी लागते. त्यातूनच दुहेरी किंवा द्विगुण करारोपणाचा प्रश्न निर्माण होतो. द्विगुण करारोपणाचा अर्थ, त्याचे परिणाम आणि ते टाळण्यासाठी उपाययोजना यांचा अभ्यास महत्त्वाचा ठरतो. सरकारच्या वाढत्या खर्चासाठी कर महसुल पुरेशा प्रमाणात  करण्याचा प्रयत्न करताना सरकारला कराचे दर आणि त्यापासून मिळणारे उत्पन्न यांच्यातील संबंध लक्षात घ्यावा लागतो. या संबंधीचे स्पष्टीकरण ऑर्थर लाफर यांनी एका – सहाय्याने केले आहे. त्यास लाफर – असे म्हणतात.

७) अप्रत्यक्ष करांचा विचार करताना वस्तू व सेवा कर याचा विचार महत्त्वाचा ठरतो. विशेषतः त्याचा अर्थ व वैशिष्टये आणि फायदे व तोटे लक्षात घेणे आवश्यक ठरते.

८) सरकार वाढता सार्वजनिक खर्च भागविण्यासाठी सार्वजनिक कर्ज उभारणीचा मोठ्या प्रमाणात वापर करते. त्यामुळे सार्वजनिक कर्जाचा अर्थ, त्याचे मार्ग व महत्व आणि सार्वजनिक कर्जाचे वर्गीकरण यांचा अभ्यास करावा लागतो. सरकारच्या कर्ज घेणे व त्याची परतफेड करणे या व्यवहारामुळे क्रयशक्तीचे हस्तांतरण घडून येते. त्याचे देशातील उत्पादन,वितरण आणि आर्थिक स्थैर्य यावर परिणाम होत असतात.  या परिणामातून कर्जाचा भार निर्माण होतो. कर्जाचे स्थान आणि किंमत पातळी या तीन गोष्टींच्या आधारे कर्जाच्या भाराचे  मापन करता येते. यामध्ये अंतर्गत कर्जाचा भार व बाह्य कर्जाचा भार असा स्वतंत्र अभ्यास केला जातो.

९) कर आणि सार्वजनिक कर्ज सरकारला वित्तीय सामग्री उपलब्ध करून देतात. पण या दोहोमध्ये एक महत्वाचा फरक असतो. तो म्हणजे सार्वजनिक कर्जाची सरकारला परतफेड करावी लागते. सार्वजनिक कर्जाची शक्यतो वेळेवर परत– फेड करणे चांगले असते. सार्वजनिक कर्जाची परतफेड करण्यासाठी सरकारला पुढील

पद्धतींचा अवलंब करता येतो. १) ऋणनकार २) ऋणशोधन ३) भांडवल कर ४) ऋण परिवर्तन ५) इतर पद्धती

१०) अलिकडील काळात सार्वजनिक कर्जाचे व्यवस्थापन अत्यंत व महत्त्वाचे झाले आहे. सार्वजनिक कर्ज व्यवस्थापन हे कर्ज उभारणे आणि परतफेड करण्याशी संबंधित आहे. सार्वजनिक कर्ज व्यवस्थापनाची तत्वे पुढीलप्रमाणे

१) सार्वजनिक कर्जावरील व्याज खर्च कमीत कमी राहिल पाहिजे.

२) गुंतवणूकदारांच्या गरजांची पूर्तता करणे.

३) अल्पकालीन कर्जाचे दीर्घकालीन कर्जात रूपांतर करणे

४) सार्वजनिक कर्ज धोरणाचा वित्तीय आणि राज्यवित्तीय धोरणाशी समन्वय आवश्यक.

५) कर्ज परिपक्वता वितरण आणि कर्जधारकांचे प्रकार

या सर्व तत्वाचा साकल्याने विचार करून सार्वजनिक कर्जाचे व्यवस्थापन अशारितीने केले जावे की त्याचे शक्य तितके अधिक अर्थिक लाभ प्राप्त होतील आणि कमीत कमी दुष्परिणाम सहन करावे लागतील.

**४.६ सरावासाठी स्वाध्याय :–**

**प्रश्न १ टीपा लिहा.**

१) करांचा मौद्रीक भार आणि वास्तव भार

२) कर संक्रमणाचा केंद्रीकरण सिद्धांत

३) कर संक्रमणाचा विकेंद्रीकरण सिद्धांत

४) करभाराचे मापन

५) पर्याप्त करारोपण

६) द्विगुण करारोपण

७) लाफर –

८) वस्तू व सेवा कर

९) सार्वजनिक कर्जाचे मार्ग

१०) बाह्य कर्जाचा भार

११) भांडवल कर

१२) कर्ज व्यवस्थापनाची तत्वे

**प्रश्न २ दीर्घोत्तरी प्रश्न**

१) कर संक्रमणाचा आधुनिक सिद्धांत स्पष्ट करा.

२) कर संकमणावर प्रभाव टाकणारे घटक विशद करा.

३) करदेय क्षमता तत्व स्पष्ट करा.

४) द्विगुण करारोपण म्हणजे काय?द्विगुण करारोपणाचे परिणाम टाळण्यासाठी कोणत्या उपाययोजना सुचविल्या जातात?

५) सार्वजनिक कर्ज म्हणजे काय? सार्वजनिक कर्जाचे महत्त्व विशद करा?

६) सार्वजनिक कर्जाचे वर्गीकरण स्पष्ट करा.

७) सार्वजनिक कर्ज परतफेडीच्या पद्धती विशद करा.

८) सार्वजनिक कर्ज व्यवस्थापन म्हणजे काय? सार्वजनिक कर्ज व्यवस्थापनाची तत्वे स्पष्ट करा.

**संदर्भ ग्रंथ :**


1. Buchanan, J. M.(1970) The public finances, Richard D.Irwin, Homewood.
2. Jha R. (1998) Modern public Economics,Routledge, London.
3. Musgrave R.A.& P. B Musgrave,(1976) Public finance in theory and practice Megrawtill, Kogakusha,Tokyo
4. Stiglitz J.E (1986) Economics of Public sector, Narton New York.
5. Bhatia H.L (1976) public finance. Vikas Publishing House Pvt.


****